सार्क अंतर्गत येणाऱ्या कार्यक्रमांना सुदृढ करण्यासाठी कार्य गटाची योजना करण्यात आली आहे. सार्कच्या जाहिरनाम्यानुसार कार्यगट विविध प्रकल्पाचे समन्वय राखतात व प्रस्तावावर लक्ष ठेवतात. या योजना कार्यान्वित करण्यासाठी योग्य असा तांत्रिक सल्ला देणे आणि आर्थिक बाबतीत मार्गदर्शन करणे इत्यादी कार्य कार्यगटाची आहे. सध्या सार्कमध्ये जीवनतंत्रज्ञान, ऊर्जा, माहिती व दूरसंचार तंत्रज्ञान आणि पर्यटन ह्या क्षेत्रात कार्यगट अस्तित्वात आहेत.

**निरीक्षक राष्ट्रे :**

सार्क संघटनेच्या स्थापनेनंतर या भागातील विभागीय सहकार्याच्या मुद्यावर सुरू झालेल्या या चळवळीला काही वर्षात जागतिक पातळीवर ओखळ प्राप्त झाली. याच दरम्यान सार्क संघटनेवर निरीक्षक म्हणून विशेष दर्जा मिळावा म्हणून अमेरिकसह अनेक राष्ट्रांनी प्रस्ताव दाखल केले होते.[५] यातील अमेरिका, दक्षिण कोरिया यांना एप्रिल २००६ मध्ये तर युरोपीयन युनियनला ४ मार्च २००७ रोजी निरीक्षक दर्जा देण्यात आला.[६] या शिवाय सार्क संघटनेत निरीक्षक म्हणून दर्जा मिळावा यासाठी आस्ट्रेलिया, चिन, इराण, जपान, मॉरिशिस इत्यादी देशांनीही प्रस्ताव दाखल केले आहे.[७] दक्षिण आशियातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था व सर्वात मोठी लोकशाही देश म्हणून असलेली भारताची ओखळ पाहता इतर राष्ट्रांनी निरीक्षक म्हणून नेमले जाण्यासाठी हे प्रस्ताव दाखल केले असल्याचे दिसून येते.

विभागीय सहकार्यासाठी दक्षिण आशियातील देशांनी नेमकी काय पावले उचलली आहे, याचा लाभ इतर देशांना कशा प्रकारे होत आहे किंवा यात आणखी काही सुधारण्याची गरज आहे का, या बद्दल मत मांडण्याचा अधिकार निरीक्षक राष्ट्रांना आहे. प्रत्यक्ष कार्यवाहीत किंवा कामकाजात ही राष्ट्रे सहभागी होऊ शकत नाहीत. मात्र यामुळे विभागीय स्तरावर होणारे अशा संघटनाचे कामकाज अधिक मार्गदर्शपणे होऊ शकते. म्हणूनच एखाद्या विभागीय पातळीवर स्थापन होणाऱ्या संघटनेवर काही राष्ट्रांना किंवा याच प्रकारच्या विभागीय संघटनांना निरीक्षक म्हणून नेमले जाते.

**निष्कर्ष :**

दक्षिण आशियामध्ये भारतासह आठ राष्ट्रांमध्ये परस्परांबद्दल विश्वास निर्माण व्हावा हा मुख्य उद्देश समोर ठेवून स्थापन करण्यात आलेल्या सार्क संघटनेचे यशापशाचे मूल्यमापन या संघटनेच्या देशादरम्यान असलेले संबंध, आर्थिक सहकार्य आणि शांतता या आधारेच करता येऊ शकते. या देशा दरम्यान परस्पर विश्वास जेवढा निर्माण होईल तेवढा या देशातील लोकांचाही संपर्क वाढेल. आपोआपच या क्षेत्रात शांती व समृद्धी नांदू शकेल.

आज सार्कच्या स्थापनेला तीस वर्ष उलटून गेल्यानंतर या संघटनेतील सदस्य राष्ट्रांमध्ये विविध क्षेत्रातील सहकार्याच्या संधी खूप वाढल्या आहेत. तुलनेने या सहकार्याचा वेग कमी असला तरी संघटनेचा विविध देशांत कृषी, तंत्रज्ञान, विकास निधी अशी जी केंद्र स्थापन करण्यात आली. त्या माध्यमातून सदस्य देशातील संबंध निश्चितपणे सुधारले आहेत. अन्नसुरक्षेच्या दृष्टीने उभारण्यात आलेली धान्याची कोठारे, दहशतवादाच्या मुद्यावर प्रत्यार्पण करार, व्हिसा नियमात देण्यात आलेली सुट ही सकारात्मक पावले सार्कला यशाच्या मार्गावर नेणारी ठरणार आहेत. युक्त व्यापार हे सार्क सदस्य देशाचे एक स्वप्न आहे. दक्षिण आशिया सार्कच्या माध्यमातून युक्त व्यापार क्षेत्र झाले तर जगातील हे सर्वात मोठे व्यापार क्षेत्र ठरणार आहे. म्हणून चीन, जपान व अमेरिकेसारखे देश आज सार्क संघटनेशी सलगी वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. सार्कच्या वाटचालीतील भारत—पाकिस्तानाचे तणावपूर्ण संबंध हा अडसर ठरणारा मुद्दा संवेदनशील असला तरी व्यापारी सहकार्य आणि आर्थिक विकासाच्या संधी जसजशा वाढत जातील तसा तणाव कमी होऊन उत्कर्षाचे मार्ग निघतील. हा विश्वास सार्कच्या सदस्य राष्ट्रांना आहे.

**संदर्भ सूची :**


(१) *www.isrj.org भारताचे परराष्ट्र धोरण आणि सार्क राष्ट्रे रिर्सच पेपर*

(२) *तोडकर बी.डी., 'तुलनात्मक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१०*

(३) *प्रा. संदीप केशव पगार, 'दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना—सार्क'*

(४) *भारत, दक्षिण आशिया आणि सार्क Google Search pdf*

(५) *SAARC to grant observer status to USS Korea, EU, Hindustan Time, 2 August, 2006*

(६) *Wakur Rahman, "Usand S. Korea to observe SAARC", BBC News, 11 April 2008*

(७) *"Iran requests for observer status in SAARC", China Daily, 4th March, 2007*

# भारत -बांग्लादेश संबध

**डॉ. अर्जुन जी. येरगे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संशोधन मार्गदर्शक, श्री संपतराव माने महाविद्यालय, खानापूर जि. सांगली संलग्नित , शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ई–मेल, arjunyerge@gmail.com*
*Mobail-9637462647*

**प्रास्ताविक –**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांमध्ये गेल्या 50 वर्षांमध्ये अनेक स्थित्यंतरे आली आहेत. बांगलादेशची निर्मिती हे पाकिस्तानच्या संस्थापकांचे सर्वात मोठे अपयश आहे. भारतीय उपखंडातील मुसलमान हे एक राष्ट्र असून ते भारतापेक्षा वेगळे आहेत, ही त्यांची भूमिका अवघ्या 25 वर्षांमध्ये खोटी ठरली. भारताच्या सहकार्याशिवाय बांगलादेश अस्तित्वात येऊ शकला नसता. बांगलादेश निर्माण होताना झालेला हिंसाचार भयकारी होता. 20-30 लाख लोकांच्या हत्या झाल्या.४ ते ५ लाख महिलांचे शिलहरण करण्यात आले . यामध्येही तेथील हिंदूंचे सर्वाधिक हाल झाले. स्वातंत्र्यानंतरही पूर, दुष्काळ आणि गरिबी यामुळे बांगला देश अनेक वर्षे कडेलोटाच्या उंबरठ्यावर होता.

भारताचे अनुकरण करून बांगलादेशने अंगीकारलेली समाजवाद, बंगाली राष्ट्रवाद आणि सेक्युलरिझमवर आधारित लोकशाही व्यवस्था अल्पजीवी ठरली. अवघ्या 5 वर्षांमध्ये लष्करी राजवट आली आणि ती पुढील 15 वर्षे टिकली. त्यानंतर 1990च्या दशकात पुन्हा एकदा लोकशाही प्रस्थापित झाली, तरी ती आत्मविश्वासाने स्वतःच्या पायावर उभी राहू शकली नाही. लष्करी राजवटीच्या आणि बांगलादेशनॅशनॅलिस्ट पार्टीच्या काळात सेक्युलरिझमचीजागा इस्लामने घेतली. भारताविरुद्ध विष कालवायचे प्रयत्न करण्यात आले. पण 2009 सालापासून बांगलादेशमध्ये परिवर्तन घडू लागले. आवामी लीगच्या शेख हसीना पंतप्रधान बनल्या आणि आजवर कायमही राहिल्या. भारताशी वाकड्यात शिरल्यास बांगलादेशला भविष्य नाही, याची यथायोग्य जाणीव बांगलादेशच्या शेख हसीनांना आहे.

भारताच्या दृष्टीने बांगलादेश दक्षिण आशियाई क्षेत्र आणि हिंद प्रशांत क्षेत्रात एक प्रमुख भागीदार म्हणून महत्त्वपूर्ण देश आहे. बांगलादेश भारताच्या एक्ट ईस्ट पॉलीसी आणि नेबेरहूड फस्ट नीतीचा सुद्धा महत्त्वपूर्ण भाग आहे. भारत सुरुवातीपासूनच आपल्या शेजारील राष्ट्रांशी मैत्रिपूर्ण संबंध ठेवण्यावर भर देत असतो. किंबहुना भारताच्या परराष्ट्र धोरणाचा तो एक भाग आहे परंतु चीन सुरुवातीपासूनच भारत व त्याच्या शेजारील देशांच्या परस्पर संबंधांमध्ये हस्तक्षेप करीत असतो. अलीकडे भारताशेजारील राष्ट्रांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चीन जास्त प्रमाणात करीत आहे. अशा प्रसंगी आर्थिक आणि सामरिक दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या बांगलादेशा सोबत भारताला मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध ठेवणे अधिकच गरजेचे आहे.

**भारत बांगलादेश परस्पर सहकार्य** :-भारत बांगलादेश यांच्यामध्ये द्विपक्षीय सहकार्याची सुरुवात 1971 मध्ये सुरू झाली होती, जेव्हा भारताने बांगलादेशाच्या समर्थनार्थ आपली शांती सेना पाठवली होती. यामुळेच या दोन्ही देशात एक भावनात्मक बंद निर्माण झालेला आहे. खालिदा झिया यांच्या बांगलादेश

नॅशनल पक्षाचा कार्यकाळ सोडला तर भारत-बांगलादेश संबंधात तणाव निर्माण झाल्याचे उदाहरण नाही .स्वातंत्र्यापूर्वी आजचा बांगलादेश भारताचा एक भाग होता जो पूर्व बंगाल( 1905 सली बंगाल च्या फाळणीनंतर)या नावाने ओळखला जायचा. 1947 सालच्या भारत पाकिस्तान फाळणी वेळेस पूर्व बंगाल पाकिस्तानला दिला गेला व पूर्व पाकिस्तान म्हणून ओळखला जाऊ लागला. 1971 च्या भारत पाकिस्तान युद्धात भारताच्या सहकार्याने पूर्व पाकिस्तान हे पाकिस्तानपासून वेगळे होऊन एका नव्या राष्ट्राला जन्म दिला. ते राष्ट्र म्हणजे बांगलादेश होय .भारत व बांगलादेश यांच्यात 4096 किलोमीटरची आंतरराष्ट्रीय सीमा असून ती ईशान्य भारतातील पाच राज्यांना लागून जाते.( पश्चिम बंगाल ,आसाम, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय).

विद्यमान पंतप्रधान शेख हसीना ह्या बांगलादेशचे प्रथम राष्ट्रप्रमुख व बांगलादेश स्वातंत्र्यसंग्रामाचे नेते शेख मुजीबुर रहमान यांच्या कन्या आहेत. 15 ऑगस्ट 1975 मध्ये पाकिस्तान समर्थक काही दहशतवाद्यांनी शेख मुजीब उर रहमान व त्यांच्या संपूर्ण परिवाराची बांगलादेशची राजधानी असलेल्या ढाका या शहरात घरात गोळ्या घालून हत्या केली होती .सुदैवाने या हत्याकांडाच्या वेळेस शेख हसीना व त्यांच्या भगिनी घरी नव्हत्या. त्यामुळे त्या वाचल्या. अशा अवघड परिस्थितीत घटनेचे गांभीर्य ओळखून भारताने शेख हसिना यांना आश्रय दिला होता .कदाचित या कारणामुळे शेख हसीना यांचे धोरण व राजकारण हे भारताच्या बाजूने झुकलेले दिसून येते. थोडक्यात सांगायचे झाले तर गेल्या दहा वर्षापासून भारत-बांगलादेश संबंध शेख हसीना यांच्या काळात चांगले आहेत.

2018 च्या अधिकृत आकडेवारीनुसार भारत व बांगलादेश यांच्यात व्यापार हा साधारणपणे दहा अब्ज अमेरिकी डॉलर इतका असून 2014- 15 या काळात तो 6.6 अमेरिकी डॉलर्स पर्यंत होता. भविष्यात हाच व्यापार वाढविण्यास मोठा वाव असून त्याचा फायदा दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेला होणार आहे. बंगालचा उपसागर व हिंद महासागर परिसरात भारत-बांगलादेशचे तट रक्षक दल संयुक्त गस्त घालत असून त्यांना सागरी चाच्यांचा ची समुद्रातील दादागिरी ,अमली पदार्थांचे आणि शस्त्रास्त्रांची होणारी तस्करी रोखण्यात यश मिळाले आहे. भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेवर भारतीय सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) व बॉर्डर गार्ड ऑफ बांगलादेश यांच्यातही सहकार्य असून बांगलादेशच्या जमिनीवरून भारतविरोधी कोणतेही गैर काम होणार नाही याची पूर्ण काळजी घेत असतात.

सार्क, बिमस्टेक, आशियाई सहकारी संवाद, नाम, इंडियन ओशन रिम असोसिएशन,इत्यादी राष्ट्रीय संघटना व व्यासपीठावर बांगलादेशचे भारताला सहकार्य असून सीमापार दहशतवाद, सामाजिक सुरक्षितता, पर्यावरण, शिक्षण ,रोजगार, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्र आदि विषयांवर बांगलादेशचा भारतास पाठिंबा आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीत अनेक विभागांवर बांगलादेशने उत्तम कामगिरी बजावली असल्यामुळे बांगलादेश लवकरच अविकसित राष्ट्र असलेल्या दर्जा सोडून विकसनशील राष्ट्रांच्या गटात सामील होऊ शकतो.

भारत-पाकिस्तान संबंधातील मुद्द्यांवर बांगलादेशचा भारत सरकारला पाठिंबा आहे . मसूद अझहर व काश्मीर मुद्द्यावरून बांगलादेशने भारत सरकारच्या कृतीचे जाहीर समर्थन केले आहे. तसेच संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्याच्या उद्देशाने दोन्ही देशांतर्गत सैन्य अभ्यास आयोजित केले जातात .भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये भूमी सीमा करार जून 2015 मध्ये लागू करण्यात आला .भारत आणि

बांगलादेश यांच्यामध्ये संयुक्तरित्या 54 लहान मोठ्या नद्या वाहतात . या नद्यांच्या पाणी वाटपासंबंधी विवाद उत्पन्न होऊ नये आणि झालाच तर तो शांततामय मार्गाने सोडविला जावा या हेतूने 1972 मध्ये भारत बांगलादेश द्विपक्षीय संयुक्त नदी आयोग स्थापन करण्यात आले आहे.

मुक्त व्यापाराच्या दृष्टीने भारताने सार्क अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र साप्ता अंतर्गत बांगलादेशी मालाच्या निर्यातीवर करमुक्त व कोटा मुक्त धोरणाचा स्वीकार केला आहे. तसेच भारत-बांगलादेश दोन्ही देशांनी परस्पर कनेक्टिव्हिटी च्या दृष्टीने हल्दीबाडी ( भारत) आणि चिल्हाटी (बांगलादेश) यामध्ये रेल्वे लाईन सुरु करण्यास सहमती दर्शवली आहे. दोन्ही देशांमध्ये चांगले संपर्क आणि प्रवाशांची व त्यांच्या सामानाची ने-आण करण्यासाठी सोईचे व्हावे याद्दष्टीने बांगलादेश भूतान भारत-नेपाळ मोटार वाहन करार करण्यासंबंधी एकमत झाले आहे. सद्यस्थितीमध्ये बांगलादेश भारताकडून ११६० मेगावॅट वीज आयात करीत आहे . आंतरराष्ट्रीय जागतिक राजकारणामध्ये सुद्धा बांगलादेशचा भारताला पाठिंबा राहिलेला आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद मध्ये भारताला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी बांगलादेशने पाठिंबा दर्शवला आहे.

26 व 27 मार्च 2021 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बांगलादेशच्या दोन दिवसीय दौऱ्यावर होते. त्या ठिकाणी त्यांनी बांगलादेश स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम व बंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात सहभाग नोंदविला. भारताकडून वर्ष 2020 चा गांधी शांती पुरस्कार बंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांना जाहीर करण्यात आला त्याबद्दल बांगलादेशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांनी भारताचे आभार व्यक्त केले. ढाका येथे बंगबंधू- बापू डिजिटल प्रदर्शनाचे संयुक्तरित्या उद्घाटन करण्यात आले.

6 डिसेंबर भारत-बांगलादेश मैत्री दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्णय घेण्यात आला ,या दिवशीच भारताने 1971 मध्ये बांगलादेशास एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिली होती. यावेळी भारताकडून दिल्ली विद्यापीठांमध्ये बंगबंधू पीठ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली तसेच भारताने त्याच्या नेबरहूड फास्ट पॉलिसी अंतर्गत बांगलादेश सरकारला ऑक्सफर्ड एस्ट्राजेनिक कोवीशिल्ड वाक्सीन च्या 0 .3 मिलियन डोस देण्यात आले. तसेच 26 जानेवारी 2019 रोजी साजरा करण्यात आलेल्या बहात्तराव्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये बांगलादेश सशस्त्र दलातील 122 सदस्य सैन्यदलाने सहभाग घेतला होता. अशाप्रकारे एकंदरीत काही विवादित मुद्दे सोडले तर भारत बांगलादेश मैत्रीपूर्ण संबंध असलेले दिसून येते.

**भारत-बांगलादेश संबंधातील प्रमुख आव्हाने :**

1. बांगलादेशी स्थलांतरितांचा प्रश्न - बांग्लादेशी घुसखोरांचा प्रश्न
2. सीमा सुरक्षा कुंपण
3. तिस्ता नदी पाणी वाटप प्रश्न
4. चीनचा बांगलादेशातील वाढता हस्तक्षेप
5. पाण्याने वेढलेली बेटे आणि त्यांचे आदानप्रदान
6. सीमावर्ती भागातील तस्करी बेकायदा व्यापार

७. सी ए ए आणि एन आर सी कायदा

८. बांगलादेशी नागरिकांची हत्या.

९. भारत-बांगलादेश आयात-निर्यात धोरण यातील तफावत

वरील काही मुद्द्यांवरून भारत-बांगलादेश यांच्यामध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. जर भारत बांगलादेश यांना मैत्रीपूर्ण संबंध अधिक वृद्धिंगत करायचे असल्यास दोन्ही देशातील विवादित मुद्दे सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भारताच्या दृष्टीने वर्तमान भू - आर्थिक समीकरणे पाहता बांगलादेश सोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे गरजेचे आहे. त्याच बरोबर भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये जगातील पांचवी सगळ्यात मोठे स्थलसीमा आहे. सुरक्षा आणि सीमा प्रबंधनाच्या दृष्टीनेसुद्धा भारताला बांगलादेशाबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवावे लागतील .भारत-बांगलादेश या दोन्ही देशांतून ५४ नद्या वाहतात त्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न दोन्ही देशांनी परस्पर समन्वयाने सोडविले पाहिजे. विशेषता तिस्ता नदी जलविवाद . तिस्ता नदी संदर्भात भारत बांगलादेशा सोबत करार करायला अपयशी ठरला. त्यामुळे बांगलादेश आज चीन कडे वळला आहे.

तिस्ता नदीशी संबंधित राजकारणाचा वेध घ्यायचा झाला तर त्यासाठी भारताच्या फाळणी पर्यंत मागे जावे लागेल .त्यावेळी ऑल इंडिया मुस्लीम लीगने अशी मागणी केली होती की दार्जिलिंग आणि जलपाईगुडी या जिल्ह्यांचा समावेश पूर्व पाकिस्तानात केला जावा कारण हे दोन्ही जिल्हे तिस्ता पाणलोट क्षेत्राचा भाग आहेत .त्यानंतर भारत आणि बांगलादेश मध्ये सातत्याने विविध प्रकारच्या माहितीचे आदान-प्रदान होत राहिले .अखेर १९८३ मध्ये संयुक्त नदी आयोगाची स्थापना करून भारत आणि बांगलादेश या दोन वर्षासाठी या प्रश्नावर तात्पुरता मार्ग काढला होता पण त्यानंतरच्या काळात दोन्ही देशांनी परस्परांमध्ये कोणताही करार न करताच नदीपात्रात सिंचनाच्या पायाभूत सुविधा विकसित करू लागले यामुळे परिस्थिती प्रचंड हाताबाहेर गेली. तिस्ता नदी पाणीवाटपाचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच वाढत गेला.

भारताने सीएए ,एन आरसी कायदा केला. त्यामुळे बांगलादेशमधील सरकार विरोधी गटाकडून त्या कायद्याला विरोध होत आहे . दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे की सीएए ,एन आरसी कायदा हा भारताचा अंतर्गत मामला आहे .त्याचा भारत-बांगलादेश संबंधावर काही परिणाम होणार नाही. सीएए च्या अंतर्गत ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत अफगाणिस्तान ,पाकिस्तान आणि बांगलादेश मधून धार्मिक हिंसेच्या कारणामुळे भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन ,बौद्ध, ईसाई, पारशी समुदायाच्या लोकांना भारतीय नागरिकता देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे एन आर सी हे आसाम या राज्यात राहणाऱ्या भारतीय नागरिक आणि अवैध बांगलादेशी प्रवाशांची ओळख करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ३.३ करोड अर्जदारांपैकी १९ लाख पेक्षा जास्त लोक ३० ऑगस्ट २०२० रोजी प्रकाशित अंतिम एन आर सी मधून बाहेर आहेत . त्याचाच अर्थ जे बांगलादेशी भारतीय नागरिकत्व सिद्ध करू शकणार नाही त्यांना भारत सोडून बांगलादेशात परत जावे लागणार आहे. त्यामुळे एन आर सी वरून भारत-बांगलादेश तणाव निर्माण झाला आहे .

चीन बांगलादेशमध्ये आपला प्रभाव वाढवत आहे. वर्तमाना मध्ये बांगलादेश चीनचा "बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह" चा एक सक्रिय भागीदार आहे. सुरक्षा क्षेत्रामध्ये चीन बांगलादेशला पाणबुडी

आणि इतर सैन्य उपकरण पुरवीत आहे .तसेच बांगलादेशने "तीस्ता रिवर कॉम्प्रेहेन्सीव मॅनेजमेंट आणि रेस्टरेशन प्रोजेक्ट" चा निर्माणासाठी चीन कडून एक बिलियन अमेरिकी डॉलर कर्ज घेतले आहे. तसेच बांगलादेशने अलीकडेच देशातील विविध क्षेत्रांमध्ये ९ पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांसाठी चीनकडे 6.4 अब्ज अमेरिकी डॉलरची आर्थिक मदत मागितली होती. अशा प्रकारे बांगलादेशमध्ये चीनचा प्रभाव वाढत आहे हे भारताच्या दृष्टीने धोक्याचे आहे. वर्तमान स्थिती मध्ये बांगलादेशला विदेशी आर्थिक मदतीची गरज आहे अशा परिस्थितीत बांगलादेश चीन व भारत यापैकी कोणत्याही देशाकडून कर्ज घेऊ शकतो. ज्या देशाचे कर्ज बांगलादेश घेईल त्या देशाचा अनुकूल असेच परराष्ट्र धोरण ठरविल. त्यामुळे भारताला चीनला शह देण्यासाठी बांगलादेश सोबत सहकार्याचे व मैत्रीपूर्ण संबंध ठेवावे लागतील.

**निष्कर्ष: -**

बांगलादेशच्या स्वातंत्र्य आंदोलनापासून ते आज पर्यंत भारताने वेळोवेळी बांगलादेशास मदत केलेली आहे .अलीकडे काही वर्षांमध्ये व्यापार ,सुरक्षा ,ऊर्जा ,वाहतूक इत्यादी क्षेत्रांमध्ये भारत-बांगलादेश संबंधांमध्ये प्रगती झालेली दिसून येते. बांगलादेशकडून भारताला मोन्ला बंदराच्या वापराची परवानगी दिल्यामुळे भारताच्या पूर्वेकडील राज्यांसाठी समुद्री व्यापार अधिक सुलभ होईल .दोन्ही देशांनी आपल्यातील विवादित मुद्दे परस्पर सहकार्याने सोडवून बाहेरील आव्हानांना (चीन व पाकिस्तान) दोघांनी मिळून तोंड द्यावे लागेल. विशेषता भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये कोणताही मोठा विवाद राहिलेला नाही .अधिकांश मुद्द्यांच्या संदर्भात दोन्ही देशांचे समान मत राहिलेले आहे. वर्तमान स्थिती मध्ये बदलत्या दक्षिण आशियाई आणि जागतिक स्तरावरील बदलत्या राजकीय व आर्थिक परीप्रेक्षमध्ये दोन्ही राष्ट्रात क्षेत्रीय आर्थिक सहयोग खूप महत्त्वाचा आहे.

**संदर्भ ग्रंथ –**


१. *देवळाणकर, डॉ. शैलेन्द्र – भारत आणि जग –(जून २०१५) प्रकाशक, सकाळ पेपर्स प्रा. लि पुणे*
२. *बिस्वाल तपन – अन्तरराष्ट्रीय संबंध (२०१०) मैकमिलन पब्लिशर्स इंडिया लि. नई दिल्ली*
३. *बाजपेयी अरुणोदय – समकालीन विश्व और भारत (२०१२) डोर्लिंग किंडरस्ले पब्लिशर्स नई दिल्ली.*
४. *गांगुली सुमित (संपादक) भारत कि विदेश नीती (२०१८) oxford university press, new delhi.*
५. *दैनिक प्रभात (संपादकीय), एन आर सी च्या गोंधळात भारत – बांगलादेश मैत्रीवर प्रश्न, १७ सप्टेंबर २०१९.*
६. *दैनिक सकाळ (संपादकीय- प्रशांत पाटील ), पन्नास वर्षाचा शेजार धर्म, २७ मार्च २०२१.*

# भारत बांग्लादेश संबंध

**डॉ. डी. एस. पटवारी**
*राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, ता. औसा जि. लातूर (महाराष्ट्र)*
*मो.9823653629*

भारतीय उपखंडातील विशेषत: द.आशियातील भारताचा अगदी जवळचा दुसरा शेजारी म्हणजे बांगला देश होय. भारताचा पाकिस्तान इतकाच महत्वाचा शेजारी देश म्हणून बांगलादेशाकडे पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर एक सार्वभौम देश म्हणून इ.स. 1971 मध्ये बांगलादेशचा झालेला उदय ही एक अभूतपूर्व घटना मानली जाते. 26 मार्च 1971 हा त्यांचा पहिला स्वातंत्र्य दिन असून 'मुक्ती दिन' म्हणून 16 डिसे. 1971 पासून 16 डिसे. हा मुक्ती दिन म्हणून पाळला जातो. बांगला देश मुस्लीम 90.4% हिंदू 8.2% इतर 1.4% अशी धार्मिक लोकसंख्या असून या देशाची एकूण लोकसंख्या 16.9 कोटी आहे. त्याचे क्षेत्रफळ 1,47,570 चौ.कि.मी. असून तो जगातील 94व्या क्रमांकाचा (क्षेत्रफळानुसार) देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत तो जगातील आठव्या क्रमांकाचा देश आहे.

**बांग्लादेश -निर्मितीचा इतिहास**

इ.स. 1947 मध्ये भारताची फाळणी होऊन पाकिस्तान या राष्ट्राचा जन्म झाला. भौगोलिक दृष्ट्या पाकिस्तानची विभागणी पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान अशा दोन प्रादेशिक गटात झाली होती. त्यापैकी पुर्व पाकिस्तान म्हणजे आजचा बांगलादेश होय पूर्व पाकिस्ताणातील लोकांची संस्कृर्ती, भाषा, त्याचा आर्थिक विकास इत्यादी गोष्टीकडे पाकिस्तानी राज्यकर्तानी अक्षम्य दुर्लक्ष केले होते. त्यामुळे पूर्व पाकिस्तानातील जनतेच्या मनात पाकिस्तानी राज्यकर्ता विषयी असंतोष निर्माण होऊ लागला. शेख मुजिबूर रहमान यांच्या डिसे. 1970 मध्ये झालेल्या नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकीत नेत्रदिपक यश मिळवून ही त्यांना सरकार स्थापन करण्याची संधी दिली नाही. त्यामुळे पूर्व पाकिस्तानचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा निर्णय अवामी लीगने घेतला. त्यानुसार 25 मार्च 1971 रोजी शेख मुजिबूर रहमान यांनी बांगलादेशचे स्वतंत्र राज्य आस्तित्वात येत असल्याची घोषणा केली. बांगलादेशच्या स्वातंत्र्य प्रेमी जनतेनी पाकिस्तानी लष्कराची दडपशाही मोडून काढण्याची 'मुक्तीवादीनी' नावाने शस्त्रदल उभा करून गनिमी पध्दतीने पाकिस्तानी सैन्या विरूध्द संघर्ष सुरू केला.याच दरम्यान पाकिस्तानने भारतावर विविध प्रकारचे आरोप लावले. भारताने पाकिस्तानचे सर्व आरोप फेटाळले. लगेच पाकिस्तानच्या लढाऊ विमानानी भारताच्या काही हवाई तळावर 3 डिसे. 1971 रोजी अचानक हल्ला केला. पाकिस्तानच्या या आक्रमक कृतीमुळे भारताने पाकिस्तान विरूध्द युध्दाची घोषणा केली. शेवटी 16 डिसें. 1971 रोजी पाकिस्तानी सैन्याने भारतीय सैन्या समोर शरणागती पत्करली अशा प्रकारे पूर्व पाकिस्तानचा प्रदेश पाकिस्तानच्या नियंत्राणातून मुक्त झाला. एकंदरीत अशा प्रकारे 25 मार्च 1971 ला पाकिस्तानने पुर्व पाकिस्तानमध्ये लष्करी कायदा पुकारून सुरू केलेल्या भिषण दडपशाही अत्याचाराचे पर्यावसन बांगलादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामात झाले. बांगलादेशची निर्मिती स्थानिक जनतेचा स्वातंत्र्यसंग्राम आणि भारताचे प्रचंड लष्करी

योगदान याचा संयुक्त परिणाम होय. बांगलादेश हा तीन दिशांनी भारताने वेढलेला भुप्रदेश होय त्यांच्या पश्चिम व उत्तर दिशाना पश्चिम बंगाल आणि पुर्व दिशेला आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोराम हे भारतातील प्रदेश आहे. दक्षिण दिशेला बंगालचा उपसागर आहे.

**भारत – बांग्लादेशातील : प्राथमिक संबंध व मैत्रीपर्व**

बांगला देश जेंव्हा स्वतंत्र झाला तेंव्हा शेख मुजिबुर रहेमान यांनी पाकिस्तानच्या बंदिवासातून सुटका झाल्यानंतर 22 डिसें. 1971 ला ते दिल्ली येथे आले, मग तेथून ते ढाक्याला गेले 12 जाने. 1972 ला त्यांनी बांगलादेशाच्या प्रधानमंत्री पदाची, सुत्रे स्वीकारली. ढाका येथे 17 मार्च 1972 ला श्रीमती इंदिरा गांधी यानी भेट दिली . 19 मार्च 1972 ला 25 वर्ष मुदतीचा मैत्री सहकार्य व शांतता करार केला. तत्पूर्वी 6 डिसें. 1971 ला भारताने बांगला देशला एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली होती. श्रीमती इंदिरा गांधी यानी 6 डिसे. 1971 ला लोकसभेमध्ये बांगला देशला मान्यता देताना असे म्हटले की, “मुझे पूरा विश्वास है कि भविष्य मे भारत तथा बांगलादेश की सरकारे तथा जिनके आदर्श तथा त्याग समान है, एक दुसरे की संप्रभूता, क्षेत्रीय अखंडता, एक दुसरे के आंतरिक मामलो में हस्तक्षेप न करे, समानता और आपसी हितों के प्रति सम्मान परआधारित सम्ब-धों का सर्वोत्तम कालखंड माना जायेगा .” 6 फेब्रु. 1972 मध्ये भारताचा तीन दिवशीय दौरा केला या दौऱ्यात विविध करारही करण्यात आले. पुढे 15ऑगस्ट 1975 शेख मूजिब यांच्यासह 15 ऑगस्ट 1975 ला त्याच्या परिवारातील सदस्यांची हत्या करण्यात आली. मुजिब याच्या हत्ये नंतर झियाउर रहेमान यांनी देशाची सत्ता आपल्या हाती घेतली. झियाउर रहेमान याची 1989 मध्ये हत्या झाली. त्यानंतर एच.एम. इर्शाद देशाची सुत्रे आपल्या हाती घेतली. इ.स. 1975 नंतर या दोन्ही देशात काही समस्या निर्माण झाल्या. या समस्या संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या ठरल्या सीमा प्रश्न, लोकसंख्या स्थलांतर समस्या, व्यापार व आर्थिक समस्या, नवमुर बेटाची समस्या,फराक्का धरणाची समस्या आदी प्रश्न दोन्ही देशातील तणाव वाढण्यास कारणीभूत ठरल्या.

परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगानेही बांगला देश निर्मितीला भारताचे वेगळे आयाम होते. भारत -पाक संघर्षात चीन पूर्नत: पाकिस्तानचा पक्षपाती होता. ‘पीपल्स डेली’ या पत्रकातील त्याचा मजकुर भारत विरोधी होता. निक्सन यांनी बंगालच्या उपसागरात सातवे आरमार पाठवण्याचा निर्णय घेतला होता. निक्सन व किंसिंजर याची एक भीती होती की पुर्व पाकिस्तानात लष्कर पाठवून भारत सरकार थांबणार नाही तर पश्चिम पाकिस्तानवरही हल्ले करील आणि रशियाच्या मदतीने ‘काश्मीर’ घेईल यावरून आंतरराष्टीय क्षेत्रात भारताचा दबदबा वाढला होता ही गोष्ट निदर्शनास येते.

**संबंधातील तणाव व सता परिवर्तन आणि करार**

बांगलादेश मध्ये वारंवार सता परिवर्तन झाली आहेत. विशेषत: मुजिब यांच्या नंतर दोन देशात तणाव वाढला, याची महत्वाचे कारण म्हणजे फराक्का धरणाचा प्रश्न होय इ.स. 1976 मध्ये (मुजिब याच्या हत्ये नंतर) युनोच्या व्यासपीठावर हा प्रश्न उपस्थित करून त्याला आंतरराष्ट्रीय वादाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. दिव्दपक्षीय चर्चेद्वारे तोडगा काढला जाऊ शकतो अशी भारताची भूमिका आहे. बंगालच्या उपसागरातील नवमुर नावाच्या बेटाच्या मालकी हक्कावरून वाद सुरू झाला. शेवटी दोघांनी समोपचाराने मार्ग काढण्याचे मान्य केले आहे. या दोन देशातील सरहद्दीसंबंधीही वाद आहे. भारतातील त्रिपुरा, आसाम

व मेघालय या राज्याशी लागून असलेल्या बांगलादेशच्या सरहदीसंबंधी असे वाद निर्माण झाले आहेत. नोव्हें. 1977 मध्ये दोन्ही देशात गंगा नदीच्या पाणी वाटपासंबंधी एक करार झाला. इ.स. 1980 मध्ये पी.व्ही. नरसिंहराव यांच्या बांगलादेश भेटीत उभय पक्षानी हा प्रश्न सीमा प्रश्न चर्चेच्या मार्गाने सोडविण्याचे मान्य केले. 1983 मध्ये 'तिन बिघा' प्रश्नांवर दोन्ही देशात एक करार झाला ऑक्टो. 1982 मध्ये इंदिरा गांधी इर्शाद याच्यात एक शिखर परिषद झाली. इ.स. 1986 मध्ये इर्शाद हे भारत भेटीवर आले. 1991 मध्ये बेगम खलिदा शिमा याची पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आली. मे 1992 मध्ये त्यानी भारताला भेट दिली. याचवेळी 'तिन बिघा' भागाचे बांगला देशकडे हस्तांतरण करण्यात आले. विशेषत: बेगम खलिदा झिमा याच्या कारकिर्दीत बांगला देशात भारत विरोधी प्रचार शिगेला पोहोचला होता. 1996 मध्ये शेख हसिना वाजेद हया पंतप्रधान बनल्या त्यांनी भारताचे पंतप्रधान देवेगौडा सोबत 12 डिसे 1996 पाणी वाटपा संबंधी करारावर सहया केल्या. याच काळात आगरताळा ते ढाका बससेवा सुरू करण्यात आली. बांगला देशाला 400 कोटी रूपयाचे कर्ज देण्याची भारताने घोषणा केली.

त्यानंतर 2001 मध्ये बांगला देशात निवडणुका होऊन बेगम खलिदा झिमा पंतप्रधान बनल्या. त्याचा भारत विरोधी प्रत्यय लवकरच आला. या नव्या सरकारने भारताऐवजी चीन व पाकिस्तान याच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापीत करण्याला प्राधाण्य दिले. बेगम खलिदा झिमा याच्या कारकिर्दीतच बांगला देशाच्या सरकारने दहशतवादाची पाठराखण करण्याचे आणि दहशतवादाला अप्रत्यक्ष मार्गाने समर्थन देण्याचे धोरण अंगिकारले; त्यामुळे बांगलादेश आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा आणखी एक अड्डा बनण्याचा धोका निर्माण झाला. भारताच्या दृष्टिने ही बाब गंभीर होती. 2008 नंतर पुन: शेख हसिना वाजेद यांनी सत्ता सुत्रे स्वीकारली. सत्ता परिवर्तन झाल्यामुळे भारतासोबत नव्या संबंधाची आशा वाढली. याशिवाय लोकसंख्या स्थलांतर, चकमा निर्वासीतांची समस्या सहरदीवर कुंपण घालणे, आदी आव्हाने भारतीय परराष्ट्र धोरणासमोर आहेत. किंबहूणा ज्या भारताच्या सहकार्याने बांगला देशाची-निर्मिती झाली, त्याच बांगलादेशी सैनिकांनी एप्रिल 2001 मध्ये भारतीय क्षेत्रात 1.5 कि.मी. प्रवेश करून एका गांवावर ताबा मिळविला होता. तसेच बांगला देशाच्या सैनिकांनी 16 भारतीय जवानांची निर्दय व कुरपणे हत्या केली होती. या घटनेमुळे भारतातील सर्व लोक हादरून गेले होते. खरे भारताबद्दल त्याने अजन्म ऋणी राहणे योग्य होते पण प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही. ही बाब नक्कीच चिंताजनक आहे. यानंतर 14 ते 15 जूलै 2003 मध्ये दोन्ही देशाच्या परराष्ट्र मंत्र्याची आर्थिक संबंधाला बळकटी देण्यासाठी एक महत्वपूर्ण बैठक झाली. त्यानंतर ऑगस्ट 2004 मध्ये सीमेवरील गुन्हेगारी, अवैद्य घुसखोरी, जणावरांची तस्करी, थांबविण्यासाठी भारतीय सीमा सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यानी बांगलादेश राईफळच्या अधिकाऱ्यांसोबत 'कोमिला' बैठकीत विस्तृत चर्चा केली होती.

**मोदी कालीन नवे पर्व - भारत बांग्लादेश संबंध:-**

नरेंद्र मोदी यांनी सत्ता सुत्रे हाती घेतल्यानंतर, त्यांनी बांगला देशाचा दौरा केला होता. भारतासाठी बांगला देश हा अधिक जवळचा देश असून या दोन देशात 4096 किलो मिटरची सीमारेषा आहे. या दोन देशातील 'लॉर्ड बॉर्डर ॲग्रीमेंट' आणि तिस्तान नदी पाणी वाटपाचा करार महत्वाचा मानला जातो. बांगला

देशाचे 111 भुखंड भारताच्या हद्दीत आहेत, तर 55 भुखंड बांगला देशाच्या हद्दीत आहेत, लॉड बॉर्डर ॲग्रीमेंटनुसार या भुखंडाची अदला बदल केली जाणार आहे. व्हीसा करार, गुन्हेगारांच्या हस्तांतरणाचा करार या दोन्ही ही ऐतिहासिक करारावर यापुर्वीच्या सरकारने 2013 मध्ये करार केले आहेत. अलिकडच्या काळातील भारत- बांगलादेश भू-सीमारेषा करार अत्यंत महत्वाचा असून 7 मे 2015 रोजी भारतीय संसदेने 119 वी घटनादूरूस्ती विधयेक पारित केले. या विधयेकावर 28 मे 2015 रोजी राष्ट्रपतीची स्वाक्षरी होताच त्याचे रूपांतर शंभराव्या घटनादुरूस्तीत (100 व्या घटनादुरूस्ती अधिनियम,2015) मध्ये झाले. 29 मे 2015 रोजी हा घटनादुरूस्ती अधिनियम अधिसूचित झाला. या अधिनियमाचा उद्देश भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांत सन 1974 मध्ये झालेल्या भू-सीमा रेषा कराराला मंजूरी देणे हा होता. बांगलादेशाच्या संसदेने 1974 मध्येच मंजुरी दिली होती. आता भू-सीमा करारानुसार (लॉड बॉर्डर ॲग्रीमेंट) भारतात असलेली 111 बांगलादेशी अंत: क्षेत्रे बांगलादेशाकडे हस्तांतरीत करणे आणि बांगलादेशामध्ये असलेली 51 भारतीय अंत: क्षेत्रे भारताच्या स्वाधीन करणे उद्देशित झाले. त्यानुषंगाने 6 जून 2015 रोजी भारताने बांगलादेश सोबत ऐतिहासिक असा सीमा करार केला. 31 जूलै, 1 ऑगस्ट 2015 दरम्यानच्या मध्य रात्रीपासून हा करार अंमलात आला.

भारत आणि बांगला देशामधील संबंध सुधारण्यास बांगला देशमधील लोकशाही आणि आर्थिक उदारीकरणाच्या माध्यमातून आर्थिक विकासासाठी बांगलादेशने सुरू केलेले प्रयत्न प्रामुख्याने जबाबदार होते. सार्कच्या व्यासपीठाने यात मोलाची भर घातली. 'गुजराल धोरणामुळे' यास हातभार लागला. दक्षिण आशियायी उपखंडामध्ये लोकशाही शासनप्रणाली आस्तित्वात यासाठी भारताचे परराष्ट्र धोरण अत्यंत महत्वाचे आहे. खरेतर बांगला देशच्या राजकारणावर धार्मिक मुलतत्ववादी वाढता प्रभाव हे भारतासाठी भविष्यात चिंताग्रस्त ठरू शकते.

**संदर्भ ग्रंथ.:-**

*1) के.सागर, 'भारताचे शेजारी राष्ट्रांशी संबध',(1999), के सागर पब्लिकेशन्स पुणे, पृ.114.*
*2) प्रा.पाटील, भारतीय परराष्ट्रीय धोरण, 2010, के सागर पब्लिकेशन्स पुणे, पृ.109.*
*3) डॉ.दिवाण चंद्रशेखर "भारताची विदेश निती', विद्या प्रकाशन-नागपुर, पृ.47.*
*4) डॉ.पवार रांधूं, मिश्रा आरजू, 'भारतीय विदेश नीति', 2013, आर्या पब्लिकेशन्स दिल्ली, पृ.130.*
*5) तळवलकर गोविंद, 'भारत आणि जग', 2009, मौज प्रकाशन, गिरगांव मुंबई, पृ.368.*
*6) डॉ.देवळाणकर शैलेंद्र, 'भारत आणि जग', 2015, सकाळ प्रकाशन पुणे-2, पृ.74.*

# सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांपुढील आव्हाने

**प्रा. डॉ. जितेंद्र आनंदा माळी**

*विभागप्रमुख – संरक्षण आणि सामरिक अभ्यास विभाग, कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड. ता. अमळनेर, जि. जळगांव.*

**प्रस्तावना –**

दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणात प्रादेशिक सत्तासमतोलाला फार महत्व प्राप्त आले. त्यातुनच जगाच्या वेगवेगळया भागात प्रादेशिक व्यवस्था उदयास आल्या, वास्तविक प्रादेशिक व्यवस्था ही एक भू–राजकीय संकल्पना आहे. प्रत्येक भू–प्रदेशात स्थानिक वेगवेगळे प्रश्न असतात, या प्रश्नांना जागतिक राजकारणात दुय्यम स्थान असते. अशावेळी संबंधीत स्थानिक प्रदेशातुन काही राष्ट्रे एकत्र येवून आपले प्रश्न स्थानिक स्तरावर चर्चेतून, वाटाघाटीतून किंवा सामोपचाराने सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी स्थानिक स्तरावर एक स्वतंत्र संघटनेची निर्मिती केली जाते.

अशाच प्रकारे दक्षिण आशियाचा सर्वागिण विकास व्हावा याकरीता, या भागात एखादे क्षेत्रिय संघटन असावे अशी भुमिका तत्कालीन बांगला देशाचे अध्यक्ष झिया–उर–रहेमान यांनी घेतली. त्यादृष्टिने त्यांनी एक प्रस्ताव तयार करुन सर्व दक्षिण आशियायी राष्ट्रांकडे पाठविला. या प्रस्तावावर सर्व संबंधीत राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांच्या अनुक्रमे १९८१, १९८२, १९८३ मध्ये विविध बैठका व चर्चा होवून एक निश्चित क्षेत्रिय विकासाचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानंतर दक्षिण आशियातील सात राष्ट्रांचे परराष्ट्रीय मंत्री नवी दिल्ली येथे १ व २ ऑगष्ट १९८३ रोजी एकत्र आलेत. या बैठकीत त्यांनी आतापर्यंतच्या बैठकांचा आढावा घेत, दक्षिण आशियाच्या सहकार्यासाठी दक्षिण आशियायी क्षेत्रीय सहकार्याचे संघटन स्थापन करण्याची औपचारीक घोषणा केली.*(तोडकर,२०१५,३०५)* त्यानंतर भूतानच्या थिम्पू येथे १९८५ मध्ये झालेल्या परराष्ट्रीय मंत्र्यांच्या बैठकीत दक्षिण आशियाई सहकार्यांच्या प्रयत्नांना संघटनात्मक स्वरुप देण्याचे ठरले. त्यानुसार दक्षिण आशियातील भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान बांगला देश, श्रीलंका व मालदीव या सात राष्ट्रांचे प्रमुख बांगला देशाची राजधानी ढाका येथे ७ व ८ डिसेंबर १९८५ मध्ये एकत्र आले. याठिकाणी **''दक्षिण आशियाई क्षेत्रिय सहकार्य संघटन''** अर्थात **''सार्क''** संघटनेची अधिकृतरित्या स्थापना केली. *(सिंह अशोक कुमार,२०१४,२७९)*

सार्क संघटना ही दक्षिण आशियायी क्षेत्रिय सहकार्य संघटना असून तीची निर्मीती मुळात परस्पर सहकार्य व विकास या मुख्य तत्वावर झालेली दिसून येते. परंतु सदयस्थितीत **सार्क** या क्षेत्रिय संघटनेतील सदस्य राष्ट्रांसमोर संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांबाबतीत विविध आव्हाने निर्माण झालली आपणांस दिसून येते. त्याअनुशंगाने प्रस्तृत शोध निबंधात **''सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांपुढील आव्हाने व त्यावरील उपाययोजना''** याबाबींचा उहापोह केलेला आहे.

**सार्क राष्ट्रे –** सन १९८५ मध्ये सार्क संघटनेची निर्मिती प्रसंगी सार्क सदस्य राष्ट्रांची संख्या फक्त सात एवढी होती. त्यात, भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान बांगला देश, श्रीलंका व मालदीव या सात राष्ट्रांचा समावेश होता. परंतु नवी दिल्ली येथे एप्रिल २००७ मध्ये भरलेल्या १४ व्या सार्क परिषदेपासुन अफगणिस्तान हे आठवे सदस्य

राष्ट्र म्हणुन सार्क संघटनेत समाविष्ठ झालेले आहे. त्यामुळे आज रोजी सार्क संघटनेची सदस्य संख्या **''आठ''** एवढी आहे.

**सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांपुढील आव्हाने —**

दक्षिण आशियाच्या सर्वांगिण विकासासाठी सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली. परंतु सदयस्थितीत, सार्क राष्ट्रांना अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. त्याबरोबर काही बाह्य शक्तीही सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्रीय धोरणांपुढे आव्हाने उभी करतांना दिसतात, त्यातीलच काही आव्हाने पुढीलप्रमाणे सांगता येतील. *(तोडकर,२०१५,३१५)*

**१) लोकशाहीला अपयश —** सार्क राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनव्यसस्थेला आलेले अपयश हे खुप मोठे आव्हान आहे. सार्क राष्ट्रांमधील भारताच्या शेजारी असणाऱ्या पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भुतान, श्रीलंका, अफगणिस्तान आणि म्यानमान या राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनप्रणाली प्रस्थापीत होवून राजकीय स्थिरता निर्माण व्हावी, यासाठी भारत सुरुवातीपासूनच प्रयत्नशील राहीला आहे. कारण भौगोलिक रचनेमुळे भारताची पर्यायाने दक्षिण आशियाची सुरक्षा या राष्ट्रांच्या सुरक्षेशी जोडली गेली आहे. या राष्ट्रांमधील राजकीय, सामाजिक व आर्थिक घडामोडींचे परिणाम सर्व सार्क राष्ट्रांना सहन करावे लागतात.

**२) शस्त्रास्त्रस्पर्धा व वाढता संरक्षण खर्च —** शीतयुध्दाच्या काळापासूनच दक्षिण आशिया शस्त्रस्पर्धेला बळी पडलेला आहे. शीतयुध्दाच्या राजकारणाचा भाग म्हणून अमेरिका पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत करीत आहे. त्या शस्त्रास्त्रांचा वापर पाकिस्तान सतत भारताविरोधी करीत आहे. पाकिस्तानच्या या वाढत्या शस्त्रास्त्र सामर्थ्याला संतुलीत करण्यासाठी भारताला आपल्या संरक्षण खर्चात सातत्याने वाढ करावी लागत आहे. यातुनच सार्क राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धेला चालना मिळालेली आहे. त्याचबरोबर, वांशिक संघर्ष, धार्मिक मुलतत्ववादाचा प्रसार, फुटीरतावादी चळवळी, अंमली व मादक पदार्थांचा व्यापार, लष्करी हुकूमशाहीचा उदय, लोकशाहीला आलेले अपयश व राजकीय अस्थिरता अशा विविध कारणांनी या प्रदेशात शस्त्रास्त्रांचा व्यापार वाढला आहे. विशेष म्हणजे येथील सर्वच राष्ट्रे कमीजास्त प्रमाणात या शस्त्रास्त्रस्पर्धेत सामील झालेली आहेत. यामुळे सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणापुढे मोठे आव्हान उभे राहिलेले दिसून येते.

**३) वाढते वांशिक संघर्ष —** शीतयुध्दोत्तर काळात वाढत्या वांशिक संघर्षांनी सार्क राष्ट्रांना भेडसावलेले असून त्यात, पाकिस्तान, अफगणिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान व म्यानमार ही राष्ट्रे वांशिक हिंसाचाराला बळी पडलेली आहेत. यात शासनव्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापीत करणे, आपली स्वतंत्र ओळख जपणे, शासनाच्या विषमतेवर आधारीत धोरणांचा विरोध करणे, स्वतंत्र राज्यांची निर्मिती, इतर वंशाच्या लोकांचा द्वेष, आर्थिक व राजकीय फायदयासाठी शासनाला वेठीस धरणे यासाठी हे वांशिक संघर्ष सुरु आहेत. यात हजारो निष्पाप लोकांचा बळी जात आहे. यातुनच सार्क राष्ट्रांमध्ये प्रादेशिकतावाद व संकुचिततावाद वाढला आहे. महिलांच्या, अल्पसंख्यांकांच्या व मानवी हक्कांच्या संरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. यातुनच सार्क देशांच्या सुरक्षेपुढे मोठे आव्हान निर्माण झालेले दिसुन येते.

**४) आर्थिक उदारीकरण व जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्या —** १९९० च्या दशकात बहुतेक सार्क राष्ट्रांनी कमी—अधिक प्रमाणात आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्विकारुन आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर जोडण्याचा प्रयत्न केला. त्यातुनच आर्थिक व सामाजिक विकास साधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात

आले, मात्र उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया सार्क राष्ट्रांना उपकारक ठरण्याऐवजी, अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्यांच्या निर्मितीला कारणीभूत ठरली. मुळातच् सार्क राष्ट्रांमध्ये जीवनमान, साक्षरता आणि दरडोई उत्पन्न यांचे प्रमाण कमी असल्याने, या प्रक्रीयेनंतर येथे गरिबी, बेकारी, उपासमार, दारिद्रय, निम्न जीवनस्तर यांसारख्या समस्या तीव्र बनल्या आहेत. साहजिकच सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांना आव्हान निर्माण झाले आहे.

**५) राजकीय अस्थिरतेचे संकट —** सार्क राष्ट्रांमध्ये राजकीय अस्थिरता ही संमिश्र शासन पध्दतीमुळे उदयास आली आहे. १९९० च्या सुरुवातीस नेपाळ, बांगलादेश व पाकिस्तानमध्ये लोकशाही शासनपध्दती उदयास आली, परंतु त्यातुनच तेथे राजकीय अस्थिरता निर्माण झाली. याचा फायदा दहशतवादी, फुटीरतावादी व धर्मांन्ध मुलतत्ववादयांनी घेवून हुकूमशाही शासनव्यवस्थेची स्थापना केली. परिणामी राजकीय अस्थिरता वाढून सार्क राष्ट्रांमध्ये वांशिक संघर्ष, धार्मिक मुलतत्ववाद, दहशतवाद, फुटीरतावादी चळवळी, शस्त्रास्त्रांचा व अंमली पदार्थांचा वाढता व्यापार यांसारख्या समस्या वाढून सुरक्षेला धोका निर्माण झालेला आहे.

**६) अण्वस्त्रांचा प्रसार —** सार्क राष्ट्रांमधील भारत व पाकिस्तान यांच्यात १९९० च्या दशकातील अण्वस्त्रांचा प्रसार ही सर्वात मोठी घटना असुन, तीचा दक्षिण आशियाई राष्ट्रांवर दुरगामी परीणाम झालेला दिसतो. सुरुवातीस भारताने सर्वप्रथम १९७४ मध्ये शांततामय विकासकार्यासाठी अणुस्फोट केला. मात्र यामुळे दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये भिती व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. त्यातुनच पाकिस्तानने चीनची मदत घेऊन १९९० च्या सुरुवातीलाच अण्वस्त्र बनविण्याची क्षमता प्राप्त केली. तिची औपचारिकता १९९८ मध्ये अणुचाचणी घेऊन पुर्ण केली. आपल्या शेजारी पाकिस्तानने चीनच्या मदतीने अण्वस्त्र क्षमता प्राप्त केल्यामुळे भारतालाही अण्वस्त्रांचा विकास करण्याशिवाय पर्याय नव्हता. परिणामी १९९८ मध्येच भारताने पाच अणुचाचण्या करुन स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणुन घोषित केले. साहजिकच आज रोजी भारत—पाकिस्तान हे अण्वस्त्र संपन्न असल्यामुळे यांच्यातील एखादा छोटा संघर्षही अणुयुध्दाचे स्वरुप धारण करु शकतो आणि या युध्दाचे परिणाम सर्व सार्क राष्ट्रांना भोगावे लागतील. साहजिकच सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि सुरक्षेसमोर मोठे आव्हान उभे राहीलेले दिसून येते.

**७) सार्क राष्ट्रांचे हस्तक्षेपी धोरण —** सार्क राष्ट्रांनी परस्परांच्या अंर्तगत कारभारात हस्तक्षेप करु नये, या हेतूनेच सार्क संघटनेची स्थापना झालेली होती. परंतु आज रोजी सार्क राष्ट्रे कोणत्या ना कोणत्या कारणांनी दुसऱ्या राष्ट्रांच्या अंर्तगत कारभारात हस्तक्षेप करतांना दिसून येतात. उदा. पाकिस्तानने अफगणिस्तान मध्ये व काश्मीर प्रश्नावरुन भारताच्या अंतर्गत कारभारात केलेला हस्तक्षेप तर बांगला देश निर्मितीच्या प्रश्नावरुन भारताने पाकिस्तानच्या कारभारात हस्तक्षेप व १९८० मध्ये श्रीलंकेतील तमीळ बंडखोरांना केलेले समर्थन त्याचप्रमाणे १९९० नंतर पाकिस्तानच्या समर्थनावर भारतात फोफावलेला दहशतवाद ही सर्व परस्परांच्या हस्तक्षेपी धोरणांची उदाहरणे आहेत. यामुळे साहजिकच सार्क राष्ट्रांची सुरक्षा धोक्यात आलेली दिसून येते.

**८) भारताविषयीची सुप्त भिती —** सार्क राष्ट्रांमध्ये भारत हा सर्वच बाबतीत मोठा आहे. आकार, आर्थिक स्थिती, औद्योगिक, व्यापार, विज्ञान व तंत्रज्ञान, अण्विक तंत्रज्ञान, लष्करी साधने व शस्त्रास्त्रे या बाबतीत भारताने भरीव प्रगती केल्यामुळे तो महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. भारतचा असाच विकास होत राहीला तर २०२५ पर्यंत भारत एक विभागीय महासत्ता म्हणुन उदयाला येईल, असे जागतिक अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्यामुळे भारताच्या श्रेष्ठत्वाविषयीची एक सुप्त भीती सार्क राष्ट्रांमध्ये निर्माण झाली आहे. *(पाटील वा. भा.*

*,२०१५,४१)* या भीतीपोटी काही लहान सार्क राष्ट्रे अमेरिका, चीन व युरोपीयन राष्ट्रांसोबत करार करीत आहेत. त्यातुन परकीय सत्तांचा दक्षिण आशियाई परीसरात शिरकाव झाला आहे. त्यामुळे सार्क राष्ट्रांच्या परराष्ट्रीय व संरक्षण धोरण प्रभावित झालेले दिसून येते.

**९) दहशतवादाची समस्या –** सार्क राष्ट्रांमध्ये कमी अधिक प्रमाणात दहशतवादी कारवाया घडून येतांना दिसतात. सार्क राष्ट्रे देशांतर्गत, सीमापार आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या समस्यांना तोंड देत आहेत. त्यातच काही राष्ट्रे एकमेकांच्या विरोधात दहशतवादी कारवायांना खतपाणी घालतांना दिसून येतात. त्यात भारतात दहशतवादी निर्माण करण्याचे काम पाकिस्तान व बांगला देश करतात, नेपाळ व मालदिव मध्ये बांगलादेश सरकार विरोधी कारवाया करतो, तर श्रीलंकेमध्ये भारताकडून कारवाई होतांना दिसते. आजरोजी दक्षिण आशिया आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे केंद्र बनले आहे. परीणामी दहशतवादामुळे संबंधित राष्ट्रांच्या विकासाला खिळ बसून, सुरक्षितता धोक्यात तर येतेच शिवाय राष्ट्रीय सुरक्षेपुढे मोठे आव्हान उभे राहते.

**१०) बाहयसत्तांचे राजकारण –** दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यात सुरु झालेल्या शीतयुध्दाचा तळच दक्षिण आशिया होता. तेव्हापासूनच अमेरिका व सो. रशिया यांनी आपापल्या स्वार्थासाठी सार्क प्रदेशात हस्तक्षेपाचे व विभागीय सत्तासमतोलाचे राजकारण केलेले दिसून येते. आज भारताच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्यासाठी पाकिस्तानला हाताशी धरणे, अफगणिस्तान मध्ये लष्करी व राजकीय हस्तक्षेप करणे. *(तोडकर,२०१५,२१३)* चीनच्या वाढत्या व्यापारी सामर्थ्याला संतुलित करण्याठी विरोधीशक्ती म्हणुन भारताचा वापर करणे. तर चीन साम्यवादी व पाकिस्तान अमेरिका प्रणीत म्हणुन सो. रशिया त्यांच्या कारवायांकडे दुर्लक्ष करतो. चीन भारताला विरोध म्हणुन पाकिस्तानला जवळ करतो. परिणामी बाहयसत्तांच्या हस्तक्षेपामुळे सार्क राष्ट्रांचे परराष्ट्र व संरक्षण धोरणांपुढे मोठे आव्हान दिसून येते.

**११) अन्य समस्या –** उपरोक्त समस्यां बरोबरच सार्क राष्ट्रांमध्ये वैचारिक व धार्मिक भिन्नता, परस्पर सहकार्याचा अभाव, अविश्वासचे वातावरण निर्मिती, महासत्तांची भुमिका, असुरक्षितेची भावना, व्यापारी बाजारपेठांची कमतरता, वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, गरिबी, दारिद्रय, अशिक्षितपणा व आर्थिक मागासलेपणा वगैरे.*(पाटील वा. भा.,२०१५,४१)* यासारख्या अनेकाविध समस्या आढळून येतात, परिणामी यासर्वांमुळे सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र संबंधांपुढे मोठे आव्हान उभे राहीलेले दिसते.

अशा विविध प्रकारची आव्हाने सार्क राष्ट्रांच्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांपुढे निर्माण झालेली दिसून येतात.

**उपाययोजना –** पुढील काही उपायांनी सार्क राष्ट्रे आपले संरक्षण आणि परराष्ट्र धोरण यशस्वीरित्या अंमलात आणु शकतात.

१) कुणाच्याही दबावाखाली न येता आपले स्वतंत्र परराष्ट्र व संरक्षण धोरणांची निर्मीती करुन ते अंमलात आणणे.

२) राष्ट्रांतर्गत उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीच्या आधारावरच आपल्या संरक्षण व परराष्ट्र धोरणाची निर्मीती करणे.

३) परस्पर सहकार्यातून सर्वांगिण विकास हे उद्दिष्ठ समोर ठेवून आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करणे.

४) सार्क राष्ट्रांमध्ये लोकशाही शासन व्यवस्था स्थापन करण्यावर भर देणे.

५) सार्क राष्ट्रांमध्ये आर्थिक उदारीकरण व मुक्त व्यापाराला चालना देणे.

६) सार्क राष्ट्रांमधील शस्त्रास्त्रे व अण्वस्त्र निर्मिती स्पर्धा थांबवून नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणे.

७) सार्क राष्ट्रांमधील आर्थिक, व्यापारी व राजकिय हितसंबंधांच्या रक्षणासाठी विभागीय स्थैर्य टिकवून ठेवणे.

८) महासत्तांच्या जागतिक राजकारणात सहभागी न होता, दक्षिण आशियाई परिसराच्या विकासावर भर देणे.

९) दक्षिण आशियाच्या स्थानिक समस्या, प्रश्न व अडचणींचे निराकरण करणाऱ्या योजनांची आखणी करणे.

उपरोक्त उपाययोजनांचा अवलंब करुन सार्क राष्ट्रे आपल्या संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांपुढील आव्हाने कमी करु शकतात.

**सारांश —**

दक्षिण आशिया हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा प्रदेश आहे. भौगोलिकदृष्टया हिमालयाच्या पायथ्याकडील तसेच अफगणिस्तान पासुन ब्रह्मदेशापर्यंतचे सर्व राष्ट्रे दक्षिण आशियात येतात, ही सर्व राष्ट्रे सार्क संघटनेचे सभासद असल्याने त्यांना सार्क राष्ट्रे असे ही म्हणतात. या सार्क राष्ट्रांच्या राजकारणाचा अभ्यास करतांना केवळ याच राष्ट्रांचा विचार करुन चालत नाही, तर या राष्ट्रांच्या भौगोलिक सीमा, राजकीय व सामरिक संबंध ज्या इतर मोठया राष्ट्रांशी जोडले गेले आहेत, त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. दक्षिण आशियातील म्यानमार हे दक्षिण आशियाला दक्षिण—पुर्व आशियाशी जोडणारे महत्वाचे दुवा आहे, परंतु म्यानमार मधील लष्करी हुकूमशाही सार्क राष्ट्रांसाठी मोठी डोकेदुखी ठरली आहे. *(तोडकर,२०१५,३३१)* सदयस्थितीत सार्क राष्ट्रांपुढे अनेकाविध समस्या व अडचणी निर्माण झालेल्या दिसतात. त्यातुन संरक्षण व परराष्ट्रीय धोरणांपुढे मोठे आव्हान उभे राहीलेले दिसून येते. त्यामागील कारणे, घटना व परिस्थिती वेगवेगळी असली तरी वेळेचे गांभिर्य ओळखून सार्क राष्ट्रांनी यातुन बाहेर पडण्यासाठी वरील प्रमाणे काही उपाययोजनांचा अवलंब केल्यास निश्चितच परिस्थितीत फरक पडेल, यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची —**

*१) Naik J. A., International Relation, Macmillan Pub. India. 1995.*

*२) Vernon Hewitt., The New International Politics of South Asia, Manchester University Press, Manchester. 1997.*

*३) Kuashik P. D., International Relation, Kalyani Publishers, Ludhiana. 2005.*

*४) द्विवेदी धीरेंन्द्र, संजय कुमार, अन्तर्राष्ट्रीय राजनीती, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली. २००३.*

*५) कौशिक पी. डी., अन्तर्राष्ट्रीय संबंध, कल्याणी पब्लिशर्स, लुधियाना. १९९८.*

*६) सिंह अशोक कुमार, राष्ट्रीय सुरक्षा, प्रकाश बुक डिपो, बरेली. २०१४.*

*७) तोडकर बी. डी., भारत आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांमधील संबंध, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. २०१५.*

*८) देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे. २०१०.*

*९) देवळाणकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिकेशन्स, औरंगाबाद. २०११.*

*१०) पाटील वा. भा., आंतरराष्ट्रीय संबंध, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव. २०११.*

*११) पाटील वा. भा., भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव. २०१५.*

*१२) पेंडसे अरुणा व सहस्त्रबुध्दे उत्तरा, आंतरराष्ट्रीय राजकारण: शीतयुध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट लॉगमॅन प्रा. लि. मुंबई.२००८.*

# भारत आणि पाकिस्तान संबंध

**प्रा. डॉ. किशोर कल्लापा म्हेत्री**
*राज्यशास्त्र विभाग, गोगटे वाळके कॉलेज बांदा, ता. सावंतवाडी, जिल्हा- सिंधुदुर्ग*
*e-mail- mhetrikishor@yahoo.in*

**प्रस्तावना:**

ब्रिटीश भारतातून जाता जाता अखंड हिंदुस्थानची, भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रात फाळणी केली. फाळणी झाली तरी भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक असे अनेक समान घटक उभय राष्ट्रात होते. स्वातंत्र्यानंतर उभय राष्ट्रांत सलोखा, बंधुभाव, प्रेम राहील असे वाटत होते. पण काश्मीर प्रश्नावरून उभय राष्ट्रात तणाव निर्माण झाला. तो आजपर्यंत निवळू शकला नाही. भारत-पाकिस्तानच्या संबंधाचा अभ्यास करताना जसा काश्मीर प्रश्न महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे बलुचिस्तानचा प्रश्न, १९६५ चे भारत-पाक युद्ध, १९७१ चे युद्ध आणि बांगलादेशाची निर्मिती, कारगिल संघर्ष आणि पाकिस्तानचा दहशतवाद्यांना पाठिंबा हे मुद्दे ही तेवढेच महत्त्वाचे आहेत. या मुद्द्याला अनुसरून या शोधनिबंधामध्ये भारत-पाकिस्तान यांच्यातील संबंधाचा आढावा घेतला आहे.

**भारत पाकिस्तान संबंध:**

भारताच्या अगोदर एक दिवस म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान हे राष्ट्र स्वतंत्र झाला. १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची सर्वाधिक युद्धे पाकिस्तानबरोबर झाली. पाकिस्तानच्या निर्मितीमध्ये हिंदू मुसलमान धार्मिक संघर्ष मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांनी या संघर्षाला खतपाणी घातले. महात्मा गांधीने मुस्लिमांचे एकमेव म्हणून घेणारे बॅरिस्टर जीना यांनी पाकिस्तानच्या निर्मितीचा आग्रह धरला होता. त्या एका उद्देशाने त्यांनी आपले राजकारण केले. शेवटी नाईलाज म्हणून सर्वांनाच त्या फाळणीचा स्वीकार करावा लागला. १९४७ मध्ये फाळणी झाल्यानंतर मोठ्याप्रमाणावर भारतातून मुस्लीम पाकिस्तानात गेले आणि हिंदू आणि शीख भारतात आले. सीमाक्षेत्रांमध्ये त्यांच्यामध्ये चकमकी झाल्या. त्यामध्ये अनेक लोक मारले गेले. दीड कोटीच्या आसपास लोक बेघर झाले. दहा लाखांहून अधिक लोक मारले गेले. एवढे झाले तरी आज भारतात साधारण १५ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे आणि पाकिस्तानमध्येही काही हिंदू राहतात. पाकिस्तानातील अगदी अलीकडची जनगणना २०१७ साली झाली. त्या पूर्वीची १९९८ आणि त्या आधीची १९८१ मध्ये झाली होती. २०१७ च्या जनगणनेनुसार पाकिस्तानची लोकसंख्या २० कोटी ७० लाख इतकी आहे. या वेळच्या लोकसंख्येच्या धर्मानुसार वर्गीकरण जाहीर केलेले नाही. पण १९९८ च्या जनगणने प्रमाणे तिथे हिंदू लोकसंख्या १.६ टक्के होती.

भारत-पाकिस्तान संबंध समजावून घेण्याअगोदर पाकिस्तानची भौगोलिक, आर्थिक, राजकीय, लष्करी स्थिती समजावून घेणे गरजेचे आहे. इस्लामाबाद ही पाकिस्तानची राजधानी, कराची हे सर्वात मोठे शहर आहे. इंग्रजी आणि उर्दू येथील अधिकृत भाषा याशिवाय काही प्रादेशिक भाषांना मान्यता दिली

आहे. पंजाबी, पख्तून म्हणजेच पठाण, सिंधी, बलुची, सरयकी, मुहाजीर इत्यादी होय. भारतातून स्थलांतरित झालेले मुसलमान इत्यादी विविध वंशाचे लोक येथे राहतात. सुन्नी मुसलमान बहुसंख्य आहेत. पाकिस्तानच्या दक्षिणेला अरबी समुद्र, पूर्वेला भारत, उत्तरेला चीन आणि पश्चिमेला अफगाणिस्तान आणि इराण हे देश आहेत. पाकिस्तानचे चार प्रमुख प्रशासकीय विभाग खैबर पख्तुनवला यालाच पूर्वी वायव्य सरहद्द प्रांत म्हणायचे जिथे खान अब्दुल गफार खान किंवा ज्यांना सरहद्द गांधी आणि बादशाह म्हणून ओळखले जायचे, यांनी आपली चळवळ येथे चालवली होती. सिंध, बलुचिस्तान आणि पंजाब या शिवाय इस्लामाबादचे राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसेच वादग्रस्त आझाद काश्मिर ज्याला आपण पाकव्याप्त काश्मिर म्हणतो आणि गिलगीट बाल्टिस्तान. शेवटच्या दोन्ही भागावर भारताने आपले स्वामित्व जाहीर केले आहे. भारताच्या अधिकृत नकाशामध्ये हे प्रदेश भारताचा भाग म्हणूनच दाखवले जातात.

**बलुचिस्तानचा प्रश्न:**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतांमध्ये स्वतंत्र बलुचिस्तान यासाठी चळवळ चालू आहे. त्याला भारताचा पाठिंबा आहे आणि रॉ अधिकारी या चळवळीतील कार्यकर्त्यांना सर्व प्रकारची मदत करीत आहेत असा पाकिस्तानचा दावा आहे. पण पंतप्रधान मोदींनी १५ ऑगस्ट २०१६ मध्ये जाहीरपणे बलुचिस्तानमधील चळवळीच्या नेत्यांचा उल्लेख केला. त्यांनी मला शुभेच्छा दिल्या. त्या सर्व एकशे पंचवीस कोटी भारतीयासाठी होत्या असे पंतप्रधान म्हणाले. त्यानंतर भारत बलूचिस्तानचा मुद्दा उचलून धरेल असा अंदाज काही राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केला होता. पण २०१७ पर्यंत तरी भारताने या मुद्द्याचा फारसा उल्लेख केला नाही.

१९४७ साली काश्मीर सारखेच बलुचिस्तानच्या राज्याने पाकिस्तान किंवा भारतात सामील न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. काही काळ ते स्वतंत्र राहिले परंतु नंतर पाकिस्तानने सैन्य घुसवून तो प्रदेश ताब्यात घेतला. १९५५ मध्ये बलुचिस्थान पाकिस्तानचा चौथा प्रांत झाला. या भागात तेल आणि नैसर्गिक वायूचे प्रचंड साठे आहेत. मोठा सागरी किनारा आहे. त्याचा पाकिस्तानला बराच फायदा झाला. चीनच्या मदतीने बलुचिस्तानमध्ये अनेक विकास प्रकल्प राबवले जात आहेत. परंतु त्याचा फायदा स्थानिक लोकांपेक्षा पंजाब आणि सिंधमधील लोकांना अधिक होतो अशी बलुच लोकांची भावना आहे. स्वतंत्र होण्यासाठी बलुच लोकांची चळवळ चालू आहे. पाकिस्तान सरकार दडपण्याचा प्रयत्न करीत आहे असे आरोप केले जातात. एकूणच पाकिस्तानमध्ये प्रचंड अस्थिरता आहे. लिखित घटना आणि लोकशाही व्यवस्थेची चौकट असली तरी प्रत्यक्ष सत्ता लष्कराच्या हाती आहे. लष्कर आणि आयएसआय मिळून पाकिस्तानचा कारभार चालवतात. याच्या जोडीला भ्रष्टाचार, हिंसाचार, धर्मांधता, दहशतवाद, मादक द्रव्यांचा व्यापार, माणसांची तस्करी, इतर मौल्यवान वस्तूंची तस्करी, गुन्हेगारी टोळ्या आणि वाढती गुन्हेगारी हे प्रश्न आहेत. प्रशासन व्यवस्था खिळखिळी झालेली आहे. त्यामध्ये सातत्य नाही. भारताने फाळणी स्वीकारली नाही, त्यामुळे कधीतरी ते आपल्यावर हल्ला करतील ही भीती पाकिस्तानच्या नेत्यांच्या मनात कायम असते. काही वेळा राजकीय दृष्ट्या सोयीची असल्यामुळे अंतर्गत राजकारणातील महत्त्वाच्या मुद्द्यावरून सामान्य जनतेचे लक्ष हटवण्यासाठी भारत-पाकिस्तान संघर्षाच्या मुद्द्याचा वापर केला जातो.

**काश्मीरचा प्रश्न:**

काश्मीर प्रश्नामध्ये चर्चा करण्यासारखे काही असेल तर पाक व्याप्त काश्मीर भारतात सामील करणे एवढेच शिल्लक राहिले आहे. असे विधान सध्याच्या भारताच्या केंद्र सरकारमधील संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ऑगस्ट २०१९ मध्ये केले होते. काश्मीर प्रश्न खूप गुंतागुंतीचा आहे. या प्रश्नात प्रामुख्याने तीन पक्ष आहेत एक, संपूर्ण काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, अशी भारत सरकारची ही सध्याची अधिकृत भूमिका आहे. दोन, काश्मीर हा स्वतंत्र सार्वभौम देश असला पाहिजे, अशी जम्मू आणि काश्मीर संस्थांनच्या राजाची महाराजा हरिसिंग यांची सुरुवातीला हीच भूमिका होती. काश्मीरमधील काही संघटना आज ही भूमिका मांडतात. तीन, काश्मीर पाकिस्तानचा भाग आहे, अशी पाकिस्तानची निर्मिती करू इच्छिणाऱ्यांची आणि आजच्या पाकिस्तान सरकारची हीच भूमिका आहे.

भारत स्वतंत्र झाला त्या आधी एक दिवस म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान स्वतंत्र झाला. भारताचा बराचसा भाग संस्थानिकांच्या अधिपत्याखालील होता. अंतिमत: हे संस्थाने ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली गेले होते. भारताला स्वातंत्र्य देताना ब्रिटिशांनी संस्थानिकांना पर्याय दिले होते. एक, भारतात सामील होणे. दोन, पाकिस्तानमध्ये सामील होणे आणि तीन स्वतंत्र राहणे.

बहुतेक संस्थानिकांनी आपल्या भौगोलिक विभागाप्रमाणे भारत किंवा पाकिस्तानात सामील झाले. काही संस्थानिकांनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. काश्मीरच्या राजाने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. काश्मीर संस्थानाचे भौगोलिकदृष्ट्या तीन भाग होते. बौध्द बहुसंख्य असलेला लडाक, मुस्लिम बहुसंख्य असलेले आणि निसर्गसौंदर्याने नटलेले काश्मीर खोरे आणि हिंदु असलेला जम्मू विभाग. काश्मीर संस्थानचा भाग सुरुवातीस पंजाब संस्थानचा भाग होता. ब्रिटीशानी हा भाग जिंकला जम्मूचा राजा गुलाबसिंगला विकला. स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा काश्मीर संस्थानाचा राजा हरिसिंग होता. काश्मीर खोऱ्यात मुस्किम लोकसंख्या अधिक असल्यामुळे काश्मीर नैसर्गिकरित्या आपलाच भाग आहेत असे पाकिस्तानला वाटत होते. पाकिस्तानचा काश्मीरवर डोळा होता. पाकिस्तानने त्यांच्या वजीरीस्तान प्रांतातील आक्रमणे आणि लढवय्ये म्हणून प्रसिद्ध असलेले आदिवासी घुसखोर काश्मीरमध्ये पाठवायला सुरुवात केली. त्याच बरोबरीने पाकिस्तान लष्कराचे सैनिकही काश्मीरमध्ये घुसले. त्यावेळी राजा हरीसिंगने भारताकडे मदत मागितली. भारत सरकार राजा हरसिंग यांच्यामध्ये अनेक चर्चा, वाटाघाटीनंतर आणि संयुक्त राष्ट्र सहित अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी मध्यस्थी केल्यानंतर करार झाला. काश्मीरला विशेष दर्जा देण्याच्या अटीवर राजाने भारतात सामील होण्याचे मान्य केले होते. त्यानंतर भारतीय सैन्याने काश्मीरमध्ये घुसलेल्या पाकिस्तानी सैन्याला परतून लावले आणि काश्मीरचे संरक्षण केले. हे भारत आणि पाकिस्तानमधील १९४७-४८ चे पहिले युद्ध होय.

भारताने हे प्रकरण संयुक्त राष्ट्र सुरक्षा परीषेदेकडे नेले. सुरक्षा परिषेदेने २० जानेवारी १९४८ रोजी एक ठराव मंजूर संमत करून भारत आणि पाकिस्तान साठीचा संयुक्त राष्ट्र संघाने आयोग स्थापन केला. संयुक्त राष्ट्रांच्या मदतीने युद्धबंदी घोषित करण्यात आली. दोन्ही देशांनी आपले सैन्य काही प्रमाणात माघारी घेतले. काश्मीरची सीमा निश्चित होईपर्यंत एक तातपुरती सीमा ठरवण्यात आली. ती न ओलांडण्याचे बंधने दोन्ही सैन्यावर करण्यात आले. या देशाला पुढे १९७२ च्या सिमला करारामध्ये नियंत्रण रेषा किंवा

'एलोसी' असे म्हटले जाते. आजही तात्पुरती सीमा त्याच नावाने ओखळली जाते. नियंत्रण रेषेच्या उत्तरेकडील भाग पाकिस्तानच्या नियंत्रणाखाली आहे. दक्षिणेकडील भाग भारताच्या ताब्यात आहे. पाकिस्तानने काश्मीर ताब्यात घेण्याचे प्रयत्न कायम चालू ठेवले आहे. पण जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने काश्मीरचा मुद्दा हा संयुक्त राष्ट्र संघटनेकडे मांडला. तिथेही तो प्रश्न आजही सुटलेला नाही आणि आजही भारत-पाकीस्तानातील राजकीय नेते काश्मीरच्या मुद्द्यावरून राजकारण केले जाते. आज काश्मीरचा हा प्रश्न आंतरराष्ट्रीय प्रश्न म्हणून त्याच्याकडे पहिला जातो.

**१९६५ चे भारत-पाक युद्धः**

१९६५ मध्ये काश्मीर मुद्द्यावर भारत आणि पाकिस्तानमध्ये पुन्हा एकदा साधारण २२ दिवसांचे युद्ध झाले. पाकिस्तानने पुन्हा घुसखोर काश्मीरमध्ये घुसवले. त्यांच्यापाठोपाठ सैन्याच्या हालचाली चालू केल्या. परंतु भारत सरकारने वेळीच भक्कम पाऊले उचलून पाकिस्तानचे सर्व इरादे उद्ध्वस्त केले. १९६२ च्या चीनबरोबर झालेल्या युद्धामध्ये माघार घ्यावी लागल्यामुळे भरतीय सैन्याचे मनोबल खचली असेल, त्यांची लढण्याची फारशी तयारी नसेल, याच वेळी आपण हल्ला केल्यास फारसा प्रतिकार होणार नाही आणि अगदी काश्मीर प्रश्नाचा पूर्ण निकाल लागला नाही तरी भारताला वाटाघाटीच्या टेबलावर येण्यास भाग पाडता येईल असे पाकिस्तान सरकारचे व्यूहरचना होती. एवढी मोठी युद्ध होईल, त्याचा पाकिस्तान सरकारला अंदाज नव्हता.भारतीय सैन्याने जबरदस्त प्रतिकार केला 'हाजी पीर पास' ओलांडून भारतीय सैन्य लाहोर जवळ जाऊन पोहोचले. त्यानंतर अमेरिका, इंग्लंड आणि रशियाने मध्यस्थी करून ते युध्द थांबवले. ताश्कंद येथे दोन्ही देशामध्ये करार झाला. या करारानंतर लालबहादूर शास्त्री यांचा अकाली मृत्यू झाला. त्यामुळे कराराची अंमलबजावणी काहीशी लांबली. परंतु ११९६६ मध्ये दोन्ही देशांना आपल्या फौजा परत मागे नेल्या. युद्धामध्ये हार होवूनही आम्हीच युध्द जिंकले अशा वल्गना पाकिस्तानी नेत्यांनी केला. २०१५ मध्ये या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त भारत सरकारने काही कार्यक्रम आयोजित केले होते. १९६५ च्या युद्धातील विजयामुळे चीन बरोबरच्या युद्धामुळे खचलेले भारतीय सैनिकांचे मनोबल वाढले. त्यानंतर त्यांनी अधिक चांगली तयारी केली आणि त्यामुळे १९७१ साली परत झालेल्या युद्धात भारतीय सैनिक चांगले काम करू शकले. त्यानंतर भारताने आपली भूमिका बदलली. १९७२ च्या सिमला करारामध्ये काश्मीरचा प्रश्न भारत आणि पाकिस्तान आपापसातील चर्चेनेच सोडवतील असे ठरले. दोन्ही देशांचे त्यावर एकमत झाले. परंतु पाकिस्तान नेहमी काश्मीर प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न करतो असतो. त्यानंतर १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये तिसरे मोठे युद्ध झाले. या युद्धात भारताचा विजय झाला आणि या युद्धातून बांगलादेशाची निर्मिती झाली. कारगिल संघर्ष हा १९९९ मध्ये पाकिस्तान सैन्यांनी कारगिल भागात घुसखोरी केली. त्याला भारतीय सैन्यांनी तोडीस तोड उत्तर दिले आणि पाकिस्तानी सैन्याला माघार घ्यावी लागली.

**पाकिस्तानचा दहशतवाद्यांना पांठिबाः**

पाकिस्तानने काशमीरमध्ये दहशतवादी घुसवून तेथील संघर्ष चालू ठेवण्याचा 'स्वस्त युद्धाचा' प्रयत्न नेहमीच केला आहे. भारताच्या सुरक्षा संघटनानी पकडलेल्या दहशतवाद्यामध्ये कांही दहशतवादी

अफगानिस्तान, इराक, चेचेन्या इत्यादी विभागातून आल्याचे आणि त्यांना पाकिस्तानच पाठवल्याचे निष्पन्न झाले आहे. काश्मीरमधील दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदत करण्याची भूमिका पाकिस्तान नेहमी पार पाडली आहे. पाकिस्तानचा वजिरीस्तान ही जगातील सर्वात भयंकर धोकादायक जागा आहे असे विधान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी २००९ साली केले होते. पाकिस्तान जगभरातील दहशतवाद्यांना आसरा देतो हे अनेकवेळा सिद्ध झाले आहे. अल-कायदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेचा प्रमुख ओसामा बिन लादेन बराच काळ पाकिस्तानमध्ये लष्करी तळाच्या अगदी जवळ लपून राहिला होता. २ मे १९११ रोजी अमेरिकेच्या सैनिकांनी त्याचा पत्ता शोधून त्याच्या राहत्या ठिकाणी जाऊन त्याला ठार मारले.

ऑगस्ट २०१९ मध्ये भारत सरकारने काश्मीर संबंधित काही निर्णय घेतले. त्यानुसार त्या राज्याचा विशेष दर्जा काढून घेण्यात आला. त्याची जम्मू आणि काश्मीर आणि लडाख असे दोन विभाग करून दोन वेगळी केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. त्यामुळे आता या प्रदेशाचे नियंत्रणथेट केंद सरकारकडे गेले आहे. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या '३७०' आणि '३५-अ' या दोनही कलमामध्ये बदल करण्यात आले. बरेचसे स्थानिक नेते बंदिवासात आहेत. लष्करी आणि निमलष्करी दलांची उपस्थिती मोठ्या संख्येने वाढवण्यात आली आहे. पाकिस्तानने या घडामोडी संबंधी आपली नाराजी व्यक्त केली. त्याला उत्तर देताना हा आमचा

अंतर्गत मुद्दा आहे त्याची पाकिस्तानाने दखल घेण्याची गरज नाही, पाकिस्तानने बेकायदेशीरपणे आपल्या ताब्यात ठेवलेला काश्मीरचा भाग भारताला परत करावा अशी भूमिका भारत सरकारने घेतली. अलीकडेच ऑगस्ट २०१९ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान वादामध्ये मध्यस्थी करण्याची तयारी दाखवली. पाकिस्तानने हे वक्तव्य लगेच उचलून धरले. भारताने याची काही गरज नसल्याचे स्पष्ट केले. भारत हा हिंदू धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून पुढे आला तर पाकिस्तान बहुसंख्य इस्लामिक राष्ट्र आहे. स्वातंत्र्यानंतर भारत आणि पाकिस्तान त्यांनी एकमेकांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले परंतु अनेक वाद आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर त्याला फारसे महत्त्व नव्हते.

## मोदी सरकारचे पाकिस्तान विषयीचे धोरण:

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांचे शासन सत्तेत आले. हे शासन एनडीएचचे असल्यामुळे अटलबिहारी वाजपेयी यांच्याप्रमाणे तेदेखील शांततेची प्रक्रिया सुरू करतील असे वाटत होते. असे वाटण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे नरेंद्र मोदी यांनी आपला शपथविधी सोहळ्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांना आमंत्रित केले होते. त्यामुळे एक प्रकारचे आशादायी चित्र निर्माण झाले होते. परंतु भाजपा शासनाकडून दोन्ही देशातील परराष्ट्र पातळीवरची चर्चा अचानकपणे खंडित करण्यात आली. त्यानंतर पाच महिन्यात पाकिस्तान कडून जवळपास २५० वेळा शस्त्रसंधीचे उल्लंघन झाली आहे. सीमेवरील गोळीबारामध्ये निष्पाप लोक मारले गेले आहेत. परिणामी दोन्ही देशातील संबंध अतिशय तणावपूर्ण बनले होते. मोदी सरकारने पाकिस्तान बाबतचे धोरण बदलून 'जशास तसे' धोरण अलंबवले होते. गोळीबाराचे उत्तर गोळीबाराने दिले पाहिजे, अशी भूमिका घेतली होती. तसेच द्विपक्षीय चर्चा ही फक्त दोन्ही देशादरम्यान व्हावी, त्यामध्ये हुर्रियतला स्थान दिले जाणार नाही. याबाबतच्या भूमिकेवर भारत ठाम

राहिला. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानची दुटप्पी भूमिका उघड केली. त्यामुळे पाकिस्तान एकाकी पडत असल्याचे चित्र होते. चीनचे अध्यक्ष शी झिनपिंग, अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी भारत दौर्यावर आल्यानंतर पाकिस्तानला जाण्याचे टाळले. या सर्व घडामोडीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तान एका बाजूला पडला होता. मोदी सरकारचे धोरण जवळपास आठ महिने चालले. या काळात मोदी हे वाजपेयींच्या शांतता प्रक्रियेचा मार्ग पुढे चालू ठेवत नाहीत असे म्हणत या सरकारवर टीकाही झाली. मात्र तरीही या धोरणामध्ये बदल झालेला नव्हता. तसेच चर्चा आणि शांतता प्रक्रिया भारताने खंडित केली असल्याने पुढाकार भारतानेच घ्यावा अशी पाकिस्तानची भूमिका राहिली.

**भारत-पाक संबंधातील अडथळे:**

पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणाचे चार मुख्य सूत्रधार आहेत. एक म्हणजे, पाकिस्तानमधील राजकीय नेतृत्व. दोन, पाकिस्तानी लष्कर. तीन, पाकिस्तान मधील धार्मिक मूलतत्त्ववादी गट आणि चार, पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना. या चार गटांमध्ये सत्तेवर प्रभाव पाडण्यासाठी सातत्याने सुंदोपसुंदी चालू असते. त्यापैकी केवळ पाकिस्तानमधील राजकीय नेतृत्वालाच भारताबरोबर संबंध पुन्हा एकदा सुरळीत व्हावेत असे वाटते. इतर तीन घटकांना भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याला स्पष्ट विरोध आहे. हे तीन घटक भारताला मुख्य धोका मानतात. याच तीन गटाने हाफिज सईद आणि ए. क्यू. खान यांना हिरो केला तर मलाला हिला व्हिलन ठरवले आहे. पाकिस्तानचे अमेरिकेतील माजी राजदूत आणि प्रसिद्ध लेखक हुसेन हक्कानी यांच्या मते या तीन गटांनी पाकिस्तानातील सामान्य जनतेची मने भारत, अमेरिका आणि इस्राईलला विरोधाने कलुषित केले आहेत. त्यांच्या नकारात्मक प्रचारामुळे पाकिस्तानी जनता दहशतवादाला नाही तर पाकिस्तानचा अंतर्गत सुरक्षेपुढील मोठा धोका मानतात. या तिन्ही घटकांना सातत्याने एक भीती जाणवते, कि भारत आणि पाकिस्तान संबंध सुधारले तर भारताचा केवळ पाकिस्तानवरच नाही तर अफगानिस्तान आणि मध्य आशियावर देखील प्रभाव वाढेल. भारत सध्या अफगाणिस्तानात मोठी विकासात्मक भूमिका बजावत आहे. भारताने २०१८ मध्ये अफगाणिस्तान बरोबर एक महत्त्वपूर्ण संरक्षण करार देखील केला आहे. राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई यांची भारताची अफगाणिस्तानातील भूमिका वाढावी अशी इच्छा आणि प्रयत्न आहेत. नरेंद्र मोदीच्या शपथविधीलाही ते उपस्थित होते. या सर्व गोष्टी पाकिस्तानी लष्कर, धार्मिक मूलतत्त्ववादी आणि दहशतवाद्यांना खटकणाऱ्या गोष्टी आहेत. पाकिस्तान मधील पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री आणि पंतप्रधान नवाज शरीफ यांचे लहान बंधू शहानवाज शरीफ यांनी पाकिस्तानी लष्कराचा भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याला असलेला विरोध बोलून दाखवलेला होता. भारत-पाकिस्तान संबंधाचे अभ्यास स्टीफन कोहेन यांनी आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'शूटिंग फॉर ए सेंचुरी: फाइंडिंग अन्सर टू इंडिया-पाकिस्तान' या पुस्तकात भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यात त्यातील घटकांचा कसा अडथळा आहे हे स्पष्ट करत आर्थिक भागीदारीतून उभय देशांमध्ये संबंध कसे सुधारू शकतात याचे विश्लेषण केले आहे.

**निष्कर्ष:**

या शोध निबंधामध्ये भारत आणि पाकिस्तान या दोन देशामधील सहकार्यापेक्षा संघर्षाचेच मुद्दे अधिक दिसून येतात. या संघर्षातील सर्वात महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे काश्मीरचा प्रश्न होय. काश्मीरचा प्रश्न हा

युद्धातून अथवा संघर्षातून न सोडवता तो चर्चेतून आणि वाटाघाटीतूनच सोडविणे हे दोन्ही देशाच्या दृष्टीने अधिक महत्वाचे होईल. त्यमुळे दोन्ही देशामध्ये चर्चा सुरु होणे गरजेचे आहे. कारण बरेचदा चर्चा खंडित झाल्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण होते. तसेच दोन्ही देशादरम्यान चर्चा खंडित व्हावी ही पाकिस्तानच्या लष्कराची नेहमीच इच्छा राहिलेली आहे असे दिसते. पाकिस्तानमधील लष्कर आणि पाकिस्तानी दहशतवादी संघटना हे भारताबरोबर चर्चा होऊ नये, संघर्ष वाढवा यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. पाकिस्तानी नेतृत्वाला भारताबरोबर संवाद सुरु व्हावा असे वाटते. पण तो खंडित झाल्यामुळे लष्कराला जास्त महत्व प्राप्त झाले आहे. पाकिस्तानमधील लष्कर, दहशतवादी संघटना यांचे महत्व कमी करायचे असेल तर तेथील राजकीय नेतृत्वाबरोबर चर्चा, वाटाघाटी आणि संवाद सुरु ठेवणे हे भारतासाठी गरजेचे आणि आवश्यक आहे आणि काश्मीरचा प्रश्न हा या माध्यमातूनच सुटू शकेल असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**

*१. डॉ. शैलेंद्र देवळाणकर- समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.*
*२. प्रा. बी. वाय. कुलकर्णी- आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, नागपूर.*
*३. डॉ. डी. ए. मांढरे, डॉ. पी. आर. पाटील व प्रा. बी. डी. तोडकर- भारताचे परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षितता, प्रतिमा पब्लिकेशन, अहमदनगर.*
*४. डॉ. शैलेंद्र देवळाणकर- भारताचे परराष्ट्रीय धोरण-सातत्य आणि स्थित्यंतर, सकाळ प्रकाशन पुणे, नोव्हेंबर २०१६.*
*५. हर्षद भोसले व शुभाराज बुवा - आंतरराष्ट्रीय संबंध , शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी २०१९.*
*६. वसंत र. रायपुरकर- आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.*
*७. डॉ.पंदित नलावडे - आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा औरंगाबाद.*

# कोरोनाच्या संकटात आशियाई क्षेत्रात सार्क संघटनेची भूमिका

**प्रा. डॉ. मारोती घंटेवाड**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख , वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.*

**प्रास्ताविक**:- जागतिक स्तरावरील सर्वच राष्ट्रेआपल्या राष्ट्रीय हीतसंबंधासाठी आणि सुरक्षिततेकरिता आप आपल्या राष्ट्रांचे धोरण उपलब्ध परिस्थितीनुसार व वस्तुनिष्ठ घटकांचा विचार करून ठरवित असतांना दिसुन येतात.याशिवाय राष्ट्राचे हितसंबंध, सुरक्षितता, सार्वभौमत्व आणि आर्थिक विकास व राजकीय पकड अधिक मजबूत होणे शक्य होत नाही. असा विचार पुढे येत होता म्हणूनच जगातील प्रत्येक राष्ट्रांनीआपले धोरण इतर राष्ट्रांशी आर्थिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण सहकार्याचे ठरवितांना दिसून येतात. अशा विचारसरणीचा वेग पहिल्या महायुद्धानंतर वाढला आणि द्वितीय महायुद्धानंतर या विचार प्रणालीने अधिक वेग घेतल्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शीतयुद्धास प्रारंभ झालेला प्रकर्षाने दिसून येतो. त्याच बरोबर द्वितीय महायुद्धानंतर जागतिक स्तरावर आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका खंडातील बहुतांश वसाहती खाली असणारी राष्ट्र नव्याने स्वतंत्र होऊ लागली आणि जागतिक पटलावर आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी पुढे येऊ लागली. अशा प्रकारच्या नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना शीतयुद्धात सहभाग घेणे विकासाच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटाच दिसत होती. कारण दोन राष्ट्रांच्या युद्धाच्या धुंदीत निष्पाप नवस्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचा बळी जातो.हे सर्व नवोदित राष्ट्रांना समजलेले असल्यामुळेच नवोदित राष्ट्रे शीतयुद्ध पासून तटस्थतेची भूमिका घेतली.कालांतराने आलीप्त चळवळीचा एक गट आंतरराष्ट्रीय ऊदयास येउन आपले आस्तित्व बळकट करण्यासाठी तीसरी शक्ती म्हणून पुढे आला.

**द्वितीय महायुद्धानंतरची स्थिती:-**

1945 ते 1980 च्या दशकापर्यंत जागतिक स्तरावर साम्यवादी विचाराविरोधात भांडवलशाही अशा प्रकारचा तणाव निर्माण झालेला दिसून येतो.अशाही वातावरणामध्ये आशिया,आफ्रिका,लॅटिन अमेरिका खंडातील नवोदित स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी आपापल्या पद्धतीने विकास करण्यासाठी प्रयत्न करीत होती. त्याचबरोबर जागतिक क्षेत्रांमध्ये युरोप खंडातील विकसित राष्ट्रांनी आपला सामुहिक विकास करण्यासाठी जागतिक संघटनेपेक्षा प्रादेशिक सहकार्य संघटना स्थापन करून त्या माध्यमातून सामूहिक विकासावर अधिक भर देऊ असा एकमुखी विचार मांडुन प्रादेशिक सहकार्य संघटना स्थापन करण्यावर भर दिला.

**प्रादेशिक संघटनेची आवश्यकता :-**

प्रादेशिक संघटनेची आवश्यकता असण्याचे महत्त्वाचे कारण असे की, जगातील कोणतेही राष्ट्र एक दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतंत्रपणे विकास करणे शक्य नसते. त्यांना इतर राष्ट्रांचे सहकार्य घेणे आवश्यक असते.त्यामुळे परस्परावलंबन व सहकार्य या तत्त्वांच्या आधारावर विविध क्षेत्रात विकास करण्यासाठी मदत मिळते व मानवी विकासाचा जीवनस्तर उंचावला जाऊन तेथील शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत मिळते. याकरिता प्रादेशिक संघटनेचे आवश्यकता आहे असे विकसित राष्ट्रांनमध्ये एकमत झाल्यामुळेच युरोप खंडामध्ये प्रादेशिक संघटना निर्माण झालेल्या दिसून येतात.

उदा:- आठ विकसित राष्ट्रांचा समूह (Group of 08 Development Countries),अमेरिकन राज्याची संघटना (Organization of American State ),युरोपीय आर्थिक समूह ( European Economic Community ),पश्चिम युरोपीय संघ (Western European Union ), युरोपियन मुक्त व्यापार संघटना (European Free Trade Organization),पेट्रोल निर्यातदार राष्ट्रांची संघटना (Organization of Petrol Exporting Countries) इत्यादी प्रादेशिक सहकार्य संघटनांची निर्मिती करण्यात आली .याव्यतिरिक्त सुद्धा 1945 पूर्वी व राजकीय क्षेत्रात राष्ट्रसंघाव्यतिरिक्त सुद्धा काही संघटनांची नोंद केली गेली. ज्यामध्ये ब्रिटिश राष्ट्रकुल (British Comman Wealth),अरब लीग (Arab League),अमेरिकन राज्याची संघटना (Organization of American State )या त्या दिसून येतात.

**नवस्वतंत्र झालेल्या राष्ट्रांची विकासाकडे वाटचाल:-**

1945 नंतर ब्रिटिश वसाहतवादातून स्वतंत्र झालेल्या नवस्वतंत्र राष्ट्रांनी देखील विकसित राष्ट्रांचे प्रादेशिक सहकार्य संघटना निर्माण केल्याचे उदाहरण लक्षात घेऊन त्यांचा ही सर्वस्पर्शी विकास साधण्यासाठी परस्पर सहकार्याची गरज प्रतिपादित केलेले दिसून येते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रामुख्याने आफ्रिका, लॅटिन अमेरिका खंडातील राष्ट्राने आफ्रिकन एकता संघ (Organization of African Union),दक्षिण -पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (Association of South East Asian Nation)यासारख्या प्रदेश संघटना निर्माण केल्या. या संघटनांच्या निर्मितीचा मुख्य उद्देश ही विकसित राष्ट्रांच्या प्रादेशिक संघटने सारखाच दिसून येतो.

**प्रादेशिक संघटना सार्क:- (दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना: सार्क ):-**

युरोप खंडातील प्रादेशिक संघटना आणि आफ्रिका खंडातील प्रादेशिक संघटना यांच्या निर्मितीच्या आदर्शाने ध्येयाने व उद्देशाने प्रेरित होऊन दक्षिण आशियाई क्षेत्रातील ऐतिहासिक ,भौगोलिक ,आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या जवळीक असलेल्या त्याचबरोबर समान समस्या आणि विकासाची मंदगती असणाऱ्या विविध राष्ट्रांचा सर्वतोपरी सर्व स्तरावर विकास करण्यासाठी बांगलादेशाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष झिया-उर-रहमान यांच्या अथक प्रयत्नातून आणि भारताने दिलेल्या पाठिंब्यामुळेच 7 डिसेंबर 1985 रोजी दक्षिण आशियातील ,भारत ,पाकिस्तान ,बांगलादेश ,श्रीलंका ,भूतान ,नेपाळ व मालदीव या आशियातील सात राष्ट्राला संघटीत करून दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना सार्क नावाची प्रादेशिक संघटना निर्माण करण्यात झिया-उर-रहमान यांनी यश मिळविले. त्यामुळे परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, सामाजिक ,आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरावर आदान-प्रदान करणे, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात विकास घडवून आणणे ,जनतेचा जीवनस्तर उंचावणे ,महिला व बालकांच्या समोर येणाऱ्या समस्या नष्ट करून त्यांचा विकास करणे ,एकमेकांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे, वादाचे आणि संघर्षाचे प्रश्न सामंजस्याने सोडणे इत्यादी उद्देश साध्य करण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली. सार्क संघटना स्थापन करण्यासाठी आशिया खंडातील राष्ट्रांपैकी भारताने सर्वाधिक प्रयत्न केले त्याचबरोबर सार्क संघटनेला मजबूत करण्यासाठी पुढाकार घेऊन आर्थिक मदत सर्वाधिक देऊ केली .त्यामुळे भारताला आज सार्क मध्ये बिग ब्रदर म्हणून ओळखले जाते. भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी त्यानंतर श्री राजीव गांधी यांनी पुढाकार घेऊन सार्क संघटना निर्माण केली.खऱ्या अर्थाने सार्क संघटनेचे भवितव्य राजीव गांधी पासून ते डॉ.मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीपर्यंत अतिशय महत्वाचे होते.1985 पासुन प्रत्येक

भारतीय पंतप्रधानांनी दक्षिण आशियामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी सार्क संघटनेच्या माध्यमातून सकारात्मक भूमिका घेऊन सार्क राष्ट्रांचे संबंध मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत होती. सार्क संघटना मजबूत करण्यासाठी भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, श्री राजीव गांधी ,इंद्रकुमार गुजराल ,अटल बिहारी वाजपेयी ,डॉ.मनमोहन सिंग यांची अतिशय महत्त्वाची भुमिका आहे. त्याचबरोबर सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथविधीलाच दक्षिण आशिया खंडातील सात राष्ट्रांच्या काही सदस्यांना निमंत्रित करूनच पंतप्रधानपदाची शपथ घेतली यामुळे सात राष्ट्रांचे भारतासोबत संबंध अधिक मजबूत करण्यासाठी सार्कच्या व्यासपीठ महत्त्वाचे ठरल्याचे दिसून येते. तसे पाहताना अटल बिहारी वाजपेयी यांच्या कालखंडात आणि नरेंद्र मोदी यांच्या कालखंडात थोड्या प्रमाणात सार्क राष्ट्रांचे संबंध काही प्रमाणात तणावाचे तर काही प्रमाणात सलोख्याचे दिसून येतात परंतु पुढे चालून या दोन्ही पंतप्रधानांनी सार्क राष्ट्रांचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केलेले सुद्धा दिसून येतात. उदाहरणात पंतप्रधान वाजपेयी यांनी दिल्ली लाहोर बस सुरु करुन मैत्रीचा नवा मार्ग सुरू केला.

**नरेंद्र मोदी यांचे कोरोनाच्या कालखंडात पाकिस्तान सोबतचे संबंध:-**

नरेंद्र मोदी यांनी ३७० कलम रद्द केल्यानंतर पाकिस्तान-भारताचे संबंध अतिशय तणावाचे निर्माण झालेले होते. परंतु पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांना कोरोना झाल्यामुळे कोरोनातुन सावरण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी पत्र पाठवून त्यांची तब्येतीची शहानिशा केली आणि भारत पाकिस्तानच्या सीमेवरील तणाव कमी करण्याची विनंती केली त्याला सकारात्मकता पाकिस्तानच्या पंतप्रधान इम्रान खान यांनी दर्शविली याचा अर्थ पाकिस्तान हा कोरोनाच्या संकटात सापडला असल्यामुळे अनेक प्रकारच्या संकट पाकिस्तान वर आले होते. अर्थव्यवस्था कोलमडली ,महागाईचा प्रत्येक क्षेत्रात स्फोट झालेला दिसून येत होता. त्यामुळे घाबरलेल्या पाकिस्तानने आपली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी नरमाईची भूमिका घेतल्याचे दिसून येते.अर्थात सार्क संघटनेच्या माध्यमातून तणाव कमी करून संबंध वाढविण्यावर भर दिल्याचे दिसते. म्हणून सार्क संघटना ही आशियाई क्षेत्रात शांतता निर्माण करण्यासाठी महत्त्वाची ठरलेली दिसते.असे जरी वाटत असले तरीसुद्धा काही कळीचे मुद्दे निर्माण करून या क्षेत्रात अशांतता कायम रहावी सार्क राष्ट्रात एकमेकाबद्दल संशयाचे वातावरण निर्माण व्हावे. या राष्ट्रांच्या विकासात अडथळे यावेत. अशी नीती काही विकसित राष्ट्रांनी आणि आशिया खंडातील स्वतःला श्रीमंत म्हणून घेणारा चीन देश करीत असल्याचे दिसून येते.

**जागतिक राजकारणाचे बदलते स्वरूप:-**

आज जागतिक राजकारणाच्या समीकरणाचे बदलते स्वरूप लक्षात घेताना असे दिसून येते की ,प्राथमिक अवस्थेत रशिया विरुद्ध अमेरिका असा संघर्ष दिसून येत होता समकालीन जागतिक संघर्षात साम्यवादी चीन अमेरिका असा संघर्ष निर्माण झालेला दिसून येत आहे. कोरणा सारख्या रोगाचा प्रसार चीनच्या हुआन शहरातून निर्माण झाला असा आरोप अमेरिका आणि जगातील बहुतांशी राष्ट्र स्पष्टपणे बोलू लागले त्यामुळे संपूर्ण जग समकालीन कोरोना च्या संकटाचा सामना करीत आहे हे सुद्धा जागतिक राजकारण चीनने केल्याचे दिसून येते. परंतु हा आरोप चीनने फेटाळत आहे. चीन आरोप फेटाळत असला तरीही चीन खरोखरच डावपेचाचे राजकारण करणारा जागतिक स्तरावरचा एक प्रमुख देश दिसून येतो हे सर्व जगातील राष्ट्रांना स्पष्ट पद्धतीने समकालीन स्थितीमध्ये कोरोनाच्या संकटातून दिसून आले आहे.

**चीनचा समकालीन जागतिक डावपेज :-**

चीनचा समकालीन जागतिक डावपेच संपूर्ण जगाच्या लक्षात आलेला आहे चीन हा देश असा आहे की आशिया खंडातच नव्हे तर संपूर्ण जगाला उध्वस्त करण्याच्या मार्गावर उभा राहिलेला आहे हे कोरोना सारख्या भयानक रोगाची निर्मिती करून जगभर तो व्हायरस पसरून स्वतः मात्र शांत बसलेला दिसतो त्यामुळे संपूर्ण जग या व्हायरसमुळे मानवाचे प्राण वाचविण्यात मग्न झाले आहे त्यामुळे एकंदरीत जगातील बहुतांशी राष्ट्रांची अर्थव्यवस्था संकटात सापडली दिसून येते याला अमेरिका सुद्धा अपवाद नाही. त्यामुळे चीन हा देश दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये भारताचा शत्रू राष्ट्र म्हणून 1962 पासून सतत भारताच्या विरोधात कुरघोडी करीत असल्याचे दिसून येते .आजही भारताच्या विरोधात चीनने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीमध्ये कायम सदस्यत्वासाठी बहुतांश राष्ट्राने भारताला पाठिंबा दर्शविला असताना देखील चीनने मात्र प्रखर विरोध केलेला दिसून येतो. अशाप्रकारची चीनची नीती भारताच्या संदर्भात असल्यामुळे भारताने सुद्धा सार्क राष्ट्रांमध्ये चीनला सदस्यत्व देण्यासाठी विरोध दर्शविलेला दिसून येतो. चीन हे राष्ट्र सार्कचा सदस्य नसल्यामुळे सार्कमधील राष्ट्रांना चिथावणी देऊन आपलेसे करून घेण्यात आणि भारताला एकांगी पाडण्यात सतत डावपेच करीत असल्याचे दिसून येते. परंतु भारत हा एकमेव लोकशाहीप्रधान राष्ट्र असल्यामुळे दक्षिण आशियाई राष्ट्रातील सार्क मधील सदस्य राष्ट्रांतर्गत लोकशाही निर्माण करण्यासाठी त्या देशांमधील सर्व समस्या दूर करण्यासाठी भारत सदैव प्रयत्न करीत आला आहे.भारताने सार्क राष्ट्रांमधील ज्या ज्या समस्या निर्माण झालेले आहेत त्या समस्या नष्ट करण्यासाठी पुढाकार घेतलेला दिसून येतो. दारिद्य, बेकारी कुपोषण ,वाढती लोकसंख्या, गुन्हेगारी पर्यावरण, आरोग्य, सीमापार दहशतवादी कारवाया, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात विकास घडवून आणणे, जनतेचा जीवनस्तर उंचावणे ,महिलांच्या समस्या सोडवणे, बालकांचा विकास करणे ,सामाजिक ,आर्थिक व सांस्कृतिक स्तरावर आदान-प्रदान करणे ,परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण करणे यासाठी सातत्याने भारताने सुरुवातीपासून आजपर्यंत पूर्णपणे सकारात्मक भूमिका दर्शवित आलेला आहे.

**कोरोनाच्या संकटात आशियाई क्षेत्रात सार्क संघटनेची भूमिका:-**

दक्षिण आशियाई क्षेत्रांमध्ये सार्क संघटनेची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे 1985 पासून ते आजतागायत सार्क संघटनेच्या माध्यमातून सारख्या व्यासपीठावरून अनेक प्रश्न सोडविण्यासाठी तपशील आशय राष्ट्रातील सार्क सदस्य राष्ट्रांनी सारख्या व्यासपीठाच्या माध्यमातून सारख्या राष्ट्रात एकजूट निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर सार्क सदस्य राष्ट्रांमधील जे मतभेद आहेत ते नसतं करण्यासाठी सारख्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत. सार्क सदस्य राष्ट्रांनी एकमेकांबद्दल विश्वास संपादन करणे अतिशय महत्त्वाचे आहेत या दृष्टिकोनातूनच भारताने अतिशय महत्त्वाची भूमिका घेऊन एकमेकांबद्दल विश्वास संपादन करण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे दिसून येते. दक्षिण आशियाई क्षेत्रामधील अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत त्या समस्या नष्ट करण्यासाठी भारताने सार्कच्या माध्यमातून पुढाकार घेत सार्क राष्ट्रांमध्ये मैत्रीसंबंध दृढ करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. दक्षिण आशिया खंडामध्ये वाढत असणारा सीमापार दहशतवाद यासारख्या समस्या नष्ट करण्यासाठी दहशतवादी गटांना खतपाणी घालणाऱ्या राष्ट्रावर सामूहिक दबाव टाकण्याचे काम सार्क संघटनेच्या व्यासपीठावरून भारताने करीत आहे. दहशतवादी गटाला सहकार्य करणाऱ्या एखादा सार्क राष्ट्र असेल तर त्याला आर्थिक निर्बंध लावण्याचे सर्व प्रयत्न सार्क व्यासपीठाच्या माध्यमातून सार्क सदस्य राष्ट्रे करीत

आहेत. दक्षिण आशियाई क्षेत्रात समस्या निर्माण करणाऱ्या राष्ट्रांना योग्य धडा देण्यासाठी भारताने सार्कच्या व्यासपीठावरून वेळोवेळी पुढाकार घेतला आहे. या क्षेत्रात शांतता,विकास , परस्परांना सर्व क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी एकमेकांच्या हातात हात देणे आवश्यक आहे असे आव्हान करून भारत पुढाकार घेत आला आहे. यासाठी भारताने जे प्रयत्न करीत आहे त्याच सारखे प्रयत्न सार्क राष्ट्रे सुद्धा करणे आवश्यक आहे . आज समकालीन परिस्थितीमध्ये जागतिक राजकारणाच्या समीकरणात बदल होत आहेत त्या पार्श्वभूमीवर भारताने सुद्धा आशिया खंडातील सार्क सदस्य राष्ट्रांच्या मैत्री संबंधाबद्दल सकारात्मक होती का घेऊन कोरोना सारख्या समस्यांचा सामना करण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोनाची लस भारतात निर्माण केल्यावर आशिया खंडातील सदस्य राष्ट्रांना देण्याचे आश्वासन मागणी करण्याऱ्या राष्ट्रांना देउन सहकार्यही केले आहे.त्याचबरोबर इतर अनेक राष्ट्रांना सहकार्य करूनच या संकटातून बाहेर काढण्यासाठी भारताने कोरोणावर निघालेली दिलस देऊन जागतिक राजकारणात आणि दक्षिण अशियाई क्षेत्रातील राजकारणात संकटाच्या विरोधात भारताने पुढाकार घेऊन कोरोनाचा सामना करण्यासाठी सार्क राष्ट्रांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहून मानवतावाद अंगीकारलेला दिसून येतो. तसे पाहता नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण थोड्याफार प्रमाणात का होईना सकारात्मक दिसून येतात. पण असे नव्हे की नेहरूजीची तुलना कोणीही करू नये नेहरूजीचा कालखंड आणि समकालीन परिस्थिती यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे.जर सार्क राष्ट्रांनी परस्पर मैत्रीसंबंध दृढ केल्यास दक्षिण अशियाई प्रादेशिक क्षेत्रातील मानवी समुदायाच्या विकासाला हातभार लागेल. परिणामी दक्षिण आशियाई प्रादेशिक क्षेत्रात कायमची शांतता निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. या क्षेत्राचा प्रभाव जगातील विकसित राष्ट्रांवर सुद्धा पडल्याशिवाय राहणार नाही.त्यामुळे आशिया खंडात शांतता नव्हे तर संपुर्ण जगामध्ये शांतता निर्माण होईल यात शंका नाही.

## संदर्भसची:-

*१) रुकमी बसू, आंतरराष्ट्रीय राजकारण - संकल्पना, सिद्धांत आणि समस्या, साग पब्लिकेशन्स नई दिल्ली,२०१७*
*२) शिवम पाल - आंतरराष्ट्रीय संबंध, वंदना पब्लिकेशन नई दिल्ली.२०१२*
*३) मुन्द्रिका प्रसाद - आंतरराष्ट्रीय संबंध, अर्जन पब्लिकेशन हाउस नई दिल्ली. २०१३*
*४) दिनेश मांडोन, आंतरराष्ट्रीय संघटन, अंकित पब्लिकेशन जयपूर. २०१०*
*५) बी. सी. नरुला, आंतरराष्ट्रीय राजनिती, अर्जुन पब्लिकेशन नई दिल्ली. २०१३*
*६) डॉ.रुक्मी बसू - संयुक्त राष्ट्रसंघ सिद्धांत व व्यवहार, जवाहर पब्लिकेशन नई दिल्ली, २०११.*
*७) ए.के.मिश्रा - दक्षिण आशिया एवं भारत का विकास प्रिझम बुक्स जयपूर, २०१२.*
*8) व्हि. एन. खन्ना आंतरराष्ट्रीय संबंध, विकास पब्लिकेशन हाऊस नवी दिल्ली, २००७.*
*९) बी. सी. नरुला- प्रमुख राष्ट्रों की विदेश नीती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, २०१२.*
*१०) डॉ. बी. सिंह गहलोत - भारतीय विदेश नीती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली २००६.*
*११) विवेक यश. राज - भारतीय विदेश नीती, सिविल सर्व्हिसेज टाइम्स, नवी दिल्ली, २०११.*
*१२) नीरज सिंह, नेहरू- पटेल, अग्रीमेंट विदिन डिफरनसेस सेलेक्ट डॉक्युमेंटस अॅन्ड करस्पाँडन्स (१९३३-१९५०), नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २०१०.*
*१३) डॉ.शशी शुक्ला आंतरराष्ट्रीय संघटन, भारत प्रकाशन लखनऊ, २००९.*
*१४) पी. बी. दत्त - स्वतंत्र भारत की विदेश नीती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २०११.*
*१५) दैनिक लोकसत्ता मधील अनेक लेख व संपादकीय लिखाण 2019*
*१६) गुगल सर्च २०१९.*
*१७) Pawar Yadav , International Relational ,Srishit book Distributors ,New Delhi 2012.*
*१८)Andreas Wenger, International Relations: From Could War to the Globalized World,Viva Books,New Delhi.2004.*

# सार्क संघटनेची समकालीन प्रासंगिकता

**डॉ . एन. आर. चिमुरकर**
*सहा. प्राध्यापक, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर*
*nrchimurkar1@gmail.com*

**गोषवारा**

*व्दितीय महायुध्दानंतर आंतराष्ट्रीय राजकाराणात आर्थिक व राजकीय सहकार्य नागरीकांचा सर्वागीन विकास व्हावा. या उदेशाने प्रेरीत होउन, अनेक राज्यांनी प्रादेशीक स्वरूपाचे संघटन निर्माण केले आहे. यामध्ये दक्षिण आशियातील सार्क ही क्षेत्रीय संघटना अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यामुळे या राज्यात परस्पर बंधुभाव व परस्पर सहकार्याचे नवे दालन खुले झाले. त्यामुळे या संघटनेला 'युगांन्तरकारी' घटना 'सामुहीक समझदारी' व राजकीय ईच्छाशक्तीची अभिव्यक्ती अशी उपमा देण्यात आली.*

*दक्षिण आशियायी संघटनेची स्थापना अशा काळात आली की, या संघटनेतील काही राज्यांचे परस्पर सबंध मित्रत्वाचे नसून शत्रुत्वाचे होते. आणि ते संबंध समकालीन परिस्थीतीत देखील सामान्य स्वरूपाचे नाही त्यामुळे सार्क संघटनेच्या विकासावर व उद्देशावर विपरीत परीणाम आलेला दिसून येते, तरी पण सार्क संघटनेतील राज्यात राजकीय विग्रह असला तरी, आर्थीक, सामाजीक, सांस्कृतीक आणी व्यापारीक सहकार्य वाढीस लावण्यासाठी व या प्रादेशीक भुखंडावर वास्तव्य करणाऱ्या नागरीकांच्या विकासाकरीता ही संघटना आजही महत्वपूर्ण आहे.*

***बिजशब्द —*** *क्षेत्रीय सहकार्य, साप्टा आत्मनिर्भरता सक्रीय सहयोग, आंतराष्ट्रीय राजकारण, शिखर संमेलन, राजकीय इच्छा*

**प्रस्तावना —**

संयुक्त राष्ट्र संघाप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक स्तरावर वेगवेगळया राज्यांनी प्रादेशिक स्वरूपांचे संघटन स्थापन केले आहे. या प्रादेशिक संघटनांना संयुक्त राष्ट्राची संमती असून संयुक्त राष्ट्रांच्या संसदेत या संघटनांना वैधानिक स्थान देण्यात आले आहे. सनदेच्या कलम नं ५२ प्रमाणे संयुक्त राष्ट्राच्या उददेश व सिध्दांतानुसार शांतता व सुरक्षिततेसाठी क्षेत्रीय संघटनांना मान्यता देण्यात आली आहे. कलम नं. ५४ नुसार अशा संघटनांना शांततेच्या स्थापनेसाठी कोणतीही कारवाई करण्यापुर्वी सुरक्षा मंडळास सुचना देणे बंधनकारक असते.

दक्षिण आशियायी क्षेत्रातील नागरीकाचा कल्याण व जिवनमानाचा स्तर उंचावणे तसेच आंतरराष्ट्रीय मंचावर आपसी सहकार्य मजबुत करण्यासाठी सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली आहे सार्क संघटनेचा मुळ आधार राज्याराज्या मधील क्षेत्रीय सहकार्यावर भर देणे आहे.

**सार्क संघटनेची स्थापना व स्वरूप**

दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) या संघटनेची स्थापना ८ डिसेंबर १९८५ बांग्लादेशाची राजधानी ढाका येथे करण्यात आली. यात दक्षिण

आशियातील भारत, बांग्लादेश, भुतान, पाकिस्तान, श्रीलंका, मालदिप व नेपाल ही संस्थापक सात राज्य आहेत. परंतु सध्या यात आठ राज्य असून २००७ ला अफगानिस्थान ला सभासदत्व देण्यात आलेले आहे. सार्कच्या स्थापनेमुळे या देशामध्ये सदभावना बंधुभाव आणि आपसी सहकार्याचे नवे युग निर्माण होईल, अशी अपेक्षा होती त्यामुळे या संघटनेला नव्या युगाचा शुभारंभ असे म्हटले होते.

दक्षिण आशियातील देशांचे प्रादेशिक संघटन असावे अशी भुमिका सर्वप्रथम बांग्लादेशाचे राष्ट्रपती जिया उर रहमान यांनी मांडली होती. त्यांनी १९७७ ते १९८०या दरम्यान या राज्याचे दौरे करून यावर चर्चा केली व संघटनेसंबंधीचा दस्तावेज करण्यात आला. पुढे १९८३ ला विदेश मंत्र्याची बैठक दिल्ली येथे आयोजीत केली होती या बैठकीत या संघटनेची औपचारीक घोषणा करण्यात आली आहे. त्यांनतर सवैधानिक स्वरूप निश्चित करून १९८५ ला या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे.

सार्क संघटनेचा मुळ गाभा प्रादेशिक स्वरूपाचा, सहकार्याचा आहे. कृषी आरोग्य, विज्ञान, मौसम, डाक तार सेवा, ग्रामीण विकास, खेळ सांस्कृतिक सहकार्य, संकटकालीन सहकार्य, दहशतवादाची समस्या मादकद्रव्याची तस्करी, महीला विकास व भुमिका या सर्व विषयावरील क्षेत्र निर्धारीत करून आपसी सहकार्य भुमिका, घेण्यात आलेली आहे.

दक्षिण आशियायी देशांमधील सामुहीक आत्मनिर्भरता मध्ये वाढ करणे, आर्थिक, सामाजीक, राजकीय, सांस्कृतिक स्तरावर विकास करणे, आपसी विश्वास, सद्भावना व समस्यांचा निपटारा करणे, अन्य विकसनशील देशांना मदत करणे तसेच सामान्य प्रश्नांवर आंतरराष्टीय स्तरावर आपसी सहयोग करणे. या उद्देशाच्या पूर्ततेसाठी सार्क संघटनेची निर्मिती करण्यात आली आहे.

सार्क संघटनेच्या मुख्य सिध्दांतानुसार अंतर्गत सहकार्य, समानता, प्रादेशिक अखंडता, राजकीय स्वतंत्र तसेच कोणत्याही देशाच्या अंतर्गत व्यवस्थेत हस्तक्षेप न करणे व्दिपक्षिय किंवा बहुपक्षिय स्थान न देता त्यांना पूरक निर्माण केले आहे. या सिध्दांतावर आधारीत सार्क संघटनेची निर्मिती होवून, या प्रादेशिक संघटनेमधील सर्व देशांनी आपसी सहकार्य व प्रादेशिक विकासावर भर दिले आहे.

सार्क सभासद देशांचे क्षेत्रफळ जागतीक क्षेत्रफळाच्या केवळ ३ टक्के आहे. परंतु या प्रादेशीक स्तरावर वास्तव्य करणा—या लोकांची संख्या ही जागतीक एकुण लोकसंख्येच्या २१ टक्के इतकी आहे तसेच जागतीक अर्थव्यवस्थेत सार्क देशाची भागीदारी केवळ ३.८ टक्के आहे ही २.९ टिलीयन अमेरीकन डॉलर इतकी आहे यावरून सार्क देशाचा विकास व त्या देशातील नागरीकांचे राहणीमान व दर्जा यांचा अंदाज येवू शकतो.

**सार्क संघटनेचे यशापयश**

क्षत्रिय आशियायी संघ हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्व प्रादेशीक संघापेक्षा अधिक लोकसंख्येवाला संघटन आहे. या क्षेत्रात प्राकृतिक संसाधने, लोकसंख्येची प्रतिभा

भरपूर आहे. परंतु तेथील लोकसंख्या अजुनही गरीबी, कुपोषण, निरक्षर या समस्यांचा सामना करीत आहे.

सार्क देशामधील राजकीय सुरक्षात्मक वाद—विवाद असले तरी आर्थिक विकास व सहकार्य करीता ही संघटना अतिशय महत्वपूर्ण आहे. या देशामध्ये राजकीय स्वरूपांचे संघर्ष असले तरी आर्थिक, सामाजीक, सांस्कृतीक, व्यापारी सहकार्य वाढीस लावून, सार्क देशांच्या विकासावर भर देता येते. परंतु सार्क देशांच्या संघटनेला स्थापना होवून ३५ वर्षे झाले असले तरी, या संघटनेचा व प्रादेशिक सहकार्याचा विकास अतिशय कासव गतीने सुरू आहे युरोपीयन संघटन तसेच आशियान याप्रमाणे एक आर्थिक शक्ती म्हणून निर्माण झालेली नाही तसेच सार्क नी आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष कोणत्याही प्रकारची राजकीय ओळख किंवा प्रतिष्ठा निर्माण केलेली नाही.

दक्षिण आशियाई संघटनेला कोणत्याही प्रकारची स्वतंत्र ओळख नसल्याने या क्षेत्रीय सहकार्याचे प्रयत्न म्हणजे मृत शिशुच्या समान आहे असे म्हटले जाते सार्क सभासद देशामध्ये विविधता दिसून येते. पाकिस्तान हा स्वत:ला दक्षिण आशियाचा अंग न समजता इस्लामिक मध्य—पूर्वचा अंग समजतो नेपाल कधी चिनकडे तर कधी भारताकडे झुकतो श्रीलंकेमध्येही चिनचे वर्चस्व वाढीस लागले आहे तसेच मालदिप वरही चिनचा फार मोठा प्रभाव दिसून येतो सार्क संघटनेच्या उपदेशानुसार परस्पर सहकार्य करण्याचे निश्चित केले असले तरी यांचे धोरण व दृष्टिकोन परस्पर विरोधी आहेस आंतरराष्ट्रीय स्तरावर समान मत असावे असे असले तरी संयुक्त राष्ट्र संघात एक दुस—याच्या विरोधी मतदान केले आहे भारत आणि पाकिस्तान हे पारंपारीक एकमेकांचा शत्रु राष्ट्र मानत असतांना भारत आणि नेपाल यांचे ही संबंध मधुर स्वरूपाचे नाही नेपालचा चिनकडे झुकणारा कल हा भारतासाठी डोकेदुखी ठरली आहे. नेपालने २०२० ला भारताच्या सिमेवर गोळीबारही केला होता भारतातील दहशतवाद आतंकी हमले यामुळे सार्क संघटनेतील प्रभावी राष्ट असले तरी भारत व पाकीस्तान हे परस्परांना कट्टर शत्रु समजतात त्यांचा फार मोठा प्रभाव सार्क संघटनेच्या सहकार्यावर व विकासावर झालेला आहे भारत व बांग्लादेश यामधील अनेक प्रश्नावर मतभेदआहेत त्यामुळे प्रादेशिक सहकार्यावर विपरीत परिणाम होत आहे.

सार्क संघटना प्रादेशीक सहकार्य व विकास या क्षेत्राकरीता स्थापन झाली असली तरी भारतासोबत अनेक राज्यांचे मतभेद असल्याने त्यांनी जगातील इतर राज्यासोबत संबंध स्थापन केले आहे नेपाळ ने चिनला तर पाकिस्तानला अमरीकेला जवळ नेले आहे त्यामुळे सार्क संघटनेच्या बांग्लादेशाच्या प्रधानमंत्री बेगम खालीदा यांनी Divided House असे म्हटले आहे.

असे अनेक मतभेद व आपशी संघर्ष असले तरी सार्क देशांनी परस्परांतील अनुभव व तंत्रज्ञानाचे आदान—प्रदान करून उत्पादकता वाढीस लावली तर, तसेच उत्पादीत वस्तु व सेवांचा परस्पर देवान—घेवान केली तर प्रादेशिक स्तरावर सामुहीक स्वरूपांची आत्मनिर्भरता

प्राप्त होईल, त्यामुळे जगातील महाशक्तीच्या प्रभावातुन मुक्त होवून हा प्रदेश आंतराष्ट्रीय आर्थिकदृष्टया समृध्द होवू शकतो.

**सार्क संघटनेची समकालीन प्रासंगिकता**

दक्षिण आशियाई प्रदेशातील आठ देशांची सार्क संघटना स्थापन झाली असली तरी, परस्परातील मतभेद व वाद—विवाद तसेच परस्परातील अविश्वास यामुळे या संघटनेला अपयश प्राप्त झाले आहे. दक्षिण आशिया जगातील सर्वात मोठा असंघटीत क्षेत्र आहे. सार्क देशांचा जागतीक जो व्यापार आहे. त्यापैकी फक्त ५टक्के व्यापार परस्परात होतो सन २००६ ला सर्व देशांमध्ये व्यापारी वृध्दीं करण्यासाठी दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र साफटा करार करण्यात आला, असला तरी वास्तविक परिस्थीतीत अजुनही सफल झालेले नाही. भारतीय उरी क्षेत्रावर आतंकी हमला झाल्यानंतर भारत व पाकीस्तान मध्ये अतिशय संघर्ष निर्मान झाल्याने पाकीस्तानमध्ये होणारे सार्कचे शिखर सम्मेलन रद्द झाले व ते अजुनही त्यानंतर संम्मेलन न झाल्याने आपशी वाद—विवादातील चर्चा झालेल्या नाही याचा विपरित परिणाम सार्कच्या विकासावर होत आहे भारत व पाकीस्तान मधील संघर्ष हा सार्क संघटनेच्या असफलतेचा महत्वाचा कारण आहे भारत हा **'बिम्सटेक'** (BIMSTEC) चा सभासद आहे. यात भारताची वाढती कार्यवीधी हा एक कारण सार्क संघटनेच्या प्रासंगिकतेवर व भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्मान करीत आहे. या सर्व देशामध्ये भारत हा मजबुत स्थितीत आहे. त्यामुळे पाकिस्तान वारंवार भारताला कायमचा शत्रु माणून विरोध करीत असते सार्क संघटनेत भारतामार्फत प्रस्तााावित सर्व प्रस्तावाला पाकिस्तान नेहमीच विरोध करीत असतो.

सार्क देशातील एकुण लोकसंख्येच्या जवळ—जवळ अर्धी लोकसंख्या ही निम्न उत्पन्न गटातील आहे. तसेच या लोकांपर्यंत आरोग्य सेवाही पोहोचलेल्या नाही त्यामुळे Covid-19 सारख्या संक्रमक विषाणू पासून संरक्षण करण्यासाठी सार्क देशांनी केलेल्या सुविधांचा व जागरूकतेचा अभाव दिसून आलेला आहे अशी अनेक कारणे व वास्तविक परिस्थीतीमुळे सार्क संघटनेच्या उपयोगीतेवर व औचित्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होतात त्यामुळे ज्या उद्देशासाठी सार्क संघटनेची स्थापना झाली ते उद्देश साध्य न झाल्याने सार्क संघटनेची प्रासंगिकता कमी झाली आहे असे म्हटले जाते.

असे असले तरी सार्क संघटनेची समकालीन प्रासंगिकता कमी न होता Covid-19 च्या सक्रमण अवस्थेत अधिक वाढीस लागली आहे. सार्क देशातील निम्न जनता आर्थिक निम्न स्तरावर जीवन जगत असतांना त्यांना Covid-19 पासून संरक्षण करायचे असेल तर सार्क देशांनी प्रादेशिक स्तरावर एकत्रीत सहकार्य करावे मार्च २०२० ला सार्कच्या विडीओ—कॉन्फरन्समध्ये भारताच्या पंतप्रधानाने Covid-19 ची समस्या निपटण्याकरीता सार्क Covid-19 इमरजंसी फंड स्थापीत करण्याचे प्रस्ताव ठेवले होते १० लाख डॉलर सुरवातीची सहयोगी राशी जाहीर केली. त्यामुळे सार्क देशामध्ये महामारीच्या काळात एक आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. सार्क देशामधील भारत असा एक देश आहे की Covid-19 ची औषध

व लस विकसीत करू शकतो त्यांचा फायदा सर्व आशियाई देशांना होवून मानवी जीवनाचे संरक्षण होवू शकते या करीता सार्क देशाचे संघटन महत्वपूर्ण आहे. सार्क देशातील प्रबळ आरोग्य सेवांचा अभाव वाढते दारीद्रय, महाशक्तींचा वाढता प्रभाव, चिनचे वाढते हस्तक्षेप, सार्क देशातील राज्यांवर वाढते विदेशी कर्ज, आंतरराष्ट्रीय व्यापारात निम्न भागीदारी व वाढती आयात, व आर्थिक शत्रांच्या बाबतीत परांवलंबीत्व व वाढता आतंकवाद, नक्षलवाद, निर्वासितांचा प्रश्न परस्पर राजकीय संघर्ष व मतभेद अशा अनेक समस्या सार्क देशामध्ये प्रामुख्याने अस्तीत्वात असुन यांचा गंभीर परिणाम या देशांच्या राजकीय, आर्थिक विकासावर होवून हे क्षेत्र अशांततामय झाले आहे.

या सर्व समस्यांचा निपटारा करावयाचा असेल तर प्रादेशिक स्तरावरील सार्क संघटना अतिशय महत्वपूर्ण आहे. सार्क देशांनी आपसी संघर्ष व मतभेद विसरून परस्पर सहकार्य व सेवांचे आदान—प्रदान केले तर, या संघटनेतील सर्व राज्यांचा विकास होवून, या प्रादेशिक स्तरावर असणा—या सर्व नागरीकांचा सर्वांगीन विकास होवू शकतो या करीता सार्क देशांनी सर्व प्रथम आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे. यासाठी सार्क संघटन महत्वपूर्ण भुमिका निभावू शकतो. त्यामुळे सार्क संघटनेची प्रासंगिकता आजही कायम आहे.

**मुल्यमापन :**

प्रादेशिक सहकार्यासोबतच संघटन अंतर्गत सहयोग समानता, प्रादेशिक अखंडता, राजकीय संरचना व आर्थीक, सामाजीक, सांस्कृतीक विकास साध्य करण्यासाठी स्थापन झालेली सार्क संघटना ही अतिशय महत्वपूर्ण पाउल मानले जाते या संघटनेला युगान्तकारी घटना असेही म्हटले गेले होते. यातच या संघटनेची उपयोगीता सामावलेली आहे परंतु सार्क देशामधील परस्पर मतभेद वाद—विवाह संघर्ष व परस्परावरील अविश्वास यामुळे ही संघटना अपयशी ठरली आहे असे म्हटले जाते भारत व पाकिस्तानचा वाढता संघर्ष हा सार्क संघटनेवर व त्यांच्या उपयोगीतेवर तसेच संघटनेच्या अस्तीत्वावर प्रश्न चिन्ह निर्माण करीत असते असे असले तरी सर्व देशातील असलेल्या समस्यांचे निवारण करण्यासाठी सार्क संघटनाच अतिशय महत्वपूर्ण व उपयोगी ठरू शकते.

या सार्क संघटनेत भारताची भुमिका, दृष्टिकोन अतिशय महत्वपूर्ण आहे समकालीन जगाच्या अनिश्चित वातावरणात भारत एक अतिशय जबाबदारपूर्ण नेतृत्व क्षमतेचा प्रदर्शन करून, सार्क देशामध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करू शकतो त्यामुळे सार्क देशातील प्रादेशिक सहकार्य वाढीस लागून सार्क संघटनेची प्रासंगिकता कायम राहील.

**संदर्भ :—**

*डॉ. वसंत रायपूरकर, २००१ आंतरराष्ट्रीय संबंध, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.*
*वर्मा दिनानाथ, आंतरराष्ट्रीय संबंध, श्री. ज्ञानदा प्रकाशन पाटणा.*
*डॉ. वि. एल. फाडीया, २००५, आंतरराष्ट्रीय संबंध, साहित्य भवन पब्लीकेशन आगरा.*
*डॉ. शर्मा मथूरालाल, आंतरराष्ट्रीय संबंध, कॉलेज बूक डेपो जयपूर*

# दहशतवाद संदर्भात सार्कची भूमिका

**प्रा. डॉ. नागेश खु.गायकवाड**

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,*

*चिखली.जि.बुलडाणा.४४३२०१*

आज संपुर्ण विश्वामध्ये सत्तेसाठी गलिच्छ राजकारण होत असल्याचे दिसत आहे. त्यातच विकसित राष्ट्रे आपल्या आर्थिक संपन्नतेचा फायदा घेऊन मागास राष्ट्रांना मदत करतात व त्यांच्या संपूर्ण शासकीय व्यवहारावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्याचा परिणाम विकनसनशिल राष्ट्रांसोबत मागास राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय दृष्टिने स्वातंत्र्य राहत नाही. असा प्रकार दुसऱ्या महायुध्दानंतर मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसते. त्याचे कारण दुसऱ्या महायुध्दात रशीया व अमेरीका सोबत लढले, परंतु एकमेकांना विश्वासात न घेता लढले.त्यात अमेरीकेने रशियाला अंधारात ठेवून बॉम्ब निर्मिती केल्याने, रशीया अमेरीकन निती विरोधात गेला आणि यांच्यात तेंव्हापासुन शितयुध्द सुरु झाले त्यांनी आपआपले प्रस्थ वाढविण्यासाढी नव नविन गटांची स्थापना केली, त्यामध्ये सिटो, नाटो, वारसा इत्यादी त्याचा परिणाम जगात जे राज्य आपला विकास करुन ईच्छित होते, परंतू या दोन्ही देशाच्या बंधनात न राहता इतर सहकारी संघटना स्थापन करुन त्या माध्यमातून विकास व्हावा अशी अपेक्षा करत होते.

अशा राष्ट्रांनी युरोपीयन महासंघाची प्रेरणा घेऊन ओपॅक,आशियन आणि सार्क अशा प्रादेशिक सहकार्य करणाऱ्या संघटनांची निर्मिती केली.

**सार्क :—**

युरोपियन महासंघाच्या धर्तीवर, एकमेकांना सहकार्य करण्याच्या उद्दिष्टाने दक्षिण आशिया क्षेत्रातील राज्यांनी, त्यामध्ये भारत, पाकीस्तान, नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका, मालदिव आणि भुतान एकत्र येऊन ८ डिसेंबर १९८५ ला सार्क (SAARC) ची स्थापना केली, आणि आज अफगणिस्तान २००७ ला सार्क सदस्य झााल्याने संघटनेची संख्या आठ झाली आहे.

सार्क सात देशाची परस्पर सहकार्यासाठी स्थापन झालेली आग्नेय आशीयाची राष्ट्रांची विभागीय सहकार्य संघटना आहे दक्षिण आशीया उपखंडातील सात राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी एक सहकारी व्यासपिठ असावे अशी मूळ कल्पना प्रथम १९८० साली बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष झिया—उर—रहेमान यांनी मांडली होती. त्यासाठी त्यांनी १९७७ ते १९८० या काळात भारत, पाकीस्तान,नेपाळ, श्रीलंका या देशांना भेटी दिल्या. त्यांच्या प्रयत्नना अनुसरुन प्रथमत: दक्षिण आशियाची देशांच्या परराष्ट्र सचिवांची बैठक घेऊन त्यामध्ये कोणकोणत्या क्षेत्रात या देशांना सहकार्य करता येणे शक्य आहे यावर विचार विनिमय झाला. एप्रिल १९८१ मध्ये या राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांची कोलंबो येथे पहिली बैठक झाली. त्यांनतर काढमांडू. नोव्हेंबर—१९८१, इस्लामाबाइ—१९८२,ढाका—मार्च १९८३ अशा तीन बैठका झाल्या. त्यानंतर परराष्ट्र मंत्र्याची बैठक झाली त्यामध्ये संघटनेच्या एकात्मिक कृती कार्यक्रमाबाबत सहमती झाली. शेती (कृषी), ग्रामीण विकास, हवामान शास्त्र, आरोग्य, लोकसंख्या या क्षेत्रात सातही राष्ट्र परस्परांशी सहकार्य करुन शकतात यावर सातही राष्ट्रात एकमत झाले आणि शेवटी ७ व ८ डिसेंबर १९८५ ला बांग्लादेशाच्या राजधानित (ढाका) येथे सातही राष्ट्रप्रमुखांची बैठक झाली आणि त्यात सार्कच्या स्थापनेवर शिक्कामोर्तब झाले.

सन १९८५ पासुन आजपर्यत सार्क संघटनेने आर्थिक क्षेत्रात सहकार्य वृध्दीगंत केले. सोबतच महिला व बालकल्याण, शांतता, विकास,दारित्र्य निर्मूलन, पर्यावरण संरक्षण अशा विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले. त्यात २००६ मध्ये दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) या संघटनेची स्थापना करुन मुक्त व्यापारास चालना दिली. एकंदरीत सार्क इतर क्षेत्रात मध्ये उत्तम कार्य करत असल्याचे त्यांच्या मागील कार्यावरुन निदर्शनास येते. परंतू तरीही सार्कला जगातील इतर यशस्वी प्रादेशिक संघटनासारखे यश अद्यापही मिळालेले नाही. त्याचे प्रमुख कारण काय ? याचा शोध जेंव्हा घेतला जातो तेंव्हा सदस्य राष्ट्रामध्ये आपसात असलेले टोकाचे वैमनस्य हे प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास येते. या वैमनस्याचे प्रमुख कारण पाकीस्तानकडून दहशतवाद रोखण्यासाठी कोणताही प्रतिसाद न मिळता उलट त्याला प्रोत्साहन मिळत असल्याचे अनेक वेळा पुराव्यानिशी स्पष्ट केले आहे. तरीही दहशतवादी कारवाया अजून थांबलेल्या नाहीत त्यात सार्कने वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**दहशतवात थांबविण्यासाठी सार्कचे प्रयत्न :—**

भारत,पाकीस्तान,श्रीलंका, बांग्लादेश, अफगणिस्तान आदी सार्क संघटनेची सदस्य राष्ट्र दहशतवादाच्या समस्येला तोंड देत आहेत. काढमांडू येथे नोव्हेंबर १९८७ मध्ये झालेल्या सार्कच्या तिसऱ्या शिखर संमेलनात दहशवाद दडपून टाकण्याच्या करारावर सर्व सदस्य राष्ट्रांनी सहया केल्या, म्हणजे दहशवाद दडपून टाकण्याच्या कराराला मंजुरी दिली. दहशतवादी गुन्हयांबाबत आंतरराष्ट्रीय कायद्यात नमुद असलेल्या मुलभूत सिध्दांताची दक्षिण आशीया या प्रदेशात अंमलबजावनी करण्याचे या कराराने सर्व सदस्य राष्ट्रांनी मान्य केले. उदा. दहशवादी कृतीबाबतच्या माहितीचे आदान—प्रदान सर्व सदस्य राष्ट्रांनी करणे, अंमली पदार्थाचा चोरटा व्यापार, हवाला मार्गाने पैशांची देवाणघेवाण, अन्य प्रकारचे संघटित गुन्हे आणि दहशवादी संघटना यांच्यात परस्पर संबंध आहेत. दहशवादाला पायबंद घालावयाचा असेल तर या सर्व प्रकारच्या गुन्हयांवरही हल्ला करणे व त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेवुन यामध्ये २००२ ला सुधारणा करण्यात आली सोबतच २००४ मध्ये इस्लामाबादच्या १२ व्या शिखर परिषदेत सदस्य राष्ट्रांनी दहशतवादी संघटनाच्या आर्थिक संसाधनावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी एक करार केला. ऑगस्ट २००८ च्या बैठकीत दहशवाद व तत्सम गुन्हयातील माहितीचे देवाण घेवाण करण्याच्या दृष्टिने पंधराव्या सार्क परिषदेत Convention on Mutual Legal Assistance Treaty (MALT) करण्यात आला आणि पुन्हा नोंव्हेंबर २००८ मध्ये भारतातील मुंबई शहरात फार मोठा दहशतवादी हल्ला घडून आला. यामधुन पुन्हा भारत—पाक संबंध ताणल्या गेले आणि भारताने UNO पासुन सार्क पर्यंत सर्व ठिकाणी या हल्याला पाकीस्तानने मदत केल्याचे निदर्शनास आणुन दिले.

याशिवाय नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकीस्तान येथे होणाऱ्या सार्क परिषदेत भारतात पाकस्कृत झाालेल्या उरी हल्ल्याच्या निषेधार्त भारत, बांग्लादेश, भूतान व अफगाणिस्तान या राज्यांनी सहभाग नाकारला. सोबतच सार्कच्या प्रत्येक संमेलनात दहशवादावर प्रतिबंध घालण्यासाठी हा विषय अजेंडयावर असतो. त्याचाच प्रत्यय म्हणून यावर्षी २४ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या सार्कच्या ऑनलाईन बैठकीमध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री श्री जयशंकर यांनी पाकचे नाव न घेता दहशतवादाला खतपाणी घालण्याऱ्यांनी बंद करावे व दहशवादाला पायबंद घालण्यासाठी मदत करावी असे नमुद केले. असे सार्कने दहशवाद थांबविण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत, आणि प्रत्येक बैठकीमध्ये दहशवाद ही समस्या अजेंडयावर ठेवली जाते.

**निष्कर्ष –**

१९८७ पासनुच्या तिसऱ्या शिखर संमेलनापासुन २०२० च्या शिखर संमेलनापर्यत जवळपास सर्वच संमेलनात शिखर परिषदांच्या कार्यक्रम पत्रीकेवर दहशवाद हा विषय असल्याचे दिसून येते व प्रत्येक बैठकीत राष्ट्रप्रमुखांनी एकमताने दहशतवादावर ठराव मंजुर केलेले आहेत. परंतू अद्यापही दहशवादाच्या प्रभावातून सार्क संघटनेच्या सदस्य राष्ट्रांची सुटका झालेली नाही. कारण ते आमलात आणण्यासाठी त्या त्या राज्यातील विधिमंडळानी त्याला पुरेशा प्रमाणात मंजुरी दिल्याचे आढळून येत नाही त्यासाठी सार्कने कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. आज एक प्रादेशिक संघटना म्हणून सार्कचे योगदान नक्कीच चांगले आहेत परंतू सदस्य राष्ट्रांनी आपसामध्ये सार्कच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अमंलबजावणी प्रामाणिकपणे करणे अपेक्षित आहे. तेंव्हाच दहशतवाद रोखण्यासाठी सार्क यशस्वी होऊ शकेल अशी आशा आहे.

**संदर्भ –**


१. *रासम वासंती व खापरे करिअप्पा (२०११) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, फडके प्रकाशन कोल्हापुर.*

२. *पाटील व्ही.बी. जुलै (२०१२) भारताचे परराष्ट्र धोरण, के सागर पब्लीकेशन, पुणे*

३. *Countering Terrorism in South Asia : Strengthening Multilateral Engagement, Eric Ros and, Naureen Choudhary Fink, and Jason Ipe ( May-2009)( ipinst.org/wp-content/uploads/ publications/ct_in_south_asia_epub.pdf)*

# भारत-पाकिस्तान संबंध

**डॉ. पी. एस. लोखंडे**

*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी-४३१४०१*

*lokhps@gmail.com*

**प्रस्तावना :**

इस.१९४२ मध्ये भारतामध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली 'चलेजाव आंदोलन' झाले. प्रस्तुत आंदोलन ब्रिटिश सरकारच्या विरोधातील आत्तापर्यंतचे सर्वात मोठे आंदोलन होते. स्वतः महात्मा गांधीजींनी या आंदोलनासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना असे सांगितले होते की, 'ब्रिटिश सरकारच्या विरोधातील माझ्या आयुष्यातील हे शेवटचे व निर्णायक आंदोलन असणार आहे, त्यामुळे देशहितासाठी करा किंवा मरा' परिणामस्वरुपी इस. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाला अभूतपूर्व पाठिंबा मिळाला. समाजातील सर्व स्तरांतील लोक या आंदोलनामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन ब्रिटिश शासनाच्या हे लक्षात आले की, भारताला लवकरच स्वातंत्र्य दिल्याशिवाय पर्याय नाही. परंतु त्या वेळेला जगामध्ये दुसरे महायुद्ध सुरू होते. हे महायुद्ध दोन गटामध्ये लढले जात होते यापैकी एका गटाचे नेतृत्व 'इंग्लंड' या देशाकडे होते. त्यामुळे इंग्लंड सरकारने अशा प्रकारची भूमिका घेतली की, दुसरे महायुद्ध समाप्त होईपर्यत आम्हाला मदत करा, या युद्धामध्ये लोकशाहीच्या विजयासाठी तुमच्या सहकार्याची गरज आहे. त्यानंतर लवकरच आम्ही भारताला स्वातंत्र्य बहाल करू, त्यामुळे खऱ्या अर्थाने येथेच भारताला लवकरच स्वातंत्र्य मिळेल हे निश्चित झाले होते. तिकडे 'मुस्लीम लीग ' कडून मात्र मुस्लिम बांधवांसाठी 'पाकिस्तान' या स्वतंत्र राष्ट्राची मागणी होत होती. मुस्लिम लीगचे प्रमुख नेते बॅरिस्टर महंमद अली जिना यांनी अशा प्रकारची भूमिका घेतली की, स्वतंत्र भारतामध्ये अल्पसंख्य समाजाच्या सर्वांगीण विकासाची संधी मिळणार नाही,आमचे हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत. बॅरिस्टर जिनांना समजून सांगण्याचा प्रयत्न अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी केला. परंतु जिना आपल्या मागणीवर ठाम होते. शेवटी हिंदुस्थानची फाळणी करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. अशाप्रकारे अखंड हिंदुस्थानची फाळणी होऊन 'भारत' व 'पाकिस्तान' ही दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली.

**दोन्ही देशातील तणावपूर्ण संबंध :**

पाकिस्तान या राष्ट्राची निर्मितीच मुळामध्ये धर्माच्या आधारावर झालेली होती. इस.१९४७ मध्ये फाळणीच्या दरम्यान 'हिंदू' आणि 'मुस्लीम' अशा प्रकारची भीषण दंगल उसळली. या दंगलीमध्ये लाखो निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. अशाप्रकारे भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांच्या संबंधांची सुरूवातच भयंकर हिंसेने झाली. याच दरम्यान मुस्लीम लीग व बॅरिस्टर जीना हे हिंदुस्थानच्या फाळणीवर समाधानी नव्हते. कॅबिनेट मिशन योजनेनुसार असे ठरले होते की, ज्या भागामध्ये मुस्लीम लोकसंख्या जास्त आहे तो भाग पाकिस्तानला मिळावा, परंतु 'काश्मीर' संस्थानाचे राजे हरिसिंग यांनी आपले संस्थान

पाकिस्तानमध्ये विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला. सुरुवातीस त्यांनी स्वतंत्र राहण्याची भूमिका घेतली होती, परंतु पाकिस्तान च्या घुसखोरांनी सैन्याच्या मदतीने काश्मीरच्या दिशेने वेगाने आगेकूच केली होती, त्यामुळे राजे हरिसिंग यांनी तातडीने तत्कालीन पंतप्रधान नेहरूशी संपर्क साधत भारतीय सैन्य पाठवण्याची विनंती केली होती व लागलीच विलीनीकरणाच्या करारावर त्यांनी सह्या केल्या. परंतु काश्मीर संस्थानाचे अशाप्रकारे जे विलीनीकरण झाले ते पाकिस्तान या राष्ट्राने अमान्य केले.

पाकिस्तानने सुरुवातीपासून अशाप्रकारची भूमिका घेतली आहे की, भौगोलिकदृष्ट्या काश्मीर हे संस्थान पाकिस्तानला लागून आहे, त्याचबरोबर या भागामध्ये बहुतांश प्रजा ही मुस्लीम आहे. काश्मीरच्या मुद्द्यावरून या दोन्ही राष्ट्रांमध्ये इस. १९४७ मध्येच संघर्ष सुरू झाला. तेव्हापासून ते आजतागायत या दोन राष्ट्रांमधील संघर्ष दिवसेदिवस तीव्र बनत गेला. फाळणीच्या दरम्यान महात्मा गांधीजींनी लोकांना शांततेचे आवाहन केले. परंतु तरीदेखील लाखो लोकांच्या मृत्यूला ते रोखू शकले नाहीत. या दंगलीमुळे महात्मा गांधीजी प्रचंड व्यथित झाले. दुर्दैवाने या दोन देशांमध्ये आतापर्यंत चारवेळा युद्ध झाले. या चारही युद्धामध्ये पाकिस्तानला दारुण पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे ९० च्या दशकापासून पाकिस्तानने अप्रत्यक्षपणे दहशतवादाचा मार्ग स्वीकारला. सुरुवातीच्या कालखंडामध्ये दोन देशांच्या सीमा भागातून ज्या नद्या वाहतात त्या नद्यांच्या पाण्यावरून वाद झाला, त्या काळामध्ये महात्मा गांधीजींनी सुद्धा पाकिस्तानला त्यांच्या हक्काचे पाणी द्यावे अशा प्रकारची भूमिका घेतली होती. त्याचबरोबर पाकिस्तानला नुकसानभरपाईपोटी विशिष्ट रक्कम दिली जावी अशा प्रकारचे मत गांधीजींचे होते. वास्तविक पाहता पाकिस्तान या राष्ट्राची निर्मिती भारत विरोधातून झालेली आहे. त्यामुळे कधीही या दोन देशांमध्ये फारसे समाधानकारक संबंध निर्माण होऊ शकले नाही. निश्चितपणे वेळोवेळी दोन्ही देशांतील राष्ट्रप्रमुखांनी संबंध सुधारण्यावर भर दिला.परंतु ते फार काळ टिकले नाही. संपूर्ण जगामध्ये भारत आणि पाकिस्तानची ओळख पारंपरिक शत्रू राष्ट्र अशा प्रकारचे आहे. कारण या दोन देशांचा संघर्ष अनेकदा UNO मध्येदेखील पाहण्यास मिळाला. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान 'झुल्फिकार अली भुट्टो' यांनी तर UNO मधेच जाहीरपणे आपला प्रचंड रोष व्यक्त केला होता. या दोन देशांमधील संघर्षाला शीतयुद्धाची पाश्र्वभूमी देखील आहे. शीतयुद्धाच्या दरम्यान पाकिस्तान या राष्ट्राने NATO या अमेरिका प्रणीत लष्करी संघटनेचे सदस्यत्व स्वीकारून उघडपणे अमेरिकेच्या गटात प्रवेश केला होता. भारताने जरी अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले असले तरी, भारताची जवळीकता रशियाशी होती हे वास्तव नाकारता येणार नाही. त्यामुळे ज्या ज्या वेळी UNO किंवा वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर काश्मीरचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर अमेरिका हा देश पाकिस्तानची बाजू घेत असे, तर रशिया भारताला समर्थन देत असे, अशाप्रकारे काही राष्ट्रे पाकिस्तानला समर्थन देत होती, तर काही राष्ट्रे भारताच्या बाजूने होते.

इस.१९९८ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी व पाकिस्तानचे तत्कालिन लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांनी दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते, परंतु दुर्दैवाने इस. १९९९ मध्ये कारगिलचे युद्ध घडून आले. त्यानंतर उभय देशांच्या संबंधांमध्ये पुन्हा कटुता निर्माण झाली. इस.१९९८ मध्ये भारताने अणुबॉम्बची चाचणी घेतली. तर अगदी काही दिवसांनंतर नवाज शरीफ यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्ताननेसुद्धा अणुबॉम्बची चाचणी घेतली. अशाप्रकारे या उभय देशांमध्ये सुरवातीपासून स्पर्धात्मक आणि संघर्षमय संबंध राहिलेले आहेत. जर या उभय देशांमध्ये संबंध

सुधारण्याचे असतील, तर दोन्ही देशांतील राष्ट्रप्रमुखांनी आणि जनतेने व्यापक भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे.भावनिक न होता या प्रश्नाचे राजकारण न करता जनतेच्या विकासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

*१.आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ.शैलेंद्र देवळानकर*
*२. भारत की विदेशनीती - डॉ.महेश भटनागर*
*३. Pakistan Mai - Khushvant Singh*
*४.Indian Express*

# सार्क संघटनेचे योगदान

**डॉ. प्रमोद मा. आचेगावे**
*न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, वर्धा.*

आंतरराष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतांशी राष्ट्र पारतंत्र्यातून स्वतंत्र झाले. स्वतंत्र राष्ट्रांनी आपल्या सार्वभौमत्वाच्या संरक्षणाकरिता प्रादेशिक संघटना स्थापन करित आहेत. प्रादेशिक संघटनेचा उद्देश प्रादेशिक सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे अथवा परस्पर राष्ट्रातील आर्थिक आणि सामाजिक समस्यावर उपाय शोधणे आहे. संघटणाच्या माध्यमातून स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्रे क्षेत्रिय हितपूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. अशा प्रयत्नातूनच प्रादेशिक संघटनेचा उदय आंतरराष्ट्रीय समुदायात झालेला आहे. क्षेत्रिय किंवा प्रादेशिक संघटना दोन प्रकारच्या असतात. त्यापैकी एक क्षेत्रिय संघटना सैनिकी कराराच्या संदर्भातल्या आहेत. उदा. नाटो, सेन्टो, सिएटो, वार्सा करार इत्यादी. दुसरी क्षेत्रिय संघटनेचा उद्देश आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, व्यापारी आणि जनकल्याण या क्षेत्रामध्ये कार्य करण्याच्या संदर्भात प्रयत्नशील असतात. उदा. अरबलीग, एशियन व सार्क इत्यादी. सार्क संघटना ही लष्करी किंवा सैनिकी कराराची संघटना नाही. तर आपल्या क्षेत्राचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यापार, आर्थिक व वैज्ञानिक विकास झाला पाहिजे म्हणून प्रयत्न करणारी आहे.

सार्कला मराठी भाषेत दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना असे म्हटले जाते. सार्क ही दक्षिण आशियाई राष्ट्राची संघटना डिसेंबर १९८५ साली स्थापन झाली. आर्थिक, सामाजिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक विकासाकरिता सामूहिकरित्या काम करण्यासाठी सार्कचे सदस्य एकत्र आले आहेत. बांगलादेश, भूतान, भारत, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका हे सार्कचे सदस्य आहेत. नोव्हेंबर २००५ मध्ये अफगाणिस्तान सार्कचे सदस्सत्व दिले आहे. सार्क संघटनेत एकूण आठ सदस्य आहेत. सार्क संघटनेचे कार्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहेत.

- **सार्क परिषदेचे प्रमुख उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.**

१. दक्षिण आशियातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंजावून लोकांचे कल्याण साधणे.
२. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात विकासाची गती वाढवणे.
३. लोकांना सन्मानाने राहणाची संधी उपलब्ध करून देणे.
४. दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
५. ऐकमेकांच्या समस्या समजून घेवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
६. ऐकमेकांमध्ये विश्वासाचे आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे.

७. इतर विकसनशील राष्ट्रांबरोबर सहकार्याची भावना वाढीस लावणे.

८. परस्परात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रात सहकार्य करणे.

९. सामूहिक हितासाठी सहकार्याची भावना वाढीस लावणे.

आपला देश म्हणून अफगाणिस्तानही भारत—पाक संबंध सुधारावेत या मताचा आहेत. अफगाणिस्तानबरोबरचे संबंध वाढविण्यासाठी भारतालाही पाकिस्तानच्या सहकार्याची आवश्यकता आहे. शिवाय युरोप, अमेरिका, अरब राष्ट्रे, रशिया या साऱ्या देशांनाही काही कारणास्तव भारतीय उपखंडातील या दोन मोठ्या राष्ट्रात तणावाचे संबंध नकोत असे वाटते. हीच भावना युनो येथील व्यासपीठावरून झाली. सार्क क्षेत्रातील दळणवळण विकासाचा भाग म्हणून रेल्वे तसेच सागरी संपर्क मार्गाच्या निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदस्य राष्ट्रात मुक्त व्यापार समझोत्यांची अंमलबजावणी व्यापारी निर्बंध हटविण्यास प्राध्याण्य, मानकांच्या समक्षीकरणास प्राध्याण्य व आयात निर्यातीबाबतच्या संवेदनशील विषयांवर निर्णय अशा बाबींही सार्कच्या वाढीच्या कार्यक्रम पत्रिकेवर असाव्यात अशी सदस्य राष्ट्रांची इच्छा आहे व ती काठमांडू येथील कामकाजात व्यक्त केली आहे. गेली काही वर्षे या बाबींवर एकमताने अनुकूल निर्णय होत असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अत्यंत धीमी असल्याने एकूण क्षमतेच्या केवळ १० टक्केच इतकाच मुक्त व्यापार प्रत्यक्षात होत आहे. तो वाढवावा अशीच सर्वांची इच्छा आहे. आणि गरजही आहे. वास्तविक पाहता या मुक्त व्यापार क्षेत्राची संकल्पना २००६ मध्येच मान्यता पाावली आहे. तथापि फारशी प्रगती व्यवहारात झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सार्कमध्ये प्रारंभी असणाऱ्या सात देशांमध्ये काही वर्षापूर्वी अफगाणिस्तानची भर पडली. आता भारत, पाकिस्तान,नेपाळ , भूतान, बांग्लादेश, मालदिव, श्रीलंका असे आठ सदस्य आहेत. चीनचीही सार्कमध्ये समाविष्ट होण्याची इच्छा आहे. व ब्रम्हदेश हा सुद्ध सार्क संघटनेत असावा अशी सदस्यांना वाटते. परंतु त्यासाठी तेथे प्रथम लोकशाही स्थापन झाली पाहिजे.

काठमांडू येथील शिखर परिषदेत अफगाणिस्तााानचे अध्यक्ष हमीद कारजाई, बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना, भूतानचे पंतप्रधान लिनोचेन जिगमी योसीर तिनली, भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नशीद, नेपाळचे पंतप्रधान बाबुराम भट्टराय, पाकिस्तानचे पंतप्रधान युसूफ रजा गिलानी, श्रीलंकेचे अध्यक्ष महिंद्रा राजपक्षे असे सर्व शासन प्रमुख उपस्थित होते. या शिखर परिषेदेत युरोपातील आर्थिक पेंचप्रसंगाचा उल्लेख अटळ होता. या अनुषंगाने प्रादेशिक सहकार्य संघटनांच्या भूमिकांवर विचार विनिमयही आवश्यक होता. तथापि उपखंडातील तणावांच्या पार्श्वभूमीवर चर्चा इतकीच पुढे गेली आहे

- **सार्क संघटनेचे योगदान**
- **दक्षिण आशियातील जनतेच्या विकासाठी**

सार्क संघटनेचा उद्देश दक्षिण आशियातील जनतेचा सर्वांगिंन विकास आणि कल्याणाला प्राधाण्य देणे आहे. त्या अनुषंगाने सार्क संघटनेने वेगवेगळी कार्य केलेले आहे. सार्क संघटनेच्या शिखर परिषदेत दारिद्रय निर्मूलन, अमलीपदार्थाचा व्यापार थांबविणे, महिला विकास, आरोग्य ,कुपोषण इत्यादी क्षेत्रात चर्चा झाली. २०१० च्या भूतान देशात सार्क संघटनेचे शिखर परिषद झाली. त्या परिषदेत जलवायू परिवर्तन यास हरित क्रांती म्हणून नाव दिले आहे.

- **आर्थिक क्षेत्रांत**

सार्क संघटनेच्या उद्देशात आर्थिक विकासावर अधिक भर देऊन सामूहिक स्वावलबंन निर्माण करणे आहे. त्या संदर्भातही सार्क संघटनेतचे जे शिखर परिषद पार पडल्यात त्यात या दृष्टीकोनातून कार्यक्रम राबविले आहे. सार्क संघटनेच्या क्षेत्रात येणाऱ्या देशातंर्गत मुक्त व्यापार धोरण स्विकारले. सार्क एग्रीमेंट ऑन दे इन सर्विस सुरू केले. सार्क संघटनेच्या देशातंर्गत आर्थिक गुतूंवणुक करण्यावर भर देण्यात आला. भारताचे नेपाळ व भूतान सोबत ५० टक्के व्यापार आहे. २०१३—१४ मध्ये सार्कच्या एकूण व्यापाराच्या ३३.३७ टक्के बांग्लादेशा सोबत आहे.

- **आरोग्य**

दक्षिण आशियातील देशात लोकसंख्येची समस्या आहे तसेचे रोगराईची ही समस्या आहे. या अनुषगांने सार्क संघटनेच्या व्यासपिठावर आरोग्यांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. १५ मार्च २०२० सार्क देशासंबधित कोविड१९ ची सामुहिक समस्या सोडविण्यासाठी सार्क कोविड १९ इमरजेन्सी फंड स्थापित करण्याचा प्रस्ताव भारत देशाने ठेवला. त्यात १० मिलियन अमेरिकन डॉलर देण्याची घोषणा केली.

- **सांस्कृतिक**

दक्षिण आशियाई क्षेत्रातील देशांना आपली संस्कृती जोपासता यावी तसेच सामुहिक सांस्कृतिक कार्यक्रम करण्यावर भर देण्यात आला. नविन दिल्ली येथे सार्क टेक्सटाईल आणि हॅडिक्रॉप्ट सेटंर स्थापन केले. एकत्रित परस्पर देशातील तरूण वर्ग एकत्र येऊन सांस्कृतिक सहकार्याची भूमिका वाढीस हातभार लावत आहेत.

- **दहशतवाद**

सार्क संघटनेच्या अंतर्गत येणाऱ्या देशा— देशामध्ये दहशतवादाची समस्या आहे. भारत—पाकिस्तान, श्रींलका, नेपाळ या देशात दहशतवादाने धुमाकूळ घातला. त्या दहशतवादाचा बिमोड व्हावा या विषयावर शिकर परिषदेतेत चर्चा झाली. सार्क संघटनेतील देशामध्ये दहशतवाद थांबविण्याच्या करिता कठोर पावले चालविली दिसून येत नाही.

दहशतवादाला काही देशांनी आपल्या पाठीशी घातले. पाकिस्तान व भारतता दहशतवादाच्या संदर्भात वेगवेगळी भूमिका आहे. त्यामूळे दहशतवद ही समस्या सोडविण्यास अवघड आहे. असे असले तरीही सार्क संघटना दहशतवाद विरोधी भूमीका घेत असल्याचे दिसून येते.
अशा प्रकारे आरोग्य, शिक्षण, दहशतवाद , सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात सार्क संघटनेचे योगदान आहे. सार्क संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये एकमेका बाबत विश्वास नाही त्यामुळे सार्क संघटना प्रभावी कार्य करू शकली नाही असे असले तरी आपल्याला सार्क संघटनेचे योगदान नाकारता येत नाही.

- संदर्भ


१. *http://en.wikipedia.org/economist.com/ graphical detail*
२. *रोकश कुमार झा पुनम गर्ग: भारतीय राजनीती विज्ञान शोधपत्रिका वर्ग १ अंक जुलै ते डिसेंबर २००९, आतंकवाद की समस्या गांधीय विकल्प*
३. *लोकमत दिनांक २९.११.२०१४*
४. *अमीत कुमसा सिंग : इस्लामीक आंतकवाद : एक त्रृटीपूर्ण अवधारण भारतीय राजनैतिक शोध पत्रिका*

# दक्षिण आशियाई राष्ट्राच्या विकासात सार्कची संघटनेची भूमिका

**प्रा. डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
*राज्याशात्र विभागप्रमुख, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,कोल्हापूर*

**प्रस्तावना**

दक्षिण आशियाई देशांनी एकत्रीत येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सार्क संघटना होय.या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून०५ डिसेंबर १९८५ रोजी ढाका येथे सार्क संघटनेची स्थापना केली.दक्षिण आशियाई देशामध्ये सहकार्य होण्याच्या दृष्टीने सार्क संघटनेच्या बाबत किमान तीन परीषदामध्ये चर्चा झाली.बांगलादेशाचे राष्ट्रपती झियाउ रहेमान यांनी दक्षिण आशियाई देशांना या बाबत अधिकृत पत्र पाठवले तसेच नेपाळचे राजे बिरेंद्र यांनी नद्याच्या पाणी वाटपा बाबत सहकार्याची आवशकता बोलून दाखवली झियाउ रहेमान व राजे बिरेंद्र यांच्या अहवानाला प्रतिसाद देत सात देशाच्या परराष्ट्र खात्यचे उच्च अधिकारी १९८१ मध्ये एकत्र भेटले. बांगलादेशाच्या प्रस्तवाला नेपाल,श्रीलंका,भूतान.व मालदीव यांनी पाठींबा दिला.मात्र भारत व पाकिस्तान संयमी भूमिकेत व्होते. छोटे देस मिळून भारत विरोधी आघाडी उभारतील अशी भारताला भीती वाटत होती.पाकिस्तानला असे वाटत होते की भारत छोट्या देशांना एकत्र आणून प्रादेशिक बाजारपेठेत मक्तेदारी निर्माण करण्यची ही भारताची खेळी असेल असी पाकिस्तानला भीती वाटत होती.१९८३मध्ये दिल्ली येथे भरलेल्या अंतरराष्ट्रीय परिषेदेत तत्कालीन विदेस मंत्री पी. व्ही. नरसिंह राव यांनी सार्कचा जाहीरनामा स्वीकारला.

सार्क संघटनेत सुरवातीला ७ देश संस्थात्मक सदस्य आहेत भारत, पाकिस्तान, बांगलादेश,नेपाल,मालदीव भूतान श्रीलंका व २००७ साली अफगानिस्तान हा आठवा देश नवीन सदस्य बनला. सार्क संघटनेचे निरीक्षक राष्ट्रे म्हणून ऑस्ट्रेलिया,चीन,जपान,इराण, युरोपिअन, युनियन, मॉरीशीस, म्यानमार, दक्षिण कोरिया अमेरिका यांचा समावेश आहे.सार्कची १२ प्रादेशिक केंद्रे आहेत तर ०६ उच्यतम संस्था आहेत.

**सार्क संघटनेची कार्य**

नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या साचीवालायाची स्थापना करण्यात आली.सार्कच्या सरचिटणीसाची नियुक्ती सदस्य देशामाधूम आळीपाळीने केली जाते. सार्कच्या सदस्य देशामधील विवीध शहरातून विविध समित्यामार्फत कार्य चालते.सार्कची वार्षिक परिषद वर्षातून एकदा सदस्य देशाच्या नावाच्या आकार विल्हेनुसार भरते.तत्पूर्वी या देशाच्या परराष्ट्र मंत्र्याची वर्षातून दोनदा बैठक होत असते.आणि त्या बैठीकीला सदस्य देशाचे राष्ट्रप्रमुख उपस्थित राहतात.

दक्षिण आशियायातील देशांचे समाजकल्याण आणि लोकांचा जीवनविकास आर्थिक स्थिती सुधारणा इत्यादी उदिस्थे डोळ्या समोर ठेऊन सार्क संघटनेची निर्मिती झाली. या सर्व देशांनी त्या वेळी कृषी,ग्रामीण विकास, दूरसंचार,हवामान,आरोग्य आणि लोकसंख्या वाढ या क्षेत्रात एकात्मिक कृती कार्यक्रम राबविण्याचे ठरवले.२०१५ च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग सामिविष्ट होतो.तर जगाच्या लोकसंख्याच्या२१ टक्के लोकसंख्या दक्षिण आशियायातील

होती.सदस्य देशामध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे या साठी सार्क नेहमीच प्रेय्तनसील असते.निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रासंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक सबंध आहेत.युरोपियन युनियन व अन्य अनेक अंतरराष्ट्रीय संघटनाबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण सबंध ठेवले आहेत.

सार्क संघटनेने अल्पकाळात विविध आघाड्यावर लक्षणीय प्रगती केलेलीकेली आहे.दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्राची स्थापना२००६ मध्ये सार्क संघटने अंतर्गत करण्यत आली.सदस्य देशामधील व्यापाराबाबत सार्क संघटनेला चांगले येश मिळाले आहे.सार्क अंतर्गत देशामधील प्रवासाच्या व्हिसाच्या २४ प्रकारच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत.महिला व बालकल्याण शांतता,विकास, दारीद्या निर्मुलन,पर्यावरण रक्षण,इत्यादी विषयी सार्क संघटनेने कार्य केलेले दिसून येते.आणि तसेच प्रादेशिक सहकार्य करणार्यांना परीतोसक जाहीर केली आहेत.

भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळण वळण उपग्रह देण्याचे मान्य केलेआहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे.मात्र पाकिस्तानचा या योजनेला विरोध आहे.त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरवले आहे."सिमाविरहीत ज्ञान" असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे स्थापन केले आहे.सार्क आणि अन्य देशातील विध्यार्थी २०१४ पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत.सुमारे ७ हजार विध्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यामध्ये या विध्यापिठाच्या सलाग्न शाखा असतील व थेतेही विध्यार्थीना संशोधन करता येयील .

सार्क परिषदामध्ये सदस्य राष्ट्रांनी परस्पर सहमतीने दहशतवाद विरोधी करार, अन्न शुरक्षा विषयक करार,मादक पदार्थ विरोधी करार , परस्पर व्यापार सहकार्यासाठी करार,या सारखे महत्वपूर्ण करार केले आहेत .रल्वे,रस्ते,जलवाहतूक,मार्ग या सारख्या आधारभूत संरचनाचा अभाव दळण वळण सुविधा काही भागात प्रचलित असणारी निरक्षरता या विषयी सार्क संघटनेने कार्य केलेले दिसून येते. दहशतवादी कारवाया आणि त्यांना होणाऱ्या अर्थ पुरवठ्यला आळ घालण्यासाठी सार्क सदस्य राष्ट्रांनी १९८७ ते २००४ साली करार करून एक आचारसंहिता तयार करण्यात आली आहे.महिला व मुलांची तस्करी थांबविन्याबाबत आणि बाल कल्याणाला प्रोत्साहन देण्यासाठी,आवश्क प्रादेशिक यंत्रणा मजबूत करण्यासाठी सार्क राष्ट्रांनी दोन करार केले.द रिजनल इनीशिएटिव्ह फॉर साउथ आशिया ह्युमन राईट्स मेय्कानिझाम यातून सार्क राष्ट्रांनी आपली मानवी हक्काबाबतची भूमिका विषद केलेली दिसते.सार्कच्या स्वायत दारीद्रे निर्मुलन आयोगाने २००२ साली तयार केकेला दारीद्रे निर्मुलन कृती अहवाल २००६ ते २०१५ दारीद्रे निर्मुलन दशक जाहीर केले आहे.२००७ साली सार्क फूड ब्रांडची स्थापना करण्यचा केलेला प्रयोग या वरून सार्कचे सर्वसमावेशकतेचे धोरण दिसून येते.सार्कने २००४ साली दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार (SAFTA) वर स्वाक्षरी केली.व जुलै २००५ पासून हा करार अमलात आला.या कराराअंतगर्त सार्क सदस्य राष्ट्रांनी २०१२ पासून सार्क अग्रीमेंट ओन ट्रेन इन सर्विसेस अमलात आणले आहेत.या बरोबरच सार्क विद्यापीठ सार्क उपगृह सामुहिक विद्दुत जाळ उभारणे सार्क विकास बँक आदि उपक्रमाची दखल सार्कने घेतलेली आहे. १६ ते २९ एप्रिल २०१० रोजी सार्कची १६ वी शिखर संमेलन भूतानची राजधानी थीम्पू येथे पार पडली. या परिषदेत हरित व सुखी दक्षिण आशियाई या विषयावर सखोल चर्चा करण्यात

आली.यामध्ये दक्षिण आशियाई राष्ट्रांतील देशामध्ये वस्तू व सुविधा आणि लोकांना येण्याजाण्या साठी अधिक सूट देण्यात आली आहे.भारताकडून दहशतवाद थांबविण्यासाठी काही उपया सुचवण्यात आले आहेत. परंतु या बाबत भूतानचे पंतप्रधान यांनी दहशतवाद या विषयी विचार मांडण्याची परवानगी दिली नाही.या परिषदेत सार्क युथ समिती स्थापन करण्यात आली.जेंडर इकविलिटी वाढविण्यासाठी भरदेण्यात आला.तंत्रज्ञाणासाठी पशिमी देशावर अवलंबून न राहता तंत्रज्ञाणात प्रगती सार्क राष्ट्रांनी केलेली दिसूनयेते.जागतिक बाजार पेठेत आशियाई राष्ट्रांतील देशाचा सहभाग वाढवणे या विषयी सार्कने कार्य केले आहे.

**सार्क संघटनेच्या कार्याचे मूल्यमापन**

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशामुळे सार्क संघटना कायमच अडचणीत येत असल्यची सार्कमधील बहुतांस देशाची तक्रार आहे.२०१६ मध्ये सार्कची १९ वी शिखर परिषदेचे आयोजन पाकिस्तानमधील ईस्लामाबादेत केलीहोती.मात्र ही परिषद रहद करण्यात आली.भारतीय मुत्सदीपणामुळे ती परिषद न झाल्याचे काही देशाचे म्हणेने आहे. मात्र या देशात विशेतहा बांगलादेश आणि नेपाळ व श्रीलंका आणि मालदीवसारख्या देशात पाकिस्तानकडून दिली जाणारी मदत आणि दहशतवादी कारवयासाठी खातपाणी घालण्याचे प्रमाण कमी झाले नाही.याचा त्यांना सोयीस्करपणे विसर पडला आहे.ते सुद्धा मागील काळात किंवा संभाव्यता आयएसआयच्या दहशतवादाचे बळी ठरलेले आहेत.त्याचे निर्णय हे इतरापेक्षा स्वंतत्र होते.आणि भारताच्या बाबतीत वेगळे होते.त्यातल्या त्यात वर्षी इतर ठिकाणासह पानकोट ऊरी आणि बारामुल्ला हल्यानंतर वाढ झाली.

सार्क देशामध्ये परस्पर सहकर्याचे वातावरण निर्माण होण्तात फारशी कधीच संधीउपलब्ध झाली नाही.आणि या अपयशाचे मुख्य कारण मानले जाते की ते ‘ भारत आणि पाकिस्तान यांच्या मधले शत्रुत्व’. दक्षिण आशियाई देशामध्ये परस्पर विश्वास आणि सुरक्षा संदर्भातील गतील्शील परस्पर सहकर्यात मर्यादा पडलीआहे.’ ती भारत पाक तणावाची’. पुलवामा येथे झालेल्या दहशदवादी हल्यानंतरभारत आणि पाकिस्तान या दोन देशामध्ये टोकाचा तणाव निर्माण झाला आहे.अशा परीस्थित सार्क संघटनेचे नेतृत्व सांभाळणारे नेपाळने दोन्ही देशांना संयम आणि सबुरीचा सल्ला दिला.अर्थात सार्क संघटनेच्या माध्यमातून आजवर दक्षिण आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यामध्ये यापुर्वी तरी कोणतेही ठोस पाऊले उचलण्यात आली नाहीत.हा दहशवादी हल्ला झाला तेंव्हा त्याचा निषेध करण्यासाठी सार्क देश सर्वात आधी पुढे आलेला दिसतो.नेपाळचे पंतप्रधान खड्गप्रसाद शर्मा ओली याने लगेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संम्पर्क केलाआणि या दहशवादी हल्याचा निषेद केला. तसेच श्रीलंका आणि मालदीव या राष्ट्रांनी दहशवादी हल्याचा निषेद केला.भूतानच्या पारराष्ट्रमंत्र्यांनी या हल्याची कठोर सब्दात निंदा करून आपणही या प्रसंगी भारताच्या सोबत उभे असल्याचे सांगितले.भारत पाकिस्तान दरम्यान पुलवामा हल्यानंतर परस्पराची जेट विमाने पाडल्यामुळे या तणावातच अनिखीन भर पडलीआहे.त्यामुळे दक्षिण आशियाई देशामध्ये शांतता आणी स्थेर्य नांदायला हवी याची जाणीव सगळ्यांना झाली. भारत पाकिस्तान यांच्यातला संघर्ष दक्षिण आशियायला हितावह नाही.आणि त्यामुळे शांतता आणि सामोपचारच्या मार्गाने यातून मार्ग काढण्याच्या सगळ्याचा आग्रह दिसून योतो.

## उपाययोजना

SAFTA अंतर्गत मुक्त व्यापार व गुंतवणुकीची जलद अंमलबजावणी करणे यासाठी प्रगत प्रादेशिक संपर्क सुविधा उपलब्ध असणे व राष्ट्रामधील तणाव आणि अविश्वास दूर करणे गरजेचे आहे.सार्क सदस्य राष्ट्रातील सिमा वीषयकवादाचा आणि दहशतवादाचा लोकहिताशी समंधीत धोरण कार्यक्रमावर व आर्थिक एकीकरणावर दुष्परिणाम होणार नाही याची खबरदारी सदस्य राष्ट्रानी घेणे गरजेचे आहे. हवामानातील बदल पाणी व अन्नधान्याची टंचाई यांचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम लक्षात घेता सार्क संघटनेच्या पातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

सार्कच्या स्थापनेला ३० वर्षाहून अधिक काळ झाला आहे गेल्या ३० वर्षातील सार्क संघटनेची वाटचाल असमाधानकारक असलेली दिसून येते.सार्कच्या अधिवेशनात महत्वपूर्ण निर्णय घेतले जातात पण ते कागदोपत्रीच राहतात.त्यांचा अंमलबाजावणी साठी आवश्यक ती राजकीय इच्छाशक्ती सदस्य राष्ट्रे दाखवत नाहीत.यांचे उत्तम उदाहरण म्हाणजे दहशतवादासंबधीचा ठराव(२०१३) गरीबीच्या निर्मुलना संबधीचा ठराव, असे अनेक ठराव आहेत ते पूर्ण झाले नाहीत. यावरून एक गोष्ट स्पट होते की ती म्हाणजे या संघटनेची मुख्य समस्या अंमलबाजावणीची आहे.

सार्क संघटनेच्या येश्स्वी वाटचालीकरता सार्क सदस्य राष्ट्रांनी प्रादेशिक एकीकरणाच्या प्रक्रेयची अंमलबाजावणी ऊर्ध्वगामी दृष्टीकोनातून करणे गरजेचे आहे. शेजारी राष्ट्राशी शिक्षण,प्रशिक्षण,कौशल्य विकास, दूरसंचार, दळणवळण, गोर गरिबी निर्मुलन, दहशतवाद निर्मुलन या विषयी सार्वजनिक राजनयाचा वापर करणे आवश्यक ठरेल.

## संदर्भ सूची


*१) डॉ. वसंत रायपूरकर अंतरराष्ट्रीय संबध मंगेश प्रकाशन नागपूर*
*२) दि.वा.इंदापवार अंतरराष्ट्रीय संघटना मंगेश प्रकाशन नागपूर*
*३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर अंतरराष्ट्रीय संबध विद्या बुक्स औरंगाबाद*
*४) लोकसत्ता टेलिग्राम*
*५) प्रवीण चौगुले लोकसत्ता संपादकीय लेख*
*६) http/WWW.saarch.sec.org*
*७) sadrc-sec.org*

# दक्षिण आशियाच्या विकासासाठी सार्क संघटनेची आवश्यकता : एक अध्ययन

**डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार**

*सहा. प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. मोर कला, वाणिज्य आणि*

*श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा*

**प्रस्तावना :**

दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये प्रादेशिक सहकार्यातून विकास होण्यासाठी एखाद्या प्रादेशिक संस्थेची आवश्यकता बांगलादेशचे अध्यक्ष झिया उर रहेमान यांना १९७० नंतरच्या काळात जाणवू लागली. यादृष्टीने त्यांनी स्वत: दक्षिण आशियाई राष्ट्रांना भेटी दिल्या व नंतर परिपत्रकांद्वारे व स्वत:चे प्रतिनिधी पाकिस्तान, नेपाळ, भारत, श्रीलंका, मालदीव व भूतान देशांना पाठवून अशा प्रकारची प्रादेशिक संघटना स्थापन करण्याचे आव्हान करून याकरिता जोर दिला. या सर्व राष्ट्रांनी त्यांच्या या सूचनांचे स्वागत करून त्यावर विचार विनिमय करण्यासाठी भारत, बांगलादेश, पाकिस्तान, भूतान, श्रीलंका, नेपाळ व मालद्विप अशा सात राष्ट्रांची पहिली बैठक २१ ते २३ एप्रिल १९८१ पर्यंत कोलंबो येथे संपन्न झाली. शेती, आरोग्य, ग्रामीण विकास व लोकसंख्या इत्यादी बाबतीत सहयोग करण्याच्या दृष्टीने एक योग्य दिशा ठरविण्यात आली.

पुढे १ ऑगस्ट १९८३ रोजी दिल्ली येथे सात देशाच्या विदेश मंत्र्याच्या बैठकीमध्ये “South Asian Association of Regional Co-operation” ची औपचारिक घोषणा करण्यात आली. यामध्ये ‘दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्याचा जाहीरनामा’ आणि त्या अंतर्गत एकात्मिक कार्यक्रमास मान्यता देण्यात येऊन डिसेंबर १९८५ मध्ये ढाका येथे झालेल्या शिखर परिषदेत ‘दक्षिण आशियाई सहकार्याचा करारनामा’ (Chapter of the SAARC) मंजूर करण्यात आला. वर्तमानामध्ये बांगलादेश, भूतान, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव आणि २००५ मध्ये अफगाणिस्थान असे एकूण आठ देश सार्कचे सदस्य राष्ट्र आहेत. प्रचंड आर्थिक मागासलेपण, निरक्षरता, वाढती लोकसंख्या, विज्ञान–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मागासलेपण, संसाधनाचा अपुरेपणा व आरोग्याच्या समस्या इत्यादींनी ग्रस्त असलेली सदस्य राष्ट्रे सार्कच्या निमित्ताने एकत्र आली. अशा सर्व विपरित परिस्थितीतून विकासाकडे वाटचाल करीत असतांना आपल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक गरजेतून स्थापन झालेली विभागीय संघटना म्हणजे सार्क होय.

सार्कच्या घोषणापत्रामध्ये ९० अनुच्छेद असून सदस्य राष्ट्रातील गरीबी निरक्षरता दरिद्र्य, निकृष्ट दर्जाचा आहार, आरोग्य आणि राहणीमान यावर सामुहिकरित्या लढा देण्यासाठी संघटितरित्या प्रयत्न करण्यावर सार्क संघटना भर देते.

**सार्क उद्दिष्ट्ये :**

- ❖ दक्षिण आशियाई राष्ट्रातील लोकांचे कल्याण साधून जीवनमानात विकासात्मक बदल घडवून आणणे.
- ❖ सदस्य राष्ट्रांमध्ये सामूहिक आत्मनिर्भरता तयार करण्यासाठी प्रयत्न करणे.
- ❖ सदस्य राष्ट्रांमध्ये एकमेकाबद्दल सामंजस्याची भावना वृद्धिंगत करणे.
- ❖ आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व शैक्षणिक विकासासाठी सहकार्य करणे.

- ❖ आपआपसातील वाद, परस्पर समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी सदस्य देशामध्ये विश्वास संपादन करून सहानुभूती निर्माण करणे.
- ❖ इतर विकसनशील राष्ट्राबरोबर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा बळकटी प्राप्त करणे.
- ❖ आंतर प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संघटनाशी सारख्याच उद्दिष्टांनी व हेतूंनी सहकार्य करणे.
- ❖ प्रादेशिक सहकार्याने सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

**सार्कची प्रमुख तत्त्वे :**

१. सदस्य देशांचा, स्वातंत्र्याचा, सार्वभौमत्वाचा व प्रादेशिक अखंडत्वाचा परस्पर आदर करणे.
२. सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत राज्यकारभारात हस्तक्षेप न करणे.
३. सर्व देशांनी समतेच्या तत्त्वाची जोपासना करणे.
४. परस्पर हिताच्या संरक्षणासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे.
५. आपसातील हेवे दावे सामंजस्यानी सोडविणे.

**दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र :**

सार्क संघटनेने आपल्या सदस्य राष्ट्रात व्यापारामध्ये वाढ होऊन आर्थिक सहकार्य वृद्धिंगत व्हावे. यासाठी SAFTA १९९५ मध्ये लागू केले. या माध्यमातून व्यापाराला प्रोत्साहन देऊन करात कपात करणे, व्यापारासाठी सवलती देणे, सदस्य देशात आर्थिक गुंतवणूक वाढविणे अशी SAFTA ची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**सार्कची संरचना व कार्यप्रणाली :**

सार्क संघटना आपला विकास शिखर संमेलन, मंत्रिपरिषद, स्थायी समिती, तांत्रिक समिती, कार्यकारी समिती, सचिवालय व वित्तीय तरतूद आदीच्या माध्यमातून ध्येय–धोरणे ठरवून नीतीचे निर्धारण करीत असते.

सार्क संघटनेच्या स्थापनेला जवळपास ३५ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. या संघटनेच्या आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेतल्यास अनेक समस्या व अडचणी असल्या तरीही काही क्षेत्रांमध्ये सहकार्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

- ❖ आर्थिक प्रश्नापासून राजकीय प्रश्न वेगळे करण्याची मानसिकता बदलणे आवश्यक असल्याची जाणीव सदस्य राष्ट्रांमध्ये तयार झाली.
- ❖ दारिद्र्य, बेकारी, गरिबी, पर्यावरण व महागाई आदी समस्याबाबत चर्चा करून सार्कच्या व्यासपीठावरून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- ❖ भारताविषयी इतर सदस्य राष्ट्रांमध्ये असणारी अकारण भीती सार्कमुळे कमी झाली. सदस्य राष्ट्रांना भारताने कोणत्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता आर्थिक मदत केली.
- ❖ शेती विकास, आरोग्य, विज्ञान–तंत्रज्ञान, पर्यावरण, तसेच खाद्यान्नाच्या सुरक्षिततेसाठी करार करून विविध समित्या स्थापन करण्यात आल्या.
- ❖ माहितीच्या देवाण–घेवाण साठी तसेच वेगवेगळया क्षेत्रातील संशोधनासाठी विभागीय केंद्राची स्थापना करण्यात आली.

- ❖ मुख्यत: दहशतवाद आणि अमली पदार्थाच्या तस्करीला आळा घालण्यासाठी सार्क व्यासपीठावरून अनेक उपाययोजना करण्यात आल्या.
- ❖ मानवाधिकार, महिला व बालकांच्या विकासासाठी करार करण्यात आले.

**सार्क समोरील समस्या :**

नव्या परिस्थितील नव्या समस्यांना सोडविण्यासाठी सार्कची सदस्य राष्ट्रे प्रयत्नरत असल्याचे दिसून येते. आज महासत्ता समजल्या जाणारी अमेरिका व त्यांच्यासोबत असणारी बहुतांश युरोपीय विकसित राष्ट्रे (उदा. इंग्लंड, फ्रान्स आदी) यांच्या दावणीला बांधलेल्या जागतिक संस्था ज्यामध्ये संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक इत्यादी हया संस्था सार्क सदस्य राष्ट्राच्या समस्या सोडविण्यासाठी फारसी मदत करीत नाहीत आणि आपल्या अटीवर बांधून ठेवतात.

सार्कने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत फारसी प्रगती केली नाही असेच लक्षात येते भारत आणि पाकिस्तान या सदस्य राष्ट्रातील संघर्ष हे सार्कच्या अपयशाचे मुख्य कारण मानले जाते. भारताच्या तुलनेने इतर सदस्य देश सर्व दृष्टीने लहान व मागास असल्यामुळे भारताविषयी भितीचे वातावरण आहे.

सार्कच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास केल्यास पुढील प्रश्न समोर येतात.

- ❖ **परस्पर अविश्वासाचे वातावरण :**

  संघटनेच्या यशस्वीतेसाठी आपसामध्ये विश्वास असणे आवश्यक असते. परंतु सार्कच्या सदस्य देशांमध्ये अजूनही परस्परांविषयी अविश्वासाचेच वातावरण असल्याचे दिसते. पूर्णत्वाने सांघिक वृत्ती आणि एकरुपता आढळत नाही.

- ❖ **भारताच्या भूमिकेविषयी शंका :**

  सार्कच्या इतर सदस्य देशांमध्ये भारताविषयी भीतीचे आणि शंकेचे वातावरण आहे. भारतापेक्षा इतर सदस्य देश गरीब व कमकुवत, मागास आहेत. भारत पुढे आपल्यावर वर्चस्व गाजवलेली काय? अशी शंका नेपाळ, भूतान व श्रीलंका सारख्या राष्ट्रांना वाटते.

- ❖ **महासत्ताचे राजकारण :**

  पाकिस्तानने अमेरिकाद्वारा निर्मितीत लष्करी संघटनेचे सदस्यत्व घेतल्याने अमेरिकेचा दक्षिण आशियाच्या राजकारणात हस्तक्षेप वाढला. यामुळे भारत व पाकिस्तान संबंधांमध्ये तेढ निर्माण होत आहे. रशिया आणि अमेरिकाकडून सार्क सदस्य राष्ट्र मोठ्या प्रमाणात लष्करी सामुग्री खरेदी करत असल्याने शस्त्रास्त्र स्पर्धा सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

- ❖ **दहशतवादाने ग्रसित :**

  सर्वच सदस्य राष्ट्रांना देशांतर्गत दहशतवाद, सीमापार दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादाने ग्रासले आहे. दहशतवादामुळे या राष्ट्रांना जीवित वा वित्त हानीची झळ सोसावी लागली. अफगाणिस्तान हे दक्षिण आशियातील दहशतवादाचे केंद्र बनले आहे.

- ❖ **राजकीय अस्थिरता :** भारतात लोकशाही, पाकिस्तानमध्ये ल  करशाही, भूतान—नेपाळमध्ये जवळपास राजेशाही व बांगलादेशमध्ये धार्मिक मूलतत्त्ववाद अशा वेगवेगळया शासन पद्धतीमुळे तसेच तेथील राजकीय अस्थिरतेमुळे सार्कला कार्याची अंमलबजावणी करतांना अडचणी येतात.

❖ **वंश वाद :**

सार्कच्या सदस्य राष्ट्र देशांमध्ये वांशिक संघर्ष मोठ्या प्रमाणात दिसून येतो. पाकिस्तानमध्ये शिया–सुन्नी, श्रीलंकेमध्ये तामिळ व सिंहली, बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांकामध्ये सुद्धा वांशिक संघर्ष दिसून येतो. तसेच आपल्या हितसंबंधाच्या विरोधी असणा–या शासनाच्या धोरणाचा निषेध करणे असे चित्र नेपाळमध्ये माओवाद्याकडून पाहायला मिळते.

❖ **वाढती अण्वस्त्र निर्मिती :**

१९७४ आणि १९९८ मध्ये भारताने तर १९८८ मध्ये पाकिस्तानने अण्वस्त्र चाचणी करून आणि पुढे अण्वस्त्र क्षमता वाढवून दक्षिण आशियामध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. यामुळे सुद्धा सार्कच्या विकासामध्ये अडथळे उत्पन्न होत आहेत.

**सार्क संघटनेसमोरील समस्येवर उपाय :**

१. सार्क सदस्य रा ट्रांनी अमेरिका, रशिया, चीन सारख्या बडया देशाचा हस्तक्षेप हा कोणत्याही देशामधील हस्तक्षेप न मानता पूर्ण दक्षिण आशियामधील घुसखोरी समजून त्याला एकमताने प्रखर विरोध करणे आवश्यक आहे.
२. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणारे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधूत्व, मुलभूत अधिकार, मुलभूत कर्तव्य, एकात्मता व धर्मनिरपेक्षता आदी मौलिक तत्व संसदीय लोकशाहीतच प्राप्त होऊ ाकतात म्हणून लोकशाहीचा अंगिकार करणे.
३. शिक्षण आणि आरोग्यावरील खर्चात वाढ करणे.
४. 'वसुदैव कुटुंबकम' या तत्वानुसार कार्य करणे.
५. एकमेकांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करण्याचे तत्व ख–या अर्थाने प्रत्यक्ष कृतीत उतरविणे.
६. सदस्य रा ट्रांनी आपल्या पुरती संकुचित विचारधारा बाजूला ठेऊन संपूर्ण सार्कचे हित लक्षात ठेवणे.
७. नैसर्गिक आणि कृत्रिम संकटाचा सामना एकमुखाने करणे.
८. स्वत:चा राक्षसी स्वार्थ बाजूला ठेऊन मानवजातीच्या कल्याणासाठी दहशतवादाला दक्षिण आशियातून कायमचे न ट करणे आदी उपाय सार्क समोरील समस्यांवर सांगता येतील.

एकंदरीत सार्कच्या स्थापनेमध्ये सर्व सदस्य देशांचे सहकार्य असले तरी सार्कच्या विकासामध्ये मात्र सदस्य देशाचे सहकार्य दिसत नाही. यासाठी सदस्य राष्ट्रांनी परस्पर विश्वास, सामंजस्य आणि सर्वांचे हित लक्षात घेऊन योग्य दिशेने वाटचाल केल्यास सार्कचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही.

**संदर्भ सूची :**


१. *तोडकर बी. डी., ''भारत आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांमधील संबंध'', डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे २०१५.*
२. *कुलकर्णी बी. वाय., ''नाईकवाडे अशोक, आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांत आणि व्यवहार श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००४.*
३. *टिकेकर मनीषा, ''भारत आणि भारताचे शेजारी'', साधना प्रकाशन, पुणे, २०११.*
४. *पेंडसे अरुणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा, ''आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण'', ओरिएंट ब्लॅकस्वान प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई, २०११.*
५. *फाडिया बी. एल., ''आंतरराष्ट्रीय राजनीती'', साहित्य भवन पब्लिकेशन्स्, आगरा, २००७.*
६. *देवळाणकर शैलेंद्र, ''समकालीन जागतिक राजकारण : भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने'', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४.*

# सार्क संघटना आणि भारताची भूमिका

**प्रा. डॉ. राजेंद्र सदाशिव मुद्दमवार**

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा जि. चंद्रपूर ( म. रा. )*

## पार्श्वभूमी :

दक्षिण आशियाई देशांची विभागीय (प्रादेशिक) सहकार्यासाठी स्थापन झालेली एक संघटना. तिचे पूर्ण इंग्रजी नाव 'एशियन असोसिएशन फॉर रीजनल को-ऑपरेशन' असे असून त्यास मराठी पर्यायी नाव 'आशियाई विभागीय सहकार्य संघटना' असे आहे. तिची स्थापना १९८५ मध्ये झाली व तिचे स्थायी कार्यालय (सचिवालय) काठमांडू (नेपाळ) येथे आहे. सरचिटणीस हा तिचा मुख्य अधिकारी असून सात संचालक (प्रत्येक देशाचा एक)त्यास मदत करतात. त्यांची नियुक्ती सरचिटणीस सभासद राष्ट्रांच्या शिफारशी नुसार तीन वर्षांकरिता करतो. अपवादात्मक परिस्थितीत कालमर्यादा वाढविण्यात येते. सचिवालयाची अधिकृत भाषा इंग्रजी आहे आणि संघटनेची भारत, बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान व मालदीव ही राष्ट्रे कायम सभासद आहेत. या सात राष्ट्रांचे पंतप्रधान/राष्ट्रप्रमुख या संघटनेचे प्राधिकारी असून वर्षातून एक परिषद देशांच्या नावाच्या आकारानुसार त्या त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते. तीत आगामी धोरणांचे सुसूत्रीकरण, प्रगतीचे पुनर्विलोकन आणि सहकार्यासाठी नवीन क्षेत्रांचा शोध व तत्संबंधीची आवश्यक ती यंत्रणा यांविषयी विचारविनिमय होतो. या परराष्ट्र मंत्र्यांना परराष्ट्र सचिवांची स्थायी समिती सहकार्य करते, तसेच कार्यक्रमण करणारी समिती आणि ११ तांत्रिक समित्या देशपरत्वे विविध कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सहभागी होतात.

दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना. या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली होता. या सर्व देशांनी त्या वेळी कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृति कार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रिल २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला.

**उद्दिष्टे व ध्येयधोरणे** : या परिषदेच्या स्थापनेपूर्वी परराष्ट्र सचिवांच्या बैठकीत प्रथम या संघटनेच्या संदर्भातील एक मसुदा तयार करण्यात आला, त्यात संघटनेची पुढील उद्दिष्टे व धोरणे स्पष्ट करण्यात आली:

(१) दक्षिण आशियातील जनतेच्या कल्याणाला सर्वतोपरी प्राधान्य देणे.

(2) कृषी, वनविद्या, आरोग्य, लोकसंख्या, विज्ञान व तंत्रविद्या, हवामानशास्त्र,पर्यावरण, ग्रामीण विकास, स्त्रियांचा विकास, कला, शिक्षण वगैरे अकरा विभागांत (क्षेत्रांत) प्रादेशिक सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली असून त्यांच्या संवर्धन-संरक्षण यांवर भर दिला आहे.
(3) मादक पदार्थांचा व्यापार व दहशतवाद यांना पायबंद घालण्याच्या उपायांचा पाठपुरावाही त्यात व्यक्त केला आहे.
(4) आर्थिक विकासवाढीस गती देणे, सभासदराष्ट्रात सामूहिक आत्मनिर्भरता जागृत करणे याही गोष्टी नमूद केल्याआहेत.
(5) प्रादेशिक सहकार्यासाठी सूत्रबद्‌घ नियोजन व एकमताच्या आधाराने सर्व निर्णय घेण्यात यावेत.
(6) चर्चेतून द्विपक्षीय आणि वादग्रस्तमुद्यांना वगळण्यात यावे, तसेच स्वायत्तता, समानता, प्रादेशिक एकात्मता,राजकीय स्वातंत्र्य कसे अबाधित राहील, यांवर कटाक्ष ठेवून परस्परांच्याअंतर्गत व्यवहारात संघटनेने हस्तक्षेप करू नये, या मुद्यांवर भर देण्यातआला आहे.
(7) मूळ मसुद्यात निर्दिष्ट केलेल्या अकरा विभागांपैकी कृषी,ग्रामीण विकास, दळणवळण, हवामान, आरोग्य व लोकसंख्या यांच्याअभ्यासासाठी स्वतंत्र गट नेमून प्रत्येक गटाचा एक स्वतंत्र संयोजक नेमावा ,असे सूचित केले आहे.

सार्क या संघटनेच्या कल्पनेचा प्रथम उच्चार (पुरस्कार) बांगला देशाचे राष्ट्राध्यक्ष झिया ऊर रहमान यांनी केला. त्यांनी १९७७–८० दरम्यान दक्षिण आशियातील सर्व देशांना भेटी देऊन ही कल्पना विशद केली पण सुरुवातीस भारत-पाकिस्तान यांना ती रुचली नाही तथापि नोव्हेंबर १९८० मध्ये त्यांनी दक्षिण आशियातील देशांना या संघटनेच्या आवश्यकतेची बाब पत्र पाठवून स्पष्ट केली. अर्थात त्यांच्या या कल्पनेमागे रशियाचे तत्कालीन नेते ब्रेझनेव्ह व अलेक्सी कोसिजीन यांची प्रेरणा होती. तिला अनुसरून एप्रिल १९८१ मध्ये या संदर्भात कोलंबो (श्रीलंका) येथे परराष्ट्र सचिवांची बैठक झाली. तीत दक्षिण आशियाई विभागातील सहकार्य संघटनेचा मसुदा तयार करण्यात आला. यावेळी भारताने द्विपक्षीय आणि वादग्रस्त प्रश्न यांत घेऊ नयेत असा आग्रह धरला तर पाकिस्तानने या संघटनेच्या निर्मितीची घाई करू नये, असे सांगितले. अखेर बऱ्याच विचारविनिमयानंतर या संघटनेची कल्पना राष्ट्रप्रमुखांच्या पातळीवर मान्य झाली. त्यानंतर परराष्ट्र सचिव पातळीवर या संघटनेसंबंधी १९८१ ते १९८३ दरम्यान अनेक बैठका झाल्या आणि त्यास अंतिम स्वरूप प्राप्त झाले.

१-२ ऑगस्ट १९८३ रोजी संघटनेचा जाहीरनामा तयार होऊन तिची बैठक डाक्का (ढाका) येथे ७ डिसेंबर १९८५ रोजी झाली. तिथेच संघटनेचा जाहीरनामा प्रसिद्‌घ करण्यात आला आणि सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रांत परस्परांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच महिलांचे प्रश्न व त्यांचा सहभाग यांसंदर्भात शिलाँग (८ मे १९८६) आणि बंगलोर (१५ नोव्हेंबर १९८६) अशा दोन स्वतंत्र परिषदा झाल्या. त्यांत महिलांच्या शिष्यवृत्त्या, अभ्यासवृत्त्या, आर्थिक सहकार्य, महिला आणि मुले यांच्या भवितव्याचा तसेच दहशतवाद व स्त्रियांचे लैंगिक शोषण यांच्याशी मुकाबला करण्याविषयी एकमत झाले. सार्कची सतरावी परिषद १० नोव्हेंबर २०११ रोजी गॅनद्वीप (मालदीव) येथे झाली. तीत द्वीपक्षीय करारासह अनेक मुद्यांवर चर्चा झाली. १९८५ नंतर आजपर्यंत काही अपवाद वगळता १७ परिषदा झाल्या. संघटनेचे

विद्यमान सरचिटणीस (२०११) चेंक्याब डोरजी (भूतान) हे आहेत. पाकिस्तान, नेपाळ, बांगला देश, मालदीव यांचा तिला विरोध आहे. संघटनेच्या काही देशांत लोकशाही आहे मात्र काही देशांत लोकशाही रुजलेली नसल्यामुळे सामूहिक निर्णयास काही मर्यादा पडतात. नोव्हेंबर २०११ मध्ये भरलेल्या परिषदेत भारताने काही मौलिक सूचना केल्या. त्यांत भारत व पाकिस्तान यांत सौहार्दता निर्माण होण्यासाठी सांस्कृतिक देवाण-घेवाण, व्यापार करार यांवर भर देण्यात आला होता.

आजच्या या परिस्थितीचा विचार करता, अशाप्रकारची संघटना भारत आणि पाकिस्तान यांच्यामधल्या या परिस्थितीवर काहीतरी अर्थपूर्ण तोडगा काढण्यास सक्षम नाही हे प्रकर्षाने जाणवते. तरीही नेपाळने पुलवामा हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारे निवेदन प्रसिद्ध करून हे स्पष्ट केले आहे की, दक्षिण आशियामधल्या देशांची पुलवामा हल्ल्यानंतरच्या परिस्थितीवर काय भूमिका आहे. त्यामुळे आता प्रश्न हा उभा रहातो की, सदस्य देशांतर्गत शांतता आणि सुरक्षेसाठी 'सार्क'सारखी मर्यादित देशांची संघटना काही महत्त्वाचे योगदान देऊ शकणार आहे का? हा दहशतवादी हल्ला झाला तेव्हा त्याचा निषेध करण्यासाठी सार्क देश सर्वात आधी पुढे आलेले दिसले. नेपाळचे पंतप्रधान खडगप्रसाद शर्मा ओली यांनी लगेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संपर्क केला आणि या दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त केला होता. नेपाळच्या परराष्ट्र खात्याने निवेदन जारी करून या हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करून हा अतिरेकी हल्ला "निर्घृण कृत्य' असल्याचेही जाहीर केले.

श्रीलंकेचे पंतप्रधान रणील विक्रमसिंघे यांनी ट्विटर पोस्ट वरून हल्ल्याचा कठोर निषेध नोंदवला होता. तर मालदीवचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला शाहीद यांनी भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री सुषमा स्वराज यांना पत्र पाठवून, "दहशतवादाविरुद्ध लढायला पूर्ण सहकार्य देण्याची बांधिलकीही जाहीर व्यक्त केली आणि दहशतवादाचा समूळ उच्छेद करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्र येण्याचे सर्व देशांना आवाहन करताना त्यासाठी भारतासोबत काम करण्याची इच्छा देखील व्यक्त केली.

भूतानच्या परराष्ट्र मंत्र्यांनीही कठोर निंदा करताना आपणही या प्रसंगी भारतासोबत उभे असल्याचे सांगितले. तर बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी या अतिरेकी हल्ल्याचा निषेध व्यक्त करताना दहशतवाद हा दोन्ही देशाचा समान शत्रू असून त्याला मात देण्यासाठी सर्व देशांनी सहकार्य दिले पाहिजे अशी भूमिका व्यक्त केली. भारत पाकिस्तानच्या दरम्यान पुलवामा हल्ल्यानंतर, परस्परांची जेट विमाने पाडल्यामुळे या तणावात आणखी भर पडली आहे. आणि त्यामुळे दक्षिण आशियामध्ये शांतता आणि स्थैर्य नांदायला हवे याची जाणीव सगळ्यांना झाली आहे.

**रचना व कार्य**

नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली.सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्यदेशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्य देशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद (वर्षातून एकदा) देशांच्या नावाच्या त्या-त्या देशात भरते. या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख/पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या

पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगला देश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणा-या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता.

त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही.

पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे.

२०१५च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत. सार्कने अल्पकाळात विविध आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची (SAFTA) स्थापना २००६ मध्ये करण्यात आली. सदस्यदेशांमधील व्यापारवृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणरक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली. सदस्यदेशांतील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण-उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. 'सीमाविरहित ज्ञान' असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरू केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृद्ध असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशांतील विद्यार्थी २०१४ पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यदेशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा असतील व तेथेही या विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नू विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**मूल्यमापन :-**

भारत आणि अन्य सदस्यदेश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को-ऑपरेशन डायलॉग (ACD–३४ देश),

साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को-ऑपरेशन (SASEC–६ देश), मेकाँग–गंगा को-ऑपरेशन (MGC–६ देश), इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA–२१ देश), बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य (BBIN–४ देश) आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद (BIMSTEC–७ देश) या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणा-या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.

अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेश देताना सार्कच्या सदस्यदेशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणाला म्हणायचे, यावरून हा वाद निर्माण झाला होता. सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहिला आहे.

**संदर्भ :**

*http://www.saarc-sec.org/SAARC-Charter/5/; accessed on 1st May 2017-05 01*

*quora.com/What-are-the-functions-of-SAARC ; accessed on 1st may 2017*

*preservearticles.com/2012020222426/brief-notes-on…The organization structure of SAARC ; accessed on 1st May 2017*

*saarc-sec.org; accessed on 1st May 2017*

*दैनिक वर्तमान पत्रे :-*

*लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, देशोन्नती*

*आंतरराष्ट्रीय संबंध : - वसंत रायपुरकर*

*आंतरराष्ट्रीय संबंध तथा राजनीती :- जे. सी. जोहरी*

*आंतरराष्ट्रीय संबंध : - व्ही. एन. खन्ना*

*डॉ. शैलेंद्र देवलनकर यांचे लेख*

*संपादकीय कार्यालय*

*राठी विश्वकोश कार्यालय, गंगापुरी, वाई, जिल्हा सातारा, महाराष्ट्र ४१२ ८०३*

*(०२१६७) २२००५३/२२०१५४*

*प्रशासकीय कार्यालय*

*महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५, भारत*

*(०२२) २४२२ ९०२०*

# भारत व भूतान यांचे परराष्ट्र धोरण

**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे**

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख (सय्योगी प्राध्यापक), कर्मवीर दादासाहेब देवतळे महविद्यालय, चामोर्शी जि. गडचिरोली, मोबाईल नं. ९४२३१२२०७७*

**१) प्रस्तावना :—**

दक्षिण एशिया मध्ये छोटा देश म्हणून भूतान प्रसिध्द आहे. भूतान आणि भारत हा शेजारी राष्ट्र आहे या दोन्ही देशामध्ये भौगोलिक, सामाजीक व सांस्कृतीक सबंधी अत्यंत महत्वपुर्ण सबंध आहे ब्रिटीश सरकारने सही करुन भूतान हा देश अस्तित्वात आला. तेव्हापासून भारत व भूतान यांच्यात सबंध मित्रत्वाचे सबंध प्रस्थापित झालेले आहे. आणि आज सुध्दा आहेत. भारत आणि भूतान यांचे राजनितीक सबंध १९६८ मध्ये स्थापीत झाले. त्यानंतर फेब्रुवारी २००७ मध्ये खेसर नामगेल वांगचुच यांनी भारत दौरा केल्यानंतर राजनितीक सबंध दृढ झाले. त्याचवेळी त्यांना स्वाक्षरी सुध्दा केली. अधिक दृढ झालेली भारत—भूतान सबंध २१ व्या शतकात विकासाात महत्वाची मानली जाते यामध्ये शांती मैत्री व मुक्त व्यापार, वाणीज्य तसेच एक—दुसरे देश यांच्या नागरीकांस समान न्याय प्राप्त होईल अश्या प्रकारची चर्चा होउुन त्यावर निर्णय घेण्यात आला. अश्याप्रकारचे विशेष सबंध दोन्ही देशामध्ये सर्वोच्च स्तरावर नियीमत यात्रा व विचार, व्यापारक प्रामाणात आदान—प्रदान मजबूत करण्यात आले २०१३ मध्ये उच्चस्तरीय आदान—प्रदान करण्यात आले. त्यामध्ये भूतान नरेश महामहिन खेसर नामगेल वांगचूच यांना ६४ व्या गणराज्य दिवस कार्यक्रमात मूख्य अतिथी म्हणून भारतामध्ये आले होते. भारताचे राष्ट्रपतीच्या निमंत्रणानूसार त्यांना पाचारण करण्यात आले होते ६ जानेवारी ते १० जानेवारी २०१४ मध्ये भारतामध्ये अनेक ठीकाणी जाउुन भेटी दिल्या यामध्ये त्यांनी वाराणसी या ठीकाणी सुध्दा भेट दिली.

प्रधान मंत्री नियुक्त झाल्यानंतर लेयोनचेन तशेरींग तोषगे यांनी विदेश यात्रा प्रसंगी ३० ऑगष्ट ते ४ सप्टेंबर २०१३ या कालावधीत भारतामध्ये दौरा केला. ही त्यांची पहली भारतीय विदेश यात्रा होती. यामध्ये त्यांनी भारताचे राष्ट्रपती प्रधानमंत्री तसेच अनेक मंत्र्यासोबत चर्चा केली. करीता भारत सरकार कडून सहाय्यता राशीची मागणी केली. व त्यावर भारत सरकारने मंजूरी दिली या कालावधीत त्यांनी हैद्राबाद दौरा सुध्दा केला. भारताचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी शपथ ग्रहण सोहळयाप्रसंगी सहा सदस्यीय शिष्टमंडळ त्यामध्ये विदेश मंत्री व पंतप्रधान स्वत: २५ मे ते २८ मे पर्यंत उपस्थित होते.

भूतान रेश यांनी आमंत्रीत केल्यानूसार भारताचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी १५ ते १६ जून २०१४ मध्ये भूतान चा राजकीय दौरा करण्यात आला. या दौरा दरम्यान विदेश मंत्री व राष्ट्रीय सलाहकार तसेच वरिष्ठ अधिकारी तसेच विदेश सचिव यामध्ये सहभागी झााले होते.

भारताचे प्रधानमंत्री यांची शपथ ग्रहणानंतर पहिली विदेश यात्रा होती. या यात्रा दरम्यान उच्च स्तरीय विदेश यात्रा सबंधीत नियीमत आदान—प्रदान सबंधी विचार अधिक दृढ करण्यात आले. या विदेश दौऱ्या निमित्य भारताच्या प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी भूतान चे चौथे व पाचवे नरेश यांची भेट घेतली या दौऱ्या दरम्यान अनेक विषयावर चर्चा झाली.

भूतान हे राष्ट्र लोकसंख्या स्थीर असलेले राजेशाशी या राष्ट्रांत अस्तित्वात आहे. या देशाचे क्षेत्रफळ ३८,३९४ वर्ग कि.मी आहे. त्यांच्या पश्चिमेस सिक्कीम, पूर्वेला अरुणाचल प्रदेश तर दक्षिणेस आसाम लागून आहे. पश्चिम बंगालचा दार्जीलिंग जिल्हा भूतानला नेपाळ पासून वेगळा करतो तसेच भूतानची ४७० कि.मी सीमा ही चीनला लागून आहे. यामुळे भारत—चीन यांच्या दरम्यान भूतान हा बफर झोन म्हणून कार्य करीत आहे. यामुळे भारतासाठी भूतान हा अतिशय महत्वाचा आहे. भारत आणि भूतान यांच्यात ६०५ कि.मी सिमा आहे. आणि ती पुर्णतः खुले आहे. भारतातील लोक भूतान मध्ये जातात. तर भूतान चे भारतामध्ये येत असतात. कुठलाही पासपोर्ट किंवा व्हिसाशिवाय येउु शकतात कोणताही व्यवसाय, व्यापार करु शकतात.

भारताने भूतानमध्ये दंतक प्रकल्पाच्या माध्यमातून २५०० कि.मी रस्ते बनवून दिले आहे. तसेच विमानतळ दुरसंचार उभारणी, आकाशवाणी केंद्र, जलविद्यूत प्रकल्प दवाखाने इत्यादी भारताच्या मदती तूनच निर्माण झाली आहे. भारत.भूता मधील मैत्रीपुर्ण सबंध चीनला सतत खोचत असतात त्यामुळे भूतानच्या सिमेमध्ये नेहमी आक्रमण करीता राहीला आहे. २०१७ साली चीनने डोकलाम सिमा रेषेचा वाद निर्माण झाला तेव्हा भूतानच्या संरक्षणासाठी भारत खंबीरपणे उभा राहीला होता. त्यावेळी भारताने लक्ष घातले नसते तर चीन भूतानचा बराचशा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला असता. तेव्हा भूतान ला कळले की आपल्याला भारताशिवाय पर्याय नाही. भारत भूतानला नेहमी मदत करीत असतो भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भूतान व भारत यांचे सबंध अधिक मजबूत झालेले आहे.

**भारत व भूतान याच्यांतील प्रमूख मुद्दे**

१) भारतामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी हे बौध्द धर्माच्या शिक्षणा करीता भारतामध्ये प्रवेश घेतील.

२) भारतीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी भूतानमध्ये ७२० मेगावॅट जलविद्यूत योजना कार्यात्वीत करण्यात आली.

३) भारतामध्ये प्रमूख आय आय टी आणि भूतान मधील नामंकित विद्यापीठामध्ये नेहमी संपर्क राहील त्याकरीता भारत सहकार्य करेल.

४) आर्थिक सबंध दोन्ही देशामधील चांगले राहील याकरीता सुध्दा प्रयत्न करण्यात आले.

**सारांशः** आजच्या परिस्थितीत भूतान आपली स्वतंत्र विदेश निती करीता प्रयत्नशिल आहे कारण भारतासोबत अधिक प्रभावी सबंध राहील आणि चीन सारख्या बलाढय शक्तीचा

मुकाबला करण्यास सक्षम होईल. भारत आणि भूतान यांचे सबंध विश्वासपुर्ण आहे चीन सुध्दा भूतान सोबत राजनितीक सबंध स्थापीत करण्याचा प्रयत्न करीत आहे तसे भूतान मधील बरेच नागरीक चीन मध्ये व्यापार करीत आहे. याचा परिणाम येत्या काही वर्षात भारतावर फार मोठा परिणाम होणार आहे. भारत—भूतान यांचे व्दिपक्षीय सबंध अधिक मजबून करण्याचा प्रयत्न झाला तर या दोन्ही देशामधील सबंध अधिक दृढ होईल. भारताचा शेजारी राष्ट्र म्हणून भूतान यांच्यातील परराष्ट्र धोरण अधिक मजबूत झाले पाहिजे. जगात भारत — भूतान यांच्यातील मैत्रीपुर्ण सबंध हे आदर्श ठरले आहे.

**सदर्भ ग्रंथ सूचि**

*१) डॉ. वसंत रायपूरकर — आंतरराष्ट्रीय सबंध श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर*

*२) प्रा. र.ध. वराडकर — आंतरराष्ट्रीय सबंध आणि राजकारण विद्या प्रकाशन, नागपूर.*

*३) व्ही. बी. पाटील — भारताचे परराष्ट्रीय धोरण के सागर पवीकेशन्स — पुणे*

*४) प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर — भारतीच परराष्ट्रीय धोरण सातत्य आणि स्थित्यंतर प्रतिभा प्रकाशन, पुणे*

# भारताचे समकालीन परराष्ट्र धोरण : सार्क संगठना

**डॉ. सचिन एस वेरुळकर**
*राज्यशास्त्र विभाग एस एन मोर महाविद्यालय तुमसर,भंडारा.*

दक्षिण आशियाला 'भारतीय उपमहाद्वीप' या नावाने देखील ओळखले जाते. हा केवल राजकीय योगायोग नव्हे तर यामागे भारताद्वारे व्यापलेला भौगोलिक भागाचेही महत्व अधोरेखित होते. ह्या क्षेत्रातील सर्वच राष्ट्रांना भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धर्मिक प्रभावापासून दूर राहता येऊ शकले नाही.

प्राचीन काळापासून हे क्षेत्र अतिशय एकमेकात गुंतलेले होते. अनेक राजकीय घडामोडी नंतर त्यांचे आजचे स्वतंत्र राजकीय अस्थित आहे. भारतापासून स्वतंत्र राजकीय व्यवस्था अस्थित्वात असून देखील त्यांना भारताबाबत राजकीय भीती वजा आकस स्वाभाविकता पाहायला मिळतो.भारता शेजारील राष्ट्रांनी कितीही टाळले तरी त्यांच्या जनमानसावर भारताचा प्रभाव ते टाळू शकत नाही हे मान्य करणे आवश्यक आहे .

**सार्क ची स्थापना व उद्देश्य :**

दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहयोग संघटनेची (सार्क) स्थापना क्षेत्रीय,ऐतिहासिक ,सांस्कृतिकदृष्ट्या जी राष्ट्रे परस्पर संबंधित आहे त्यांना एकत्रित आणण्यासाठी अनौपचारिक प्रयत्न म्हणून झाली. आज यामध्ये भारत ,पाकीस्थान ,नेपाळ,भूतान,बांग्लादेश ,श्रीलंका ,मालद्वीप, अफगाणिस्थान
यांचा समवेश आहे.या राष्ट्रातील समस्या ह्या सामान्यपने समान आहे .

१) परस्पर सहकार्य व प्रयत्नांनी गरिबी निर्मुलन,आर्थिक ,सामाजिक विकास करणे.

२) परस्पर सहकार्य करतांनाच देशांमध्ये समानता,क्षेत्रीय अखंडता,सार्वभौमत्व,अंतर्गत अहस्तक्षेप हे उद्देश्य ठेवण्यात आले.[1]

**विकास व संभावना :**

आज सार्क द्वारे संयुक्त राष्ट्राच्या अन्य संघटना सह अन्य १८ आंतरराष्ट्रीय संघटना
बरोबर सहयोग करार झाले आहे तसेच जपान ,जर्मनी ,कनेडा या राष्ट्रांसी सहयोग करार झाले आहे.

1. सीमा शुल्क संबंधित पारस्परिक प्रशासनिक सहायता संबंधी करार.
2. सार्क मध्यस्थ परिषद स्थापना संबंधी करार
3. दुहेरी कराधान पासून बचाव व कर प्रकरणा संबंधित पारस्परिक प्रशासनिक सहायता संबंधी करार

- आतंकवाद संबंधी सार्क क्षेत्रीय कन्वेंशनवर 1987 में हस्ताक्षर करण्यात आले होते. सर्व सार्क देशांनी या कराराचे समर्थन केले व 12 जनवरी, 2006 पासून हा करार लागू झाला आहे.
- 14 वे शिखर सम्मेलन विशेष रूपात महत्वपूर्ण होते यात पहिल्यांदा सार्क की सदस्यत्येचा विस्तार केल्या गेला. सार्क च्या 8वें सदस्यच्या रूपात अफगानिस्तानला सदस्यत्व देण्यात आले जे

भारतीय राजनयाचे यश मानल्या जाते . या व्यतिरिक्त, या क्षेत्राच्या बाहेरील 5 पर्यवेक्षक अर्थात् चीन, यूरोपीय संघ, जापान, कोरिया गणराज्य व अमेरिका पहिल्यांदा सार्क पर्यवेक्षक म्हणून हजार होते.[2]

**साफ्टा :**

एक जानेवारी, 2006 पासून साफ्टा लागू झाला आहे. वर्ष 2016 पर्यंत याला सर्व सदस्यांनी लागू करण्याचे ठरविण्यात आले होते. यानुसार सदस्य राष्ट्रांनी आपल्या येथील संवेदनशील व्यापार वस्तूची यादी जाहीर करावी व त्यांच्या व्यतिरिक्त अन्य सदस्य राष्ट्रांच्या वस्तू आयात शुल्कात कपात करावी. याच्या यशामुळे परस्पर संबंध केवल राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित राहणार नाही तर त्याचे रुपांतर व्यापारात झाल्यास या क्षेत्राची आर्थिक प्रगती होईल व विवादित मुद्दे मागे पडतील.[3]

**आपत्ती व्यवस्थापन :**

13व्या सार्क शिखर सम्मेलनात, भारताने सार्कला पुन: सक्रिय करण्यासाठी काही प्रस्ताव मांडले होते. याचाच एक भाग सार्क आपत्ती व्यवस्थापन केंद्राने अक्तूबर, 2006 पासून नवी दिल्ली येथे कार्य करने सुरू केले. सुनामी व भूकंप सारख्या प्राकृतिक आपदामुळे जनजीवन व संपत्तिच्या मोठ्या नुकसानाला लक्ष्यात घेता हि महत्वपूर्ण प्रगति आहे. भारताजवळ यासंबंधी चांगला अनुभव आहे ,राष्ट्रीय आपदा निवारण दलासारखे प्रशिक्षित दल आहे. ज्याचा लाभ सदस्य राष्ट्रांना आपत्ती काळात मिळतो. [4]

**ऊर्जा सुरक्षा क्षमता :**

सदस्य राष्ट्राचा मोठा खर्च हा उर्जा गरजा पूर्ण करण्यावर होतो जेव्हाकी अनेक प्रकारच्या उर्जा संभावना या क्षेत्रात आढळतात. सदस्य राष्ट्राच्या भूगर्भात पेट्रोलियम वाळू, तेल तसेच मोठ्याप्रमाणात बारमाही नद्यामार्फत जलद्युत ,हायड्रोजन वाळू,सौर उर्जा इ. उर्जा संसाधने असूनदेखील हे क्षेत्र याच्या वापरापासून वंचित आहे त्यामुळे मागासलेपणात भर पडली असून नैसर्गिक संपत्तीचे दोहन वाढले. या क्षेत्रात प्रत्यक्ष्य कार्य चालु झाले तर प्रगतीला हातभार लागेल. उर्जा क्षेत्रात सहकार्यासाठी सार्क उर्जा केंद्र इस्लामाबाद ,पाकीस्थान येथे कार्यरत आहे.[5]

**संपर्क व दळणवळण :**

सार्क भूभाग व जल सीमांनी जुळलेले आहे. परंतु प्राचीन व्यापार मार्ग असतांना देखील वर्तमानात त्याचा सहजतेने उपयोग होत नाही. जर काही नियमामध्ये सर्वांनी बदल केले तर संपूर्ण क्षेत्र सुगम होईल. भारताला लागून जवळपास सर्वच देशांचे मार्ग जोडले गेले आहे परंतु राजकीय इच्छाशक्ती अभावाने त्यांचा उपयोग होऊ शकत नाही.

भारताद्वारे दूरसंचार क्षेत्रातील त्याचे तंत्रज्ञान सार्क देशांसाठी वापरात सार्क उपग्रह प्रक्षेपित केला ज्यामुळे नैसर्गिक आपदांची माहिती मिळविण्यास व संपर्क वाढीसाठी उपयोगात येईल.[6]

**भारत आणि सार्क संबंध :**

**सार्कच्या तुलनेत अन्य क्षेत्रीय संगठना :**

२० वे शतक हे संगठनेचे मानल्या गेले आहे. मागास असो किंवा विकसित राष्ट्रांनी आपापल्या संगठना उभारल्या व त्यामार्फत आपले हित साध्य करण्यासह आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले आहे जसे की G-8, G-२०, आसियान,आफ्रिकी सहयोग संगठना ,युरोपीय युनियन, इ. सामरिक व

क्षेत्रीय विकासाला अनुसरून शांघाय-६, ब्रिक्स , बिम्स्टेक, इस्बा या संगठना निर्माण झाल्या व वाढल्या परंतु सार्क याला अपवाद ठरली .

सार्क सदस्यांमध्ये कुठलीही सुसूत्रता दिसून येत नाही, त्यातील मोचकेच देश आत्मनिर्भर बनू इच्छितात, अन्य सदस्य बड्या राष्ट्रांचे अंकित बनणे पसंत करतात. त्यामुळे पूर्व आशिया पेक्षा चांगली परिस्थिती असतानाही आसियन सारखे स्थान सार्क ला मिळविता आले नाही.

सर्व सदस्य राष्ट्राचा सामान्य शेजारी हा भारत ठरतो व त्यामुळे भारताबाबत कमालीचा आकस दिसतो.यामुळे संघटनेत सदस्यांचे चित्त स्थिर होऊ शकले नाही. दुसरीकडे भारतानेही पर्यायी संगठनांचा शोध घेणे शुरू करून आंतरराष्ट्रीय राजकारणात अधिक सक्रीय भूमिका घेतली.

भारताप्रमाणेच सार्क चा पर्याय पाकीस्थान हि शोधात आहे .मध्य आशियात असे एखादे संगठन स्थापून त्याचे नेतृत्व करण्यासाठी इराण व अन्य मध्य आशियातील राष्ट्रांच्या भेटी त्यांनी घेतल्या जर क्षेत्रीय आधार जमला नाही तर धार्मिक आधारावर असे करण्याचा त्याचा प्रयत्न आहे.[7]

**बिम्स्टेक :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दुसर्या कार्यकाळाच्या शपथविधी समारंभाला बिम्स्टेक देशांच्या प्रतिनिधींना आवर्जून आमंत्रित केले होते. बिम्स्टेक म्हणजेच 'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी सेक्टर टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन'. बांगलादेश, भूतान, भारत, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड या देशांचा समावेश बिम्स्टेकमध्ये होतो. म्हणजे यात सार्क मधील केवळ पाकीस्थान, अफगाणिस्थान व मालद्विप यांचा समावेश नाही.

बिम्स्टेक देशातील आंतरराष्ट्रीय व्यापारातील दक्षिण आशियाई देशात होणाऱ्या व्यापारापैकी मोठा व्यापार या भौगोलिक क्षेत्रातून होतो. म्हणून आशिया खंडात नव्याने उदयास येत असलेल्या भूराजकीय समीकरणांमध्ये 'बिम्स्टेक' संघठनेसअधिक महत्व प्राप्त झाले आहे. बिमस्टेक देश नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मनुष्यबळ या दोन्हींसंदर्भात महत्त्वाचे आहेत. जगाच्या २२ टक्के एवढी लोकसंख्या आणि २.७ ट्रिलियन डॉलर एवढ्या जीडीपीचा वाटा या देशांचा आहे.[8]

चीनचे वाढते प्राबल्य रोखणे : दक्षिण आशियातील चीनचे वाढते प्राबल्य रोखण्याच्या दृष्टीने विचार करता, बिम्स्टेक देशातील भारताची गुंतवणूक सामरिकदृष्ट्या महत्त्वाची असणार आहे. भारताच्या पूर्वेकडील चार राज्यातील आणि ईशान्येकडील दुर्गम प्रदेशातील राज्यांचा बांगलादेश, म्यानमार आणि थायलंड या बंगालच्या उपसागरातील देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित होणे हे महत्त्वाचे ठरणार आहे. भारतातून बांगलादेशमार्गे म्यानमार आणि थायलंडपर्यंत पोहोचणारे वाहतुकीचे नवे मार्ग निर्माण करणे हे मोठे आव्हान आहे.[9]

**हिमक्षेत (हिंदमहासागर किनारी देशांची संगठना ):**

हिन्द महासागर तटीय सहयोग संघ (Indian Ocean Rim Association)हा संघ क्षेत्रीय सहयोग व अन्तरमहाद्वीपीय व्यापारामध्ये गतिशीलता आणण्याच्या उद्देश्याने हिन्द महासागरराच्या तीन प्रायद्वीपांना (एशिया, अफ्रीका और आस्ट्रेलिया) एका मंचावर आणतो. हिमतक्षेस ची स्थपना 6 मार्च, 1997 ला झाली भारत व 13 अन्य देशांनी मिळून केली होती. सध्य स्थितीत 20 देश याचे सदस्य आहे.

भारत, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, इंडोनेशिया, ईरान, केन्या, मलेशिया, माडागास्कर, मॉरीशस, मोजाम्बिक,ओमान, सेशल्स, सिंगापुर, दक्षिण अफ्रीका, श्रीलंका, तंजानिया, थाईलैंड, यमन, संयुक्त अरब अमीरात. पाकिस्तान प्रयत्न करुनही व हिन्द महासागरराचा तटवर्ती देश असूनही त्याला याचा सदस्य किंवा डायलॉग पार्टनर बनविण्यात आले नाही.[10]

**भारत-आसियान :**

१९६७ मध्ये स्थापित आसियान संगठनेत भारताने उदारीकरणानंतर आपले लक्ष्य केंद्रित केले.आपल्या 'लूक इस्ट धोरण द्वारे' आसीयांच्या आर्थिक विकासाचा लाभ मिळविण्यासाठी भारताने आसियानमध्ये अधिक रुची दाखविली म्यानमारच्या सहभागामुळे आसियान भारताच्या सीमेला येऊन पोहचले.भारत आज आसियान वार्ताकारराष्ट्र असले तरी भविष्यात भारत सक्रीय सदस्य बनण्याच्या प्रयत्नात आहे . आसियान व भारत यात ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक व अन्य बाबतीत समानता होतीच पण प्रशांत महासागरात शक्ती संतुलनात भारताची गरज तीव्रतेने भासू लागल्याने आसियान राष्ट्रेही याक्षेत्रात भारताने अधिक सक्रीय भूमिका वठविण्याची अपेक्षा करीत आहे.[11]

**भारताबाबत आकसबुद्धी :**

सदस्य राष्ट्रांवर भारताचा फारमोठा प्रभाव आहे, त्यामुळे त्याचे सकारात्मक व नकारात्मक प्रभाव तेथील राजकीय क्षेत्रावर दिसते. जसे की पाकीस्थान च्या अंतर्गत राजकारणात काश्मीर , मुलतत्ववादी व सैन्याला आपले स्थान टिकून ठेवण्यासाठी भारतविरोध करणे आवश्यक आहे. नेपाळमध्ये कम्युनिस्ट पक्ष्याला नेपाली राष्ट्रवाद जागविण्यासाठी भारतीय व्यापारी ,मधेशी व भारत विरोध करून चीनला हि खुश ठेवता येते. बांग्लादेशातही अवामी लीग सारखा पक्ष मुलतत्व वाद्यांना व पाकिस्थान धार्जीण्याना खुश करण्यासाठी भारतविरोधी धोरणे स्वीकारतो हीच स्थिती श्रीलंकेची आहे. यात चीनी प्रभावाचा नवा अध्याय जुडला आहे. यामुळे भारतावर 'बिग ब्रदर' चे आरोप लाऊन सदैव या संगठ्नेला बाधित करण्याचा प्रयत्न केल्या गेले ज्यामुळे दोन दृष्टीकोन पुढे आले.

१) भारताने सार्क कडे दुर्लक्ष्य करावे,पर्यायी संगठ्नेवर लक्ष्य केंद्रित करावे.

२) चीनचा सार्क मध्ये सहभाग करून भारताचे महत्व कमी करणे.

भारताची 'बिग ब्रदर' इमेज करणारे राष्ट्रे दुसऱ्या दृष्टिकोनावर काम करीत आहे हे लक्ष्यात घेता भारत पहिल्या दृष्टिकोनावर गंभीर विचार करीत आहे.[12]

**सार्कला भारताशिवाय पर्याय नाही :**

भारत हा सार्क सदस्यांना जोडणारा सामान्य दुवा आहे. सार्क क्षेत्राच्या ७० टक्के लोकसंख्या भारतात रहाते. भारतीय अर्थव्यवस्तेच्या प्रगतीचा लाभ या राष्ट्रांना मिळणार आहे हे गृहीत धरून भारत वगळून सार्क ची कल्पना करता येत नाही. उरी आतंकवादी हल्ल्यानंतर इस्लामाबाद संमेलनावर भारताच्या बहिष्कारानंतर अन्य सदस्य राष्ट्रांनी पाकिस्थानात होऊ घातलेल्या संमेलनात सहभागी न होण्याचे घोषित केले. यामुळे अन्य सदस्यांनी सम्मेलनात सहभागी होण्यास असमर्थता दर्शविली. श्रीलंकेने तर स्पष्ट केले "भारताशिवाय संमेलनाचे ओचीत्य नाही." यावरून भारताचे महत्व स्पष्ट होते.[13]

**सार्क बाबत भारताचे समकालीन परराष्ट्र धोरण :**

भारतीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी वर्ष 2014 मध्ये आपल्या शपथ ग्रहण समारंभात सार्क राष्ट्राध्यक्ष्यांना निमंत्रण देउन भारताच्या दृष्टीने सार्कचे महत्व अधोरेखित केले.

सार्क संदर्भात बोलताना नवनियुक्त विदेशमंत्री जयशंकर यांनी म्हटले की "दक्षिण एशियाई देशांमध्ये भारत सर्वातमोठी अर्थव्यवस्था आहे व यामुळे शेजार्यांना मदत करण्याची भारताची जवाबदारी आहे असे भारत मानतो."[14]

विदेश मंत्री पद संभाळल्या नंतर डॉ. एस जयशंकर यांनी पहिले वक्तव्य केले होते की, ''सार्क मध्ये कित्तेक समस्या आहे हे सर्वश्रुत आहे. सार्क मध्ये संपर्कासंबंधी गोंधळ आहे. जेव्हाकी BIMSTEC मध्ये ऊर्जा व संभावनाएं आहे .'' [15]भारत चे पूर्व विदेश सचिव मुचकुंद दुबे नुसार "सार्क मागील 30 वर्षात एक प्रकारे निष्क्रिय आहे".केवल वार्षिक संमेलने म्हणजे कुठल्या संस्थेचा जिवंतपणा म्हणता येणार नाही. कारण ते कृतीशून्य आहे.[16]

मोदी सरकारच्या काळात भारतासमोर आंतरराष्ट्रीय राजकारणात अधिक सक्रीय भूमिका पारपाडण्याचे धोरण स्विकारण्यात आले. चीनचे आव्हान पाहता भारताने सार्ककडे पूर्णपणे दुर्लक्ष्य केले नसले तरी भारताला हिंद-प्रशांत (इंडो-प्यासेफिक)महासागरात प्रभावी भूमिका पार पाडावी लागत आहे. अनेक नव्या आघाड्या उघडाव्या लागत आहे. जसेकी 'क्वाड' यामुळे भारत केवल क्षेत्रीय राजकारणातील खेळाडू बनू ईच्छित नाही हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष :**

सार्क व्यापक उद्देश्य डोळापुढे ठेऊन निर्माण झाली परंतु या क्षेत्रातील राष्ट्रात दक्षिण आशिया बाबत एकोप्याची भावना स्वाभविक पणे आढळत नाही. ज्याप्रमाणे आफ्रिका किंवा युरोपीय देशात आढळतात.

सार्क सदस्यराष्ट्रात भारताबाबत आकसाची भावना दिसते. ज्यामुळे वारंवार भारतावर 'बिग ब्रदर' चा आरोप लावल्या जातो. जरी या संगठ्नेच्या उद्देश्यात द्विपक्षीय मुद्द्यांना या व्यासपीठावर माडन्यास मनाई केली असली तरी भारत –पाकीस्थान यांचे संबंध सार्कला बाधित करतांना दिसतात .

सार्कचा 30 वर्षाचा आढावा घेतल्यास लक्ष्यात येईल की सार्क केवल संमेलने यापुरताच मर्यादित राहिली, दिश्याहीन व गतिहीन असे दोन्ही आरोप या संघटनेवर लागतांना दिसतात.

दळणवळण साधनासह व्यक्तींमधेही संपर्काचा अभाव प्रकर्षाने जाणवितो.यामुळे 'लोकराजनायाचा' (Public Diplomacy) प्रभाव दिसत नसून केवल राजकीय नेतृत्वाच्या माध्यमांनी हे संबंध स्थापन करण्याचा कृत्रिम प्रयत्न होताना दिसतात .

सदस्य राष्ट्रात संगठने बाबत गंभिर्तेचा अभाव दिसतो ज्यामुळे ते बाह्य शक्तीच्या आश्रित राहणे पसंत करतांना दिसतात, त्यामुळे आर्थिक प्रगतीवर त्याचा स्पष्ट नकारात्मक प्रभाव दिसतो.

या संगठनेने अन्य क्षेत्रीय संगठ्नेला पुढे ठेऊन कार्य केल्यास असलेला गतिरोध दूर होऊ शकतो. सार्कची गरज सर्वच सदस्यांना आहे हे समजून घेतल्यास सार्क ची प्रगती होऊ शकते.

## संदर्भ :


1) https://www.saarc-sec.org/index.php/about-saarc/about-saarc
2) https://www.saarc-sec.org/
3) http://www.hastakshep.com/sapta-safta-in-hindi/
4) http://saarc-sdmc.org/
5) https://www.saarcenergy.org/
6)https://www.saarc-sec.org/index.php/areas-of-cooperation/energy-transport-science-technology
7) क्या 'बिम्सटेक' अगला 'सार्क' है ? सलमान रावी, https://www.bbc.com/hindi/india-37658988 16/11/2016
8) https://www.mea.gov.in/Portal/ForeignRelation/BIMSTEC_Brief_February_2014.pdf
9) बिम्स्टेक ,लोकसत्ता टीम | June 17, 2019 12:05 am
10) https://www.iora.int/en
11)https://www.mea.gov.in/in-focus articlehi.htm?24315/India+and+SAARC+Interlinked+Dreams
12) http://www.aidiaasia.org/page/south-asia-in-post-covid-world-order
13) http://www.gshindi.com
14) https://www.bbc.com/hindi/india-48538924 07/06/2019
15)https://economictimes.indiatimes.com/news/politics-and-nation/saarc-has-problems-bimstec-full-of-energy-says-jaishankar/articleshow/69684367.cms 07/06/2019
16)https://www.bbc.com/hindi/international/2014/11/141125_saarc_china_interest_pk 26/11/2014

# समकालीन भारत—पाक संबंध
# (विशेष संदर्भ : जम्मू—काश्मीर)

**डॉ. संदीप बी. काळे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, यशवंत महाविद्यालय, सेलू जि. वर्धा*
*Email : sandipkale02@gmail-com Mob- 9763359466*

समकालीन भारत—पाक यांच्यातील संबंध अत्यंत संघर्षपूर्ण राहिले आहेत. मूलत: स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच भारत आणि पाकिस्तान या राष्ट्रांदरम्यान काश्मीर प्रश्न हा वादग्रस्त मुद्दा राहिला आहे. काश्मीर प्रश्नावर या दोन राष्ट्रांदरम्यान १९४७ चे भारत—पाकिस्तान युध्द, १९६५ चे भारत—पाकिस्तान युध्द आणि १९९९ चे कारगिल युध्द अशी तीन मोठी युध्दे झाली. काश्मीरमध्ये दहशतवाद आणि फुटीरतवाद सक्रीय करण्यामध्ये पाकिस्तानचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. १९८० च्या दशकापासून यामध्ये वाढ झाली आहे. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे CRPF जवानांवर झालेला दहशतवादी हल्ला मागील २० वर्षातील सर्वात मोठा हल्ला आहे. याचे प्रत्युत्तर भारतीय वायुसेनेने पाकिस्तानमध्ये जैश—ए—महंम्मदच्या बालकोट येथील स्थळावर हल्ला करुन दिले. यानंतर भारत—पाकिस्तानमध्ये हल्ले—प्रतिहल्ले सत्र चालले. यामुळे लष्करी कारवायांमध्ये वाढ होण्याची भीती निर्माण झाली. या संघटनेच्या अनुषंगाने दहशतवादाचा प्रश्न, काश्मीर प्रश्न आणि भारत—पाक संबंध हे समकालीन चिंतनाचे मुद्दे ठरत आहेत.

जम्मू—काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील CRPF गटावर १४ फेब्रुवारी रोजी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात ४० जवानांचा मृत्यू झाला. हा हल्ला आत्मघातकी हल्लेखोराने कारमधून स्फोटके आणून घडवला. प्रस्तुत हल्ल्याचे ठिकाण पुलवामा जिल्ह्यातील लेथपोरा हे आहे, ते अवंतीपूर या राष्ट्रीय महामार्ग १ (अ) नजीकच्या शहराजवळ आहे. जैश—ए—मोहम्मद या दहशतवादी गटाने हा हल्ला केल्याचा दावा केला. आदिल अहमददार याने कारमधून स्फोटके आणली होती. १५ फेब्रुवारी २०१९ रोजी भारताने पाकिस्तानला दिलेला विशेष प्राधान्य देश MFN (Most Fovoured Nation) चा दर्जा काढून घेतला. जम्मू—काश्मीर राज्यशासनाने १७ फेब्रुवारी २०१९ रोजी राज्यातील ५ फुटीरवादी नेत्यांना दिलेले संरक्षण व शासकीय सुविधा काढून घेतल्या. १७ फेब्रुवारी २०१९ रोजी म्युनिक परिषद (जर्मनी) येथे भारताने पुलवामा दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर आणि संभाव्य हल्ल्याचा प्रतिरोध म्हणून भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानातील बालाकोट (खैबर पख्तुना) येथील जैश—ए—मोहम्मद या गटाच्या कॅम्पवर हल्ला केला. या हवाई हल्ल्यासाठी भारताने १२ मिराज २०००H या लढाऊ विमानांचा अवलंब केला. या हल्ल्यात जैश—ए—मोहम्मदचा कॅम्प उध्वस्त केला, हा हवाई हल्ला 'गुप्तहेर माहिती आधारित कार्यवाही' व 'बिगरलष्करी स्वरुपाची प्रतिबंधात्मक कृती' या प्रकारचा असल्याचे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले. भारताने बालाकोटवर केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान हवाई दलाने काश्मीरच्या नियंत्रण रेषेजवळून हवाई हल्ला केला. भारत आणि पाकिस्तानच्या हवाई हल्ला—प्रतिहल्ला दरम्यान दोन्ही देशांचे एक एक लढाऊ विमान कोसळले. यात भारताचे MIG—२१ लढाऊ विमान व पायलट विंग

कमांडर अभिनंदन वर्धमान पाकिस्तानच्या ताब्यात राहिले. १ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना भारतात सुखरुप पाठविले होते.

पुलवामा हल्ल्यानंतर प्रतिसाद म्हणून भारतापुढे अनेक पर्याय होते. पाकिस्तानातील भारतीय राजदूतांना माघारी बोलावून पाकिस्तानसोबतचे राजनयिक संबंध कमी करणे किंवा तोडणे, विशेष प्राधान्य देशाचा दर्जा काढून घेणे, क्रीडाविषयक संबंध मोडणे, व्हिसाबंदी अवलंबणे, नियंत्रण रेषेलगतचा व्यापार बंद करणे, समझौता एक्सप्रेस थांबविणे, दिल्ली व लाहोर बससेवा थांबविणे, कर्तारपूरसंबंधी व इतर सर्व बैठका रद्द करणे असे अनेक पर्याय भारताकडे होते. भारताने यामधील काही पर्याय तात्काळ अवलंबिले. पुलवामा हल्ल्यांसाठी पाकपुरस्कृत दहशतवादाला जशास तसे प्रत्युत्तर देण्याबाबत भारतीय शासनातील उच्चपदस्थ अधिकारी सैनिक दल, परराष्ट्र मत्रांलय यांच्यामध्ये एकमत झाले. हे प्रत्युत्तर लष्करीदृष्ट्या फायद्याचे व पाकपुरस्कृत दहशतवाद्यांचे पुरेसे नुकसान होईल इथपर्यंत असायला हवे असे त्यांचे मत होते. केंद्रशासनाने यासाठी भारताच्या सैनिक दलांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. भारताच्या सैनिक कारवाईसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वातावरण अनुकूल करण्याची जबाबदारी परराष्ट्र मंत्रालयाची होती. अमेरिकेचे भारतातील राजदूत केनेथ जस्टर यांनी पुलवामा हल्ल्यानंतर तत्काळ हल्ल्याचा निषेध करणारी प्रतिक्रिया व्यक्त केली. भारतीय शासनाने देशातील सर्व राजदूतांना किंवा त्यांच्या परराष्ट्र मंत्रालयांना या घटनेविषयी प्रतिक्रिया व्यक्त करण्यासंबंधी अपेक्षा व्यत केली. भारताचे परराष्ट्र सचिव यांनी यानंतरचे काही दिवस आंतरराष्ट्रीय सतरावर या घटनेविरोधात वातावरण निर्मितीसाठी क्रियाशीलता दाखवली. पाकिस्तानचे भारतातील उच्चायुक्त सोहेल महमूद यांना समन्स पाठविणे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेतील (P–५) राष्ट्रांच्या राजदूतांना भेटणे तसेच दक्षिण आशियातील शेजारील राष्ट्रातील उच्चपदस्थ G–२० समूहातील अनेक राष्ट्रातील उच्चपदस्थ यांना भेटणे ही कामगिरी त्यांनी बजाविली. P–५ राष्ट्रे, शेजारील दक्षिण आशियाई देश, याविषयी तुर्की, सौदी अरेबिया, युनायटेड अरब अमिराती व इराण या देशांनी पुलवामा हल्ल्याचा निषेध केला. १२ दिवसात १० पेक्षा अधिक देशांनी पुलवामा हल्ल्याचा निषेध व्यक्त करणारी प्रतिक्रिया दिली.

संयुक्त राष्ट्रसंघटनेने या हल्ल्याचा निषेध नोंदवताना 'जम्मू–काश्मीरमधील हल्ला' अशा शब्दांऐवजी 'भारतीय सुरक्षा कर्मचाऱ्यांवरील हल्ला' असा शब्दप्रयोग केला. संयुक्त राष्ट्र संघटनेने पहिल्यांदाच असा उल्लेख केला आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना काश्मीरला 'वादग्रस्त' प्रदेश मानते. चीनने सुध्दा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या या निर्बंधाच्या विधानावर स्वाक्षरी केली. ही भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाची बाब आहे. कारण जैश–ए–मोहम्मद या संघटनेच्या तसेच मसूद अझरला दहशतवादी घोषित करण्याच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ठरावाला मागील १० वर्षापासून चीनकडून अडथळा आणला जात आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार लॉन बोल्टन यांनी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी केलेल्या चर्चेत भारताच्या सीमापार दहशतवादविरोधी अधिकाराला पाठिंबा दिला. ही एकप्रकारे स्वसंरक्षणार्थ भारताकडून सैनिकी कारवाईद्वारे प्रत्युत्तर देण्याला दिलेली मान्यता होती. भारताने पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी हवाई हल्ल्याचा मार्ग अवलंबण्याचे ठरविले. हल्ल्याचे स्थळ अचूकरित्या निश्चित करणे, पाकिस्तानचे नागरी किंवा सैनिकी नुकसान न करता दहशतवाद्यांच्या तळावर अचूक हल्ला करणे आवश्यक होते. गुप्तहेर माहितीचा व स्थळ निश्चितीसाठी तंत्रज्ञानाचा अभिनव वापर करण्यात आला. भारताने पाकिस्तानच्या खैबर पख्तुना प्रांतातील बालाकोट येथील जैश–ए–मोहम्मदच्या सर्वात मोठ्या कॅम्पवर २५ फेब्रुवारी २०१९ रोजी हवाई हल्ला केला. या एअरस्ट्राईकची माहिती प्रसारमाध्यमांना देण्याचे काम

सुरक्षा दलाच्या प्रतिनिधींऐवजी परराष्ट्रसचिवांनी केले. हा हवाई हल्ला सैनिकी कारवाई नसून 'असैनिकी दहशतवाद प्रतिबंधात्मक कृती' होती हे यामधून सुचित केले. बालाकोट एअरस्ट्राईकनंतर दुसऱ्या दिवशी भारत आणि पाकिस्तानच्या दलांमध्ये हल्ले प्रतिहल्ले झाले. त्यामध्ये भारताचे पायलट पाकिस्तानी सैनिकाच्या ताब्यात अडकले. भारताचे पायलट विंग कमांडर अभिनंदन यांना परत भारतात पाठविण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरुन दबाव आणण्यात आला. अबुधाबी येथे झालेल्या इस्लामिक सहकार्य संघटनेच्या बैठकीत पाकिस्तानचा विरोध झुगारुन भारताला आमंत्रण मिळाले. या मंचावर भारताने आपली भूमिका ठोसपणे मांडली. बालाकोट एअरस्ट्राईकनंतर फ्रान्स, इग्लंड व अमेरिका या देशांनी संयुक्त राष्ट्रापुढे मसूद अझरला दहशतवादी घोषित करण्याचा ठराव मांडण्याचे ठरविले आहे. अशाप्रकारे भारताने बालाकोट एअरस्ट्राईकद्वारे पाकिस्तानला प्रत्युत्तर दिल्यानंतर सुध्दा आंतरराष्ट्रीय समुदाय भारताच्या समर्थनार्थ उभा राहिला.

भारताने पाकिस्तानला बालाकोट हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्याचे निश्चित केल्यावर भारतापुढे सैनिकी हल्ल्यासाठी विशेष दलाद्वारे सर्जिकल स्ट्राईक, लष्करी हल्ला किंवा एअर स्ट्राईक असे तीन पर्याय होते. उरी हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राईकचा मार्ग अवलंबल्यामुळे तो पर्याय पाकिस्तानसाठी आकस्मिक धक्का देईल असा नव्हता. लष्करी हल्ला दीर्घकाळ चालणारा मार्ग होता. त्यामुळे जलदरित्या प्रत्युत्तर देण्याचा प्रभावी मार्ग म्हणून एअरस्ट्राईकचा निर्णय झाला. वास्तविकत: सीमेलगतच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारताने 'आक्रमक सुरक्षा' या रणनीतीवर भर देण्यास सुरुवात केली आहे. याचा पहिला प्रत्यय उरी हल्यानंतरच्या सर्जिकल स्ट्राईकद्वारे आला. पंतप्रधान नरेंद मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी या रणनीतीवर भर दिला आहे. या रणनीतीनुसार सीमेलगत होणाऱ्या पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला प्रतिसाद म्हणून सैनिकी कारवायांमध्ये वाढ करण्याचे धोरण अवलंबले आहे. यामध्ये नियंत्रण रेषेपलीकडेही सैनिकी कारवाई करण्याचा समावेश आहे. बालाकोट एअरस्ट्राईकद्वारे भारताने १९७१ नंतर प्रथमच पाकव्याप्त काश्मीरपलीकडे जाऊन व पाकिस्तानच्या मुख्य भूमीवर हल्ला केला आहे. त्यामुळे हा हल्ला भारताचे प्रभावी स्थान अधोरेखित करणारा ठरला आहे. दहशतवादी कारवायांचे प्रत्युत्तर भारत पाकिस्तानच्या भूमीमध्ये हल्ला करुन देऊ शकतो ही सामरिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका भारताने सिध्द केली आहे. आपण अण्वस्त्रधारी देश असल्यामुळे भारत युध्दाच्या भीतीने आपल्यावर सैनिकी हल्ल्याचा मार्ग अवलंबू शकत नाही. अशी समज बाळगणाऱ्या पाकिस्तानच्या अडेलतट्टूपणावर भारताने बालाकोट एअरस्ट्राईकद्वारे मर्यादा आणली. पाकिस्तानची आर्थिक दु:स्थिती, परावलंबित्व यामुळे पाकिस्तान सैनिकी कारवाई वाढविण्याचा किंवा युध्दाचा मार्ग अवलंबू शकत नाही ही गोष्ट भारतीय नेतृत्त्वाने मुत्सद्दीपणे हेरली. भारताच्या या आक्रमक प्रतिसादामुळे पाकिस्तानातील प्रस्थापितांमध्ये काही प्रमाणात धाक निर्माण झाला आहे. पाकिस्तानमध्ये बालाकोट येथे भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानच्या हवाई दलाने काश्मीरमध्ये हल्ले केले. भारताने आमच्या भूमीवर हवाई हल्ला केल्यास आम्हीही हवाई हल्ला करण्यासाठी सज्ज आहोत हे दाखवून देणे हा यामागचा हेतू असल्याचे पाकिस्तानी लष्कर अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी भारताला शांततेसाठी चर्चेचे आवाहन केले. युध्द करणे दोन्ही देशांच्या हितासाठी घातक आहे याचा त्यांनीउच्चार केला. भारताचे पायलट अभिनंदन वर्धमान यांना भारतात परत पाठविण्याचा पाकिस्तानने घेतलेला निर्णय हे पाकिस्तानच्या प्रदेशातील शांततेचे पाऊल असल्याचे पाकिस्तानी नेतृत्त्वाने दर्शविले आहे.

जम्मू–काश्मीरमधील दहशतवादी कारवायांसाठी विविध गटांना पाकिस्तानी लष्कराचा पाठिंबा राहिला आहे. पुलवामा हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तानमधील संघर्षमय परिस्थितीत दोन्ही देशातील नागरी समाजाने शांततेसाठी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. पाकिस्तानमधील दहशतवादी गटांविषयी लोकांमध्ये असलेला संयम कमी होत चालला आहे. पाकिस्तानच्या माहिती अधिकारांनी स्पष्ट केले ही, देशातील अतिरेकी गटांवर शासनाद्वारे कारवाई केली जाईल. पाकिस्तानने मागील वर्षी कर्तारपूर कॉरिडॉरसारख्या उपक्रमांसाठी पुढाकार घेऊन भारताशी पुन्हा सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी आर्थिकदृष्ट्या समृध्द असा 'नया पाकिस्तान' निर्मितीचे ध्येय देशापुढे ठेवले आहे. यामध्ये पाकिस्तानला भ्रष्टाचार अतिरेकी आर्थिक आपत्ती यापासून मुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. आर्थिक विकासासाठी पाकिस्तान चीन, सौदी अरेबिया, अमेरिका व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यावर अवलंबून आहे. त्यामुळे देशांतर्गत शांतता प्रस्थापित करणे हे पाकिस्तानसाठी देशहिताचे आहे. आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय मदत मिळविण्यासाठी, परराष्ट्रीय गुंतवणूकीसाठी पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिमा चांगली ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी पाकिस्तानला आपल्या भूमीचा दहशतवादासाठी वापर करणाऱ्या गटांबद्दल कठोर भूमिकेचा स्वीकार करावा लागेल. पुलवामा अतिरेकी हल्ल्यामुळे काश्मीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काश्मीरमध्ये मागील चार वर्षात सुरक्षा दलांवर पठाणकोट, उरी व पुलवामा येथे तीन मोठे दशहतवादी हल्ले झाले आहेत. पुलवामा हल्ल्यात काश्मीरमधील स्थानिक तरुणानेच आत्मघाती हल्लेखोराचे काम केले आहे. यावरुन काश्मिरी तरुणांमध्ये मुलतत्ववादाची वाढ होण्याची प्रक्रिया सक्रीय असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारताने जम्मू–काश्मीरमधील परिस्थिती सुधारण्यासाठी राजकीय जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडणे आवश्यक आहे. काश्मीरमधील लोकांची अलगतेची भावना कमी करण्यासाठी शासनाने त्यांच्या समस्या निराकरणाला प्राधान्य द्यावे. पर्यटन, शिक्षण, औद्योगिक विकास यास चालना दिल्यास जम्म–काश्मीर प्रदेश उर्वरित भारताशी एकरुप होण्यास मदत होईल. जम्मू–काश्मीरमधील प्रादेशिक पक्ष, संघटना यांच्याशी केंद्रशासनाचा सतत संवाद चालू असणे आवश्यक आहे.

**मूल्यमापन :**

भारत–पाकिस्तानच्या संबंधाना उरीच्या हल्ल्यानंतर वेगळे वळण लागले. उभय देशांदरम्यान चर्चेचे सर्व पर्यायबंद होऊन संबंध अतिशय संवेदनशील बनले आहेत. पाकिस्तानने या हल्ल्याबाबत आपला संबंध नाही असे दर्शवून हात झटकले. असे असले तरी आंतरराष्ट्रीय पातळीवरुन भारतास मिळणाऱ्या सहकार्यावरुन हे सहज लक्षात येते की, पाकिस्तान हा खऱ्या अर्थाने दहशतवादाला खतपाणी घालतो आहे. पाकिस्तानने हे कृत्य २००२ मधील कराराला बगल देणारे आहे. (यामध्ये पाकिस्तान दहशतवाद्यांना आपली जमीन कारवायांसाठी वापरु देणार नाही, अशी भूमिका घेण्यात आली होती) पाकिस्तानच्या आडमूठ्या भूमिकेमुळेच पाकिस्तानशी एकाएकी युध्द करणे भारतास उपयोगी नाही. १९६५ आणि १९७१ मध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तान लष्करास युध्दात हार पत्करावी लागली होती, हे जरी खरे असले तरी सध्या परिस्थिती बदलली असून पाकिस्तान हा आण्विक सज्ज सर्वात मोठे मुस्लिम राष्ट्र आहे, हे विसरुन चालणार नाही. त्यामुळे पाकिस्तानबाबतचे दहशतवादाचे पुरावे आंतरराष्ट्रीय पटलावर ठेवून दबाव निर्माण करणे हे जास्त संयुक्तिक ठरेल. तसेच कोणत्याही देशावर एकाएकी आक्रमण करता येत नाही, याचे कारण 'पवित्र सिध्दांत'. जसा की, कोल्ड स्टार्ट हा भारताचा डॉक्ट्रीन आहे,

ज्यामध्ये भारत स्वत:हून पहिला हल्ला करणार नाही, असे म्हटले आहे. तसेच लष्कराचा मोठा हिस्सा नष्ट झाल्यानंतर अणुबॉम्बचा प्रयोग केला जाईल, असे पाकिस्तानच्या डॉक्ट्रीनमध्ये म्हटले आहे.

भारताने बालाकोट एअरस्ट्राईकद्वारे आपल्या स्वसंरक्षणाचा अधिकार निर्धारपूर्वक सिध्द केला आहे. देशाची सुरक्षा, सार्वभौमत्व व सीमापार देहशतवाद याविरोधात भारताकडून आक्रमक भूमिका घेतली जाईल, हे भारताने स्पष्ट केले आहे. भारताने या लष्करी आक्रमकतेला राजनयाची सुध्दा जोड दिली आहे. संयुक्त राष्ट्र संघटना, इस्लामिक सहकार्य संघटना, अमेरिका यांच्या दबावाद्वारे तसेच पाकिस्तानचा विशेष प्राधान्य देशाचा दर्जा काढून घेऊन भारताने पाकिस्तानला राज्यपुरस्कृत दहशतवाद आटोक्यात ठेवण्यासाठी बंधने आणली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर भारताने मुत्सद्देगिरीने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले स्थान उंचावत पाकिस्तानची कोंडी केली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी सामना करताना भारताने काश्मिरी जनतेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. देशांतर्गत शांतता व एकात्मतेसाठी भारताने शांततामय मार्गाचा अवलंब केला पाहिजे. पुलवामा हल्यानंतर काश्मिरी तरुणांवर झालेले हल्ले, तसेच बालाकोट एअरस्ट्राईकनंतर प्रसार माध्यमांनी रंगवलेली युध्दाची अतिरंजकता, समाज माध्यमांवरील आत्यंतिक राष्ट्रवादाने फोफावणारा युध्दज्वर या गोष्टी भारताच्या एकात्मतेसाठी हानिकारक आहेत. भारत–पाकिस्तानमध्ये शांततेसाठी सकारात्मक राजकीय पावले उचलली जातात त्यावेळेस सीमांवर दहशतवादी कारवायांवर वाढ होते हा नेहमीचा अनुभव आहे. सद्या पाकिस्तानमध्ये स्थिर शासन अस्तित्वात आहे. पाकिस्तानमध्ये लोकशाहीची वाढ होणे हे भारताच्या हिताचे आहे. भारताची पाकपुरस्कृत दहशतवादविरोधात असणारी रणनीती ही व्यापक असून यामध्ये शासन, राजकीय पक्ष, सुरक्षा यंत्रणा, नागरी समाज व प्रसार माध्यमे या सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

*देवळणकर, शैलेंद्र (२०१८). मोदीकालीन परराष्ट्र धोरण. पुणे : सकाळ प्रकाशन.*
*सकाळ ईअर बुक (२०२०). पुणे : सकाळ प्रकाशन.*
*सकाळ ईअर बुक (२०२१). पुणे : सकाळ प्रकाशन.*
*www.http://cledrias-com/inida-pakishtan/*
*www.http://gpjournal-com*
*www.http://efas.org*
*www.http://civilserviceindia.com*
*www.http://idsexpress.net*
*www.http://c:/users/hp/downloads/india&pakistan-relation.pdf*
*"pulwama attack" India will 'completely isolate' Pakistan, BBC News, 15 February-2019*

# भारत-नेपाळ संबंधांचा राजकीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास

**डॉ. संजय काशिनाथ पाटील**
*सहाय्यक प्राध्यापक, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा, जि. जळगाव*
*Email- sanjaykpatil79@gmail.com*

आज जगातील सर्व राष्ट्रे एकमेकांपासून भौगोलिक अंतरावर असूनही आधुनिक संप्रेषणच्या साधनांमुळे एकमेकांजवळ आली आहेत. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राशी संबंध ठेवून आपले राष्ट्रीय हित साधत आहे. फेलिक्स निग्रोच्या मते, "एखाद्या राज्याशी संबंध प्रस्थापित करून तयार केलेला निर्णय म्हणजे परराष्ट्र धोरण होय." यावरून प्रत्येक देश दुसऱ्या देशाशी जे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करतो तो परराष्ट्र धोरणाचा एक भाग असतो. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक संघटना अस्तित्वात आल्या. सामूहिकरित्या राष्ट्रहिताची जपणूक करण्यासाठी, राष्ट्राचा आर्थिक,सांस्कृतिक,सामाजिक व राजकीय क्षेत्रात विकास करण्यासाठी, परस्पर सहकार्य मिळवण्यासाठी प्रादेशिक संघटनांचा उदय झाला. आज जगात सार्क,आसियान,अरब लीग, युरोपियन युनियन यासारख्या संघटना स्थापन झाल्या आहेत.

भारत हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये परस्पर सहकार्य व व्यापारासाठी दि. 8 डिसेंबर 1985 रोजी दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना- सार्क ही दक्षिण आशियातील आठ देशांची आर्थिक व राजकीय संघटना अस्तित्वात आली. सद्यस्थितीत भारत ,पाकिस्तान बांगलादेश, नेपाळ, मालदीव, भूतान, अफगाणिस्तान हे आठ देश या संघटनेचे सदस्य राष्ट्र आहेत. यापैकी नेपाळ हा भारत व चीन या दोन देशांत दरम्यान "बफर स्टेट" असल्याने भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण देश आहे, म्हणून "भारत-नेपाळ संबंधांचा राजकीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास" या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## उद्दिष्टे

1. भारत-नेपाळ संबंधांचा दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीने महत्त्व जाणून घेणे.
2. भारत नेपाळ मधील आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील सहकार्याचा अभ्यास करणे.

## गृहितके

1. नेपाळ हे भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे राष्ट्र आहे.
2. नेपाळच्या लोककल्याणासाठी भारताची भरीव मदत झाल्याने त्या देशाची प्रगती झाली आहे.
3. भारत-नेपाळ संबंधात चीनचा हस्तक्षेप हे भारताच्या दृष्टीने मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध, भारत-नेपाळ संबंध, सार्क शिखर परिषदेचे अहवाल, वर्तमानपत्रे यासंबंधीचे दस्तावेज तसेच प्रकाशित साहित्य या दुय्यम स्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**भारत-नेपाळ संबंधाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

नेपाळ हा भारतीय उपखंडातील एक भाग आणि भारताचा एक महत्त्वपूर्ण शेजारी देश आहे. हा देश भारताच्या उत्तरी सीमेस लागून आहे. भारताची अठराशे किलोमीटरची सीमा नेपाळ ला लागून आहे. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या नेपाळची उत्तर सीमा तिबेटला लागून आहे तर त्याच्या पूर्व,पश्चिम आणि दक्षिण सीमा या भारताला लागून आहेत, नेपाळमधील 80 टक्के लोक हिंदूधर्मीय आहेत. जगातील सर्वाधिक हिंदू लोकसंख्येचे प्रमाण या देशात आहे. 1768 मध्ये पृथ्वी नारायण शाह यांनी काठमांडू जिंकून एकात्मिक साम्राज्याचा पाया घातला. तद्नंतर नेपाळमध्ये राजेशाही व्यवस्था अस्तित्वात आली. 2006 मध्ये भारताच्या मध्यस्थीने राजेशाहीच्या जागी लोकशाही व्यवस्था स्वीकारण्यात आली.

नेपाळ या देशाशी प्राचीन काळापासून सुरू असलेल्या भौगोलिक,ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंधांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात नेपाळला विशेष महत्त्व आहे. भारत आणि नेपाळ मध्ये हिंदू आणि बौद्ध धर्माच्या संदर्भात समान संबंध आहेत. विशेष म्हणजे बुद्धांचे जन्मस्थान लुंबिनी हे नेपाळमध्ये आहे तर त्यांचे निर्माण स्थान कुशीनगर हे भारतात आहे. यातून भारताचे नेपाळशी सांस्कृतिक व धार्मिक संबंध जोडले गेले. 1950 मध्ये "भारत- नेपाळ शांती व मित्रता संधी" हा या दोन्ही देशातील संबंधांचा प्रमुख आधार आहे. या करारातून दोन्ही देशातील मुक्त संबंधाला चालना मिळाली असून नेपाळला भारताकडून शस्त्र खरेदी करण्याची सुविधादेखील प्राप्त झाली आहे.

**भारताच्या दृष्टीने नेपाळचे महत्व**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर त्यांच्या परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या परदेश दौऱ्यात नेपाळचा ही दौरा होता. तत्पूर्वी 1997 मध्ये नेपाळ सोबत भारताने विविध विषयांवर चर्चा केली होती.तत्कालीन सरकारने नेपाळशी नेपाळची अनेक महत्त्वपूर्ण करार केले होते.कृषी रेल्वे संबंधीचे करार, अंतर्देशीय जलद मार्ग विकास यासारख्या करारांवर सहमती दर्शविण्यात आली. बिहार मधील रक्सौल आणि काठमांडू दरम्यान जनसंपर्कासाठी आणि मालाची मोठ्या प्रमाणात वाहतूक करण्यासाठी रेल्वे मार्गाचा समावेश होता. अलीकडील काळात मोतिहारी ते नेपाळ मधील अमलेखगंज पर्यंत खनिज तेल पाईपलाईन करण्यास दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. नेपाळचा दक्षिण भाग भारताच्या उत्तर सीमेला लागून त्यामुळे भारत-नेपाळ दरम्यान रोटीबेटी नातेसंबंध निर्माण झाले आहेत.बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशची नेपाळमधील मुधेशी समुदायाचा सांस्कृतिक आणि वांशिक संबंध आहे.दोन्ही देशांच्या सीमा वाहतुकीवर कधीही कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही. सामाजिक आणि आर्थिक व्यवहार कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू आहेत. भारत नेपाळ सीमा खुली असून वाहतुकीसाठी पासपोर्ट किंवा व्हिसा लागत नाही. यातून भारत-नेपाळ संबंधांची जवळीक दिसून येते.

**नेपाळ विकासात भारताचे योगदान**

नेपाळच्या सामाजिक ,आर्थिक, राजकीय वा सांस्कृतिक विकासासाठी भारताने नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे.

- **व्यापार व अर्थव्यवस्था**

भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापारी भागीदारी असलेला तसेच परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत महत्त्वाचा देश आहे. इतर देशांसोबत व्यापार करण्यासाठी भारत नेपाळला पारगमन सुविधा

पुरवीत असतो. नेपाळला आपल्या व्यापारासाठी कोलकत्ता बंदर वापरण्याची परवानगी दिली आहे. भारतीय कंपन्या नेपाळमध्ये विविध कार्यांशी संलग्नित आहेत. नेपाळमधील मॅन्युफॅक्चरिंग, पावर, टुरिझम आणि सेवा क्षेत्रात भारतीय कंपन्यांचे अस्तित्व दिसून येते. वर्ल्ड फोकस च्या अहवालानुसार "नेपाळच्या जागतिक व्यापारातील दोन तृतीयांश हिस्सा भारताचा आहे आणि दुसरे म्हणजे नेपाळची 90 टक्के आयात निर्यात देखील भारता कडूनच आहे"

- **शिक्षणक्षेत्रात प्राधान्य**

भारत हा नेपाळला शिक्षण क्षेत्रात देखील सहकार्य करीत आहे. नेपाळी विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी भारत सरकार जवळपास तीन हजार जागा उच्च शिक्षणासाठी उपलब्ध करुन दिल्या जातात,त्यात आयआयटी सारख्या उच्च शिक्षणाचा देखील समावेश आहे.

- **संरक्षण सहकार्य**

द्विपक्षीय संरक्षण सहकार्य मध्ये शस्त्रास्त्र आणि प्रशिक्षणाद्वारे नेपाळ सैन्याच्या आधुनिकीकरणाचा समावेश आहे. भारतीय लष्कराच्या गुरखा रेजिमेंट मध्ये नेपाळच्या डोंगराळ भागातील तरुणांनाही भरती केली जाते. 2011 पासून भारत दरवर्षी नेपाळ सोबत "सूर्यकिरण" या नावाने संयुक्त सैन्य सराव करीत असतो.

- **आपत्ती व्यवस्थापन**

नेपाळमध्ये अनेकदा भूकंप व दरड कोसळणे,हिमस्सखलन, ढगफुटी, पुर यासारख्या नैसर्गिक आपत्तीचा धोका असतो. नेपाळ भौगोलिक दृष्ट्या नैसर्गिक संवेदनशील प्रदेशात असल्याने इथे नेहमी नैसर्गिक आपत्ती निर्माण होत असते.अशा नैसर्गिक आपत्ती वेळी सर्वप्रथम भारतच नेपाळला मदत करीत असतो. कर्मचारी, तांत्रिक व आर्थिक स्वरूपाचे सहकार्य करण्यास भारत नेहमी आग्रेसर असतो.

थोडक्यात भारत नेपाळ मधील शिक्षण, आर्थिक विकास,नैसर्गिक आपत्ती,वीज, संरक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत असल्याने नेपाळच्या सर्वांगीण विकासाला मोठे योगदान मिळाले आहे.

**नेपाळमधील चीनचा वाढता हस्तक्षेप**

चीन हा लोकसंख्येच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा देश आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर अमेरिकेच्या विरुद्ध आर्थिक महासत्ता होण्याच्या लढाईत चीनने उडी घेतली आहे.अमेरिकेशी भारताचे असलेले मैत्रीपूर्ण संबंध लक्षात घेऊन चीन भारत विरोधी भूमिका घेण्यात अग्रेसर असताना दिसतो.

दक्षिण आशिया मध्ये चीनचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश या भारता शेजारील देशात यांचा हस्तक्षेप वाढलेला आहे. हे सर्व देश चीनच्या "बेल्ट रोड" प्रकल्पात सामील झाले आहेत मात्र भारत या प्रकल्पाच्या बाजूने नाही.

नेपाळ आपल्या बऱ्याच गोष्टींसाठी भारतावर अवलंबून आहे.मात्र सद्य परिस्थितीत चीनची मदत वाढवून भारतावरचे अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न नेपाळचे विद्यमान प्रधानमंत्री के. पी.ओली हे करीत आहेत. नेपाळमधील शाळांमध्ये चिनी भाषा मंदारीन देखील अनिवार्य केली आहे. नेपाळमध्ये ही भाषा शिकवणाऱ्या शिक्षकांचा पगार देण्यास चीन तयार आहे.यातून नेपाळशी सामाजिक संबंध वाढवण्याचा

प्रयत्न चीन करत आहे. नेपाळ चीन संबंधात 20 पैकी चार करार कायद्याची अंमलबजावणी संदर्भात आहे

१. सीमा व्यवस्थापन

२. सीमा संरक्षण साधनांचा पुरवठा

३.परस्पर कायदेशीर सहकार्य

४.नेपाळचे ॲटर्नी जनरल व चीनचे सुप्रीम पीपल्स प्रोक्यूरेटर्स यांच्यात सहकार्य

याशिवाय नेपाळने चीन विरोधी कार्य नेपाळच्या भूमीवर न करण्याबाबत परवानगी दिली आहे. नेपाळमध्ये माओवादी मोठ्या प्रमाणात आहेत त्यांचे संबंध भारतातील नक्षलवाद्यांशी आहेत.असे असताना देखील चीनची शस्त्रे नेपाळमधील माओवाद्यांमार्फत भारतातील नक्षलवाद्यांपर्यंत पोहोचवली जातात. चीन नेहमी नेपाळच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करून नेपाळला भारत विरोधी भूमिका घेण्यासाठी प्रवृत्त करीत असताना दिसतो. उदा.जगामध्ये मागील एक वर्षापासून कोरोना व्हायरस चा पहिला झालेला आहे. यातून प्रचंड मोठी मानवहानी होत आहे यासाठी सर्व जगाने कोरोनाव्हायरस च्या प्रसारासाठी चीनला जबाबदार धरले आहे.असे असताना देखील नेपाळने नेपाळमध्ये कोरोनाव्हायरस च्या प्रसारामध्ये भारताला जबाबदार धरले आहे. या गोष्टी मागे निश्चित पणाने "चिनी जादू" असलेली दिसून येते.

नेपाळ चीन संबंधांच्या सर्वच बाबी भारतासाठी विचारप्रवर्तक असे आहेत. नेपाळ चीन यांच्यातील वाढते संबंध भारत नेपाळच्या संबंधात तणाव निर्माण करीत आहेत.

**निष्कर्ष**

1. भारताचे नेपाळशी असलेले सामाजिक, सांस्कृतिक संबंध हे भारत व नेपाळमधील विवाद कमी करण्यासाठी उपयुक्त ठरत असतात.
2. चीन पासून संरक्षणाच्या दृष्टीने नेपाळ हा भारतासाठी महत्त्वाचा देश आहे, त्यामुळे दोन्ही देशातील संबंध मैत्रीपूर्ण असणे गरजेचे आहे.
3. नेपाळच्या सामाजिक ,आर्थिक संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन,शिक्षण,जलविद्युत या विकासात भारताने भरीव मदत केली आहे.नेपाळच्या सर्वांगीण विकासात भारताचे मोठे योगदान आहे.
4. नेपाळच्या अंतर्गत राजकारणातील चीनचा वाढता हस्तक्षेप भारताच्या दृष्टीने घातक बाब आहे. यासाठी भारताने चीनचा हस्तक्षेप रोखण्यासाठी वेळीच उपाययोजना करायला हव्यात.

**संदर्भ**


1. *रायपूरकर,डॉ.वसंतः आंतरराष्ट्रीय संबंध,श्री मंगेश प्रकाशन, नागपूर*
2. *खन्ना, व्ही.एन.:आंतरराष्ट्रीय संबंध विकास पब्लिशिंग हाउस,नई दिल्ली,2011*
3. *देवळाणकर, डॉ. शैलेंद्रःभारतीय परराष्ट्र धोरण -सातत्य व स्थित्यंतरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे,2010*
4. *पंत, पुष्पेशः भारत की विदेश नीति, टाटा मेग्रा हिल्स पब्लिकेशन, नई दिल्ली,2010*
5. *World focus,Dec.2017*
6. *www.indiawrites.org*
7. *www,sansar editorial*
8. *www,drishtiias.com*

# भारत-मालदिव संबंधाचे विश्लेषण

**डॉ. संतोष संभाजी डाखरे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, राजे विश्वेश्वरराव कला-वाणिज्य महाविद्यालय*
*भामरागड जि.गडचिरोली, ईमेल- santoshdakhare15@gmail.com*

***सारांश***

*SAARC म्हणजे दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य परिषद. दक्षिण आशियातील देशांना परस्पर सहकार्य आणि एकत्रित व्यापाराची गरज जाणवू लागली. या जानीवेतून या प्रदेशात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने एखादी संघटना असावी असा विचार या देशांमध्ये वृद्धिंगत होऊ लागला. १९७० च्या दशकापासूनच बांगलादेश, भूतान, भारत, मालदिव, नेपाल, पाकिस्तान, श्रीलंका या देशांना एकत्रपणे व्यापार व सहकार हेतू एका संस्थेची गरज भासू लागली. ८ डिसेंबर १९८५ मध्ये दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन ढाका येथे या संघटनेची स्थापना केली. संघटनेतील सहभागी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा भारताचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. या समूहातील एक मोठा देश म्हणून सर्वांना सोबत घेऊन चालण्याची भारताची भूमिका राहिली आहे. तथापि बदलते राजकीय संदर्भ, आपआपसातील अहमहमिका, सीमावाद, आंतर्राष्ट्रीय व्यापार, समुहाबाहेरील अन्य बलाढ्य राष्ट्रांचे काही सदस्य राष्ट्रांवरील दडपण यासह इतर कारणांमुळे सार्कमध्ये सगळं काही आलबेल नसल्याचे चित्र आहे.*

*या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधपत्रात भारत आणि मालदिव यांच्या संबंधाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

***उद्देश***

*१) सार्क संघटनेच्या निर्मितीमागील कारणांचा आढावा घेणे.*
*२) मालदिवची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिति जाणून घेणे.*
*३) मालदिवच्या हिंद महासागरातील महत्वपूर्ण भूमिकेचा अभ्यास करणे.*
*४) भारत आणि मालदिव यांच्यातील संबंधांचा आढावा घेणे.*

***मुळशब्द***- *सार्क, भारत, मालदिव, हिंदमहासागर, आंतरराष्ट्रीय व्यापार*

## प्रस्तावना

ही संघटना सहजासहजी स्थापन झाली नाही, तर याकरिता या देशांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली आणि अशा चर्चेनंतर या संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली होती. या सर्व देशांनी त्या वेळी कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृतिकार्यक्रम राबविण्याचे ठरविले होते. या संघटनेच्या उभारणीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांची भूमिका महत्वपूर्ण होती. प्रारंभी भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. या संघटनेच्या अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास अमेरिका आणि चीन नंतर सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रित अर्थव्यवस्था ही जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील एकूण लोकसंख्येच्या २३ टक्के लोकसंख्या ही सार्क सदस्य

देशांची आहे. या समुहामध्ये भारत हा सर्वात मोठा देश आहे. सार्क समुहामध्ये चालणारा मुक्त व्यापार व परस्पर सहकार्य ही या संघटनेची जमेची बाजू आहे.

**मालदिवचा परिचय**

मालदिव हे हिंद महासागरामधे स्थित एक द्वीप राष्ट्र आहे. ज्याच्या सागरी सीमा भारत आणि श्रीलंका यांना लागून आहे. ईस्लाम हा अधिकृत धर्म असलेल्या या देशाला २६ जुलै १९६५ रोजी ब्रिटिशांपासून स्वतंत्रता प्राप्त झाली. २९८ वर्ग कि.मी. क्षेत्रफळ लाभलेल्या या देशाची लोकसंख्या ४२७७५६ आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या आधारावर मालदिव आशियामधील सर्वात छोटा देश आहे. समुद्रसपाटीपासून केवळ सात फूट उंचीवर हा देश वसला आहे. जागतिक हवामान बदलामुळे वाढत असलेला समुद्री जलस्तर या देशाच्या चिंतेत भर घालत आहे.

याबाबत जगाचे लक्ष वेधून घेण्याकरिता मालदिवने १७ ऑक्टोबर २००९ रोजी समुद्राच्या आत कॅबिनेट बैठक आयोजित केली होती. जी जगातील पहिली आंतरजलीय बैठक होती. या देशातील प्रारंभिक रहिवासी हे दक्षिणी भारत आणि श्रीलंकेतून मासेमारीच्या निमित्ताने आले असावे, अशी संभावना आहे. सम्राट अशोकाच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार मालदीवमध्ये झाला. तिथे अनेक वर्ष बौद्ध धर्म हा एक प्रमुख धर्म म्हणून अस्तित्वात होता. मालदीवच्या राजांनीही या धर्मास मान्यता व प्रोत्साहन दिले होते. या देशावर हिंदू राजांनी शासन केल्याचेही पुरावे उपलब्ध आहे. त्यानंतर मात्र हा देश मुस्लीम राष्ट्र बनत गेला.

प्राचीन काळी हा देश नारळ, टूना मासे, नारळाची दोरी व हस्तकलेच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होता. नव्वदच्या दशकानंतर मालदीवने उदारीकरणाचा मार्ग अवलंबिला आणि विदेशी गुंतवणुकीला प्राधान्य दिले. या देशाचा प्रमुख व्यवसाय हा पर्यटन आहे. जीडीपीच्या ३२ टक्के मिळकत ही पर्यटनामधून होत असते. मालदीवचा विकास, अर्थव्यवस्था, रोजगार हे सर्व पर्यटनावर अवलंबून आहे.

एकगृही ५० सदस्यीय संसद (मजलिस) अस्तित्वात असलेल्या मालदिवमध्ये अध्यक्षीय गणतंत्र प्रणाली आहे. ज्यामधे राष्ट्रपती शासन प्रमुख असून कॅबिनेटची नियुक्तीही तोच करतो. राष्ट्रपतीची निवड ही गुप्त मतदान प्रक्रियेद्वारे संसद सदस्याद्वारा पाच वर्षाकरिता केली जाते. २००४-०५ मध्ये राष्ट्रपती 'गयूम' यांच्याविरोधात मालदीव येथे हिंसक प्रदर्शने झालीत. त्यानंतर खऱ्या अर्थाने लोकशाही प्रक्रियेत सुधारणा घडून आल्या. २००८ मधे झालेल्या निवडणुकांमध्ये 'मोहम्मद नशीद' यांनी बाजी मारली. बहुपक्षीय लोकशाही पद्धतीतून निवडून आलेले ते पहिले राष्ट्रपती ठरलेत आणि राष्ट्रपती 'गयुम' यांच्या वादग्रस्त तीस वर्षाच्या शासन काळाला पूर्णविराम लागला.

**भारत-मालदिव संबंध**

मालदिव हा 'लक्षद्वीपपासून' केवळ सातशे कि.मी. अंतरावर असल्याने सामरिकदृष्ट्या भारतासाठी तो फार महत्त्वपूर्ण आहे. भारताचा ९५ टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार हिंद महासागरातूनच होत असतो. मालदीव समुद्री जहाजांचा महत्त्वपूर्ण मार्गावर स्थित आहे. हिंद महासागर परिसरात चाळीसच्या वर देशांचे अस्तित्व आहे. चीनने पूर्वीपासूनच या परिसरात आपले वर्चस्व निर्माण करण्याकरिता नौसैनिक

जहाजांची तैनाती केली आहे. मालदीवचे महत्त्व यामुळे आणखीनच अधोरेखित होते. भारत-मालदीवचे संबंध नेहमीच घनिष्ठ, सौहार्दपूर्ण आणि बहुआयामी राहिले असले तरी मालदीवमधील अलीकडील राजवटीतील अस्थिरतेला विशेषत: राजकीय आणि सामरिक क्षेत्रात काही मर्यादा आल्या आहेत.

हिंद महासागरातील मालदिवच्या स्थानामुळे आणि मोदी सरकारच्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणांतर्गत या देशाचे भारतासाठी धोरणात्मक महत्त्व आहे. मात्र मालदिवचे माजी अध्यक्ष अब्दुल्ला यामीन यांच्या चीन समर्थक भूमिकेमुळे दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. म्हणूनच, भारताच्या मुत्सद्दीपणाची खरी कसोटी आहे. अशा परिस्थितीमध्ये दोन्ही देशांचे संबंध कसे सुरळीत होऊ शकेल हे पाहणे गरजेचे आहे.

**मालदीवचे भू-सामरिक महत्त्व**

मालदीव हा सर्वात छोटा आशियाई देश असूनही, जगातील सर्वात भौगोलिकदृष्ट्या विखुरलेला देश आहे ज्यामध्ये उत्तर-दक्षिण दिशेने 960 किमी लांबीची सागरी किनारा आहे. जो की हिंद महासागराच्या मध्यभागी एकप्रकारे भिंतीचे कार्य करतो. आकारमानाने छोटा असला तरीही मालदिवचे सामरीक स्थानच या भागात महत्वपूर्ण भूमिका बजाविते.

मालदीव हा हिंद महासागरात टोल नाक्यासारखी भूमिका बजावित असतो. मालदिव दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील भागांवर स्थित दळणवळणाच्या दोन महत्वाच्या समुद्री मार्गावर स्थित आहे. हिंद महासागर हा जागतिक व्यापार आणि उर्जा प्रवाहासाठी महत्त्वाचा महामार्ग मानला जातो आणि याच मार्गावरील मालदिवचे स्थान प्रकर्षाने अधोरेखित होते. मालदीवला जागतिक समुद्री व्यापारासाठी व्यापक रणनीतिक महत्त्व आहे, भारताच्या बाह्य व्यापाराच्या जवळजवळ ५० टक्के आणि उर्जेच्या ८० टक्के आयात ही हिंद महासागरातूनच होत असल्याने भारतासाठी मालदिव किती महत्वपूर्ण आहे, हे यावरून सिद्ध होते.

**हिंद महासागरातील स्पर्धा**

अलिकडी काळात हिंद महासागरातील स्पर्धा तीव्र होत चालली आहे. महत्वपूर्ण अशा सागरी मार्गामुळे या भागातील भौगोलिक राजकीय स्पर्धा तीव्र झाली आहे. हे हेरून चीनने सुद्धा या भागात स्वारस्य घेण्यास सुरुवात केली आहे.

या भागातील सत्ता संतुलन साधने भारतासाठी महत्वपूर्ण आहे. यासोबतच मालदिवसोबत सौहार्दपूर्ण व सलोख्याचे संबंध कसे कायम राहतील हे सुद्धा बघणे गरजेचे आहे. भारताचा प्राधान्यक्रम हा शांति व स्थिरता असला तरीही या भागातील सुरक्षाही तेवढीच महत्वपूर्ण आहे. या सर्वामधे मालदिव हा भारतासाठी एक महत्त्वाचा भागीदार आहे.

**भारत आणि मालदीव दरम्यान सहकार्य**

मालदीवला जेव्हा-जेव्हा गरज भासली तेव्हा-तेव्हा भारताने मदत केली आहे. १९८८ मध्ये जेव्हा अध्यक्ष गयूम यांच्या विरोधात मालदिवमद्धे सशस्त्र भाडोत्री सैनिकांनी उठाव करण्याचा प्रयत्न केला तेव्हा भारताने ऑपरेशन कॅक्टस अंतर्गत नौसैनिक जहाज व लढाऊ विमाने पाठवून सहकार्य केले होते. दोन्ही देशात वेळोवेळी संयुक्त नौदल सराव आयोजित करण्यात येत असतो. यासोबतच मालदिवच्या समुद्री बेटाच्या सुरक्षिततेमध्ये भारत योगदान देत असतो.

त्सुनामी संकटातील भारताची मदत तर मालदिव कधीच विसरू शकत नाही. त्यावेळेस निर्माण झालेले पिण्याच्या पाण्याचे संकट भारताच्या सहकार्यामुळेच निस्तरले होते. मालदिवमद्धे कोरोंना संकट अगदी शिखरावर असताना भारताने मोलाची मदत केली होती. इतर शेजारी देशांपेक्षा सर्वाधिक मदत ही केवळ मलदीवलाच मिळाली. आताही मोठ्या प्रमाणात कोरोंना लसीचे वितरण भारताने या देशाला केले आहे.

भारताने राबविलेल्या उदार विसामुक्त धोरणामुळे मालदीव वासीयांना भारतात येणे सहज सोपे झाले आहे. मालदीवचे अनेक विद्यार्थी भारतातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेतात. भारतातील आरोग्य सेवेचा लाभ घेण्याकरताही अनेक रुग्ण भारतात येतात. मालदिव एक सुंदर पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असल्याने अनेक भारतीय पर्यटक दरवर्षी मालदीवला भेटी देत असतात. कित्येक भारतीय तिथे नोकरीही करीत आहेत.

**मालदिवचे कट्टरपंथाकडे मार्गक्रमण**

गेल्या दशकभरात ईसीस आणि पाकिस्तानस्थित जिहादी गट यासारख्या दहशतवादी गटांकडे आकर्षित झालेल्या मालदीव लोकांची संख्या वाढतच चालली आहे. हा देश आता कट्टरपंथाकडे मार्गक्रमण करत असल्याचे चित्र आहे. पश्चिम आशियातील बदलते राजकीय संदर्भ, देशातील राजकीय अस्थिरता, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील दहशतवादी घटना यांचा थेट परिणाम मालदीवर होत असताना दिसून येत आहे.

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना दुर्गम मालदीव बेटांचा वापर भारताविरुध्द्र दहशतवादी हल्ल्यांसाठी लॉन्च पॅड म्हणून करीत असल्याचे दिसून येत आहे. याचा थेट परिणाम भारत आणि मालदिव यांच्या हितसंबंधांवर होत आहे.

या देशातील राजकीय अस्थिरता भारतासाठी नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. २०१५ मध्ये दहशतवादाच्या आरोपावरून विरोधी पक्षनेते मोहम्मद नशिद यांना अटक करण्यात आली होती आणि त्यानंतरच्या तिथे निर्माण झालेल्या राजकीय संकटाने भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी परीक्षा घेतली होती.

**मालदिवमध्ये चीनचा प्रवेश**

मालदिव छोटा असला तरी हिंद महासागरातील त्याचे स्थान बघू जाता भारत आणि चीन या दोघांनाही मालदीव सोबत संबंध ठेवणे अपरिहार्य आहे. चीनने मालदिवला प्रचंड कर्ज दिले असून सोळा द्वीप लीजवर घेतले आहे. ते आपल्या जहाजांकरिता तसेच सैन्य गतीविधीकरिता विकसित केले आहे. तसेच चीनच्या सहकार्याने तिथे मोठ-मोठे प्रकल्प सुरू आहे. चिनचे हे सुरू असलेले निर्माण कार्य भारतासाठी सामरिकदृष्ट्या धोक्याचे ठरू शकते. कारण शेजारी देशांच्या माध्यमातून भारतावर अंकुश ठेवण्याची रणनीती चीन आखत आहे.

'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेच्यामते मालदीववर चीनचे १.३ अब्ज डॉलरचे कर्ज आहे. जे त्यांच्या जीडीपीच्या एक तृतीयांश आहे. या कर्जाचा मालदीववर प्रचंड दबाव असून ते जर फेडले नाही तर अनेक द्वीप चीनच्या घश्यात जाऊ शकते. श्रीलंकेतील 'हंबनटोटा' याचे जीवंत उदाहरण आहे. हे सत्य आहे की,

जिथे-जिथे चीन असेल तिथे-तिथे भारत मजबूत राहू शकत नाही. त्यामुळे भारताला वेगळी रणनीती आखण्याची गरज आहे.

**समारोप**

मालदीवच्या विकासात भारत एक प्रमुख भागीदार राहिला आहे. २००४ मधे आलेल्या महाभयंकर त्सुनामीने मालदीवची प्रचंड हानी झाली होती. त्यावेळेस मालदीवला मदत करणारा भारत हा पहिला देश होता. भारतीय स्टेट बँक मालदीवला आर्थिक विकासात सहाय्य करत असते. तसेच ताज ग्रुप ऑफ इंडिया, रेजीडेंसी समूह, टाटा हाऊसिंग डेव्हलपमेंट समूह तिथे कार्यरत आहे. शिक्षण, वैद्यकीय उपचार, मनोरंजन व व्यवसायाकरिता मालदीववाशी भारतात येत असतात. धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या दोन्ही देशात समानता असून तिथे पंचवीस हजाराच्या वर भारतीयांचे वास्तव्य आहे. असे असतांनाही डावपेचामधे भारत कुठेतरी कमी पडत असल्याचे चित्र आहे. सध्या मालदीव चीनच्या अधिक जवळ येत असून भारतासाठी हे धोक्याचे संकेत आहे.

**निष्कर्ष**

१) मालदिव हा हिंद महासागरातील एका महत्वपूर्ण अशा सागरी महामार्गावर स्थित आहे.
२) याच परिसरातून भारताचा सर्वात मोठा सागरी व्यापार होत असल्याने भारताला मालदीवसोबत सलोख्याचे संबंध ठेवणे अपरिहार्य असल्याचे दिसून येते.
३) मालदीवचे कट्टरवादाकडे होत असलेले मार्गक्रमण भारतासाठी चिंताजनक असल्याचे दिसून येते.
४) चीन मालदिवमद्धे करीत असलेल्या गुंतवणुकीमुळे भारत-मालदिव यांच्या हितसंबंधावर परिणाम होत आहे.

**संदर्भ**

*१) 'निवडक संविधाने आणि आंतरराष्ट्रीय संघटना', डॉ.श्रीराम येरणकर, प्रशांत प्रकाशन.*
*२) 'बिमस्टेक समिट-२०१८' (लेख), डॉ.शैलेन्द्र देवळानकर, अक्षरनामा.*
*३) 'India Maldives Relations', Dr.Laxminarayan Bussa, Avani Publication-2017*
*४) The Hindu,Newspaper,Dec.2020.*
*५) www.indiamaldivesrelations.com*

# सार्क आणि भारत
# (दक्षिण आशियाई विभागीय सहकार्य संघटना)
# (South Asian Association of Regional Cooperation)
# SAARC

**डॉ. एस.पी. वेल्हाळ**
*गोगटे – वाळके कॉलेज, बांदा ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग*
*मोबा. ९४२२५७६६८९ ईमेल आयडी: shankarvelhal2122@gmail.com*

**प्रस्तावना:**

सार्क ही आजच्या जगातील एक मोठी आंतरराष्ट्रीय संघटना आहे. १९७० च्या दशकातील काही अनुकूल घडामोडींमुळे दक्षिण आशियाई देशांची संघटना असावी हा विचार प्रबळ होत गेला. सर्व देशांना आपापसातील सहकार्य वाढवण्याची, आपापसातले मतभेद चर्चेने सोडवण्याची, व्यापार वाढवून अर्थव्यवस्था भक्कम करण्याची गरज भासू लागली. भारताबद्दलची भीती कमी होऊ लागली आणि त्याचवेळी जागतिक पातळीवरच्या संघटना फारसे प्रभावी काम करू शकत नाहीत याची जाणीव होऊ लागली होती. बांग्लादेशचे अध्यक्ष झिया उर रेहमान यांनी १९८० साली पुढाकार घेऊन विभागीय संघटना स्थापन करण्याचा विचार मांडला. त्यांनी सर्व संबंधीत देशांच्या नेत्यांशी संपर्क साधून त्यांच्यापर्यंत हा विचार पोचवला. सर्वांमध्ये चर्चा सुरू झाली आणि अंतिमतः सार्क ची स्थापना स्थापना झाली. बांग्लादेशची राजधानी ढाका येथे ७ आणि ८ डिसेंबर १९८५ रोजी सात दक्षिण आशियाई देशांच्या प्रमुखांची शिखर बैठक झाली. त्यामध्ये औपचारिक रित्या सार्कच्या स्थापनेला मंजूरी देण्यात आली. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, भूतान, श्रीलंका आणि मालदीव या सात संस्थापक सदस्य देशांनी सार्कची स्थापना केली. अफगाणिस्तान हा आठवा देश एप्रिल २००७ मध्ये दिल्ली झालेल्या १४व्या शिखर बैठकीत सार्कमध्ये सामील झाला.

जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी साधारण २५% लोक सार्क च्या सदस्य देशांमध्ये राहतात. याच भगत जगातील सर्वात अधिक काम करण्याच्या वयातील, म्हणजेच १५ ते ६० वर्षे वयातील लोकसंख्या आहे. मध्यमवर्गीय ग्राहक वर्ग इथे मोठ्या प्रमाणावर आहे. जगातील सर्वात गरीब आणि कुपोषणाचे बळी असलेले लोकही मोठ्या संख्येने इथे आहेत. इथल्या विकासावर एकूण जगाचा विकास अवलंबून आहे. हा प्रदेश निसर्गसंपन्न आहे. आर्थिक बाबतीत इथे लोकांमध्ये मोठी तफावत आहे. गरीब आणि श्रीमंतांमधील दरी मोठी आहे. सहारा वाळवंटाच्या दक्षिणेला असलेल्या गरीब आफ्रिकन देशांच्या नंतर गरिबीच्या बाबतीत सार्क देशांचा क्रमांक लागतो.

आजवर सार्कच्या १८ शिखर परिषदा झाल्या आहेत. २०१६ मध्ये १९ वी शिखर परिषद पाकिस्तान मध्ये होणार होती. परंतु त्याआधी काही दिवस भारतात काश्मीरमधील उरी येथे लष्करी तळावर हल्ला झाला. त्यामध्ये पाकिस्तानचा हात असल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर भारताने सार्कच्या शिखर परिषदेवर बहिष्कार टाकला. भारतापाठोपाठ बहुतेक सर्व सदस्य देशांनी परिषदेला उपस्थित न

राहण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानने परिषद पुढे ढकलली. परंतु आजपर्यंत ती परिषद होऊ शकलेली नाही.

## सार्कची उद्दिष्ट्ये आणि तत्वे

सार्क ही एक प्रादेशिक संघटना आहे. ती सदस्य देशांना प्रश्न मांडण्यासाठी एक मोठे व्यासपीठ पुरवते. ही संघटना सर्व देशांच्या पुढाकाराने निर्माण झाली आहे. कोणत्याही महासत्तेच्या किंवा बड्या राष्ट्राच्या पुढाकाराने आणि इच्छेने नाही. त्यामुळे या संघटनेमध्ये बड्या राष्ट्रांचा हस्तक्षेप नाही. प्रादेशिक एकात्मता साध्य करण्याच्या उद्देशाने सार्कची स्थापना झाली. शीत युद्धाच्या दरम्यान ही संघटना स्थापन झाली असली तरी अमेरिकेला किंवा सोव्हिएट यूनियनला विरोध करणे अथवा पाठिंबा देणे हा या संघटनेचा उद्देश नव्हता. भारत आणि पाकिस्तान या दोन सदस्य देशांमध्ये चर्चे दरम्यान बरेच वाद झाले तरीही ही संघटना अजून टिकून आहे. सामाजिक आणि आर्थिक विकास हे या संघटनेचे महत्वाचे उद्दीष्ट आहे. सार्कच्या स्थापनेची सर्व उद्दिष्टे आजवर – १९८५ पासून २०१९ पर्यंत, ३४ वर्षाच्या कलावधीत – साध्य झालेली नाहीत. स्थापनेच्या वेळी ठरवलेली उद्दिष्टे खालीलप्रमाणे:-

1) दक्षिण आशियाई लोकांच्या कल्याणाचा पुरस्कार करणे आणि त्यांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न करणे.
2) आर्थिक विकासाचा वेग वाढवणे, विभागामध्ये सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे, आणि आम जनतेच्या क्षमता जाणून घेऊन त्यांच्या क्षमतांचा पूर्ण रूपाने विकास करण्याची संधी त्यांना देणे तसेच त्यांना सन्मानाने जगण्याची संधी देणे.
3) दक्षिण आशियामधील प्रत्येक देशाला अधिकाधिक स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करणे.
4) राष्ट्रांमधील परस्पर विश्वास वाढवणे आणि एकमेकांचे प्रश्न समजून घेणे.
5) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि शास्त्रीय क्षेत्रामध्ये सहकार्य वाढवणे.
6) इतर विकसनशील देशांबरोबरचे सहकार्य वाढवणे आणि दृढ करणे.
7) समान हीतसंबंधांच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सार्क सदस्यांमधील सहकार्य वाढवणे.
8) समान उद्दिष्टे असलेल्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटानांबरोबर सहकार्य करणे.

सार्कच्या जाहीरनाम्यामध्ये खलील गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे:-

1) सार्क मधील सर्व सदस्य राष्ट्रांनी एकमेकांच्या सर्वभौमत्वाचा, प्रादेशिक अखंडतेचा, राजकीय स्वातंत्र्याचा सन्मान करणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे. आणि केवळ एकमेकांच्या फायद्याचा विचार करणे.
2) सार्क देशांमधील सहकार्य हे दोन किंवा दोनपेक्षा अधिक देशांमध्ये काही करार किंवा देवाण घेवाण चालू असेल त्याला पूरकच असेल. ते थांबवून नव्याने करार करण्याची गरज नाही.
3) दोन किवा दोनपेक्षा अधिक देशांनी करार करून एकमेकांवर काही बंधने घातली असतील किंवा एकमेकांपासून काही अपेक्षा ठेवल्या असतील तर त्यामध्ये सार्क हस्तक्षेप करणार नाही. त्यांच्या मर्यादा राखूनच नवीन करार करायचे असतील तर केले जातील.

सार्क मध्ये काम करताना काही सर्वसाधारण तत्वे पाळली जातात:-

1) सर्व पातळ्यांवरचे सर्व निर्णय सर्वसंमतीनेच घेतली जातील.

2) द्विपक्षीय किंवा वादग्रस्त मुद्दे सार्कमधील चर्चेमध्ये आणू नयेत.

या तत्वांमुळे सर्व राष्ट्रांना निर्णय प्रक्रियेमध्ये समान संधी मिळते. सर्वसर्वसंमतीने निर्णय घेतल्याने अंमलबजावणीच्या वेळी सर्व संबंधीत राष्ट्रे संपूर्ण सहकार्य देणार याची खात्री मिळते. वादग्रस्त विषय टाळल्याने निर्णय घेणे अधिक सोपे होते. द्विपक्षीय विषय टाळून वेगळ्या क्षेत्रात सहकार्य केल्यामुळे कदाचित भविष्यात द्विपक्षीय प्रश्न सोडवण्याचे नवे मार्ग सापडू शकतात. या पद्धतीने काम करून सार्कने काही प्रमाणात यश संपादन केले आहे.

स्थापनेपासूनच सार्कने कोणत्या क्षेत्रातील कामाला अधिक महत्व द्यायचे ते ठरवले होते. ती क्षेत्रे खालीलप्रमाणे:-

1) कृषी आणि ग्रामीण विकास
2) जैवतंत्रज्ञान
3) संस्कृती आणि क्रीडा
4) शिक्षण
5) ऊर्जा
6) पर्यावरण
7) वित्तीय क्षेत्रातील सहकार्य
8) मानवी संसाधन विकास
9) माहिती, संसूचन (संपर्क) आणि माध्यमे
10) दारिद्य निर्मूलन
11) शास्त्र आणि तंत्रज्ञान
12) सुरक्षा आणि कायदेशीर बाबी
13) सामाजिक विकास
14) पर्यटन
15) व्यापार

वरील सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्याची गरज आहे. ते झाल्यामुळे सार्क देशांचे मूलभूत प्रश्न सुटायला मदत होणार आहे. ही क्षेत्रे अराजकीय आणि सर्व वादांच्या पलिकडची असल्यामुळे याबाबतीत सकारात्मक सहकार्य शक्य आहे. सार्कमध्ये वर नोंदविलेल्या प्रत्येक क्षेत्रांअंतर्गत अनेक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. अनेक करार करण्यात आले आहेत. काही वाद निर्माण झाल्यास ते सोडवण्यास लवादाची तरतूदही करण्यात आली आहे. २००६ पासून दक्षिण आशियाई मुक्त व्यापार परिक्षेत्रची (South Asian Free Trade Area – SAFTA) सुरुवात करण्यात आली. दुहेरी कर टाळण्यासाठी करार करण्यात आला आहे. स्त्रिया आणि लहान मुलांचा व्यापार थांबवण्यासाठी करार करण्यात आला आहे. लहान मुलांसाठी कल्याणकारी योजना आखणे, गुन्हेगारीच्या बाबतीतील माहितीची देवाण घेवाण करणे, दहशतवादाला विरोध करणे यासाठीचे करार करण्यात आले आहेत.

**सार्कपुढील आव्हाने आणि सार्कचे अपयश:**

१९८५ पासून २०११ पर्यन्त करी करूनही सार्क आपली बरीच उद्दिष्टे सध्या करता आलेली नाहीत. त्याला अनेक करणे आहेत. जगातील ४० कोटी गरीब जनता इथे राहते. विभागातील ३०% जनता दारिद्यरेषेखाली राहते. सर्व सार्क देशांचा मानवी विकास निर्देशांक बऱ्याच खालच्या पातळीवर आहे. सार्कच्या अपयशाची काही प्रमुख करणे खालीलप्रमाणे:

**1) भारताच्या वर्चस्वाची भीती:**

भारताच्या आकारमान, स्थान आणि आर्थिक क्षमतेमुळे दक्षिण आशियामध्ये भारताकडे आपोआप नेतृत्वाची जबाबदारी येते. परंतु जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याची इच्छा असलेला भारतासारखा भव्य शेजारी देश बाकीच्यांच्या चिंतेचे कारण बनतो. बाकीचे सात देश देश भारताच्या तुलनेत लहान असल्यामुळे त्यांना भारताची भीती वाटते. भारताने काही मदत करण्याचा प्रयत्न केला तर दुसऱ्या देशांना तो हस्तक्षेप वाटू शकतो. काही मार्गदर्शन प्रयत्न केला तर वर्चस्व गाजवण्याचा प्रकार वाटू शकतो. भारताने आजवर सर्व देशांना मदतच केली आहे. नेपाळला अनेक नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस भरघोस मदत केली आहे, श्रीलंकेमध्ये तामिळ प्रश्न सोडवण्यासाठी शांतता रक्षक दल पाठवले, त्या प्रश्नाच्या संदर्भातच पंतप्रधान असताना ज्यांनी शांतता रक्षक दल पाठवण्याचा निर्णय घेतला त्या राजीव गांधीची हत्या झाली. भूतानाला भारत अर्थसंकल्प तयार करण्यापासून लष्करी सुरक्षा पुरवण्यापर्यंत सर्व मदत करतो. असे असले तरी भारताविषयीचे गैरसमज कमी होत नाहीत.

**2) भारत पाकिस्तान संबंध:**

भारत पाकिस्तान संबंध हा सार्कच्या विकासामधील मोठा अडथळा ठरला आहे. पाकिस्तानमध्ये धोरण ठरवण्याचे काम लष्कर आणि आयएसआय च्या हातात आहे. तिथे ते म्हणतील ती पूर्व दिशा ठरते. एखादा पंतप्रधान लोकप्रिय ठरू लागला, त्याने भारताशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, यशस्वीरित्या काही बोलणी केली की भारत – पाक सीमेवर मोठा हल्ला होतो किंवा दहशतवादी कारवाया केल्या जातात आणि त्यानंतर चर्चा रद्द होते. हा आजवरचा इतिहास आहे. पाकिस्तानने आर्थिक सहकार्यात सतत अडचणी निर्माण करण्याचे धोरण अवलंबले आहे.

काश्मीरचा मुद्दा हा भारत पाकिस्तान संबंधातील १९४७ सालापासून मोठ अडथळा आहे. भारताने बांग्लादेशाच्या निर्मितीमध्ये मदत केली, भारत अण्वस्त्रधारी झाला, भारताची लष्करी आणि आर्थिक ताकद पाकिस्तानपेक्षा खूप मोठी आहे, त्याच्याशी तुलना करणे पाकिस्तानला शक्य नाही या सर्व गोष्टी पाकिस्तानला खुपतात.

याउलट १९९७ मध्ये स्थापन झालेल्या बिमस्टेक या विभागीय संघटनेने – BIMSTEC – Bay of Bengal Initiative for Multi – sectoral Technical and Economic Cooperation – बंगालच्या उपसागरातील बहुक्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यासाठीचा उपक्रम – बरीच आर्थिक देवाण – घेवाण आणि प्रगति केली आहे. यामध्ये भारत, बांग्लादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड या सात देशांचा समावेश आहे.

**3) आर्थिक प्रश्न आणि व्यापार या मुद्यांकडे दुर्लक्ष:**

सार्कच्या जाहीरनाम्यमध्ये सदस्य देशातील आपापसातील वादग्रस्त प्रश्नांवर चर्चा होणार नाही असे स्पष्ट नोंदवलेले आहे. परंतु त्यामुळे ते वादग्रस्त प्रश्न तसेच राहतात. आर्थिक प्रगति होऊ शकत नाही. व्यापार वधू शकत नाही याउलट आसियान या दक्षिण – पूर्व आशियामधील दहा देशांच्या संघटनेने बरीच आर्थिक प्रगति केली आहे.

**4) संपर्क साधनांचा अभाव:**

सार्कच्या सदस्य देशांना आपल्यामधील संपर्क साधने – रास्ते, रेल्वे, हवाईमार्ग, सागरीमार्ग वाढवण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न केलेले दिसत नाहीत. भारत आणि बांग्लादेशमध्ये भौगोलिक दृष्ट्या शक्य असूनही रस्त्यांचा आणि रेल्वेचा विकास झालेला नाही. पाकिस्तान, अफगाणिस्तान यांच्याशीही बाकीच्या देशांचा फारसा संबंध नाही. राजकीय संघर्षाचा प्रभाव विकासाच्या मुद्द्यांवर दिसून येतो.

**सार्कचे यश:**

सार्कने पहिल्यांदाच अशक्य ते शक्य करून दाखवले. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, भूतान, मालदीव, श्रीलंका आणि अफगाणिस्तान अशा शेजारी असूनही एकमेकांशी फारसे संबंध नसलेल्या, विविध मुद्द्यांवर एकमेकांशी संघर्ष करणाऱ्या देशांना सार्कने एका व्यासपीठावर आणले. त्यांच्यामध्ये चर्चा घडून आल्या.

सार्क सदस्य देशांमध्ये व्यापार वाढला. साफ्टा – साऊथ एशियन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट – मुक्त व्यापार करार झाला. दुहेरी कर आकारणी बऱ्याच अंशी कमी झाली. प्रदेशातील शेअर बाजार आणि व्यापारी संघटनांमध्ये सहकार्याला सुरुवात झाली. १९९८ मध्ये सार्कफायनॅन्स या सर्व सार्क सदस्य देशातील केंद्रीय बँकांच्या प्रमुखांचा आणि सचिवांचा गट स्थापन करण्यात आला. त्यांनी सर्व देशांच्या आर्थिक महितीचा एक डेटाबेस तयार केला आहे.

२०१० पासून दिल्लीमध्ये आठ सार्क देशांच्या सहकार्याने चालू झालेल्या साऊथ एशियन यूनिवर्सिटीचे काम सुरू झाले. सध्या हे विद्यापीठ दिल्लीच्या चाणक्यपुरी भागात कार्यरत आहे. काही दिवसांमध्ये १०० एकरांच्या नव्या, मोठ्या जागेत त्याचे स्थलांतर होणार आहे.

चित्रपट महोत्सव, साहित्यिक मेळावा, परिसंवाद, सांस्कृतिक उत्सव इत्यादि कार्यक्रमांद्वारे सांस्कृतिक देवाण – घेवाण मोठ्या प्रमाणावर चालू असते. पर्यटनाचा विकास होतो आहे.

शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही सहकार्य वाढते आहे. इलेक्ट्रॉनिक्स, मॉलिक्युलर जीवशास्त्र, सौर ऊर्जा, जैविक खते, कमी खर्चातील घर बांधणी, मत्स्य शेती, प्रदूषण नियंत्रण या बाबतीत अनेक करार झाले आहेत.

दहशतवादासंदर्भातील माहितीच्या अदान – प्रदानाचा करार झाला आहे. तसेच मादक द्रव्यांच व्यापार रोखण्याच्या दृष्टीने करार झाला आहे.

आरोग्य आणि लोकसंख्या विषयक संशोधन या दोन्ही मुद्यांवर सर्व सार्क देशांनी बरेच कार्यक्रम एकत्रितपणे घडवून आणले आहेत. यामध्ये मलेरिया, एड्सचा प्रसार रोखणे, स्त्रीभृण हत्या थांबवणे, अपंगांसाठी विशेष योजना ह्या सर्व बाबींचा समावेश होतो.

कृषी आणि ग्रामीण विकासावर भर देण्यात आला आहे. सर्वच सार्क देशांचा हा जिव्हाळ्याचा विषय आहे कारण अजूनही त्यांचा बराच मोठा भाग ग्रामीण आहे आणि शेती हाच तेथील महत्वाचा उद्योग आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा शेतीमधून येत नसला तरी बहुसंख्य लोकांचा हाच प्रमुख उद्योग आहे. शेती संबंधीत माहिती एका डेटाबेस मध्ये एकत्रित केली जाते. त्याचा सर्वच देशांना फायदा होतो आहे.

ऑस्ट्रेलिया, इराण, मॉरिशस, म्यानमार, अमेरिका, दक्षिण कोरिया या देशांना निरीक्षक दर्जा देण्यात आला आहे. निरीक्षक या नात्याने हे देश सार्कच्या विविध बैठकांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. याशिवाय सार्कने संयुक्त राष्ट्रे आणि त्यांच्या संबंधीत अनेक आंतरराष्ट्रीय संघटानांबरोबर औपचारिक संबंध प्रस्थापित केले आहेत.

**उपखंडासाठी सार्कचे महत्व:**

भारतीय उपखंडामधील विशेषतः सार्कच्या सदस्य देशांमध्ये बरेच साम्य आहे. प्रचंड लोकसंख्या आणि लोकसंख्येची घनता हे सर्वांचे प्रश्न आहेत. निरक्षरता, अंधश्रद्धा, शैक्षणिक सुविधांचा अभाव, धार्मिक संघर्ष, दहशतवाद हेही समान प्रश्न आहेत. बहुतेक सर्व राष्ट्रांमध्ये ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणात आहे. सर्व देशांमध्ये मिश्र अर्थव्यवस्था आहे. गरीबी मोठ्या प्रमाणावर आहे. असमानतेचे प्रमाण खूप आहे. उत्पादनाचे प्रमाण कमी आहे. बेरोजगारी हा वाढत जाणारा प्रश्न आहे. सर्व देश एकतर विकसनशील किंवा अविकसित देशांच्या गटात मोडतात. पर्यावरणाचे प्रश्न सगळीकडे आहेत. पाणी आणि ऊर्जेचे प्रश्न आहेत. सर्व देशांनी एकत्र येऊन प्रयत्न केले तर हे सर्व प्रश्न सोडवणे सोपे होईल. सार्क ही एकत्र आणणारी मोठी संस्था आहे.

हिमालयाचा विकास, त्या भागातील खनिज संपत्तीचे उत्खनन, समुद्रतळाचा तेल आणि नैसर्गिक वायू आणि भूतान मध्ये जलविद्युत प्रकल्प उभे करून देण्यात आले आहेत.

**समारोप:**

भारताच्या सहकार्याशिवाय सार्क या संघटनेला फारसे महत्व राहणार नाही हे सर्व सदस्य देशांना मान्य आहे. सार्कची स्थापना झाली तेव्हा सुरूवातीला त्यावेळच्या भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सार्कच्या यशस्वीतेबद्दल शंका व्यक्त केल्या होत्या. त्यानंतर त्या सार्कमध्ये सामील होण्यास तयार झाल्या. सार्कची निर्मिती झाली तेव्हा सार्कबद्दल बऱ्याच अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या. सार्कमुळे दक्षिण आशियामधील परिस्थिती बदलून जाईल. सर्व संघर्ष मिटतील, सहकार्याला सुरुवात होईल, सर्वांची भरभराट होईल अशी अपेक्षा व्यक्त केली गेली होती. सुरूवातीला तसे काही प्रयत्नही झाले परंतु नंतर उत्साह मावळत गेला. विविध सदस्य देशांमधील संघर्ष विकासाच्या आड आले. तरीही बऱ्याच गोष्टी साध्य झाल्या. सार्कची १९ वी शिखर परिषद भारत – पाक संघर्षामुळे काशी रद्द झाली ते आपण पहिले. पुढची शिखर परिषद घेण्याची तयारी चालू आहे. अजूनही आशा जागृत आहे. सार्क विसर्जित करावी अशी मागणी कोणी केलेली नाही. भारताला अमेरिकेबरोबर संबंध वाढवायचे आहेत. चीन पाकिस्तानला मदत करतो आहे. चीनला दक्षिण आशियामधील भारतासहित सर्वच देशांमध्ये आपले एक

स्थान निर्माण करायचे आहे. चीनच्या वाढत्या आर्थिक ताकदीमुळे त्याचे महत्व दिवसेंदिवस वाढते आहे. अशा परिस्थितीत सार्कला काही ठाम भूमिका घेऊन काम करण्यास खूप वाव आहे. प्रत्यक्षात तसे होते की नाही हे नजीकच्या भविष्यकाळात स्पष्ट होईल.

**संदर्भ:**


1) *आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. हर्षद भोसले, प्रा. शुभराज बुवा*
2) *http://www.saarc.sec.org*
3) *भारत आणि जग – भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध – डॉ. शैलेंद्र देवळाणकर*
4) *जागतिक राजकारणातील भारताची भूमिका – डॉ. अशोक नाईकवडे*

# भारताचे समकालीन परराष्ट्र धोरण व सार्क संघटनेची उपयुक्तता : एक अवलोकन

**प्रा. डॉ. सुभाष दौलतराव उपाते**

*सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली, म.रा. ई–मेल: supate.1965@gmail.com*

## सार्कच्या निर्मीतीची पार्श्वभूमीः—

सार्कच्य निर्मीतीचा प्रस्ताव बांगलादेश कडून १९७९ मध्ये ठेवला गेला. दक्षिण आशियाई देशांनी एकत्रीत येऊन एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करुन दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगदेशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला. सुरवातीला भारत, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवन विकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्‌दिष्टये समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली. या देशांनी त्यावेळी कृषी, ग्रामिण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रात एकात्मिक कृती कार्यक्रम राबविण्याचे ठरविले. १९७९ ला सोविएत रशियाने अफगाणिस्तान मध्ये लष्करी हस्तक्षेप केला होता. याचवेळी नव शीत युध्दाला (New Cold War) प्रारंभ झाला. सोविएत रशियामुहे अमेरिकेची दक्षिण आशियाकडे विशेष लक्ष केंद्रीत झाले. कारण दक्षिण आशियात साम्यवादाच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिरोधन (Containment of Communism in South Asia) करणे अमेरिकेला गरजेचे वाटले. अमेरीकेच्या अप्रत्यक्ष आर्शीवादाने १९६९ मध्ये दक्षीण पूर्व आशियाई राष्ट्रांची सहकार्य संघटना अर्थात "आसियान" ची स्थापना झाली होती. म्हणून भारतीय धोरणकर्त्यांना असा संशय आला की, सार्कच्या निर्मीतीमागे अमेरिकेचे प्रोत्साहन असावे.

काही परराष्ट्र धोरण विश्लेषकांच्या मते सार्कच्या निर्मीतीमागे छोटया दक्षिण आशियाई राष्ट्रांचे राजकारण होते. बांगलादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका या दक्षिण आशियातील लहान आणि गरीब राष्ट्रांना भारताच्या श्रेष्ठत्वाची आणि वाढत्या प्रभावाची भीती होती. असे काही विचारवंताचे म्हणणे होते. भारताने सार्कच्या स्थापनेच्या प्रस्तावाचे स्वागत करतांना दोन अटी ठेवल्या

१. सार्कच्या व्यासपीठावरुन द्विपक्षीय वादग्रस्त प्रश्नांची, संघर्षाची चर्चा होता कामा नये. या व्यासपीठाचा उपयोग हा केवळ विभागीय सहकार्य वाढविण्यासाठीच केला जावा.
२. सार्कच्या व्यासपीठावरुन घेतला जाणारा प्रत्येक निर्णय हा सर्वानुमते घेतला जावा.

सार्कच्या सदस्य राष्ट्रांना भेडसावणाऱ्या समान समस्यांमध्ये गरिबी, बेकारी, वाढती लोकसंख्या, महागाई, पर्यावरणाचे प्रदुषण, निम्न जिवनस्तर, महिला व लहान मुलांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन आदी समस्यांचा समावेष आहे. या समस्या सोडविण्याची कृतीयोजना केली. पण सदस्य राष्ट्रांमधील राजकीय इच्छाशक्तींच्या अभावामुळे पूर्ण झाली नाही. पण समस्यांबाबत सामूहीक सहमती निर्माण करण्यात सार्कला यश मिळाले. सार्कमुळे भारत—पाकिस्ता या दोनही राष्ट्रांना इतर सदस्य राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्याची संधी प्राप्त झाली. तसेच दक्षिण आशियाई राष्ट्रांमधील भारताविषयीची अकारण भिती सार्कमुळे बऱ्याच प्रमाणात कमी झाली. सार्कच्य अंतर्गत भारताने छोटया आशियाई राष्ट्रांना अनेक व्यापारी सवलती दिल्या. तसेच उपविभागीय सहकार्याच्या तत्वांर्गत भारताने नेपाळ, भूतान, श्रीलंका, बांगलादेश आणि मालदिवज या राष्ट्रांना कोणत्याही परतफेडीची अपेक्षा न ठेवता मोठे आर्थिक साहाय्य पुरविले. यामुळे भारताविषयी आदर वाढण्यास मदत झाली.

सार्कच्या सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी पातळीवरील सहकार्य वाढावे, सर्व सदस्य राष्ट्रांना भेडसावणाऱ्या समान समस्यांवर सामूहिक उपाययोजना करता याव्या यासाठी गेल्या तीस वर्षात सार्कच्या व्यासपिठावरुन अनेक प्रयत्न झाले. त्यात पुढील प्रयत्नांचा समावेश आहे.

१. कृषी, साधनसंपत्तीचा विकास, ग्रामविकास, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, विज्ञान—तंत्रज्ञान आदि क्षेत्रांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी अकरा समित्यांची स्थापना करण्यात आली.
२. कृषी, हवामान तसेच काही साथीच्या रोगासंबंधीचे संशोधन व्हावे, या क्षेत्रांमधील माहितीची देवाण—घेवाण केली जावी. यासाठी चार विभागीय केंद्रे उघडण्यात आली.
३. महिला आणि लहान मुलंच्या अधिकारासंबंधी सार्क संघटना सुरवातीपासूनच संवेदनशील राहिली आहे. महिला—बालकल्याणासाठी, त्यांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी, त्यांच्या व्यापारावर बंदी घालण्यासाठी विविध प्रकारचे करार सार्कच्या व्यासपिठावरुन करण्यात आले. २००१ ते २०१० हे दशक “बालहक्क दशक” म्हणून घोषीत करण्यात आले आहे.
४. दारिद्रय निर्मुलन, महापूरांसारख्या नैसर्गिक आपत्ती, अन्नधान्याची उपलब्धता याविषयी सार्कच्या व्यासपिठावर बहूपक्षीय करार करण्यात आले आहेत.
५. दहशतवाद आणि अंमली पदार्थांचा व्यापार या परस्परसंबंधीत समस्या असून बहूतेक दक्षीण आशियाई राष्ट्रांना भेडसावीत आहेत. या समस्यांचा सामुहीक प्रतीकार करता यावा, यासाठी सार्कच्या व्यासपीठावरुन महत्वपूर्ण करार करण्यात आले.

६. सार्कने दक्षिण आशियाई राष्ट्रांना द्विपक्षीय तसेच बहूपक्षीय पातळीवर चर्चा करुन आणि सहकार्याच्या माध्यमातून आपले प्रश्न सोडविण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे.

**सार्कची उद्दीष्टे:—**

- दक्षीण आशिया विभागातील जनतेचे सामूहीक कल्याण साधून त्यांचे जिवनमान सुधारणे
- आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक विकास साधणे. सर्व व्यक्तींना विकासाच्या संधी उपलब्ध करुण देणे.
- दक्षिण आशियाई राष्ट्रांची सामूहीक आत्मनिर्भरता बळकट करणे.
- दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये परस्परांविषयी, परस्परांच्या समस्या आणि प्रश्नांविषयी सहानुभूती, विश्वास निर्माण करणे.
- सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविणे.
- इतर विकसनशील राष्ट्रांबरोबर दक्षिण आशियाई राष्ट्रांचे सहकार्य आणि मैत्रीचे संबंध प्रस्थापीत करणे.
- दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये सामूहिक हितसंबंधाच्या विषयावर सहमती प्रस्थापीत करणे.
- इतर विभागीय व्यापारसंघ आणि आंतरराष्ट्रीय संघटनाबरोबर सहकार्य वाढविणे.

**सार्कची प्रमुख तत्वे:—**

- सदस्य राष्ट्रे परपस्परांच्या सार्वभौमत्वाचा आणि भौगोलीक एकात्मतेचा आदर करतील.
- परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला जाणार नाही.
- परस्परांचे हित आणि फायद्यासाठी प्रयत्न केले जातील.
- सदस्य राष्ट्रांमध्ये सार्वभौम समानता (Sovereign Equslity) असेल.
- सार्कच्या व्यासपीठावरुन जे करार केले जातील ते सार्कच्या सदस्य राष्ट्रांनी द्विपक्ष पातळीवर अथवा बहूपक्ष पातळीवर इतर राष्ट्रांसमवेत जे करार केलेले असतील त्यांच्याशी विसंगत नसतील.
- सार्कच्या व्यासपीठावर झालेले करार सदस्य राष्ट्रांनी इतर राष्ट्रांबरोबर केलेल्या करारांची जागा घेणार नाहीत.

सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रील २००७ मध्ये अफगाणिस्तानाला

आठवा सदस्य देश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. सध्या ऑस्ट्रेलीया, चीन, इरान आणि युरोपियन युनियन ही संघटना यांना निरीक्षण देश म्हणून दर्जा देण्यात आला आहे. म्यानमारला लवकरच पूर्ण सदस्यत्व दिली जाईल, तर रशिया, दक्षिण ऑफ्रिका आणि टर्की हे देश निरीक्षक देशाचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नशील आहेत.

नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्य देशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्य देशांमधल्या विविध शहरातून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद (वर्षातून एकदा) देशांच्या नावाच्या आकारविल्हेनुसार त्या त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची वर्षातुन दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्य देशांचे राष्ट्रप्रमुख/पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्य देशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्लयानंतर भारत, बांग्लादेश, भूतान आणि अफगाणिस्ता या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणाऱ्या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्य देशांच्या अंतर्गत वादांचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युध्द किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही. पण संबंधीत देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुध्द लढण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५ च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरुपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपीयन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनाबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत.

सार्कने अल्पकाळात विविध आकडयांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षीण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची (SAFTA) स्थापना २००६ मध्ये करण्यात आली.सदस्य देशामधील व्यापार वृध्दीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशामधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथील करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्रय निर्मुलन, पर्यावरण रक्षण आणि प्रादेशीक सहकार्य या क्षेत्रात सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषीके जाहिर करण्यात आली. सदस्य देशांतील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहिर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे

गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. सार्क राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

१. लोकसंख्या — २१.३ टक्के
२. सकल गृह उत्पादन — १.३ टक्के
३. निर्यात — ०.९ टक्के
४. आयात — १.० टक्के
५. अन्नधान्याचे उत्पादन — ९.७ टक्के
६. आंतरविभागीय व्यापार — ३.४ टक्के

लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन फारच कमी आणि दुसरे म्हणजे आयातीचे प्रमाण निर्यातीपेक्षा अधिक आहे. यातही मोठी निर्यात भारताकडूनच होते. भूतान, नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका यांची अवस्था तर फारच वाईट आहे. त्यामुळे भारतापेक्षा याच राष्ट्रांना मोठा फायदा होणार आहे.

युरोपियन युनियन, नाफ्टा, आसियान, एपेक अशा अनेक संघटना पुढे यायला लागल्या आहेत. आपापसांत कितीही गंभीर स्वरुपाचे राजकीय प्रश्न असतील, तरीही आर्थिक सहकार्याच्या आड त्यांना येऊ देता कामा नये, हे शहाणपण दक्षिण आशियाई राष्ट्रांना पटले. परिणामी भिन्न राजकीय, सामाजिक आणि वांशिक पार्श्वभूमी असणाऱ्या या सात राष्ट्रांनी सार्कच्या आर्थिक व्यासपीठावर एकत्र येण्याची तयारी दाखविली हे महत्वाचे आहे. भारताच्या मते दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्य वाढवणे हे सार्कचे मुख्य उद्दीष्ट आहे. त्यामुळे या संघटनेचा वापर सदस्य राष्ट्रांमधील संघर्षमय प्रश्नांच्या चर्चेसाठी होत नाही. सार्कच्या माध्यमातून दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्याला चालना म्हणजे राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी पोषक परिस्थीती निर्माण होण्यास मदत होते. दक्षिण आशियात भारताला वडिलबंधुची (Big Brother) भूमिका पार पाडणे क्रमप्राप्त ठरते. पंडित जवाहरलाल नेहरुंपासून ते आज विद्यमान राजकीय व्यवस्थेत याचे भान सर्वच नेत्यांना आहे. दक्षिण आशिया विभागामध्ये “Regional Policeman” ची भूमिका पार पाडण्याचा भारताचा अजिबात उद्देश नाही. या परिषदेच्या स्थापनेपूर्वी परराष्ट्र सचिवांच्या बैठकीत प्रथम या संघटनेच्या संदर्भातील एक मसुदा तयार करण्यात आला होता. भारत सार्कमध्ये ७० टक्के लोकसंख्या आहे. तसेच या संघटनेच्या अर्थव्यवस्थेत ७०टक्केपेक्षा जास्त भागीदार आहे. वर्तमानस्थितीत अन्य सार्क सदस्य देशांशी व्यापार १५ बिलीयन डॉलर म्हणजे १००२ अब्ज रुपयाच्या बरोबर आहे. यात १७.५ मिलीयन डॉलर ची निर्यात आहे आणि आयात २.५ बिलीयन डॉलर आहे. यावरुन दक्षिण आशियाई राष्ट्रांची निर्भरता भारतावर आहे. या संघटनेत जास्त व्यापार भारताचा बांगलादेश, श्रीलंका व नेपाळ यांच्या सोबत आहे. २०१३—१४ मध्ये भारताने सार्कमधील व्यापार ३३.३ टक्के बांगलादेशासोबत आहे. श्रीलंकेसोबत २६ टक्के, नेपाळ २०.५ टक्के होता. नेपाळ

आणि भूतानचा ५० टक्के व्यापार भारतासोबत आहे. भारत आर्थिक सहकार्य अफगाणिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, भूतान, मालदिव, नेपाह यांच्या सोबत करता. उदाहरणार्थ— उर्जाच्या संबंधाने भूतानसोबत बऱ्याच गुंतवणूक आहे. तसेच पर्यटन, हॉटेल, एअरपोर्ट व मत्स्य उद्योगामध्ये भारत सहकार्य वाढवितो आहे. याशिवाय श्रीलंकेसोबत २० करोड डॉलर भारतीय गुंतवणूकीपेक्षही १ अरब डॉलरपर्यंत पोहचविण्याची शक्यता आहे. या व्यतिरिक्त अफगाणिस्तान मध्ये आर्थिक विकास व नेपाळसोबतही भारताच्या विकास कार्याच्या योजना कार्यान्वित आहे.

भारताचा इतिहास तपासता कुटनितीच्या बाबतीत भारताचा भूभाग हे देश आहेत. मौर्य काळात भारत अफगाणिस्तान पासुन म्यानमारपर्यंत समाविष्ट होता. याच अर्थाने भारत या राष्ट्रांषी सांस्कृतीकदृष्टया केंद्रस्थानी आहे. त्यातच पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश यांच्या सिमा भारतासोबत जोडलेल्या आहेत. भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरवीले आहे. “सिमाविरहीत ज्ञान” असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सूरु केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृध्द असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशातील विद्यार्थी २०१४ पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्य देशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा असतील व तेथेही या विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नु विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**सारांशः—**

दक्षिण आशिया हा आशिया खंडामधील एक भौगोलिक प्रदेश आहे. हया प्रदेशामध्ये भारतीय उपखंडामधील भूभागाचा समावेश होतो. भौगोलिक दृष्टया दक्षिण आशिया हिमालयाच्या व हिंदुकुश पर्वतरांगेपर्यंत दक्षिणेकडील भारतीय प्रस्तरावर स्थित असून त्याच्या दक्षिणेस हिंदी महासागर आहे. भारत, पाकिस्तान, बांगलादेश व श्रीलंका हे भारतीय उपखंडामधील प्रमुख देश तसेच नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान व मालदिव हया आठ देशांना साधारणपणे दक्षिण आशियाई देश मानले जाते. अमेरिका व चिन खालोखाल सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रीत अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर असून जगातील लोकसंख्येच्या २१टक्के लोक सार्क क्षेत्रामध्ये राहतात. आजतागायत संघटनेच्या १८ शिखर परिषदा पार पडल्या आहेत. सार्कच्या सदस्य राष्ट्रांनी नियीमत एकत्र येणे अपेक्षीत असतांना तीस वर्षात फक्त १८ वेळा ते एकत्र आले. यातुन सार्कचे अपयश अधोरेखीत होते. २०१६

मध्ये पाकिस्तान येथे होणारी १९ वी शिखर परिषद भारतासह बांगलादेश, भूतान, अफगाणिस्तान यांनी बहिष्कार टाकल्याने झाली नाही कारण त्याला हल्ल्याची पार्श्वभूमी होती.

भारत आणि अन्य सदस्य देश यांची महत्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को—ऑपरेशन डायलॉग (ACD- ३४ देशद्ध, साऊथ एशिया सब रिजनल इकॉनॉमिक को—ऑपरेशन (SASEC- ६ देशद्ध, मेकॉग—गंगा को—ऑपरेशन (MGC- ६ देशद्ध, इंडियन ओशियन रिम असोशिएशन (BBIN- ४ देशद्ध आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद (BIMSTEC- ७ देशद्ध या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानामुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेषातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे. अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेष देतांना सार्कच्या सदस्य देशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणााला म्हणायचे यावरुन हा वाद निर्माण झाला होता.

सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खुप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहीला आहे. सोबत सार्क संघटनेची उपयुक्तता पाहतांना सार्कच्या अपयशाची पण चर्चा करणे संयुक्तीक ठरेल. लोकसंख्या, संसाधने, लष्करी सामर्थ्य, आर्थिक आणि तंत्रज्ञानात्मक विकास, भौगोलिक स्थान या सर्व बाबी लक्षात घेता भारत आणि इतर सार्क देशामध्ये प्रचंड विषमता आहे. दक्षिण आशियाई प्रदेश हा गुंतागुंतीच्या आर्थीक व राजकीय, ऐतीहासीक पार्श्वभूमी बरोबरच जागतिक स्तरावर अधिक गरीब लोकसंख्या व तीव्र राजकीय अस्थिरता असणारा प्रदेश आहे. हीच बाब सार्क देशांच्या द्विपक्षीय संबंधामधील सर्वात मोठा अडथळा ठरते. सार्क सनदेनुसार द्विपक्षीय वादग्रस्त मुद्दे सार्क परिषदेमध्ये उपस्थित केले जाऊ नयेत अशी ठळक तरतुद आहे. परंतु गेल्या ३० वर्षाच्या सार्कच्या वाटचालीवर दृष्टीक्षेप टाकल्यास ताणलेले द्विपक्षीय संबंध हा सार्कच्या यशस्वीतेमधील मोठा अडथळा ठरत आहे. यामध्ये १९४७—४८ पासून असणारी भारत—पाक यातील शत्रुत्वाची भावना, विश्वासाची कमतरता सार्कच्या अपयशाचे मूळ आहे. तरीपण सार्कची कार्य करण्याची गतीमानता सकारात्मक आहे. हे भारत देशासाठी गौरवाची बाब आहे.

**संदर्भ लेख:—**

*१) प्रा.डॉ.शैलेंद्र देवळाणकर : भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, पान क्र. १२७ ते १४९*

*२) Noor A Husain : "India Regional Policy: Strategic and security Dimentions"*

*in Stephen Cohen. The Security of South Asia : American and Asian Perspective (New Delhi : Vistar Publication)* पान क्र. २४ ते ४९

३) *K. Subrahmanyam : "Prospects for Security and Stability in South Asia" in Stephen Cohen, The Security of South Asia,* पान क्र. २०१ ते २१३

४) *Prem Lata Sharma : India's Foreign Policy (Jaipur : Mangal Deep, 2000) "Indias as a Regional Power"* पान क्र. २४ ते ४७, प्रकरण क्रं. ४

५) सार्क – मराठी विश्वकोश : विजय पवार २.४.२०१९
सामजिकशास्त्र – राष्ट्रीय सुरक्षा. भाषांतरकार : भगवान दातार, समीक्षक : शशिकांत पित्रे

६) *https:mr.mwikipedia.org,wiki :* दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकारी संघटणा

# भारत-पाकिस्तान मधील व्यापाराचे विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. सुनील बाळू घुगे**
*( अर्थशास्त्र विभाग प्रमुख ), कला , विज्ञान व वाणिज्य महाविदयालय,सुरगाणा*
*इमेल:ghugesunil33@gmail.com मो.:9420000063*

**गोषवारा**

*हे संशोधन पाकिस्तान आणि भारत यांच्यात शांती आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी व्यापाराचे महत्त्व दर्शवितो. 1948-49 च्या दरम्यान पाकिस्तानची 70 टक्क्यांहून अधिक निर्यात ही भारताबरोबर होती आणि भारतातून पाकिस्तानला होणारी निर्यातही 63 टक्के होती. 1949 नंतर मात्र भारत आणि पाकिस्तानमधील व्यापार कमी होऊ लागला होता. पाकिस्तान-भारत व्यापार संबंध, व्यापाराचे निर्बंध, त्यातील द्विपक्षीय व्यापाराचे फायदे आणि प्राप्त फायदे या पेपरात व्यापाराच्या माध्यमातून युक्तिवाद केला आहे. परस्परावलंबने आणि शांती मिळवण्याद्वारे व्यापार शांती साधण्याचे साधन आहे. परस्पर आर्थिक लाभ सीमा-विवादांबाबत पाकिस्तान-भारत वाटाघाटी आणि शांतता प्रस्थापित करण्याचे उद्दीष्ट आहेत. दोन्ही देशांसाठी महत्वाचे आहे. मतभेद कमी करण्यासाठी व्यापार हा मऊ आणि सकारात्मक मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय करण्यासाठी मोकळेपणा व्यापार उदारमतवादी शांतता महत्त्वपूर्ण चालक आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराचे प्रमाण खूपच कमी आहे.व्यापार वाढवणे गरजेचे आहे.*

***सूचनक शब्द (keywords) :*** *पाकिस्तान आणि भारत, आयात,निर्यात, मोस्ट फेव्हर्ड नॅशन, एलओसी.*

**प्रस्तावना** :

भारत आणि पाकिस्तानदरम्यान सुमारे 138 वस्तू निर्यात केल्या जातात. सध्या भारत आणि पाकिस्तान दरम्यान व्यापाराचे दोन महत्त्वपूर्ण मार्ग आहेत - मुंबई ते कराची हे समुद्रमार्गे आणि जमिनिद्वारे वाघा बॉर्डर मार्गे. भारतीय निर्यातीत प्रामुख्याने सुमारे 33 टक्के वस्त्रोद्योग आणि 37 टक्के रासायनिक उत्पादने असतात. दुसरीकडे, भारतीय आयात प्रामुख्याने 49 टक्के खनिज उत्पादने आणि 27 टक्के फळांचा समावेश आहे. पुलवामा हल्ला फेब्रुवारी 2019 मध्ये झाला तेव्हा भारताने पाकिस्तानकडून मोस्ट फॅव्हर्ड नेशन्स (एमएफएन) दर्जा मागे घेतला आणि त्यानंतर भारतात येणाऱ्या सर्व पाकिस्तानी वस्तूंवर २०० टक्के सीमाशुल्क लादले गेले. जम्मू-काश्मीर पुनर्गठन विधेयकानंतर पाकिस्तानने भारताशी राजनैतिक आणि आर्थिक संबंध पूर्णपणे संपुष्टात आणले आहेत. 1996 मध्ये भारताने पाकिस्तानला मोस्ट फेव्हर्ड नॅशनचा (एमएफएन) दर्जा दिला आणि त्याच वर्षी पाकिस्तानने भारतातून आयात केलेल्या वस्तूंची संख्या ही 600 पर्यंत वाढवली. 2003 साली, पाकिस्तानने या यादीमध्ये इतर 78 वस्तू समाविष्ट करण्याची घोषणा केली, ज्यात रसायने, खनिजे आणि धातू उत्पादने समाविष्ट केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराचा एक मोठा भाग अनौपचारिक मार्गाने होतो, म्हणजे दोन्ही देशांमधील व्यापार तिसऱ्या देशातून होतो. अमृतसर हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराचा आणखी एक महत्त्वाचा मार्ग आहे आणि येथील स्थानिक अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर या व्यापारावर अवलंबून आहे, कारण अमृतसरला स्वतःचा पारंपारिक उद्योग नाही. यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराबाबत घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचा थेट परिणाम अमृतसरच्या स्थानिक

अर्थव्यवस्थेवर होतो. आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार ठप्पांमुळे भारत-पाकिस्तानवर थेट परिणाम झाला आहे, ज्यात त्यांचे कर्मचारी, कस्टम हाऊस एजंट्स (सीएचए), मालवाहतूक करणारे, ट्रक ऑपरेटर, ढाबा मालक आणि इंधन स्टेशन यांचा समावेश आहे. गुंतलेले आहेत. जागतिक बँकेच्या 2018 च्या अहवालानुसार भारत आणि पाकिस्तानने जर व्यापारातील अडथळे आणि कठोर व्हिसा धोरण दूर केले तर दोन देशातील व्यापार हा दोन अब्ज डॉलरवरून 37 अब्ज डॉलरवर जाईल.

2018-19 मध्ये भारताची पाकिस्तानला होणारी निर्यात ही 2066.56 दशलक्ष डॉलर तर आयात फक्त 816.62 दशलक्ष डॉलर एवढी होती.म्हणजे भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील व्यापारात भारताला मोठा फायदा आहे.त्यामुळे व्यापारातील अडथळे दूर करून व्यापार v वाढवणं भारताच्या फायद्याचे आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

1. भारत आणि पाकिस्तान मधील व्यापाराचा आढावा घेणे.
2. भारत आणि पाकिस्तान मधील व्यापारातील समस्या जाणून घेणे.
3. भारत आणि पाकिस्तान मधील व्यापारातील अडथळे दूर होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन आणि कार्यपद्धती**

विश्लेषणासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धत वापरली गेली आहे. दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. दुय्यम स्त्रोतांमध्ये वृत्तपत्रे, मासिके, अहवाल, पुस्तके आणि इंटरनेट या साधनांचा वापर केलेला आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष आणि समस्या:**

**भारतातून कापूस आयात केल्यास अनेक फायदे:**

भारत आणि पाकिस्तान हे देश शेजारील राष्ट्र आहेत. त्यामुळे इतर दूरच्या देशांकडून आयात करण्यापेक्षा कापूस आयातीसाठी भारत हा योग्य पर्याय असल्याचे पाकिस्तानला वाटते. सध्या पाकिस्तान हा कापसाची आयात अमेरिका, ब्राझील, उझबेकिस्तान या देशांकडून करतो. या देशांसोबत व्यवहार करणे पाकिस्तानला महाग पडते. तसेच आयात केलेला माल पाकिस्तानमध्ये दाखल होण्यास तब्बल 2 महिने लागतात. हाच माल भारतातून आयात केल्यास त्याला पाकिस्तानमध्ये जायला फक्त तीन ते चार दिवस लागतात. त्यामुळे भारतातून आयात करणे हे पाकिस्तानसाठी अनेक अंगांनी किफायतशीर आहे.

**टेक्स्टाईल इंडस्ट्रीचे योगदान:**

पाकिस्तानमध्ये वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणात पसरलेला असून जवळपास 30 टक्के उद्योग फक्त वस्त्रोद्योगामुळे निर्माण होतो असा अनुमान आहे. कापूसनिर्मितीमध्ये भारत, बांग्लादेश यांनतर पाकिस्तानचा नंबर येतो. पाकिस्तानी जी निर्यात केली जाते त्यातील 60 टक्के निर्यात ही वस्त्रोद्योगाशी निगडीत उत्पादनांची आहे. एकूण निर्मीतीमध्ये वस्त्रोद्योगाचे योगदान 46 टक्के आहे.

दरम्यान, वरील सर्व माहिती लक्षात घेता, भारताशी आयात करार केला नाही तर पाकिस्तानला ते महागात पडू शकते. पाकिस्तानातील तब्बल 1.5 कोटी रोजगार धोक्यात येऊ शकतात. तसेच, पाकिस्तानचे दोना लाख कोटींचे नुकसानही होऊ शकते.

**भारत-पाकिस्तान मधील समझोता :**

भारत आणि पाकिस्तान यांनी फेब्रुवारी २०२१ मधील संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, त्यांनी 25 फेब्रुवारी 2021 मध्यरात्रीपासून "नियंत्रण रेषेवरील (एलओसी) आणि इतर सर्व क्षेत्रावरील सर्व करार समजूतदारपणे निभावण्यास आणि गोळीबार थांबविण्याचे कठोरपणे पालन करण्यास" सहमती दर्शविली आहे. 22 फेब्रुवारी 2021रोजी प्रस्थापित हॉटलाईनवरून सैन्य संचालनालयाचे चर्चेनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.

दिल्ली आणि इस्लामाबादमध्ये जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की "दोन डीजीएसएमओ सीमेवर परस्परांना लाभदायी आणि स्थायी शांतता मिळविण्याच्या आणि तदनुषन्गाने दोहो बाजुंच्या हिताच्या रूपात, शांततेचा भंग करणाऱ्या आणि हिंसाचाराला प्रवृत्त करणाऱ्या प्रवृत्ती असलेल्या घटकांच्या विरोधात आणि एकमेकांच्या मुख्य समस्या आणि चिंता सोडविण्यास सहमत झाले" तसेच दोन्ही बाजू कोणतेही गैरसमज सोडविण्यासाठी हॉटलाइन आणि ध्वज संमेलनाच्या विद्यमान यंत्रणेचा वापर करतील असेही या निवेदनात म्हणण्यात आले आहे . विद्यमान यंत्रणेनुसार मिलिटरी ऑपरेशन्स संचालनालयाच्या अधिकाऱ्यांमार्फत दर मंगळवारी चर्चा होत असते पण जेव्हा एका बाजूने संभाषणाची विनंती केली तेव्हाच डीजीएसएमओ बोलतात.

भारताच्या बाजूने मात्र या धोरणाचा अर्थ पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आणि इतर समस्या सोडविण्यात कोणत्याही प्रकारची हयगय केली जाईल असा होत नाही हे ठासून स्पष्ट करण्यात आले आहे. भविष्यात आपला कोणत्याही आगळिकीला प्रत्ययत्तर देण्याचा मानसही लष्कराने बोलून दाखवला आहे. भारताशी पाकिस्तानशी सामान्य मैत्रीपूर्ण संबंधांची इच्छा आहे. आम्ही कायमच कायम हे धोरण ठेवले आहे की आम्ही शांततेत द्विपक्षीय मार्गाने कोणतेही प्रश्न सोडवण्यासाठी प्रतिबद्ध आहोत," असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अनुराग श्रीवास्तव यांनी सांगितले.

जनरल मिलिटरी ऑपरेशनद्वारे पाकिस्तानचे हे पाऊल पंतप्रधान इम्रान खान यांच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७० मध्ये सुधारणा करण्याच्या भारताच्या निर्णयावरील पूर्वीच्या भूमिकेमधील बदल आहे. आधी त्यांनी म्हटले होते की जम्मू-काश्मीरच्या "स्वायत्त" पुनर्स्थापनाशिवाय भारताशी संबंध जोडण्याची शक्यता नाही. स्थिती.

भारतासोबतच्या संबंधांमध्ये सुधारणांसाठी पाकिस्तानानं पुन्हा ठेवली काश्मिरची अट**,** व्यापारासही नकार**:**

कापूस आणि साखर भारतातून आणण्याच्या प्रस्तावाला पाकिस्तानच्या आर्थिक समन्वय समितीने 31 मार्च 2021 ला मान्यता दिली होती, तसेच भारताकडून ३० जून २०२१ पर्यंत कापूस आणि

साखरेची आयात करू, असेही पाकिस्तान कॅबिनेटच्या आर्थिक समन्वय समितीने म्हटले होते. या घडामोडींमुळे पाकिस्तानसोबत पुलवामा घटनेनंतर सुमारे वर्षभरापासून बंद असलेला व्यापार सुरू होणार होता. मात्र हे इम्रान सरकारने फेटाळले आहे. पाकिस्तानचे मानवाधिकार मंत्री शिरीन मजरी यांच्या म्हणण्यानुसार पंतप्रधान इम्रान खान यांनी हे स्पष्ट केले आहे की भारतासोबतचे संबंध तेव्हापर्यंत पूर्ववत होणार नाहीत जोपर्यंत 370 अंतर्गत जम्मू-काश्मीरला देण्यात आलेला विशेष दर्जा परत दिला जात नाही.

**भारत आणि सर्वाधिक पसंती राष्ट्र करार :** भारत हा गॅट व जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सभासद असल्याने भारताचे सर्वाधिक पसंती राष्ट्र करार जागतिक व्यापार संघटनेच्या अनेक सभासद राष्ट्रांबरोबर आहेत. उदा., अमेरिका, जपान, चीन, इझ्राएल, फ्रान्स, इंग्लंड इत्यादी. त्याचबरोबर दक्षिण आशियामधील सार्क संघटनेतील सर्व आठही सभासदांसोबत भारताचा सर्वाधिक पसंती राष्ट्र करार झालेला असून पाकिस्तान वगळता त्यांनीही भारताला सर्वाधिक पसंती राष्ट्राचा दर्जा दिलेला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील संघर्षपूर्ण संबंध असूनसुद्धा भारताने जागतिक व्यापार संघटनेच्या गॅट कराराअंतर्गत 1996 मध्ये पाकिस्तानला सर्वाधिक पसंती राष्ट्राचा दिर्जा दिला होता; मात्र पाकिस्तानने हा दर्जा आजही भारताला दिला नाही. यामुळे पाकिस्तान आणि जागतिक व्यापार संघटनेच्या अन्य सभासद देशांना भारताला व्यापारात प्राधान्य देणे बंधनकारक आहे. पुलवामा हल्ला फेब्रुवारी 2019 मध्ये झाला तेव्हा भारताने पाकिस्तानकडून मोस्ट फॅव्हर्ड नेशन्स (एमएफएन) दर्जा मागे घेतला आणि त्यानंतर भारतात येणाऱ्या सर्व पाकिस्तानी वस्तूंवर २०० टक्के सीमाशुल्क लादले गेले.
सर्वाधिक पसंती राष्ट्र ही संकल्पना प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय अर्थकारण व राजकारण यांच्याशी संबंधित आहे. एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राबरोबर वस्तू व सेवा यांच्या व्यापारात सुलभता निर्माण व्हावी म्हणून त्या राष्ट्रास 'सर्वाधिक पसंतीचे राष्ट्र' असा दर्जा देतो. यामध्ये असा दर्जा देणारे राष्ट्र प्रामुख्याने आयात आणि निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवा यांवरील प्रशुल्क, आयातशुल्क, सीमाशुल्क हे इतर देशांसोबत होणाऱ्या व्यापारांपेक्षा कमी आकारते. म्हणजेच एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास व्यापाराकरिता विशेषाधिकार प्रदान करते.

जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय व्यापार नियमांच्या आधारावर एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला सर्वाधिक पसंतीचे राष्ट्र असा दर्जा देऊ शकते. असा दर्जा प्राप्त राष्ट्राला या व्यापारात कोणतीही हानी होणार नाही, याची शाश्वती असते. सर्वाधिक पसंती राष्ट्राचा दर्जा असणाऱ्या देशांमध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार परस्परिकता आणि भेदभावमुक्त व्यापार या आधारांवर परस्पर द्विपक्षीय संबंध प्रस्थापित केले जातात. सर्वाधिक पसंती राष्ट्राचा दर्जा मिळालेला राष्ट्रांमध्ये होणारा व्यवहार हा इतर देशांच्या तुलनेत सर्वांत कमी आयात शुल्काच्या आधारे होतो. जागतिक व्यापार संघटनेचे सभासद देशमुक्त व्यापार आणि व्यवहार यांकरिता बांधील असले, तरी सर्वाधिक पसंती राष्ट्र नियमानुसार अशा देशांना विशेष सूट दिली जाते. सिमेंट, साखर, सेंद्रिय रासायनिकी, कापूस, भाजीपाला आणि काही निवडक फळांशिवाय खनिज तेल, ड्राय फ्रूट, पोलाद यांसारख्या वस्तुंचा व्यवसाय उभय देशांदरम्यान होतो. जर दोन देशांत सुरक्षेसंबंधी विवाद निर्माण झाल्यास जागतिक व्यापार संघटनेच्या 'कलम २१ बी' नुसार तो देश दुसऱ्या राष्ट्राचा सर्वाधिक पसंती राष्ट्र दर्जा काढून घेऊ शकतो.

**विश्लेषणात्मक अध्ययन:**

## तक्ता 1: भारतातून पाकिस्तानला होणारी निर्यात:
## (आकडे हे दशलक्ष डॉलर मध्ये आहेत)

| Sr.No | Commodity | 2018-19 | 2019-20 | % Growth |
|---|---|---|---|---|
| 1 | Cotton | 550.33 | 64.25 | - 88.33 |
| 2 | Oganic Chemicals | 457.75 | 273.97 | -40.15 |
| 3 | Plastic and Articles Thereof | 131.19 | 42.62 | - 67.51 |
| 4 | Tanning Or Dyeing Extracts; Tannins And Their Deri. Dyes, Pigments And Other Colouring Matter; Paints And Ver; Putty And Other Mastics; Inks. | 114.48 | 39.47 | - 65.52 |
| 5 | Nuclear Reactors, Boilers, Machinery And Mechanical Appliances; Parts Thereof | 94.88 | 42.42 | - 55.29 |
| 6 | Pharmaceutical Products | 59.57 | 58.29 | - 2.15 |
| 7 | Iron and Steel | 51.90 | 15.78 | - 69.60 |
| 8 | Man-Made Filaments | 50.99 | 40.42 | - 20.72 |
| 9 | Miscellaneous Edible Preparations. | 50.29 | 21.18 | - 57.89 |
| 10 | Coffee, Tea, Mate And Spices. | 48.19 | 23.47 | - 51.30 |
| 11 | Sugars And Sugar Confectionery. | 14.44 | 39.83 | 175.84 |
| | Total | 2066.56 | 816.62 | - 60.48 |

*Source: Department of commerce, Export Import Data Bank, Export: Country –Wise all Commodities.*

**विश्लेषण : वरील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे,**

1. भारतातून पाकिस्तानमध्ये होणाऱ्या निर्यातीत कापसाचा वाटा सर्वात मोठा आहे. 2018-19 मध्ये भारतातून पाकिस्तानला 550.33 दशलक्ष डॉलरची कापसाची निर्यात करण्यात आली. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या व्यापारातील अडथळे यामुळे 2019- 20 मध्ये कापसाची निर्यात फक्त 64.25 दशलक्ष डॉलर एवढी झाली. ती 88.33 % ने कमी झाली.
2. भारतातून पाकिस्तानला केमिकल ची होणारी निर्यात ही 2018-19 मध्ये 457.57 दशलक्ष डॉलर एवढी होती. ती 2019-20 मध्ये 273.97 दशलक्ष डॉलर एवढी कमी झाली.
3. भारतातून पाकिस्तानला होणारी प्लास्टिकची निर्यात ही 2018 -19 मध्ये 131.19 दशलक्ष डॉलर होती, ती 2019 - 20 मध्ये 40.62 दशलक्ष डॉलर एवढी कमी झाली.
4. भारतातून पाकिस्तानला होणाऱ्या औषधांच्या निर्यातीत मात्र व्यापार अडथळा मध्ये सुद्धा कमी झालेली दिसत नाही. 2018 -19 मध्ये ती 59.57 दशलक्ष डॉलर एवढी होती, तर 2019-20 मध्ये ती 58 .29 दशलक्ष डॉलर एवढी झाली. त्यामध्ये फक्त 2.15 टक्क्यांची कमी झाली.
5. भारतातून पाकिस्तानला लोह -पोलाद, चहा-कॉफी ,मसाले यांची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. व्यापार अडथळ्यांमुळे ती मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे.
6. भारतातून साखरेची पाकिस्तानला होणारी निर्यात ही 2018 -19 मध्ये 14.44 दशलक्ष डॉलर एवढी होती. तर 2019- 20 मध्ये ती 39.83 दशलक्ष डॉलर एवढी वाढली. व्यापारातील अडथळ्यांनंतरसुद्धा भारतातून पाकिस्तानमध्ये होणारी साखरेची निर्यात ही वाढलेली आहे.
7. भारतातून पाकिस्तानला 2018 -19 मध्ये एकूण निर्यात ही 2066.66 दशलक्ष डॉलर्स एवढी होती. तर व्यापारातील अडथळ्यांमुळे 2019-20 मध्ये ती कमी होऊन 816.62 दशलक्ष एवढी झाली. म्हणजे निर्यातीत 60.48 टक्क्यांची कमी झालेली आहे.

**तक्ता 2: भारतात पाकिस्तानमधून होणारी आयात:**
**(आकडे हे दशलक्ष डॉलर मध्ये आहेत)**

| Sr.No | Commodity | 2018-19 | 2019-20 | % Growth |
|---|---|---|---|---|
| 1 | Mineral Fuels, Mineral Oils And Products Of Their Distillation; Bituminous Substances; Mineral Waxes. | 131.29 | 0.01 | - 99.99 |
| 2 | Edible Fruit And Nuts; Peel Or Citrus Fruit Or Melons. | 103.27 | 0.92 | - 99.11 |
| 3 | Salt; Sulphur; Earths And Stone; Plastering Materials, Lime And Cement. | 92.84 | 1.31 | - 98.59 |
| 4 | Ores, Slag And Ash. | 17.18 | 0.03 | - 99.82 |
| 5 | Oil Seeds And Olea. Fruits; Misc. Grains, Seeds And Fruit; Industrial Or Medicinal Plants; Straw And Fodder. | 15.98 | 0.65 | - 95.92 |
| | Total | 494.87 | 13.97 | - 97.18 |

*Source: Department of commerce, Export Import Data Bank, Import: Country –Wise all Commodities.*

**विश्लेषण** : वरील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे,

1. पाकिस्तानमधून भारतात मुख्यतः खनिज इंधन आणि खनिज तेल यांची आयात मोठ्या प्रमाणात केली जाते.2018-19 मध्ये ती 131.29 दशलक्ष डॉलर एवढी होती, तर 2019-20 मध्ये ती 0.01 दशलक्ष डॉलर एवढी कमी झाली. त्यामध्ये 99.99 टक्के एवढी घट झाल्याचे लक्षात येते.म्हणजेच व्यापारातील अडथळ्यांचा पाकिस्तानला सर्वात जास्त तोटा झालेला आहे.
2. पाकिस्तानमधून भारतात फळांची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. 2018-19 मध्ये ती 103.27 दशलक्ष डॉलर एवढी होती. तर 2019-20 मध्ये ती 0.92 दशलक्ष एवढी कमी झाली. त्यामध्ये 99.11 टक्के एवढी घट झाल्याचे लक्षात येते.
3. पाकिस्तान भारताला मीठ, गंधक, अर्थ, स्टोन, प्लास्टर साहित्य, चूना आणि सिमेंट यांची निर्यात करतो. व्यापारातील अडथळ्यांमुळे पाकिस्तान ची निर्यात मोठ्या प्रमाणात घटली आहे.
4. पाकिस्तानमधून भारतात तेलबिया,विविध धान्य, बियाणे, औद्योगिक आणि औषधी वनस्पती यांची निर्यात करतो. व्यापारातील अडथळ्यांमुळे पाकिस्तान ची निर्यात मोठ्या प्रमाणात घटली आहे.
5. पाकिस्तान मधून भारतात 2018-19 मध्ये 494.87 दशलक्ष डॉलर एवढी आयात झालेली होती. व्यापारातील बंधनांमुळे 2019-20 मध्ये ती कमी होऊन 13.97 दशलक्ष डॉलर एवढी कमी झाली. पाकिस्तानच्या निर्यातीत 97.18 टक्क्यांची घट झालेली आहे.

**संशोधनाच्या उपायोजना:**

1. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी व्यापारातील अडथळे दूर होण्यासाठी एक स्थायी समितीची नियुक्ती करावी. त्या समितीद्वारे दोन्ही देशातील व्यापाऱ्यांना व्यापार करतांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी त्या समितीने मदत करावी.

2. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा व्यापार सुरळीत राहिल्यास फायदा होतो. कारण दुसऱ्या देशांकडून वस्तूची आयात करण्यामध्ये वाहतूक खर्च जास्त येतो, त्यामुळे दोन्ही देशांनी इतर देशांना प्राधान्य न देता प्राधान्यक्रमाने व्यापार करावा.
3. सर्वाधिक पसंती राष्ट्राचा दर्जा दोन्ही देशांनी एकमेकांना द्यावा. त्यामुळे दोन्ही देशांचा फायदा होईल.
4. भारताने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात निर्यात होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी पाकिस्तानला कोणत्या वस्तूंची गरज आहे याचा अभ्यास करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करावी आणि त्याद्वारे पाकिस्तानला त्या वस्तूची निर्यात करण्यासाठी प्रयत्न करावा.
5. भारतातून पाकिस्तानला फळे आणि भाजीपाला याची मोठ्या प्रमाणात निर्यात करण्याची संधी आहे त्यासाठी सरकारने याची निर्यात करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे,
6. भारतातील निर्यातदारांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.
7. भारताने पाकिस्तान बरोबर व्यापारी संबंध मोठ्या प्रमाणात प्रस्थापित करणे गरजेचे आहे. भारतातून पाकिस्तानमध्ये जर मोठ्या प्रमाणात निर्यात झाली तर त्याचा फायदा भारताला होईल.
8. भारताने पाकिस्तानला निर्यात करण्यासाठी डम्पिंग पद्धतीचाही वापर केला पाहिजे. असे केले तर भारतातून मोठ्या प्रमाणात पाकिस्तानला निर्यात होईल आणि भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करणे शक्य होईल.
9. भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील संबंध चांगले करणे गरजेचे आहे. कारण पर्यटनातून दोन्ही देशांना फायदा होईल.
10. मेडिकल टुरिझम चा फायदा भारताला मोठ्या प्रमाणात करून घेणे शक्य आहे. त्यासाठी भारत आणि पाकिस्तान मधील संबंध सुधारणे गरजेचे आहे. मेडिकल टुरिझम मुळे पाकिस्तानातील लोकांना भारतात उपचार करणे इतर देशांपेक्षा स्वस्त आहे आणि भारतात चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहे.
11. भारताने पाकिस्तानला कोविड ची लस उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करने गरजेचे आहे. तसे केल्यास भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळेल.

## संदर्भ सूची :

*Ansari, H and Vohra, R (2003). Confidence Building Measure at Sea; opportunities for India and Pakistan, Sandia National Labortries.*

*Angell, N. (1913). The Great Illusion: A Study of the Relation of Military Power to National Advantage. 4th rev. and enl. edn. New York: Putnam.*

*Ansari, H and Vohra, R (2003) Confidence Building Measure at Sea; opportunities for India and Pakistan, Sandia National Labortries.*

*Directorate General of Foreign Trade, Ministry of Commerce and Industry, Government of India. Available at https://tradestat.commerce.gov.in/eidb/ecntcom.asp*

*Economic Times (2016). Pakistan Suspends Import of Cotton, Agri Commodities from India Available at*

*Naqvi, Z.F.,(2012) the Challenges and Potential of Pakistan-India Trade. Washington, DC: The World Bank, South Asia Region.*

*https://lakshyaiasacademy.com/*

# भारत पाकीस्तान संबंध आणि सार्कची भूमिका

**डॉ. विठ्ठल ल. मंदुलवार**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शरदचंद्र कला व वाणिज्य महाविद्यालय बुटीबोरी, नागपूर.*

१९४७ साली अखंड भारताची फाळणी झाली आणी भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे अस्तीत्वात आली. पाकीस्तानने सुरुवातीपासूनच काश्मीर पाकीस्तानचाच भाग आहे यासाठी प्रयत्न चालविलेले आहे. याकरीता पाकीस्तानने १९४७—४८ मध्ये पहीले युद्ध लढले हे काश्मीर आपलाच भाग आहे हे दर्शविण्यासाठी हे छेडखानी युद्ध होते. यालाच काश्मीर युद्ध म्हणून ओळखले जाते. १९४७ ते १९४८ यामध्ये जम्मू व काश्मीर आपलाच भाग आहे हे दाखविण्याकरीता हा पाकीस्तानचा पहीला प्रयत्न होता त्यानंतर सातत्याने पाकीस्तान भारतासोबत युद्ध करीत गेला परंतू त्याला आतापर्यंतही त्यात यश आले नाही. १९७१ च्या युद्धामध्ये अपयश, कारगील युद्धामध्ये अपयश. आता पाकीस्तान समजून गेला आहे की जम्मू काश्मीरच्या बाबतीमध्ये आपण भारतासोबत कितीही लढाया केल्या तरी मात्र हा भाग आपला कधीही होणारच नाही म्हणून पाकीस्तानने आता वेगळेच तंत्र वापरणे सुरु केले आहे ते म्हणजे 'दहशतवाद'. दहशतवादाच्या माध्यामातून आपण भारतामध्ये कारवाया करु शकतो आणि याच माध्यमातून आपण भारताला जेरीस आणू शकतो. परंतु तेही तंत्र त्याचे फेल होऊन राहीले आहे. आता पाकीस्तानने हेही ओळखले आहे की दहशतवादाच्या माध्यमातूनही भारताला नमवता येत नाही म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर हा विषय पाकीस्तानने लाऊन धरला आहे. चीन व अमेरिकेला पाकीस्तानने वारंवार भारताच्या विरोधात पटवून सांगितले परंतू त्याचाही काही फायदा पाकीस्तानला झाला नाही. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये सुरुवातीपासूनच काश्मीरचा मुद्दा पाकीस्तानने लाऊन धरला आहे आणि तो आजही सूरु आहे. परंतू त्याचाही काही फायदा पाकीस्तानला झालेला नाही म्हणून पाकीस्तान आता चिडलेला आहे. आणि चिडून अधूनमधून पाकीस्तानच्या कारवाया सुरुच आहेत.

भारत पाकीस्तान सहित आशियात राष्ट्राचा विकास व्हावा, दक्षिण आशियातील राजे सर्वांगीण बाबतीत प्रगतीशील होण्यासाठी, दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना, या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदिर्घ चर्चा करुन दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांग्लादेश, श्रीलंका, मालदीव, पाकीस्तान, भूटान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते दक्षिण आशियातील देशांचे समाज कल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली. या सर्व देशांनी त्यावेळी कृषी, ग्रामीण विकास, दुरसंचार हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रात एकात्मीक कृती कार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक सहभागी होण्यासाठी प्रयत्नशिल होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रील २००७ मध्ये अफगाणीस्तानला आढवा देश म्हणून या परिषदेमध्ये मान्यता देण्यात आली.व प्रवेशित करण्यात आले. सध्या ऑस्ट्रेलिया, चीन, इराण, जपान, मॉरीशस, म्यानमार, दक्षिण कोरीया, अमेरीका हे आठ देश आणि युरोपीयन युनियन ही संघटना यासंना निरिक्षक देश म्हणून दर्जा देण्यात आला आहे. म्यानमारला

लवकर सदस्यत्व दिले जाईल. तर रशिया, दक्षिण आफ्रीका आणि टर्की हे देश निरिक्षक देशाचा दर्जा मिळावा प्रयत्नशील आहेत.

नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचीवालयाची स्थापना करण्यात आली सार्कच ररचिटनिसाची नियुक्ती सदस्य देशामधून आळीपाळीने केली जाते. सदस्य देशामधल्या विविध शहरातून विविध समित्यामार्फत सार्कचे काम चालते सार्कची वार्षिक परिषद देशांच्या नावाच्या आदयाक्षरावरुन त्यांच्या देशात भरते. तत्पर्वूी या देशांच्या परराष्ट्रमत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते व त्या बैठकीला सदस्य देशांचे पंतप्रधान किवा राष्ट्रपती उपस्थित राहतात. पूर्वी सदस्य देशतील मतभेदामुळे बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडीत नसत. पाकीस्तान दहशतवादयांना देत असलेल्या पाठींब्यामूळे आणि भारतात उरी येथील हमल्यांवर भारत, बांग्लादेश, भूटान आणि अफगाणीस्तान या देशांनी २०१६ मध्ये पाकीस्तानात होणाऱ्या सार्क परिषदेवर बहीष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली.

**भारत व पाकीस्तानच्या संबंधामध्ये सार्कची भूमिका :—**

भारत व पाकीस्तान हे सुरुवातीपासूनच सार्क परिषदेचे सदस्य देश आहेत. सार्क परिषदेमध्ये या दोन देशाचे महत्वसुद्धा अनन्यसाधारण आहेत त्यातील भारत हो एक बलाढय राष्ट्र आहे या देशाचा या परिषदेवर सुरुवातीपासूनच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेहमीच भारतानी मदतीची भावना जोपासली आहे. तसेच अनेक बाबतीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य जागतिक निर्णयाची भूमिका भारताने वठविली आहे. म्हणूनच या परिषदेमध्ये भारताला पाकीस्तान जर सोडला तर बाकी सहा देश आणि या परिषदेचे मार्गदर्शक देश जास्तीत जास्त महत्व देत आहे. कारण भारत नेहमीच राष्ट्रीय हिताबरोबर आंतरराष्ट्रीय हित जोपासत आला आहे.

भारताचे आणि पाकिस्तानचे संबंध हे दोन्ही देशाच्या निर्मितीपासूनचेच आहेत आणि ते काश्मीरच्या बाबतीमध्ये आहे हे संपूर्ण जगाला माहिती आहे. तसेच ते सार्क परिषदेलाही माहिती आहे. म्हणून याचा परिणाम सार्कच्या कार्यावर पडू नये याची काळजी सार्क परिषद नेहमीच घेत असते. साधारणत: काश्मीरच्या बाबतीतील वाद हा भारत व पाकिस्तानचा अंतर्गत वाद आहे हे समजून सार्क परिषदेवर या बाबतीमध्ये जास्त चर्चा होत नाही. परंतु बाकी मात्र भारत आणि पाकीस्तान यांचे संबंध सौहार्दपूर्ण राहावे याकरीता सार्क परिषदेने दोन्हीही देशांना वारंवार मदत केली आहे आणि नेहमीच सर्वच बाबतीमध्ये या दोन्ही देशांमध्ये शांततेचे वातावरण राहण्याकरीता प्रयत्न केलेले आहे.

दहशतवादविरुद्ध लढण्यासाठी ज्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघामध्ये वारंवार चर्चा होते तसेच याही सार्क परिषदेमध्सये दहशतवादविरुद्ध लढा देण्यासाठी वारंवार चर्चा होत राहते आणि दहशतवाद संपावा याकरीता सतत प्रयत्न होत असतात. सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रिय सहकार्य वाढविण्यासाठी सार्कची नेहमीच सकारात्मक भूमिका राहीलेली आहे. सार्क परिषद नेहमीच या देशामध्ये सहकार्याची भावना वाढीस लागावी म्हणून प्रयत्नशिल आहे. निरिक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरुपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपीयन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनाबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत. सार्कने अल्पकाळात विविध आघाडयावर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार केंद्र या सार्क अंतर्गत संघटनेची स्थापना करण्यात आली. (२००६) सदस्य देशातील व्यापार वृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क

देशामधसील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारच्या अटी शिथील करण्यात आल्या. महीला व बालककल्याण, शांतता, विकास, दारीद्रय निर्मूलन पर्यावरण रक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली. सदस्य देशातील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क परिषदेतील ऐक्य टिकून रहावे याकरीता नेहमीच सार्क परिषदेमध्ये चर्चा होत राहते. प्रयत्न होत राहतात.

भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकीस्तानचा या योजनेला विरोध आहे. त्यामूळे पाकीस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. ''सिमाविरहीत ज्ञान'' असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरु केले आहे या विद्यापीठात अनेक देशांतील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सार्कने नेहमीच भारत आणि पाकिस्तान यांचे सौहार्दपूर्ण संबंध राहण्याकरीता प्रयत्न केले आहेत. दोन्ही देशामधून दहशतवाद मिटावा याकरीता सार्कच्या व्यासपीठावर नेहमीच योग्य दिशेने चर्चा केलेली आहे. दोन्ही देशातील राजनैतिक संबंध चांगले रहावे याकरीता नेहमीच प्रयत्न केलेले आहेत. दोन्ही देशांची आयात, निर्यात योग्य दिशेने चालू रहावी याकरीता नेहमीचे सार्क परिषदेच्या व्यासपीठावर सकारात्मक दृष्टीकोनातून चर्चा होत असते. भारत पाकीस्तान बरोबरच अन्य देशांतील आर्थिक उलाढाल वाढावी याकरीता सार्कच्या व्यासपटलावर सकारात्मक दिशेने चर्चा झालेली पहावयास मिळते.

**मूल्यमापन :–**

भारत पाकीस्तान तसेच अन्य सदस्यदेश यांची महत्वपूर्ण भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनाबरोबर सार्कचे महत्वपूर्ण संबंध अहोत. दक्षिण आशियायी लोकांचे समाजजीवन सुधारणे, त्यांचे हीत जोपासणे,त्यांच्यात आर्थिक संबंध मजबूत करण्याकडेच सर्का परीषदेने वारंवार आपली भूमिका विषद केलेली दिसून येते. दक्षिण आशियायी देशांत आर्थिक विकासासोबतच आपसामध्ये एकमेकांचा विश्वास संपादन करणे, निर्यात आणि आयात वाढविणे याबाबतीमध्ये या आठ देशांमध्ये विकासाचे वाढते प्रमाण निश्चित करण्याकडेच सार्क संघटनेचा भर राहीलेला दिसून येतो. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि वैज्ञानिक संबंधामध्ये वाढ करण्याकडे सार्क परिषदेने भर दिलेला दिसून येतो. सार्क परिषदेचा उद्देशच यातील आठ राष्ट्राचा विकास करणे हा आहे. सोबतच सर्वांचा सर्व बाबतीमध्ये मदत करणे हा आहे त्या वाक्यानुसार सार्क परिषद आपल्या हेतूचे पालन करतांना दिसून येते. सार्क परिषदेचा पटलावर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाचे वातावरण आहे जे निवळण्यासाठी सुद्धा सार्कने प्रयत्न केलेले दिसून येते. वारंवार या दोन राष्ट्रातील परिस्थिती सुधरविण्याकरीता सार्कने आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणलेली दिसून येते. एकूणच ज्या उद्देशाने किंवा हेतूने सार्क परिषदेची निर्मिती झाली तो उद्देश सार्क परिषदेने सफल केल्याचे दिसून येते. या परिषदेमध्ये बाकी सहा राष्ट्रांच्या समस्येबाबत प्रश्न नाही. प्रश्न फक्त भारत आणि पाकिस्तान यांच्या बाबतीमध्ये सार्कची काय भूमिका आहे या प्रश्नाचे वरील सार्कने केलेल्या भारत आणि पाकिस्तान यांचेतील वातावरण निवळावे आणि यांच्यातील संबंध सुधारावे याकरीता सार्कने निश्चितच या दोन राष्ट्रांच्या बाबतीमध्ये चांगले प्रयत्न केलेले दिसून येतात.

**संदर्भ :—**

*१) दिक्षित, नि. सी. : आधूनिक जग (२०१०), पिंपळापूरे पब्लीशर्स, महाल, नागपूर.*
*२) सप्तर्षी, प्रविण : जागतिक भूगोल(२००७), डायमंड पब्लीकेशन, पूणे.*
*३) आचार्य, धनंजय : विसाव्या शतकातील जग (२००७), साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
*४) navbharattimesindiatimes.com*
*५) marathivishwakosh.org*
*६) http/www.saarc-sec.org/SAARC-Charter/5/*

# जागतिक विकासात सार्कची भूमिका

**प्रा. डॉ. कृष्णा आनंदराव माहुरे**
*(राज्यशास्त्र विभाग प्रमुख),* डॉ. गोपाळराव खेडकर *महाविद्यालय गाडेगाव*
*(तेल्हारा) जि.अकोला ४४४ १०८ मो.९४२३६१४११३*

**प्रस्तावना :**

सार्क संघटनेची कल्पना १९५०च्या दशकात Asian Relations Conference मध्ये उदयाला आली. १९७० च्या दशकात बांगलादेश, भूतान, भारत, मालदिव, नेपाल, पाकिस्तान, श्रीलंका आणि अफगाणिस्तान या देशांना एकत्रपणे व्यापार व सहकाराच्या हेतूने एका संस्थेची गरज भासू लागली. दक्षिण आशियामध्ये आर्थिक व सामाजिक प्रगती करण्याच्या उद्देशाने तसेच सांस्कृतिक विकास व विकसनशील देशाबरोबर सहकार्य करण्यासाठी ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली. दक्षिण आशियाई देशांची विभागीय (प्रादेशिक) सहकार्यासाठी स्थापन झालेली सार्क संघटना आहे. सार्क म्हणजे 'एशियन असोसिएशन फॉर रीजनल को-ऑपरेशन' मराठी पर्यायी नाव 'आशियाई विभागीय सहकार्य संघटना' असे आहे. सार्कची स्थापना १९८५ मध्ये झाली. तिचे स्थायी कार्यालय (सचिवालय) काठमांडू (नेपाळ) येथे आहे. सरचिटणीस हा तिचा मुख्य अधिकारी असून सात संचालक (प्रत्येक देशाचा एक)त्यास मदत करतात. त्यांची नियुक्ती सरचिटणीस सभासदराष्ट्रांच्या शिफारशीनुसार तीन वर्षांकरिता करतो. अपवादात्मक परिस्थितीत कालमर्यादा वाढविण्यात येते. सचिवालयाची अधिकृत भाषा इंग्रजी आहे आणि संघटनेची भारत, बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान व मालदीव ही राष्ट्रे कायम सभासद आहेत. या सात राष्ट्रांचे पंतप्रधान/राष्ट्रप्रमुख या संघटनेचे प्राधिकारी असून वर्षातून एक परिषद देशांच्या नावाच्या अकारविल्हेनुसार त्या त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते. तीत आगामी धोरणांचे सुसूत्रीकरण, प्रगतीचे पुनर्विलोकन आणि सहकार्यासाठी नवीन क्षेत्रांचा शोध व तत्संबंधीची आवश्यक ती यंत्रणा यांविषयी विचारविनिमय होतो. या परराष्ट्र मंत्र्यांना परराष्ट्र सचिवांची स्थायी समिती सहकार्य करते, तसेच कार्यक्रमण करणारी समिती आणि ११ तांत्रिक समित्या देशपरत्वे विविध कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सहभागी होतात. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (South Asian Association for Regional Cooperation (SAARC) सार्क ही दक्षिण आशिया खंडामधील ८ देशांची एक आर्थिक व राजकीय सहयोग संघटना आहे. अमेरिका व चीन खालोखाल सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रित अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर असून जगातील लोकसंख्येच्या २१ टक्के लोक सार्क क्षेत्रामध्ये राहतात. भारत हा सार्कमधील सर्वात बलाढ्य देश आहे.

**रचना व कार्य :**

सार्कच्या सचिवालयाची स्थापना नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी करण्यात आली. सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्य देशांमधून आळीपाळीने केली जाते.

सदस्यदेशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद (वर्षातून एकदा) देशांच्या नावाच्या आद्याक्षरानुसार त्या-त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते. त्या बैठकीला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख वा पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगलादेश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणा-या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर चर्चा होत नाही. पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५ च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट आहे. जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची आहे. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत.

**उद्दिष्टे व ध्येयधोरणे :**

या परिषदेच्या स्थापनेपूर्वी परराष्ट्र सचिवांच्या बैठकीत प्रथम या संघटनेच्या संदर्भातील एक मसुदा तयार करण्यात आला, त्यात संघटनेची पुढील उद्दिष्टे व धोरणे स्पष्ट करण्यात आली:

१) दक्षिण आशियातील जनतेच्या कल्याणाला सर्वतोपरी प्राधान्य देणे.

२) कृषी, वनविद्या, आरोग्य, लोकसंख्या, विज्ञान व तंत्रविद्या, हवामानशास्त्र, पर्यावरण, ग्रामीण विकास, स्त्रियांचा विकास, कला, शिक्षण या अकरा क्षेत्रांत प्रादेशिक सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच त्यांच्या संवर्धन व संरक्षण यांवर भर दिला आहे. मादक पदार्थांचा व्यापार व दहशतवाद यांना पायबंद घालण्याच्या उपायांचा पाठपुरावाही त्यात व्यक्त केला आहे.

३) आर्थिक विकासवाढीस गती देणे, सभासदराष्ट्रात सामूहिक आत्मनिर्भरता जागृत करणे याही गोष्टी नमूद केल्या आहेत.

४) प्रादेशिक सहकार्यासाठी सूत्रबद्घ नियोजन व एकमताच्या आधाराने सर्व निर्णय घेण्यात यावेत.

५) चर्चेतून द्विपक्षीय आणि वादग्रस्तमुद्यांना वगळण्यात यावे, तसेच स्वायत्तता, समानता, प्रादेशिक एकात्मता, राजकीय स्वातंत्र्य कसे अबाधित राहील, यावर कटाक्ष ठेवून परस्परांच्या अंतर्गत व्यवहारात संघटनेने हस्तक्षेप करू नये, या मुद्यांवर भर देण्यात आला आहे.

६) मूळ मसुद्यात निर्दिष्ट केलेल्या अकरा विभागांपैकी कृषी, ग्रामीण विकास, दळणवळण, हवामान, आरोग्य व लोकसंख्या यांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र गट नेमून प्रत्येक गटाचा एक स्वतंत्र संयोजक नेमावा,असे सूचित केले आहे.

**सार्कची भूमिका :**

सार्कने अल्पकाळात विविध आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची स्थापना २००६ मध्ये करण्यात आली. सदस्यदेशांमधील व्यापारवृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणरक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली. सदस्यदेशांतील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण-उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आाहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. 'सीमाविरहित ज्ञान' असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरू केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृद्ध असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशांतील विद्यार्थी २०१४ पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यदेशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा आहेत. याठिकाणी विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नू विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आजच्या परिस्थितीचा विचार करता सार्क संघटना भारत आणि पाकिस्तान यांच्यामधल्या या परिस्थितीवर काहीतरी अर्थपूर्ण तोडगा काढण्यास सक्षम नाही हे प्रकर्षाने जाणवते. तरीही नेपाळने पुलवामा हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारे निवेदन प्रसिद्ध करून हे स्पष्ट केले आहे की, दक्षिण आशियामधल्या देशांची पुलवामा हल्ल्यानंतरच्या परिस्थितीवर काय भूमिका आहे. त्यामुळे आता प्रश्न हा उभा रहातो की, सदस्य देशांतर्गत शांतता आणि सुरक्षेसाठी 'सार्क'सारखी मर्यादित देशांची संघटना काही महत्त्वाचे योगदान देऊ शकणार आहे का? हा दहशतवादी हल्ला झाला तेव्हा त्याचा निषेध करण्यासाठी सार्क देश सर्वात आधी पुढे आलेले दिसले. नेपाळचे पंतप्रधानांनी लगेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संपर्क केला आणि या दहशतवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त केला होता. नेपाळच्या परराष्ट्र खात्याने निवेदन जारी करून या हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करून हा अतिरेकी हल्ला "निर्घृण कृत्य' असल्याचेही जाहीर केले. श्रीलंकेचे पंतप्रधान रणील विक्रमसिंघे यांनी ट्विटर पोस्ट वरून हल्ल्याचा कठोर निषेध नोंदवला होता. तर मालदीवचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला शाहीद यांनी भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री सुषमा स्वराज यांना पत्र पाठवून, "दहशतवादाविरुद्ध लढायला पूर्ण सहकार्य देण्याची बांधिलकीही जाहीर व्यक्त केली. दहशतवादाचा समूळ उच्छेद करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकत्र येण्याचे सर्व देशांना आवाहन करताना त्यासाठी भारतासोबत काम करण्याची इच्छा देखील व्यक्त केली आहे. भारत आणि अन्य सदस्यदेश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे

मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को-ऑपरेशन डायलॉग (ACD–३४ देश), साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को-ऑपरेशन (SASEC–६ देश), मेकाँग–गंगा को-ऑपरेशन (MGC–६ देश), इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA–२१ देश), बांगलादेश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य (BBIN–४ देश) आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद (BIMSTEC–७ देश) या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणा-या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.

सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहिला आहे. सार्कच्या स्थापनेला तीस वर्षे होऊन गेलीत. गेल्या तीस वर्षांतील या संघटनेची वाटचाल निश्चितच समाधानकारक नाही. ज्या उद्दिष्टांसाठी ही संघटना स्थापन झाली होती त्यातील बहुतांश उद्दिष्टे अद्याप कागदोपत्रीच आहेत. सार्कच्या सदस्य राष्ट्रांनी प्रतिवर्षी भेटणे, एकत्र येणे अपेक्षित आहे. पण तीस वर्षांत केवळ १८ वेळा ते एकत्र आले यातूनच या संघटनेचे अपयश प्रतिबिंबित होते. सार्कच्या अधिवेशनात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात; परंतु ते कागदोपत्रीच राहतात. त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती राजकीय इच्छाशक्ती सदस्य राष्ट्रे दाखवत नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दहशतवादासंबंधीचे ठराव. डिसेंबर २०१३ पर्यंत दक्षिण आशियात मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याचा निर्णय घेतला गेला होता. तो पूर्ण झाला नाही. दहशतवादाच्या निर्मूलनासंबंधीचा ठराव कागदोपत्रीच आहे. १९९३ साली गरिबीच्या निर्मूलनासंबंधीचा ठराव केला गेला, त्यानुसार या उपखंडातून २००२ पर्यंत गरिबीचे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते, जे पूर्ण झाले नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कि, या संघटनेची मुख्य समस्या अंमलबजावणीची आहे. या अंमलबजावणीत दोन मुख्य अडथळे आहेत. एक म्हणजे सदस्य राष्ट्रांमधील विशेषतः भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय स्वरूपाचे संघर्ष आणि दुसरी म्हणजे विश्वासाची कमतरता. सदस्य राष्ट्रांमधील द्विपक्षीय संघर्षाचे प्रतिबिंब सातत्याने या संघटनेच्या प्रगतीच्या आड येत आहेत. सार्क संघटनेचे बहुतेक निर्णय पाकिस्तानच्या आडमुठ्या धोरणामुळे पूर्णत्वाला येऊ शकत नाहीत. विश्वासाच्या कमतरतेचा प्रश्न या राजकीय संघर्षातूनच निर्माण झाला. याशिवाय भारताची 'बिग ब्रदरची' प्रतिमा देखील काही प्रमाणात याला जबाबदार आहे. सार्कच्या इतर सदस्यांच्या तुलनेत भारत सर्व दृष्टीने मोठा आहे. दक्षिण आशिया उपखंडाच्या एकूण आकारमानापैकी एकट्या भारताचे आकारमान सत्तर टक्के एवढे आहे. स्वाभाविकपणे भारताचा या संघटनेवर प्रभाव आहे. दक्षिण आशियायी प्रदेश हा गुंतागुंतीच्या आर्थिक व राजकीय ऐतिहासिक पाश्र्वभूमीबरोबरच जागतिक स्तरावर अधिक गरीब लोकसंख्या व तीव्र राजकीय अस्थिरता असणारा प्रदेश आहे. ही बाब सार्क देशांच्या द्विपक्षीय संबंधांमधील सर्वात मोठा अडथळा ठरते. सार्कच्या सनदेनुसार द्विपक्षीय वादग्रस्त मुद्दे सार्क परिषदेमध्ये उपस्थित केले जाऊ नयेत, अशी ठळक तरतूद आहे. परंतु गेल्या तीस वर्षांच्या सार्कच्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकल्यास ताणलेले द्विपक्षीय संबंध हा सार्कच्या यशस्वीतेमधील मोठा अडथळा ठरत आहे. यामध्ये १९४७-४८ पासून

असणारी भारत-पाक यातील शत्रुत्वाची भावना, विश्वासाची कमतरता सार्कच्या अपयशाचे मूळ आहे असे ठामपणे म्हणता येते.

**निष्कर्ष :**

'सार्क'सारख्या आशिया खंडातल्या एकमेव महत्त्वाच्या मंचाच्या माध्यमातून सदस्य देशांमधले परस्पर ताणतणाव दूर होण्यात मदत झाली पाहिजे होती, परंतु याउलट या संघटनेने स्वत:ला त्यापासून अलिप्तच ठेवले आहे. संघटनेच्या घटनेनुसार या मंचावरून दोन सदस्य देशांमधल्या परस्पर वादविवादांची चर्चा केलीही जाऊ शकत नाही. साधारणतः तीस वर्षांपूर्वी १९८५ साली या संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशिया उपखंडात एक सामूहिक बाजारपेठ निर्माण करणे हा तिच्या स्थापनेमागचा प्रमुख उद्देश होता. त्यासाठी दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्य वाढीस लागावे म्हणून सार्कचे व्यासपीठ निर्माण करण्यात आले.

१. सार्कच्या स्थापनेला तीस वर्षे झाली गेल्या तीस वर्षांतील या संघटनेची वाटचाल निश्चितच समाधानकारक नाही. ज्या उद्दिष्टांसाठी ही संघटना स्थापन झाली होती त्यातील बहुतांश उद्दिष्टे अद्याप कागदोपत्रीच आहेत.
२. सार्कच्या सदस्य राष्ट्रांनी प्रतिवर्षी भेटणे, एकत्र येणे अपेक्षित आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांत फारच कमी वेळा या देशाचे राष्ट्राध्यक्ष एकत्र आले यातूनच या संघटनेचे अपयश प्रतिबिंबित होते.
३. सार्कच्या अधिवेशनात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात; पण ते कागदोपत्रीच राहतात. त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती राजकीय इच्छाशक्ती सदस्य राष्ट्रे दाखवत नाहीत.
४. संपूर्ण जग हे आर्थिक आणि व्यापारी एकीकरणाच्या दिशेने प्रवास करत असताना सार्कची सदस्य राष्ट्रे मात्र यातून बोध घेत नाहीत.
५. सार्कच्या इतर सदस्यांच्या तुलनेत भारत सर्व दृष्टीने मोठा आहे. दक्षिण आशिया उपखंडाच्या एकूण आकारमानापैकी एकट्या भारताचे आकारमान सत्तर टक्के एवढे आहे. स्वाभाविकपणे भारताचा या संघटनेवर प्रभाव आहे.
६. लोकसंख्या, संसाधने, लष्करी सामर्थ्य, आर्थिक आणि तंत्रज्ञानात्मक विकास, भौगोलिक स्थान या सर्व बाबी लक्षात घेता भारत आणि इतर सार्क देशांमध्ये प्रचंड विषमता आहे.
७. सार्क देशांमध्ये परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण होण्यात फारशी कधी संधीच उपलब्ध झाली नाही. भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय स्वरूपाचे संघर्ष आणि दोन म्हणजे विश्वासाची कमतरता (ट्रस्ट डेफिसिट). सदस्य राष्ट्रांमधील द्विपक्षीय संघर्षाचे प्रतिबिंब सातत्याने या संघटनेच्या प्रगतीच्या आड येत आहेत.

**संदर्भग्रंथ :**


*१. भारताचे परराष्ट्र धोरण काल, आज आणि उद्या, हेमंत महाजन , नचिकेत प्रकाशन.*
*२. सत्तरीतला भारत, रोषण दालाल, मेहता पब्लिकेशन हाउस.*
*३. भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, डॉ.शैलेंद्र देवळाणकर, सकाळ पेपर प्रा.लि.*
*४. भारताचे परराष्ट्र धोरण नवे प्रवाह,डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सकाळ प्रकाशन*
*५. संयुक्त राष्ट्रे, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्रतिमा प्रकाशन.*
*६. सार्क विद्यापीठातील दिवस, संकल्प गुर्जर, साधना प्रकाशन.*
*७. आंतरराष्ट्रीय संघटन, प्रा.श्रीकांत देशपांडे, दि.वा. इंदापवार, मंगेश प्रकाशन.*
*८. संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, जोन्सन बोर्जेस, डायमंड प्रकाशन.*

# भारत-बांगलादेश संबंध

**डॉ. शरद मधुकर कुळकर्णी**
*राज्यशास्त्र विभाग,गं.ए.टू.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव,ता. जि. धुळे. 84594 41507*

**मुख्य शब्द-** चीन, पाकिस्तान, हिंसाचार, निर्वासित, स्थलांतर.

**प्रस्तावना**-

बांगलादेश भारताचा एक महत्त्वाचा शेजारी आहे.सार्क संघटनेत भारताचा एक विश्वासू मित्र म्हणता येईल असा हा देश भारताच्या मदतीनेच स्वतंत्र झाला होता.आज जगातील भूराजकीय व्यव्हरचनात्मक आव्हाने दिवसेंदिवस क्लिष्ट होत असतांना या दोन्ही शेजारील राष्ट्रांच्या परस्पर संबंधांचे अध्ययन करणे क्रमप्राप्त आहे. भारत आणि बांगलादेश यात अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. उभय राष्ट्रांचे प्रमुख परस्परांच्या राष्ट्रंना भेटी देत आहेत. त्यातच चीन सारख्या राष्ट्राच्या प्रभावामुळे भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांवर विपरीत परिणाम सुद्धा होत आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि बांगलादेश याच्यातील संबंधाचा नव्याने अभ्यास करणे आवश्यक आहे. या शोधनिबंधात भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट -** भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांचा अभ्यास करणे.
**गृहीतक-**भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांमध्ये चांगली वृद्धी झाली आहे.
**संशोधन पद्धती-**भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून स्रोत म्हणून दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे. यात पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्र, संकेत स्थळे यांचा आधार घेतला आहे.

**विश्लेषण-**

भारताच्या पूर्वेला असलेला बांगलादेश हा भारताचा एक महत्त्वाचा शेजारी आहे. बांगलादेश हा १९४७ पूर्वी भारताचा एक अविभाज्य असा भाग होता. १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली तेव्हा बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग म्हणून भारतापासून अलग झाला.तेव्हापासुन बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग म्हणून अस्तित्वात अस्तित्वात होता. अगदी सुरुवातीपासूनच पश्चिम पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांची पूर्व पाकिस्तान बद्दल आकसाची भूमिका होती. पूर्व पाकिस्तानच्या सर्वांगीण विकासाकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलं होतं. तसंच पूर्व पाकिस्तानातील राजकीय नेतृत्वाला कुठल्याही प्रकारची संधी न देणं, नव्याने उभे राहणारे नेतृत्व नेस्तनाबूत करणे, अशी अन्याय्कारी आणि जुलुमी वृत्ती पश्चिम पाकिस्तानचे राज्यकर्ते सतत ठेवत असल्यामुळे पूर्व पाकिस्तानमध्ये व्यापक स्वरूपात असंतोष निर्माण होऊ लागला होता. पूर्व पाकिस्तानातील जनतेचा आणि तेथील राजकीय कार्यकर्त्यांचा व राजकीय नेत्यांचा सातत्याने अपमान पश्चिम पाकिस्तानमधील राज्यकर्ते करत असत. ते त्यांना सातत्याने दुय्यम

दर्जाची वागणूक देत असत. जनरल याह्याखान यांनी२५ मार्च १९७१ रोजी पूर्व पाकिस्तान मध्ये लष्करी कायदा लागू केला आणि पूर्व पाकिस्तान मधील नेत्यांची धरपकड सुरू केली. तसेच लष्कर आणि पोलिस यांनी जनतेवर अत्याचार सुरू केला. २५ मार्च १९७१ ते १६ डिसेंबर १९७१ या काळात बांगलादेशात १० लक्ष लोक ठार झाले , ३० लक्ष लोक जखमी झाले आणि एक कोटी लोक निर्वासित झाले होते.[१] हे निर्वासित भारतात स्थलांतरित झाले. या काळात अनाथ, निराधार ,बलात्कारित आणि वृद्ध यांच्या पुनर्वसनाची फार मोठी समस्या भारतासमोर निर्माण झाली. बांगलादेशातील सर्व जनजीवन विस्कळीत झाले होते. १९७० मध्ये पूर्व बंगालमध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन शेख मुजीब यांच्या अवामी लीग पक्षाला मोठे बहुमत मिळाले,असे असतांना सुद्धा पाकिस्तानचे लष्करी हुकुमशहा याह्याखान यांनी अवामी लीग कडे सत्ता हस्तांतरित करण्यास नकार दिला. उलट शेख मुजीब यांना अटक करण्यात आली. या घटनेचे तीव्र पडसाद पूर्व पाकिस्तानात उमटले.

या घटनेचा विरोध करण्यासाठी त्यांनी देशव्यापी सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. ही चळवळ दडपण्यासाठी पाकिस्तानी लष्करीने हिंसाचाराचा मार्ग अवलंबला. यामुळे पूर्व पाकिस्तानात एका मोठ्या राजकीय क्रांतीला सुरवात झाली. ही क्रांती पूर्ण स्वातंत्र्यासाठी होती. पाकिस्तानच्या लष्करी दडपशाहीमुळे या क्रांतीला हिंसक वळण लागले आणि या हिंसाचाराच्या परिणाम म्हणून निर्वासितांचे प्रचंड लोंढे भारतामध्ये स्थलांतरीत होऊ लागले. ही भारतासाठी चिंतेची बाब होती. या काळात पाकिस्तानी लष्कराने पूर्व पाकिस्तानातील ४,००,००० महिलांवर बलात्कार केले. याह्याखान यांनी सुरु केलेल्या या अत्याचारांना थांबवावे अशी विनंती भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जगातील अनेक महत्त्वाच्या देशांना भेटी देऊन केली आणि भारताची भूमिका स्पष्ट केली. भारतात एक कोटीपेक्षा अधिक लोक शरणार्थी म्हणून आले होते. त्यांच्या पोषणाचा प्रचंड खर्च भारताच्या अर्थव्यवस्थेवर पडला होता. त्यातच पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारतावर आक्रमण केले. भारताने पाकिस्तानच्या दोन्ही आघाड्यांवर प्रभावीपणे लढा दिला. युद्धाच्या चौदाव्या दिवशी १६ डिसेंबर १९७१ रोजी पूर्व पाकिस्तानात पश्चिम पाकिस्तानचे जनरल आणि पाकिस्तानचे ९०,००० सैनिक भारतीय सेनेपुढे शरण आले.पाकिस्तानचा पराभव झाला आणि पूर्व पाकिस्तानचे रुपांतर बंगलादेशात झाले. भारताने बांगलादेशाला राजनीतिक मान्यता या काळात दिली होती. शेख मजबूर रहिमान यांची मुक्तता झाली आणि जानेवारी १९७२ मध्ये शेख मुजीबुर रहमान हे नव्या राष्ट्राचे म्हणजे बांगलादेशाचे पहिले राष्ट्रपती झाले. स्वतंत्र बांगलादेशाच्या निर्मितीनंतर १९७२ मध्ये भारत आणि बांगलादेश दरम्यान सहकार्य, मैत्री आणि शांततेचा एक महत्त्वपूर्ण करार झाला. या कराराची मुदत २५ वर्षासाठी होती आणि यामध्ये एकूण बारा कलमांचा समावेश होता. या कलमांमध्ये दक्षिण आशियामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी आवश्यक तरतुदींचा आणि परस्पर स्वातंत्र्याचा आदर करणे,अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याविषयी तरतुदींचा समावेश होता.

बांगलादेशाच्या निर्मितीनंतर भारताने बांगलादेशला आर्थिक विकासासाठी मोठी मदत केली. दोन्ही देशांदरम्यान व्यापार आणि दळणवळणासाठी, नदी पाणी वाटपासंबंधी महत्त्वपूर्ण करार झाले. १९८० ते १९९० या काळात भारत - बांगलादेशचे संबंध तणावाचे होते, मात्र १९९१ नंतर भारत आणि बांगलादेश यामध्ये सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले. [२]

१९९२ नंतरच्या काळात चीन आणि बांगलादेश यांच्यातील आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. चीन हा बांगलादेशाचा आशियातील सर्वात मोठा व्यापारी भागीदार झाला. २०१६मध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी बांगलादेशला राजनीतिक भेट दिली. यावेळी त्यांच्यात सामरीक विषयांवर चर्चा झाली आणि चीन बांगलादेशात सामारीक विषयांसंबंधी करार झाले. यामुळे भारत-बांगलादेश संबंधांवर विपरीत प्रभाव पडला. चीन जगातील अनेक राष्ट्रन्मध्ये मोठी आर्थिक गुंतवणूक करून त्यांना आपल्या आर्थिक पाशात अडकविण्याचा प्रयत्न करीत आहे.चीन बांगलादेशला पण आपला अंकित करून घेण्यासाठी मोठी आर्थिक गुंतवणूक बांगलादेशाच्या तटवर्ती भागात करण्यास इच्छुक आहे. त्यातच म्यानमारमधील रोहिंग्या मुसलमानांचा त्रास बांगलादेशला होत असून ही समस्या सोडवण्यासाठी बांगलादेशला चीनच्या मदतीची गरज आहे. त्यातच चीनच्या समुद्री रेशीम मार्ग या योजनेचा आपण स्वीकार केला तर आपला आर्थिक विकास होईल अशी भाबडी आशा बांगलादेशच्या राजकीय अभिजनवर्गाला वाटते.यामुळे बांगलादेश काही प्रमाणात भारतापेक्षा चीनकडे जास्त झुकत आहे ,असे दिसून येते. यामुळे भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांवर चीनच्या अशा डावपेचांचा वाईट प्रभाव पडतो.

चीनने पूर्ण भारतीय उपखंडात आपली आर्थिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणात केली आहे.संपूर्ण दक्षिण आशियात जागतिक विषयांच्या संदर्भात आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी चीन आपले आर्थिक संसाधने आणि आर्थिक सत्ता मोठ्या प्रमाणात वापरण्याचा प्रयत्न करीत आहे. दक्षिण आशियामधील राष्ट्रांच्या बंदरांचा विकास करून आपली मोहीम फत्ते करण्याचा चीनचा विचार आहे. या माध्यमातून भारताला चारही बाजूंनी घेरण्याची चीनची सामरिक व्युव्ह नीती आहे. यामुळे भारताची चिंता वाढली आहे. त्यातच बांगलादेशच्या विकासात असलेला चीनचा सहभाग येथील लोकांना प्रशंसनीय वाटत असतो कारण भारतासारख्या प्रबळ राष्ट्राशी सत्ता संतुलन ठेवण्यासाठी चीन सारखे राष्ट्र आपल्याला उपयोगी पडेल असे तेथील जनतेला वाटत असते. त्यामुळे बांगलादेशातील राजकीय अभिजन आणि काही विचारवंत बांगलादेशचे चीन बरोबर असलेले संबंध सुधारले पाहिजे आणि टिकून राहिले पाहिजे या विचारांचे आहेत. या सर्व बाबींचा भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांवर विपरित परिणाम होत असतो. श्रीलंकेसारखी बांगलादेशची स्थिती होऊ नये व बांगलादेश चीनच्या आर्थिक सापळ्यात सापडून नये असे सुद्धा तेथील काही विचारवंतांना वाटत असते.त्याचा मात्र भारतासाठी सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

६ जून २०१५ रोजी पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी बांगलादेशाला भेट दिली. त्यावेळी उभय राष्ट्रात २२ करारांवर सह्या झाल्या. यामुळे दोन्ही देशातील संबंध सुधारण्यास मदत झाली.३ तसेच ३१ जुलै २०१५ च्या मध्यरात्री १२ वाजता दोन्ही राष्ट्रांच्या सीमेवरील वादग्रस्त १६२ वस्त्यांमधील सुमारे ५०,००० लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे भारताचे किंवा बांगलादेशाचे नागरिकत्व देण्यात आले आणि स्थलांतर करण्याची परवानगी देण्यात आली .या बाबतीत करार ६ जून २०१५ रोजी झाला होता ,त्या कराराची अशा रीतीने पूर्तता करण्यात आली.[४] या करारानुसार १५१९३ लोकांना भारताचे नागरिकत्व देण्यात आले.[५] पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९७४ पासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडविला.यामुळे भारताचे बांगलादेशा बरोबरचे संबंध सुधारण्यास गती मिळाली असे दिसून येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ मार्च २०२१ मध्ये बांगलादेशला भेट दिली यामुळे भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांना पुन्हा उजाळा मिळाला आहे.६ केवळ चीनच्या नादी लागून भारताला दुखवणं आपल्याला परवडणार नाही याची जाणीव बांगलादेशला आहे . बांगलादेशलातील नागरिकांचे भारताबद्दलचे मत चांगले झाले पाहिजे.हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ लाख कोरोनाप्रतिबंधक लसींचे डोस व १०९ जीवनरक्षक ॲम्ब्युलन्स पंतप्रधान हसिना यांच्याकडे प्रतिकात्मकरित्या सोपविल्या. या सर्वांचा परिणाम भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यात होईल ,अशी आशा वाटते. भारत आणि बांगलादेशमधील समस्या आणि वाद हे 'सोडवता येणारच नाही' अशा प्रकारचे नाहीत. घुसखोरी व नद्यांच्या पाणीवाटपाबाबत सुरू असलेला वाद अधिक त्रासदायक आहे. आतापर्यंत घुसखोरीचा प्रश्न कठीण होता कारण घुसेखोरीचा भारत करीत असलेला आरोप त्यांना मान्य नव्हता मात्र बांगलादेशने आता हे समजण्यास सुरवात केली आहे की त्याचे नागरिक बेकायदेशीरपणे भारतात जात आहेत. बांगलादेश एनआरसी कायद्या बाबत चिंता व्यक्त करत असला तरी, बांगलादेशाने ही भारताची अंतर्गत बाब असल्याचे सांगून वाद टाळला आहे. दहशतवाद आणि रोहिंग्या निर्वासितांच्या समस्येने दोन्ही देश त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत दोन्ही देश केवळ परस्पर समन्वय आणि व्यापक सहकार्यानेच भविष्यात परस्पर संबंधांना नवीन परिमाण देऊ शकतात.[७]

**निष्कर्ष :**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध आज एका चांगल्या उंचीवर येऊन पोहोचले आहेत. १९७१ मध्ये भारताने पाकिस्तानच्या जोखडा मधून बांगलादेशला मुक्त केले. तेव्हापासून भारत आणि बांगलादेश या दोन्ही राष्ट्रांमधील संबंध मधला काही काळ वगळला तर चांगलेच असल्याचे दिसून येतात. बांगलादेशातील रहिवासी अनेक वेळा भारतात घुसखोरी करतात यामुळे दोन्ही देशांमध्ये नेहमी विसंवाद होत होता मात्र या विसंवादाने कधीही वाईट रूप धारण केले नव्हते .चीन सारख्या प्रभावी राष्ट्रांनी बांगलादेश बरोबर राजनीतिक संबंध निर्माण केल्यामुळे त्याचा वाईट प्रभाव भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांवर पडत असतो मात्र भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे आणि करत असलेल्या कार्यामुळे दोन्ही देशांचे संबंध सुरळीत झाले आहेत.

**संदर्भ-**

*नाईकवाडे, प्रा. अशोक- भारताचे परराष्ट्र धोरण -स्टडी सर्कल फोर कॉम्पिटिटिव्ह करियर्स मुंबई .पा. नं.132 -133*
*देवळानकर, डॉ. शैलेंद्र - भारतीय परराष्ट्र धोरण: सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे -30 . पा. नं. 201*
*The Hindu the 06.06.2015*
*The Times of India 01.08 2021*
*International Business Times 01 08 201*
*सकाळ-२७.०३.२०२१.*
*जनसत्ता – संपादकीय ३० ०३.२०२१*

# भारत – बांग्लादेश संबध

**एन. आर. कन्हाके**
*सावित्रीबाई फुले महिला, महा. वाशीम.*

२५ मार्च १९७१ मध्ये पाकिस्तानने पूर्व-पाकिस्तानात लष्करी कायदा पुकारून पूर्व-पाकिस्तानातील मुस्लीम समुदायाचा कत्ल केल्या गेला. भारत-पाकिस्तान युद्ध ०३ डिसेंबर १९७१ ते १६ डिसेंबर १९७१ दरम्यान झाले. या युद्धात स्वतंत्र बांग्लादेशाची घोषणा केली. १६ डिसेंबर नंतर बांग्लादेश प्रत्यक्ष गणराज्य स्थापन झाले. या देशात तांदूळ, ऊस, गहू, डाळी आणि चहाचे मळे ही पिके घेतल्या जाते. या देशाच्या शेजारी आसाम, मेघालय, त्रिपुरा, मेझोराम हे प्रामुख्याने भारतातील राज्य आहे. तर ब्रम्हदेश राष्ट्र सुद्धा शेजारी आहे. दक्षिण दिशेला बंगालचा उपसागर आहे. १९८८ च्या महापुरात दोन लक्ष ७५ हजार लोक ठार झाले. बांग्लादेशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) व राष्ट्रीय उत्पन्न (GNP) कमी आहे.

संरक्षण क्षेत्रात १९८९च्या आकडेवारीनुसार सैन्यात ९० हजार भूदलात ७ हजार ५ शे. तर नाविक दलात ४ हजार सैनिक व अधिकारी होते. निमलष्करी दलाची संख्या ५५ हजार होती, रणगाडे, लढाऊ विमाने, लढाऊ नौका याची संख्या अतिशय कमी आहे. थोडक्यात बांग्लादेशाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सैनिकी अवस्था अत्यंत गंभीर आहे.

## 1. लाहोर अधिवेशनात पाकिस्तानची मागणी

बांग्लादेशात याचे १९७१ मध्यस्वतंत्र संग्राम सुरू झाला तरी त्याची बिजे पाकिस्तान निर्मितीच्या पूर्वी मुस्लीम व्दिराष्ट्रवादाच्या संकल्पेत आढळून येताना दिसतो. १९३३ मध्ये केंब्रिज विद्यापिठातील विध्यार्थ्याने पाकिस्तान हा शब्द प्रचारात आणला. त्यामध्ये पंजाब, वायव्य सरहद प्रांत, काश्मीर सिंध व बलुचिस्तान हे प्रदेश सूचित केले होते. असे स्पष्टीकरण चौधरी रहमत अल्ली यांनी दिले. म्हणजे पूर्व पाकिस्तान याचा नामउल्लेख नव्हता.

## 2. बांग्लादेशाची स्वतंत्र मागणी

१९४७ मध्ये भारताच्या विभाजनाची योजना पुढे आलि. त्यावेळीच बंगालचे मुख्यमंत्री सु-हावर्दी यांनी बंगालसाठी स्वतंत्र राज्याची मागणी केली होती. पाकिस्तानचे प्रमुख बैरीस्टर अहमद अली जीना आणि पहिले प्रधानमंत्री लियाकत अली यांनी बंगाली आणि पंजाबी भाषीक राजकारणाला संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु कालांतराने जिनानी सर्व पाकिस्तानची भाषा उर्दू ही राजभाषा असावी अशी भुमिका घेतल्याने पूर्व पाकिस्तानात प्रचंड विरोध बंगाली झाला आणी बंगाली भाषिकांना देशाचे शत्रू मानले जाईल असे सांगितले.या भाषीक विवादाला शेख मुजिबुर रहमान यांनी विरोध दर्शवून राजभाषेचा दर्जा मिळावा या साठी आंदोलन सुरु केले. पूर्व पाकिस्तानाल भाषीक आधारावर मुस्लीम लीग या पक्षाला

जास्त प्रतिनिधित्व मिळाले नाही तर अवामी लीग या पक्षाला प्रचंड बहुमत प्राप्त झाले. त्यामुळे पश्चिम पाकिस्तानी लोकांना हे सहन झाले नाही.

**३. पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तानात संघर्ष**

पश्चिम पाकिस्तानात झुल्फिकार अली भुट्टो याच्या पिपल्स पार्टीला ८८ प्रतिनिधी निवडून आल्याने मंत्रिमंडळात अर्ध्या जागाची मागणी केली. अवामी लीगने शासनात सहभागी करून घेण्यास नकार दर्शविला. त्यामुळे लष्करी प्रशासनाने सत्ता देण्यास नकार दर्शविल्याने अवामी लीगच्या प्रमुखांनी असहकार आंदोलन सुरु केले. शेख मुजिबुर रहमान आणि लष्कर प्रमुख याह्याखान यात वाटाघाटी अयशस्वी ठरल्या, तणाव वाढला, संघर्ष निर्माण झाला आणि लष्करी कायदा पुकारण्यात आला. अपरिमित हाणी झाली अत्याचार सुरु झाले, सार्वत्रिक कत्ली झाल्या पूर्व पाकिस्तानने स्वतःचे स्वतंत्र गणराज्य घोषित करून स्वातंत्र्य युद्धाला सुरुवात केली.

**४. पूर्व पाकिस्तानचे शोषण आणि पश्चिम पाकिस्तानाचा विकास**

१९७१ पूर्वी पाकिस्तानात १५०० कोटी रुपया महसुली खर्च व ३००० कोटी रुपया विकास खर्च केला. या उलट पश्चिम पाकिस्तानात याच कार्यासाठी ९००० कोटी रुपया व ६००० कोटी रुपये खर्च करण्यात आले विदेशी मदत द्वारे २०% पूर्व पाकिस्तानात तर ८०% रक्कम पश्चिम पाकिस्तानात खर्च करण्यात येत असे त्यामुळे विकासाची गती कमी अधिक प्रमाणात दिसत असे बँका, उद्योग धंदे, बिमा कांपन्या, औद्योगीकरण, आयत निर्यात,लष्करी खर्च प्रशासकीय सेवा यामध्ये बरीच तफावत निर्माण केली.

**५. आर्थिक शोषण**

प्रशासकीय आणि लष्करी नोकरीत बरीच भेदात्मक वृत्ती जोपासली सचिव सहसचिव व उपसचिव हे पश्चिम पाकिस्तानातले होते त्यामध्ये फक्त ५१ अधिकारी हे पूर्व पाकिस्तानातले होते. बॉरिस्टर जीन्हा याच्या मृतुनंतर व लियाकत अलीच्या खुनानंतर पाकिस्तानच्या राजकारणात एच.एस. सुन्हावर्दी ख्वाजा नझिमुद्दीन व मंहमद अली बोग्रा हे तीन पंतप्रधान पूर्व पाकिस्तानातील झाले पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानात एकात्मता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले पण लष्करी राजवटीत शोषणाला सुरुवात झाली. या शोषणाला विरोध करण्यासाठी मौलाना भाशानी सार्वत्रिक संप सुरु केला आणि अन्यायाविरुद्ध लढा उभारला. त्याविरुद्ध लष्करी कायदा पुकारला. भीषण अत्याचार बलात्कार व कत्तली खूप मोठ्या प्रमाणात केल्या गेल्या. या दंगलीत ३ लाख लोक ठार झाले व ९० लाख लोक भारतात आश्रयास आले त्यामुळे बांग्लादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामात भारताचा सहभाग अपरिहार्य ठरला.

**बांग्लादेश स्वतंत्रसंग्राम व भारताचा सहभाग**

९० लाख निर्वासितांना पाकिस्तानने परत घ्यावे यासाठी वाटाघाटी सुरु केल्या परंतु पाकिस्तानने मान्य केले नाही जागतिक स्तरावर सुद्धा या समस्येचे निराकरण झाले नाही, अखेर ३ डिसेंबर १९६९ ला पाकिस्तानने भारतावर हवाई हल्ले करून प्रत्यक्ष युद्धास सुरुवात केली. बांग्लादेश होणे हे भारताच्या हिताचे होते.

**उद्दिष्टे**

१. बांग्लादेश स्वतंत्र झाला तर संकटे (पूर्व पाकिस्तान ) नष्ट होतील.
२. पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नात घट होऊन २४० कोटी रु.ची बाजारपेठ नष्ट होईल.
३. भारतासाठी संरक्षणात्मक कवच निर्माण करण्यासाठी म्हणजे आसाम,मेघालय, नागालँड, मणिपूर, मेझोराम, अरुणाचल व त्रिपुरा हे पूर्व भारतातील राज्य संरक्षणात्मक दृष्ट्या फायदेशीर राहील म्हणून बांग्लादेशाचे स्वतंत्र महत्त्वाचे होते.
४. बांग्लादेश स्वतंत्र झाला तरी दीर्घकाळ कमकुवत राहील आणि भारताला कोणताही धोका निर्माण होणार नाही.
५. मुस्लीम एकत्मवादाचे आधार घेऊन काश्मीर भूभागावर हक्क सांगण्याला खीळ बसेल.
६. निर्वासित्ताच्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी भारताची वाटाघाटीचीभूमिका अयशस्वी ठरली त्यामुळे युद्ध हे अटळ ठरले.

**बांग्लादेशासाठी भारताचे योगदान**

**१. अनन्वीत अत्याचार**

२५ मार्च १९७१ ते 16 डिसेंबर १९७१ या १० महिन्याच्या कालवधीत पूर्व पाकिस्तानात १० लक्ष ठार झाले, ३० लख लोक जख्मी झाले अनाथ, निराधार, बलात्कार झालेल्या स्त्रिया, बाल्के व इतर पीडित असे ९० लक्ष निर्वासीत झाले होते.

**२. युद्धातील नुकसान**

बंग्लादेशाच्या युद्धात अन्नसाठी घरे, गुरेढोर, कृषी अवजारे, कच्चामाल, कारखाने, चहा, उसाचे मळे यांचा प्रचंड विध्वंस झाला होता ५० मैल रेल्वे मार्ग व त्यावरील २९६ पुले ४८ रेल्वे स्थान, ९००० रेल्वे डब्बे आणि पटना, मेघना, तिस्ताव ब्रह्मपुत्रा या नद्यावरील पुले ध्वस्त करण्यात आल. देशातिले ३००० ट्रक २५०० बसेस रस्त्यावरील २७४ पूल ६६ नौकाफेरी नष्ट करण्यात आल्या बरेच बंदरे नष्ट केल्या गेली. पूर्व पाकिस्तानातील ६५% निर्यात पश्चिमपाकिस्तानात होत होत. बाजारपेढा नष्ट झाल्या होत्या UNO च्या अंदाजानुसार १३०० कोटी रुपयाची आर्थिक विनाशाला सामोरे जावे लागले.

**३. भारताकडून बांग्लादेशाला मदत**

बंग्लादेशाच्या पुनवर्सनासाठी जीवनावश्यक वस्तु पुरविण्यासाठी अनुदान स्वरुपात १३६.५६ करोड रोख रक्कम दिली तर ३३.६० कोटी रुपया कर्जाच्या स्वरुपात दिल्या गेली. इतर पाश्चिमात्य राजांनी त्या देशाला ९७२.६० कोटी रुपया मदत देण्याचे आश्वासन दिले. भारताची मदत कमी दिसत असली तरी अमेरिकेच्या पाठिमागे ही मदत तरी बांगलादेश-भारत संबंधचिरकाल कायम राहावे यासाठी भारत सतत प्रयत्नशील असतात.

**संदर्भ :-**

*१. भारतीय विदेश नीती*
*- प्रा. डॉ. चंद्रशेखर दिवाण*
*२. प्रचलित विदेशनीती*
*- शेख हाशीम आणि गवई*
*३. वृत्तपत्रे*

# भारत — पाकिस्तान संबंध एक अभ्यास

**प्रा. महादेव उत्तम तोंडे**

*विभाग प्रमुख — संरक्षणशास्त्र विभाग, धनदाई कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगाव, महाराष्ट्र पीन — ४२५४०१ E-mail- mahadevtonde07@gmail.com*

**प्रस्तावना :—**

१५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र प्राप्त करतानाच भारताचे झालेले विभाजनही स्वीकारावे लागले भारताच्या अनैसर्गिक अशा फाळणीतुन पाकिस्तान नावाचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाले. आणि या दोन्ही राष्ट्रांत वितुष्ट निर्माण झाले. आणि ते वितुष्ट पुढे कायमच राहिले. ७ व ८ डिसेंबर १९८५ ला बांग्लादेशाची राजधानी 'ढाका' येथे भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, भुतान, श्रीलंका आणि मालदीवच्या राष्ट्रप्रमुखांची बैठक होऊन ''सार्क'' या संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशियायी राष्ट्रांची सामुहिक शक्ती जगापुढे यावी तसेच या सर्व राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि राजकीय व सर्व प्रकारचे सहकार्य प्रस्थापीत व्हावे हा ''सार्क'' च्या स्थापनेमागील मुख्य उद्देश होता. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, भुतान, नेपाळ, मालदीव तसेच २००७ ला अफगाणिस्तान हा देश सार्क संघटनेचा सदस्य बनला. परंतु दुर्दैवाने आजपर्यंतचा ही विचार केला तर भारत आणि पाकिस्तानचे संबंध चांगले राहिलेले नाहीत हेच दिसुन येते.

**संशोधनाचा उद्देश :—**

१. भारत — पाकिस्तान यांच्यातील युध्दांचा अभ्यास करणे.
२. पाकिस्तानच्या काश्मिर संबंधी भूमीकेचा अभ्यास करणे.
३. भारताच्या काश्मिर संबंधी भूमिकेचा अभ्यास करणे.
४. भारताचे परराष्ट्र धोरण आणि पाकिस्तान संबंधाबाबत सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :—**

भारत — पाकिस्तान संबंध याचा अभ्यास करण्यासाठी ''सामान्याकडुन विशेषीकरणाच्या संशोधन'' पध्दतीचा उपयोग केला आहे. त्यासाठी विश्लेषणात्मक पध्दतीने साधन चिकित्सा केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात लागणारी माहिती ही दुय्यम साधनातील (Secondary Data) आहे. यात प्रामुख्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीवर प्रकाश टाकणारे ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेट इ. साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारत — पकिस्तान यांच्यातील युध्दे :—**

भारत—पाकिस्तान संबंधाचा अभ्यास करताना भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या युध्दांचा अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे ठरते त्याशिवाय भारत—पाकिस्तान संबंधाचा अभ्यास पूर्ण होऊच शकत नाही. भारत—पाकिस्तान यांच्यात झालेली युध्दे थोडक्यात पुढील प्रमाणे.

**१. भारत — पाकिस्तान युध्द (१९४७) :—**

ऑगस्ट १९४७ ला भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाले. काश्मिरचा राजा हरिसिंग यांनी मात्र भारत किंवा पाकिस्तान यांच्यात विलीन न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. परंतु २२ ऑक्टोबर

१९४७ या दिवशी पाकिस्तानातुन आलेल्या जवळ जवळ ५००० हल्लेखोरांनी काश्मीरवर उघड उघड आक्रमण केले. तेव्हा राजा हरिसिंगानी भारताच्या सामिलनाम्यावर स्वाक्षरी केली व भारताकडे मदत मागितली. तेव्हा भारतीय सैन्य काश्मीरच्या मदतीस धावुन गेले. या युध्दात भारताचा विजय झाला. पण तेव्हापासून तर आजपर्यंत पाकिस्तानने काश्मीर प्रश्नावरून भारताशी संघर्षपूर्ण संबंध ठेवले आहेत.

**२. भारत — पाकिस्तान युध्द (१९६५) :—**

सप्टेंबर १९६५ मध्ये झालेले २२ दिवसांचे भारत—पाकिस्तान युध्द ही दक्षिण आशियातील एक महत्वपूर्ण घटना मानली जाते. या युध्दात सुध्दा भारताचाच विजय झाला. पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासुन पाकिस्तानने भारतीय उपखंडातील शांतता धोक्यात आणण्याचे नेहमी प्रयत्न केले. २२ सप्टेंबर १९६५ ला अखेर युध्द बंदी झाली. आणि युध्द थांबले.

**३. भारत—पाकिस्तान युध्द (१९७१) :—**

तत्कालीन,पुर्व पाकिस्तानची जवळ जवळ ७.५ कोटी जनता रहेमान यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपती याह्या खानाचा निषेध करून स्वतंत्र बांग्लादेशची मागणी करू लागले. या आव्हानास उत्तर म्हणुन पाकिस्तानने बळाचा वापर करण्याचा प्रयत्न केला यातुन लाखो बांग्लादेशी भारतात आले आणि त्याचा विपरीत परिणाम भारतावर होवु लागला. यातुनच ३ डिसेंबर १९७१ रोजी प्रत्यक्ष युध्दाला सुरूवात झाली. भारतीय सैनिकांनी चारही दिशांनी गतिमान चढाई करून ढाक्यावर झेप घेतली आणि भारतीय विमानांनी ढाक्याच्या परिसरात जबरदस्त बॉम्ब वर्षाव सुरू केला. हे युध्द ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर १९७१ या कालावधीत लढले गेले. यात भारताचा दणदणीत विजय झाला व पाकिस्तानने शरणागती पत्करली आणि यातुन स्वतंत्र बांग्लादेशची निर्मिती झाली. ही ऐतीहासीक आणि महत्वपूर्ण अशी घटना होती.

**४. कारगिल युध्द (१९९९) :—**

९ मे १९९९ ला भारतीय सैन्यास जम्मु—काश्मीरच्या कारगिल क्षेत्रात घुसखोरी झाल्याचे सर्वप्रथम आढळुन आले. तेव्हा कारगिल क्षेत्रातील महत्वाच्या भागावर भारतीय हवाईदलाने व पायदळातील बोफोर्स तोफांच्या साहयाने हल्ला चढविला गेला. तोफखान्याच्या सतत आणि अचुक माऱ्यामुळे उंच उंच टेकड्या हस्तगत करण्यास भारतास मदत झाली. त्यात बटालीक, द्रास, तोतोलिंग, जुबार हिल्स, टायगर हिल्स या टेकड्या भारतीय जवानांनी हळुहळु आपल्या ताब्यात घेतल्या. अशा प्रकारे कारगिल युध्दात भारताचा दणदणीत विजय झाला. तेव्हापासून २६ जुलै हा कारगिल विजय दिवस म्हणुन साजरा केला जातो.

अशा प्रकारे भारत—पाकिस्तान यांच्यात झालेल्या सर्वच युध्दात भारताचा विजय झालेला आहे आणि पाकिस्तानचा पराभव झालेला आहे. आणि या पराभवाचे शल्य कायमच पाकिस्तानच्या मनात आहे.

**भारत—पाकिस्तान यांच्यातील काश्मीर समस्या :—**

भारत—पाकिस्तान यांच्यात झालेल्या सर्व युध्दाचे मुख्य कारण म्हणजे काश्मिर समस्या आहे. आणि या काश्मीर बाबतची पकिस्तानची आणि भारताची भूमीका पुढील प्रमाणे आहे

**पाकिस्तानची काश्मिर संबंधी भूमिका :—**

पाकिस्तानने काश्मिरच्या भुप्रदेशावर आपला हक्क सांगताना ''युनो'' च्या सुरक्षा समीतीत पुढील मुद्दे उपस्थित केले.

१. काश्मिर मध्ये बहुसंख्य जनता मुस्लीम आहे. त्यांचे हीत व संरक्षणाच्या दृष्टीने त्यांचा पाकिस्तानात समावेश होणे आवश्यक आहे.
२. भारत—पाकिस्तान फाळणी पुर्वी काश्मिरचा पाकिस्तानशीच जास्त जवळचा संबंध होता.
३. पाकिस्तानला संरक्षणाच्या दृष्टिने प्रबळ होण्यासाठी काश्मीरचा भु—भाग मिळणे आवश्यक आहे.
४. भौगोलिक दृष्ट्या काश्मिरचे पाकिस्तानच्या दृष्टीने अधिक महत्व आहे कारण, रावी, चिनाब, झेलम, सतलज या नद्या काश्मीरमधुन वाहतात. व पाकिस्तानचा आर्थिक विकास या नद्यावरच अवलंबुन आहे.

**भारताची काश्मीरसंबंधी भूमिका :—**

१. काश्मिरचे १९४७ मध्ये तेथील राजा हरिसींग यांच्या इच्छेनुसार भारतात पुर्णपणे विलीनीकरण झालेले आहे. तेव्हापासुन काश्मिर हा भारताचाच अविभाज्य भाग झालेला आहे.
२. काश्मिरमध्ये बहुसंख्येने मुस्लिम असले तरी १० लाखांच्या वर हिंदु असुन तेथील प्रशासक सर्व हिंदुच होते म्हणुन काश्मिरचे भारतात झालेले विलीनीकरण योग्यच आहे.
३. युध्द नैतिक व संरक्षणाच्या दृष्टीने काश्मिरचा प्रभाव भारतावर अधिक पडतो त्यामुळे या प्रदेशाचे पाकिस्तानमध्ये विलीनीकरण करणे म्हणजे भारताच्या सुरक्षेला धोका पोहचविण्यासारखे आहे.
४. भारतात काश्मिर विलीन झाल्यापासुन जम्मु—काश्मीरचा सर्वांगिण विकास होत आहे.
५. काश्मीरमधसुन वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचा वापर पुर्णपणे भारतच करेल हा पाकिस्तानचा विचार निराधार आहे. कारण, आंतरराष्ट्रीय समझोता सिध्दांतानुसार हा प्रश्न सोडविता येतो.

अशा प्रकारे काश्मिरचे योग्य समर्थन करून भारताने पाकिस्तानचे उपस्थित केलेले सर्व मुद्दे खोडुन काढले आणि जम्मु—काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे हे स्पष्ट केले. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कलम ३७० रद्द करून सर्व जगाला ते दाखवुनही दिले.

**भारताचे परराष्ट्र धोरण आणि पाकिस्तान संबंधाबाबत सद्यस्थिती :—**

भारताचे परराष्ट्र धोरण किंवा विदेश निती ही भारतीय संस्कृती आणि आदर्शाच्या मूलभुत सिध्दांतावर आधारित आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दीष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत

१. गट निरपेक्षतेचे धोरण
२. जागतिक शांततेची स्थापना
३. शीतयुध्दाचा विरोध
४. साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला विरोध
५. आंतरराष्ट्रीय विवादांची शांततापूर्ण सोडवणुक
६. आंतरराष्ट्रीय संघटनांचे समर्थन
७. वर्णव्देषाचा विरोध
८. नि:शस्त्रीकरणाचे समर्थन
९. शेजारी देशांशी मैत्रीपुर्ण संबंध
१०. दहशतवादाचे निर्मुलन

अशा या वरील सर्व घटकांवर आधारीत भारताचे परराष्ट्र धोरण आह किंवा हे वरील सर्व भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दीष्ट्ये आहेत. यातुन भारताने शांतता, सहकार्य, विकास, समस्यांची शांततेच्या मार्गाने सोडवणुक, जगातुन दहशतवाद नष्ट व्हावा या बाबींवर भर दिलेला आहे हे स्पष्ट होते.

भारत आणि पाकिस्तानच्या संबंधाबाबत विचार करता हे स्पष्ट दिसते की भारत हा सुरुवातीपासुन शांततेच्या, सहकार्याच्या मार्गाने जात आहे तसेच दहशतवादाचा बिमोड करणे हे भारताचे धोरण आहे. तर पाकिस्तानचे धोरण हे भारताच्या अगदी विरुध्द असे आहे. पाकिस्तान वारंवार दहशतवादाला खतपाणी घालत आहे. आणि भारतात दहशतवादी पाठवुन घातपात घडवत आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरु तसेच लाल बहादुर शास्त्री, इंदिरा गांधी, अटल बिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग या भारतातील सर्व पंतप्रधानांचा विचार केला तर सर्वांनी पाकिस्तान सोबत संबंध सुधारावेत असाच प्रयत्न केलेला आहे. परंतु पाकिस्तान काही सुधारण्याचे नाव घेत नाही. आणि त्यातुनच पाकिस्तानने भारता बरोबर १९४७, १९६५, १९७१ आणि कारगिल युध्द (१९९९) अशी चार युध्द केली आणि या सर्व युध्दात पाकिस्तानचा दारुण पराभव झाला आणि भारताचा विजय झाला. याचे शल्य पाकिस्तानच्या मनात कायमच आहे आणि याच सुडबुध्दीतुन पाकिस्तानने दहशतवादाला जास्तच खतपाणी घालण्यास सुरुवात केली आहे.

पाकिस्तानने भारतात घडविलेले काही प्रमुख दहशतवादी हल्ले पुढील प्रमाणे आहेत.

१. १९९३– मुंबई बॉम्बस्फोट
२. २००१– श्रीनगर असेंब्लीवर हल्ला
३. २००१ – भारतीय संसदेवर हल्ला.
४. २००२ – अक्षरधाम मंदिरावर हल्ला.
५. २००४ – आसाम येथे बॉम्बस्फोट
६. २००६ – मुंबई लोकल रेल्वेत बॉम्बस्फोट
७. २६ नोव्हेंबर २००८ – मुंबई ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल दहशतवादी हल्ला.
८. २०१० – पुणे जर्मन बेकरीत बॉम्बस्फोट
९. २०१६ – पंजाब मधील पठाणकोट दहशतवादी हल्ला
१०. २०१९ – पुलवामा दहशतवादी हल्ला.

हे वरील सर्व दहशतवदी हल्ले आणि भारतासोबत पाकिस्तानने लढलेले सर्व युध्दे यांचा विचार करता पाकिस्तानचे धोरण कसे आहे हे स्पष्ट होते. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही पाकिस्तानसोबत संबंध सुधारण्याचे वारंवार प्रयत्न केले पण त्यालाही यश आलेले दिसत नाही. भारताने ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू.काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे कलम ३७० रद्द केले आणि पुन्हा पाकिस्तानचा जळफळाट झाला. तसेच भारताची अमेरीकेशी वाढणारी जवळीकता पाहुन पाकिस्तानने चिन सोबत जवळीकता करुन भारताची सुरक्षितता कशी धोक्यात आणता येईल याचा वारंवार प्रयत्न पाकिस्तान करत आहे. आणि त्यामुळे सद्या भारताने चीन आणि पाकिस्तान या आपल्या दोन्ही सिमा मजबुत केल्या आहेत आणि राफेल लढाऊ विमानामुळे भारत लष्करी दृष्ट्या आणखी जास्त सक्षम बनला आहे.

**निष्कर्ष :–**

भारत आणि पाकिस्तान हे सार्क संघटनेतील महत्वपुर्ण देश आहेत. आणि सार्क संघटनेचे जे उद्दिष्ट्ये आहेत. ते म्हणजे सार्क मधील देशांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक वैज्ञानीक विकासाला चालना देणे. सार्क मधील देशांच्या जिवनमानात सुधारण घडवुन आणने, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर एकमेकांना सहकार्य करणे परंतु सार्कची ही उद्दीष्टे पुर्ण होण्यासाठी भारत–पाकिस्तान यांच्यात असणारे तणापुर्ण संबंध अडथळा ठरत आहेत. तसेच पाकिस्तानने भारतातील दहशतवादी कारवाया तात्काळ बंद करणे गरजेचे आहे. तसेच सिमेवरील शस्त्रसंधीचे उल्लंघन करणे ही पाकिस्तानने बंद करणे अत्यावश्यक आहे. आणि भारतासोबतचे संबंध पाकिस्तानने सुधारावेत जेणेकरुन सार्कमधील देशांचा विकास होईल आणि सार्कची उद्दीष्टये पुर्ण होण्यास मदत होईल. आणि भारत पाकिस्तान यांच्यातील संबंध सुध्दा सुधारतील.

**संदर्भ सूची :–**


१. *भारताचे परराष्ट्रीय धोरण– डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०१५*
२. *भारताची राष्ट्रीय सुरक्षा– प्रा. ए. पी. चौधरी, अर्चना चौधरी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००३*
३. *२१ व्या शतकातील दहशतवाद– प्रा. म. न. उदगावकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे–२००९*
४. *अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध – डॉ. बी. एल. फडिया, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा–२००९*
५. *अन्तर्राष्ट्रीय राजनीती– डॉ. बी. एल. फडिया, साहित्य भवन पब्लिकेशन– आगरा – २००९*

# भारताच्या दृष्टीकोणातून — सार्क

**प्रा. चंद्रकांत. एन. पुरी (राज्यशास्त्र विभाग)**
*श्री.दत्त कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगांव,ता.हदगावं जि.नांदेड*
*मो.नंबर ९०२१०५०२३२*

**दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (South Asion Association For Regional Cooperation (SAARC) ) (संक्षिप्त नाव : सार्क) ही दक्षिण आशिया खंडातील ८ (आठ) देशाची एक अर्थिक व राजकिय सहयोग संघटना आहे.**

**१) प्रस्तावना :—**

सार्क ची स्थापना ७—८ डिसेंबर १९८५ ढाका (बांगलादेश) येथे दक्षिण आशियातील सात देशांच्या राष्ट्रप्रमुखच्या संम्मेलनात झाली. या संघटनेच्या मुळ सदस्यात भारत,पकिस्तान,बांगलादेश,नेपाळ,श्रीलंका,भूटान व मालदिप हे देश होते. तर २००७ च्या सार्कच्या १४ व्या संम्मेलनात अफगानिस्थानला सदस्य राष्ट्र म्हणुन मान्येता देण्यात आली. ही दक्षिण आशियामधील पहिली अशी संघटना आहे की, तीने जागतीक राजकारणात प्रादेशिक सहकार्याची सुरूवात केली. आपआपसातील मतभेद विसरून सर्व शेजारील राष्ट्रातील सहयोग वाढवून विकासाकडे वाटचाल केली पाहिजे. हया उद्देशाने या प्रादेशिक संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशियाची एक प्रादेशिक संघटना असावी हा विचार सर्व प्रथम बांगलादेशाचे पुर्व राष्ट्रपति जिया उर रहमाण यांचा होता. त्यांनी १९८० च्या आसपास भारत,पकिस्तान,बांगलादेश,नेपाळ,श्रीलंकाची यात्रा करून या संघटनेचे महत्व पटवुन दिले. व राजीव गांधी यांच्या प्रयत्नातुन सार्कची निर्मीती झाली.

**संशोधन पध्दती व तथ्य संकलन :—**

प्रस्तुन शोध निंबधासाठी ऐतिहासिक व अन्वेशात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग केलेला आहे. त्यासाठी दुयम तथ्ये संकलन पध्दतीचा उपयोग केलेला आहे. दुयम तथ्य संकलनासाठी मराठी,इंग्रजी,हिंदी भाषेतील वर्तमान पत्रे, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके,इंटरनेट सेवा इत्यादी माध्यामांचा व दुरचित्रवाहीनीतील विविध वाहिन्याचा तथ्य संकलनासाठी उपयोग केलेला आहे.

**अध्यायनाची उदिष्टये :—**

१) सार्कच्या सदस्य देशासमोरील सारख्या समस्येचा आभ्यास करणे.
२) सार्कच्या विकासातील अडथळा निर्माण करण्या—या बाबीचा आभ्यास करणे.
३) सार्क मुळे भारताला होणा—या फायदयाचा (सहयोगाचा) अभ्यास करणे.
४) जागतिक राजकारणात सार्कचे महत्व अभ्यासने.

**अध्यायनाची गृहीतके :—**

१) सार्कमध्ये भारताचे महत्व इतर राष्ट्राच्या तुलणेत जास्त आहे.

२) सदस्य राष्ट्रा समोरील समस्या हया सारख्या आहेत.

३) सार्कच्या इतर संघटनंच्या तुलनेत विकास नगन्येच आहे.

४) भारताच्या परराष्ट्र धोरणात सार्कचे महत्व खुप आहे.

**१) सार्क मध्ये भारताची महत्वपुर्ण भुमिका :—**

सदस्यामध्ये भारत हा क्षेत्रफळानेच नाही तर लोकसंख्या व अर्थ व्यवस्थेच्या बाबत ७० टक्के भागीदार आहे. सार्क सदस्या देशाबरोबर भारताचा व्यापार हा १७.५ बिलीयन डॉलर्स निर्यात व २.५ बिलीयन डॉलर्स हा आयात आहे (२०१४)

त्याच बरोबर भारत हा सदस्य राष्ट्रा सोबत अनेक क्षेत्रामध्ये सहयोग पण करतो. नेपाळ, भूटान या देशाला तर भारताकडून सर्वात जास्त सहकार्य सर्वच क्षेत्रामध्ये मिळत असते. मालदिवला भारताने वेळोवेळी सहकार्य केले. श्रीलंका,बांगलादेश,अफगाणिस्तान मध्ये विविध विकास कामात भारत मोठा भागीदार आहे. त्याच बरोबर भारताने कोव्हीड—१९ च्या लढयात औषधी व लसीचा सर्वप्रथम मोफत निर्यात शेजारील राष्ट्रांनांचा देवू केली.

कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सर्वप्रथम भारतच आपल्या शेजारी राष्ट्रांना मदतीचा हात देतो. त्यामुळे सार्कमध्ये भारताची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

**२)सार्क सदस्य राष्ट्रापुढील समस्या :—**

दक्षिण आशिया हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला उपखंड आहे. या सदस्य राष्ट्रा समोरील समस्या मध्ये ब—याच प्रमाणात एकसमानता असून भौगोलिक जवळीकतेमूळे एका राष्ट्रातील समस्याचा दुस—या राष्ट्रावर त्वरीत परिणाम होत असतो. या समान समस्या सोडवण्यासाठी सहकार्या शिवाय पर्याय नाही, हयाच उद्देशाने सार्कची स्थापना झाली. परंतु तिन दशके होउनही सार्कच्या स्थापनेचा उद्देश पुर्ण होवू शकला नाही. दक्षिण आशिया हा जगातील सर्वात गरिब भौगोलिक क्षेत्रापैकी एक आहे. या देशातील ४० टक्के जनता ही दारिद्रियरेषेखालील जिवन जगत आहे. त्यांच्या साक्षरतेचे प्रमाण हे ५० टक्के आहे. इतर राष्ट्राच्या तुलनेत आरोग्य व शिक्षणावर सर्वात कमी खर्च हा सार्क सदस्य राष्ट्रांचा होतो. जगाच्या तुलनेत महिला साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. त्याच बरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्यामुळे वेगवेगगळया प्रदुषणाला येथील जनतेस तोंड द्यावे लागल आहे.

त्याच बरोबर डरडोई उत्पन्न फार कमी आहे. या राष्ट्रात गरिबी,बेकारी,उपासमारी,कुपोषण या सारख्या समस्या हा एक सार्क समोरील चिंतेचा विषय बनलेला आहे.

सिमावाद,वांशिक संघर्ष, राजकिय अस्थिरता, नक्षलवाद, अतंकवाद, अण्वस्त्रचा प्रसार हयामुळे सार्क राष्ट्रासमोरील समस्यात वाढ झाली आहे.

**३) सार्कच्या विकासातील अडथळे :—**

सार्कच्या स्थापनेला ३५ वर्षे उलटूनही सार्कचा पाहिजे तसा विकास झाल नाही. कारण असे अनेक कारणे आहेत कि जे सार्कच्या विकासात बाधा निर्माण करत आहेत. त्याचे मुख्य कारण म्हणजे भारत—पाक, भारत—नेपाळ, पाक—बांगलादेश, पाक—अफगाणिस्थान,भारत—श्रीलंका यांच्यात अनेक प्रश्नावरून असेलेला संघर्ष व त्यमुळे निर्माण झालेला अविश्वास व त्यातुन निर्माण झालेली शस्त्रास्त्रास्पर्धा व अस्थिर राजकीय वातावरण होय.भारत—पाकिस्थान यांचा एकमेकांवरील अविश्वास हा सर्वात मोठा अडथळा आहे. कारण या संघटनेमध्ये ही दोन राष्ट्रे मोठी आहेत. परंतु त्यांच्या सिमावादामुळे त्यांच्यात मोठा तणाव असतो. त्याच बरोबर भारत आणि नेपाळ मध्ये लेपूलेक व कालापाणी हया विवादीत क्षेत्रावरून तणावात वाढझाली आहे. भारत व बांगला देशात रोहिंग्या व घुसपेठीची समस्या आहे ईत्यादी.

मुक्त व्यापार करार (ै।थ्ज।) याची अमलीबजावणी नगण्य प्रमाणात झाली आणि हया देशाच्या एकूण व्यापाराच्या फक्त ५ टक्के व्यापारच या देशाच्यामध्ये होतो. कश्मिरमधील उरी येथील आतंकवादी हल्यानंतर २०१६ मध्ये इस्लामाबाद (पाकिस्तान) येथे होणारी १९ वी सार्क शिखर परिषद भारताच्या विरोधामूळे रद्द केली. त्यानंतर एकही परिषद झाली नाही. १९८५ पासून आतपर्यंत फक्त १८ सार्कचे सम्मेलने झालीत. त्यामुळे या सादस्य राष्ट्रातील एकजुटतेचा अभार व या संघटने प्रती असणारी उदासिनता हे सार्कच्या विकासातील मुख्य अडथळे म्हणावे लागेल.

**४) भारताच्या परराष्ट्र धोरणात सार्कचे महत्व :—**

भारत हा एकमेव असा देश आहे तो सार्कच्या सदस्य राष्ट्राच्या सिमांना जोडतो. त्या व्यतिरिक्त धर्म,भाषा,संस्कृती यामध्ये असणारी समानता त्यामुळे भारताचा अन्ये सदस्य देशावर मोठा प्रभाव पडतो. २०१४ च्या मोदी सरकारच्या शपथ ग्रहण समारंभास भारताने सार्क देशाच्या राष्ट्राध्याक्षांना बोलावून सार्कचे महत्व स्पष्ट केले होते.

भारताने मालदिव, नेपाळ, अफगान,श्रीलंका भूटान या देशाला स्वास्थ सुविधा उपलब्ध करून कोरोनाच्या काळात त्यांची मोठी मदत करून आपली शेजारील राष्ट्रांवर असणारी पकड मजबुत केली. जगातील लोकसंख्येच्या २२ टक्के लोकसंख्या सार्क देशात राहत असल्याने एक वेगळा प्रभाव निर्माण झाला. भारत या देशा सोबत ११०२ अरब रूपये येवढा व्यापार करतो.

सार्कच्या उद्देशामध्ये अतंरराष्ट्रीय मंचावर एकमेकांना साथ देवून आपली उपस्थिती मजबुत करणे हे उद्दिष्ट असल्याने सर्व देश (पाक वगळता) भारताच्या बाजुने उभे राहतात. आर्थीक,सांस्कृतीक,सामाजिक व वैज्ञानिक क्षेत्रात सक्रिय योगदान देवून भारताने शेजारील राष्ट्राला मदत केली. नरेन्द्र मोदीजी पंतप्रधान होताच भुटान व नेपाळच्या दै—यावर जाने , व

कोव्हीड—१९ या महामारीच्या काळात त्यांनी सर्व प्रथम सार्क देशाला मदत देवून त्यांना खुप सहकार्य करणे हे परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीकोणातुन भारताला उपयुक्त ठरले.

**५) सार्कच्या माध्यमातुन झालेला विकास :—**

सार्कच्या निर्मीतीचा मुख्य उद्देश दक्षिण आशियातील देशात आत्मनिर्भरता वाढून त्यांना मजबुत करणे. एकमेकांच्या समस्या सोडवून त्यांच्यात विश्वास व सहकार्य वाढवणे. सारख्या हिताच्या विषयात अतंरराष्ट्रीय मंचावर एकमेंकांना सहयोग करणे. जनतेचे कल्याण व त्याचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास करणे हा आहे. यामध्ये सार्क देशाना थोडया प्रमाणात यश मिळालेले आहे.

सार्कच्या माध्यामातुन २६६ वस्तुवरिल करात कपात करण्यात आली. यामध्ये भारताने सर्वाधिक १०६ वस्तुवर व्यावसायीक सवलत देवू केली. त्यामुळे नेपाळ,मालदिप,भूटान सारख्या गरीब देशांना त्यांच्या फायदा झाला.

या वेतिरिक्त १९९० पासून बालीका वर्ष,आवास वर्ष, पर्यावरण, विकलांग,गरीबी उन्मुलन वर्ष घोषित केले. १९९१ ते २००० हे बालीका दशक म्हणून पाळले गेले व त्या माध्यामातुन मुलिंच्या शिक्षण,विकास,स्वास्थ इत्यादी बाबीवर लक्ष केंद्रीत केले गेले. त्याच बरोबर कृषी, आरोग्य,साक्षरता, शिक्षा व पर्यावरण, सांस्कृती,आर्थिक, पर्यटन ,प्रसारमाध्यमातील सहकार्य, आमलीपदार्थाचा व्यापार,दहशतवाद,शस्त्रस्त्राचा व्यापार व मानवाधिकार इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्राता सार्कच्या माध्यामातून प्रभावीपणे उल्लेखनिय कार्य भारताच्या सहकार्याने केले गेले.

**६) सारांश :—**

दक्षिण आशियातील राष्ट्रांनी परस्परामधील वादग्रस्त प्रश्न आणि संघर्ष बाजूला सारून आर्थिक व व्यापारकि पातळीवर सहकार्याला प्राधान्य द्यावे . आर्थिक आणि राजकिय मुद्दे यामध्ये फारकत करावी असे भारताचे स्पष्ट मत आहे. परंतु जो पर्यंत पाकिस्तान आपला सिमाविवाद सार्कच्या मंचावर मांडत राहील तोपर्यंत सार्कचा विकास होईल हे म्हणता येणार नाही.

सार्क देशाच्या नेत्यांनी युरोपियन संघ व असियान सारख्या संघटनाचा विकास पाहून आपली वृत्ती बदलण्यास हवी. हया संघटनानी आर्थिक एकजुटीच्या माध्यामातुन विकासाची वाटचाल सुरू केली. त्यांच्या माध्येमातुन आर्थिक विकासाचे ऐक माध्येम म्हणून सार्कला पाहाण्यात यावे २००४ च्या (इस्लामाबाद) सम्मेलनात स्वतंत्र व्यापार क्षेत्राची (साफटा) सुरूवात केली १९९१ कोलंबो मधील बैठकित दारिद्रियनिर्मूलनाचा ठराव घेवून गरिबी निर्मुलनासाठी मोठे कार्य केले.

सार्क देशाच्या मुख्य समस्या गरिबी,मागासलेपणा,आरोग्य,सुविधांचा अभाव हा असून सार्कच्या माध्येमातुन त्यामध्ये विकास करण्याची गरज आहे. सर्व सदस्य राष्ट्र हे कृषी प्रधान आहेत. त्यांची अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित आहे. त्या अनुषगांने कृषीच्या क्षेत्रामध्ये

विकास करणे गरजेचे आहे. आणि भारत आपली जबाबदारी पूर्णपणे बजावत आहे. असे अनेक क्षेत्र आहेत ज्या मध्ये सार्कला (भारताला) आपली मुख्य भुमिका निभवावी लागणार आहे. तरच ख—या अर्थाने सार्कच्या स्थापनेचे उद्दीष्ट तात्कालीन पंतप्रधान राजीाव गांधी व राष्ट्रपती जिया उल रहमान यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण होईल.

**संदर्भ :—**


१) *कुमार मूनेष,स्वतंत्र भारतकी विदेश निती,डिस्कवरी पल्लीसिंग हाउस प्राईवेट लिमिटेड नई दिल्ली—२०१०*
*पृ.क्र. २१३, २१४, २१९*

२) *फडिया बि.एल. राजनिती विज्ञान,प्रकाशक — साहित्य भवन सि १७, सिकन्दरा,औद्योगिक क्षेत्र,आगरा—उ.प्र. कोड २०४*
*पृ.क्र. ७१७, ७२०, ७२२*

३) *कुलकर्णी विजयकुमार गो., अंतरराष्ट्रीय संबंध,कैलाश पब्लीकेशन्स औरंगपूरा,औरंगाबाद,ऑगस्ट २०१०*
*पृ.क्र. ११०, ११४, ११५*

४) *देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन,सदाशिव पेठ,पुणे, मार्च २००७*
*पृ.क्र. १२७, १३५, १३८, १४०, १४३*

५) *जैन महेन्द्र, प्रतियोगीता दर्पन, राजनिती विज्ञान, सिरीज २२ कोड ८६६, स्वदेशी बीमा नगर , अगरा*
*पृ.क्र. १०२, १०३*

# भारत-श्रीलंका संबंधाचे बदलते स्वरूप

**प्रा. महिपाल रामराव सुळे**
*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, ता. धर्माबाद, जिल्हा नांदेड.*
**डॉ.दयानंद माधवराव गुडेवार**
*सहाय्यक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक तथा, राज्यशास्त्र विभागप्रमुख, उज्वल ग्रामिण महाविद्यालय, घोनसी, ता.जळकोट जिल्हा लातूर*

भारताच्या दक्षिणेला अवघ्या 31 किलोमीटर अंतरावर श्रीलंका हा देश असून त्याचे पूर्वाश्रमीचे नाव 'शिलोन' व 1972 साली 'लंका' आणि 1978 साली 'श्रीलंका' असे नामकरण झालेले आहे. श्रीलंकेमध्ये आज समाजवादी लोकशाही गणराज्य शासन पद्धती अस्तित्वात आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर म्हणजे, 4 फेब्रुवारी 1948 रोजी ब्रिटिशांपासून श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाले व तेव्हापासून भारत आणि श्रीलंका राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. परंतु श्रीलंका आणि भारत या दोन्ही देशांचा संबंध प्राचीन तसेच स्वातंत्र्यपूर्व काळापासून असल्याचे अनेक पुरावे आपल्याला मिळतात. कालखंडानुसार उल्लेख करावयाचा झाल्यास 2500 वर्षापेक्षाही जुने संबंध भारत आणि श्रीलंका या देशाचे आहेत. बौद्धिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात या दोन्ही देशात सहकार्य राहिले आहे. हिंदु धर्माच्या रामायण या ग्रंथात श्रीलंके सोबतच्या भारताच्या संबंधाचे पौराणिक संदर्भ मिळतात. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रचाराकरिता आपला पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठविले होते. आज श्रीलंकेमध्ये बौद्ध धर्म हाच प्रमुख धर्म आहे. त्याचबरोबर तेथे ख्रिश्चन, हिंदू आणि मुस्लीम धर्मीय लोक सुद्धा आहेत. श्रीलंका देशाची लोकसंख्या 2.9 कोटी इतकी आहे. ब्रिटिश काळात भारतातील विशेषत: अनेक तामिळी लोक श्रीलंकेत कामाला गेले व तेथेच स्थायिक झाले. म्हणजेच भारत-श्रीलंका संबंध समजून घेत असताना त्याचे वर्णन खालील तीन टप्प्यात करावे लागेल.

1) स्वातंत्र्यपूर्व काळ (ऐतिहासिक संदर्भ)
2) स्वातंत्र्योत्तर कालखंड
3) वर्तमान संबंध

भारत - श्रीलंका यांच्यातील भौगोलिक जवळीकता, बौद्ध धर्माचा प्रचार - प्रसार, व्यापार, संस्कृतीत जवळीकता यामुळे दोन्ही देश एकमेकांच्या प्राचीन काळापासून संपर्कात आहेत. 4 फेब्रुवारी 1948 रोजी श्रीलंका स्वतंत्र झाल्यानंतर भारत-श्रीलंका राजनयिक संबंधाला सुरुवात झाली. दोन्ही देशाच्या परराष्ट्र धोरणात काही साम्य होते. उदा. अलिप्तवादी धोरणाचा स्वीकार, लष्करी गटाच्या सहभागापासून दूर, साम्राज्यवाद-वसाहतवादाला विरोध. त्यामुळे दोन्ही देशाचे संबंध सुरुवातीला सकारात्मक वाटत होते. परंतु, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर श्रीलंकन सरकारने श्रीलंकेत स्थायिक झालेल्या मूळच्या भारतीय लोकांना विशेषतः तामिळींना नागरिकत्व देऊन श्रीलंकेत सामावून घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे या लोकांना पूर्ण नागरिकत्व द्यावे यासाठी भारताने आग्रह धरला होता. श्रीलंकेला स्वातंत्र्य

मिळाल्यानंतर श्रीलंकेच्या संसदेसाठी झालेल्या निवडणुकीत 7 तामीळ बहुल मतदार संघातून 6 तामीळ उमेदवार निवडून आले होते. ज्या ज्या ठिकाणी तामिळ बहुल लोक मोठ्या संख्येने होते त्यांनी मतदान करून तामिळ हिताला समर्थन देणाऱ्या उमेदवारांच्या यशासाठी प्रयत्न केले. त्यामुळे त्यांची कृती सिंहली गटाला लोकाना मान्य नव्हती. म्हणून स्वतःच्या बहुसंख्येच्या जोरावर त्यांनी तामिळी समाजाला नागरिकत्व व मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले. त्यामुळे सिंहली व तामिळी प्रश्नाला पुढच्या कालखंडात वेगळे वळण लागले. सिंहली लोकांचे प्रमाण देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी 74 टक्के तर तामिळी भाषिकांचे हे प्रमाण 12 टक्के एवढे आहे. 1950 च्या दशकापासून श्रीलंकेत सिंहली- तामिळ वंशामध्ये जातीय दंगली उसळायला सुरुवात झाली. यावर तोडगा काढण्यासाठी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आणि श्रीलंकेचे पंतप्रधान कोटलेवाला यांच्यात 1954 मध्ये एक करार झाला. या करारानुसार श्रीलंकेतील तामिळी वंशाच्या सुमारे एक लक्ष 34 हजार व्यक्तींना आपल्या देशाचे नागरिकत्व देण्याची तयारी श्रीलंकन सरकारने दर्शवली. परंतु या करारानंतरही तामिळी वंशाच्या अनेक लोकांच्या नागरिकत्वाच्या प्रश्नावर तोडगा निघाला नाही. किंबहुना 1954 मध्ये झालेल्या कराराच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यास श्रीलंकन सरकारने नकार दिला. परिणामतः अनेक भारतीयांना श्रीलंकेत अवैध घोषित करण्यात आले.

1956 मध्ये श्री बंदार नायके हे पंतप्रधानपदी विराजमान झाले परंतु 25 सप्टेंबर 1956 मध्येच त्यांचा अकाली मृत्यू झाल्यानंतर 1960 मध्ये त्यांच्या पत्नी श्रीमती बंदारनायके या पंतप्रधानपदी विराजमान झाल्या. या काळात भारत-श्रीलंका संबंध मैत्रीपूर्ण होते. परंतु पुढे भारत व श्रीलंका यांच्यातील नागरिकत्वाच्या बाबत प्रश्न सोडवण्यासाठी 29 ऑक्टोंबर 1964 रोजी भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री व श्रीमती बंदारनायके यांच्यामध्ये समझौता झाला. एकंदरीत श्रीलंकेतील वांशिक संघर्ष 1980 च्या दशकात जरी तीव्र झाला तरी, या संघर्षाची मुळे श्रीलंकेच्या स्वातंत्र्यपासूनच होती. 1970 च्या दशकात तामिळी फुटीरतावाद व उग्रवादाला सुरुवात झाली. तामिळीच्या लहान मोठ्या संघटना एकत्र आल्या आणि 1976 मध्ये वेलूपिल्लई प्रभाकरणच्या नेतृत्वात 'लिब्रेशन टायगर ऑफ तामिळ इलम' (लिट्टे) संघटना स्थापन केली. उत्तर व पूर्व श्रीलंकेच्या तामिळ बहुल भागात एक तामिळ मातृभूमी यासाठी प्रचार व प्रसार सुरू केला. पुढे 1983 मध्ये सिंहली व तामिळवंशी यामध्ये जातीय दंगली उसळल्या. त्या अधिक चिघळेल्यामुळे त्यावर श्रीलंकन शासनाचे नियंत्रण राहिले नाही. शेवटी श्रीलंकेने भारताकडे मदत मागण्याचा निर्णय घेतला. श्रीलंका आणि भारता दरम्यान 1987 मध्ये ऐतिहासिक करार होऊन त्याअंतर्गत श्रीलंकेतील वांशिक संघर्ष नियंत्रणात आणण्यासाठी भारताने शांती सैन्य पाठवले. शांती सेनेने श्रीलंकेत शांतता स्थापनेचा प्रयत्न केला परंतु अपेक्षित यश मिळाले नाही. शेकडो भारतीय शांती सैनिक मारले गेले याच शांती सैनिक मोहिमेचा परिणाम म्हणून 1991 मध्ये लिट्टेकडून भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या करण्यात आली.

भारत-श्रीलंका यांच्या संबंधातील कटू तेथील वांशिक कारण मुख्य असले तरी इतर काही मुद्दे दोन्ही देशाच्या कटूतेला कारणीभूत आहेत. श्रीलंकेत अल्पसंख्यांकावर होणारे अन्याय दूर करावेत. यासाठी भारताने प्रयत्न करावेत. अशी मागणी भारतातील डी.एम.के. सारख्या पक्षाने केली. त्याचा परिणाम भारतीय राजकारणावर झाला. श्रीलंकेच्या मनामध्ये नेहमीच भारताबद्दल शंका निर्माण झालेली

आहे. भारत हे अण्वस्त्रधारी राष्ट्र असल्यामुळे श्रीलंकेच्या मनात सुरक्षिततेबाबत शंका आहेच. भारतावर अंवस्त्राबाबत मर्यादा घालाव्यात हा श्रीलंकेचा विचार भारताला मान्य होणारा नाही. 'कच्छतीऊ' बेटाच्या मालकी हक्काच्या प्रश्नावरुन ही दोन्ही देशात संघर्ष झालेला आहेच. 1972 च्या भारत-पाक युद्ध दरम्यान श्रीलंकेने त्यांच्या विमानतळावरून पाकिस्तानच्या लढाऊ विमानांना इंधन भरण्याची परवानगी दिली होती. म्हणजेच 1971 पर्यंतचे संबंध लक्षात घेतल्यावर ते चढ-उताराची होते हे लक्षात येते.

1990 च्या दशकापासून भारत-श्रीलंका संबंधाच्या एका नवीन पर्वाला सुरुवात झाली. दक्षिण आशियातील इतर देशाप्रमाणे श्रीलंकेने देखील आपल्या आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. सार्कच्या व्यासपीठावरून झालेल्या व्यापार करारांतर्गत दोन्ही राष्ट्रांनी परस्पराबाबत Most Favoured Nation चा दर्जा दिला आहे. सार्कच्या व्यासपीठांतर्गत भारताने उपविभागीय सहकार्याच्या योजनेचा अवलंब करून भूतान, नेपाळ, मालदीव आणि श्रीलंकेला मोठी आर्थिक मदत केली. 1994 साली 17 वर्षानंतर चंद्रिका कुमारतुंगा यांच्या पक्षाकडे सत्ता आल्यानंतर भारत-श्रीलंका संबंध सुधारण्यास प्रारंभ झाला. 1998 मध्ये भारत-श्रीलंकेत मुक्त व्यापार विषयीचा करार झाला. एप्रिल 2002 मध्ये चंद्रिका कुमारतुंगे भारत भेटीसाठी आल्या. जून 2002 नंतर श्रीलंकेचे पंतप्रधान विक्रमसिंगे हे देखील भारतभेटीवर आले. पुढे 2006 मध्ये श्रीलंकेचे अध्यक्ष राजपक्षे यांनी भारताशी श्रीलंका प्रश्नाबाबत व्यापक भूमिकेची अपेक्षा व्यक्त केली.

2009 साली श्रीलंकेतील गृहयुद्ध समाप्त झाले. 2005 ते 2009 दरम्यान श्रीलंकेच्या सरकारने तामिळीच्या विरुद्ध व एलटीटीईच्या विरुद्ध एक युद्ध मोहीम सुरु केली. त्यामध्ये जवळपास 30 ते 40 हजार निष्पाप तामिळी लोक मारले गेले. आणि श्रीलंकेकडून मोठ्या प्रमाणात मानवी अधिकारांचे उल्लंघन झाले. यावर भारताने तीव्र नाराजी व्यक्त केली. श्रीलंकेवर मुक्त व्यापाराच्या विचाराचा प्रभाव पडला. 2006 मध्ये दोन्ही देशातील व्यापारात चार पट वाढ झाली. 2006 मध्ये व्यापारात 46 टक्के वाढ झाल्याचे दिसते. 2015 मध्ये श्रीलंकेच्या राष्ट्रपतींनी भारताचा दौरा केला. त्याचे सकारात्मक परिणाम दोन्ही देशावर झाले. अलीकडेच 13 आणि 14 मार्च 2015 मध्ये भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी श्रीलंकेला भेट दिली होती. 28 वर्षानंतर भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच भेट श्रीलंकेला होती. या भेटीमुळे मच्छीमारांचा प्रश्न असेल, चीनच्या प्रभावापासून श्रीलंकेला दूर ठेवणे असेल, यासाठी ही भेट महत्त्वाची होतीच. याशिवाय मोदींनी दोन्ही देशात सकारात्मक संबंध निर्माण करण्याचे प्रयत्न केले. याचाच भाग म्हणून मोदींच्या निमंत्रणावरून श्रीलंकेचे पंतप्रधान महिंद्रा राजपक्षे हे 8 ते 11 फेब्रुवारी 2020 पर्यंत भारताच्या दौऱ्यावर होते. त्यांनी अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. तामिळी बाबत समान न्याय, शांती धोरण ठेवावे याबाबत विचारमंथन केले. श्रीलंकेतील युद्ध प्रभावित भागात 46 हजार घरांचे निर्माण करण्यासाठी मदतीची घोषणा भारताने केली. खोल समुद्रात मासेमारीच्या तांत्रिक सहाय्यतेची मागणी श्रीलंकेने केली. मच्छीमारांचा एकमेकांच्या देशात प्रवेश होतो, तेव्हा त्या विवादावर समाधान काढण्यावरही चर्चा झाली. श्रीलंकेला चीन कर्जाच्या बोझ्याखाली आणतोय त्यावरही श्रीलंकेशी चर्चा झाली. दोन्ही देश हिंदी महासागर व प्रशांत महासागरात शांतता आणि समृद्धीसाठी प्रयत्न करत आहेत. दोन्ही देशांनी आतंकवादाशी लढण्यामध्ये संपर्क आणि सहकार्य वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय निवास योजना याअंतर्गत भारताने श्रीलंकन ग्रहयुद्धात प्रभावित झालेला भाग व चहाच्या

मव्याच्या क्षेत्रात 50,000 गृहनिर्माणाची योजना आखली आहे. 41 वर्षानंतर चेन्नई ते श्रीलंकेतील जाफना या शहरासाठी विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. भारतीय रिझर्व बँकेने कोरोना महामारीने प्रभावित झालेल्या श्रीलंकेला विदेशी मुद्रा भंडार वाढवण्यासाठी आणि देशाची वित्तीय स्थिरता सुधारण्यासाठी 400 मिलियन डॉलर विनिमय मुद्रा प्रदान करण्याच्या योजनेवर हस्ताक्षर केले आहे.

**सारांश :-**

भारतीय उपखंडातील श्रीलंका हा भारताच्या शेजारी असलेला महत्त्वाचा देश असून अगदी प्राचीन काळापासून या देशाशी भारताचा संबंध आहे. भारताने प्रत्येक शेजारी राष्ट्रांशी नेहमीच शांततेचे व सहकार्याचे धोरण ठेवलेले आहे. एखादा छोटा देश म्हणून कोणत्याही देशावर भारताने स्वतः आक्रमण किंवा घुसखोरी केल्याचे उदाहरण नाही. श्रीलंकेशी स्वातंत्र्य काळापासून वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार्याचे धोरण ठेवले आहे. तामिळींचा प्रश्न, मच्छीमारांचा प्रश्न, श्रीलंकेची भारताबद्दलची साशंकता, चीनचा श्रीलंकेतील हस्तक्षेप यामुळे भारत व श्रीलंका संबंध थोडेसे चढ-उताराचे राहिलेले आहेत. परंतु वर्तमान परिस्थितीत हे संबंध सकारात्मक स्वरूपाचे दिसत आहेत. दोन्ही देशातील वर्तमान व्यापार, आतंकवादाला विरोध, संयुक्त सैन्य अभ्यास, बौद्धिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, आरोग्य क्षेत्रातील, भारताने केलेले सहकार्य यावरून सध्या दोन्ही देशातील संबंध चांगले आहेत. दोन्ही देश सार्क संघटनेचे आणि बिस्मटेक चे सदस्य आहेत. त्यामुळे दोन्ही देशांनी वादग्रस्त मुद्दे चर्चा व शांततेच्या मार्गाने सोडवून परस्पर विकास व सहकार्य या दोन्ही गोष्टीवरच अधिक भर देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**


*1) आंतरराष्ट्रीय संबंध, (2009), डॉ. दीनानाथ वर्मा, ज्ञानदा प्रकाशन नई दिल्ली.*

*2) भारतीय उच्च आयोग वेबसाईट, कोलंबो http://www.hcicolombo.org*

*3) Gupta Madhu, (May-2019), India-Shri Lanka Relationship: The thread of the relationship gets stronger ISSN:2249-894X impactfactor : 5.7631(UIF).UGC approved Journal No.48514.valume-8 issue – 8*

# भारताचे समकालीन परराष्ट्र धोरण विशेष संदर्भ सार्क देश

**सहा. प्रा. श्रीमती एम. व्ही. चौधरी**

*(अर्थशास्त्र विभाग), श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे ४२५४०५ महाराष्ट्र*

*मो.९४२३३४५८४६ ईमेल – manichaudhari70@gmail.com*

**प्रस्तावना :**

दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (South Asian Association for Regional cooperation) SAARC (सार्क) ही दक्षिण आशिया खंडामधील ८ देशांची एक आर्थिक व राजकीय सहयोग संघटना आहे. अमेरिका व चीन खालोखाल सार्क सदस्य राष्ट्रांची एकत्रिक अर्थव्यवस्था जगात तिस-या क्रमांकाची असून जगातील लोकसंख्येच्या २१ः लोक सार्क देशात आहेत. भारत हा सार्कचा सर्वात बलाढ्य देश आहे.

आज दक्षिण आशियातील ८ देश सार्कचे सदस्य आहेत. ६ जानेवारी २००६ मध्ये सार्क सदस्य राष्ट्रांनी प्रादेशिक व्यापाराला चालना मिळावी म्हणून दक्षिण आशियाई मुक्त व्यापार कराराची निर्मिती केली. सार्क संकल्पना बंगालदेशाचे राष्ट्राध्यक्ष झिया उर रहमान यांनी १९७७ मध्ये मांडली. सार्कची पाहिली बैठक ढाका येथे झाली. १९८५ पर्यंत ७ सदस्य राष्ट्रे होती. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, मालदीव, श्रीलंका, भूतान ही ७ राष्ट्रे होती. अफगाणिस्तानाचा समावेश १३ नोव्हेंबर २००५ मध्ये झाला. सार्कची सदस्य राष्ट्रे आता ८ झालीत.

आजपर्यंत संघटनेच्या १८ शिखर परिषदा झाल्या सार्कच्या सदस्य राष्ट्रांनी नियमित एकत्रित येणे अपेक्षित असतांना ३० वर्षात १८ वेळा एकत्र आले. यातून सार्कचे अपयश दिसून येते. २०१६ मध्ये पाकिस्तान येथे होणारी १९ वी शिखर परिषद भारतासह बांग्लादेश, भूतान, अफगाणिस्तान यांनी बहिष्कार टाकला. त्यामुळे ही परिषद रद्द झाली. उरी येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची पार्श्वभूमी कारणीभूत होती. उरी येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने बैठकीस नकार दिला. बैठक पुढे ढकलण्यात आली.

सार्कचे जनरल सेक्रेटरी भारताचे शिलकांत शर्मा यांचा कार्यकाल २०११ मध्ये पूर्ण झाला. आता या पदावर अर्जुनकुमार थापा कार्यरत आहेत. सार्क संघटनेची कल्पना १९५० मध्ये Asian Relations Conference मध्ये मूळ धरु लागली. १९७० च्या दशकात बांग्लादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अफगाणिस्तान या देशांनी एकत्रपणे व्यापार व सहकार हेतू डोळ्यापुढे ठेवून एका संस्थेची नितांत गरज आहे असे वाटू लागले. म्हणून दक्षिण आशियामध्ये आर्थिक व सामाजिक प्रगती करण्याच्या उद्देशाने आणि सांस्कृतिक विकास व विकसनशिल देशांशी सहकार्य यासाठी सार्क (SAARC) संघटना उभारण्यात आली.

दक्षिण आशिया विभागीय सहकार्य संघटना स्थापनेमागे सभासद देशांचा मुख्य हेतु तो म्हणजे परस्परांच्या सहकार्याने राष्ट्रातील जनतेचे जीवनमान उंचावणे हाच होता

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास झाला पाहिजे. सामुहिकरित्या स्वावलंबनाची भावना निर्माण करुन, वाढीस लावणे हा हेतू होता. या हेतूच्या पूर्ततेसाठी १९८५ पासून झालेल्या परिषदांमध्ये अनेक ठराव

केले. यामध्ये आर्थिक विकास करुन सामाजिक स्थितीत सुधारणा करणे, दारिद्र्य निर्मुलन यासारखे उपक्रम राबविले. दक्षिण आशिया विभागीय सहकार्य संघटनेतील देशांचा सर्वांगीण आर्थिक विकासासाठी व्यापाराला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तसेच आर्थिक तंत्रज्ञान संबंधी परस्पर सहकार्य महत्वाचे आहे. हा समूह विकसनशील देशांचा आहे. तिथे मोठ्या प्रमाणात दारिद्र्य दिसून येते आणि सामाजिक राजकीय अस्थिरता, पारंपारिक द्वेष, शत्रुत्व, शिक्षणाचा अभाव इ. मुख्य वैशिष्ट्ये आहे. त्यामुळे आजच्या काळात भूराजकीय व भू-आर्थिक रचनेत या विभागाला विकासाशिवाय पर्याय नाही. त्यादृष्टीकोनातून या क्षेत्रातील देशांचा परस्पर व्यापार महत्वाचा ठरतो त्यामुळे दक्षिण आशिया क्षेत्रांचा विकास अपेक्षित आहे.

सार्क देशात भारताचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. भूप्रदेशाचा विस्तार, लोकसंख्या, आर्थिक व तांत्रिक विकास या दृष्टीने भारत दक्षिण आशिया क्षेत्रात मोठा देश आहे. भारताचे स्थान मध्यवर्ती आहे. त्यामुळे या देशांशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहे. सार्कची स्थापना झाली. त्यावेळी भारताचा व्यापार मर्यादित होता. शीतयुद्धानंतर निर्माण झालेली पोकळी व आर्थिक बाबींना आलेले महत्व यातून या विभागाच्या सुरक्षेतेसाठी चिंतेची बाब आहे. त्यामुळे भारत व पाक या शेजारील देशांना व्यापाराबाबत बाधा निर्माण झाली. १९९३ मध्ये ढाका येथे झालेल्या सार्क परिषदेमध्ये श्रीलंकेचे अध्यक्ष प्रेमदासा यांनी दक्षिण आशियन व्यापार प्राधान्य करार (SAPTA- Sourth Asia Preferencial Trade Agreement) चे १९९८ मध्ये करार करण्यासंबंधी प्रस्ताव मांडला. त्यातून या देशांच्या आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यात आले. २१ फेब्रुवारी १९९९ मध्ये त्यावेळचे पंतप्रधान "आप दोस्त बदल सकते है, पडोसी नही बदल सकते। इसलिए अच्छे पडोसी के नाते रहे। " अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. भारत पाकिस्तानात विश्वास निर्माण करण्यासाठी समझदारीचे निवेदन असा प्रस्ताव मांडला. त्याला पाकिस्तानने मान्यता दिली. भारताने समझदारी निवेदनाच्या आधारे पाकिस्तान, नेपाळ, भूतान, श्रीलंका यांना सर्वाधिक पसंतीच्या राष्ट्रांना (MFN)- Most Favourite Nation) दर्जा देऊन विभागीय व्यापाराला चालना दिली.

१९८१ मध्ये भारताची सार्क देशाकडून ६.३८ः आयात वाढली. १९८०-८१ या वर्षात भारताची आयात १० वर्षाच्या तुलनेने जास्तीत जास्त होती. सार्कच्या स्थापनेपूर्वी भारताची या देशांकडून आयात १९८०-८५ चा ५ वर्षाच्या एकूण ७१७.०८ मिलीयन डॉलर होती. सार्क स्थापनेनंतर १९८६ ते ९१ या काळात एकूण आयात ५१७.०६ मिलीयन डॉलर झाली. १९८० ते ८५ च्या तुलनेत १९९.८९ मिलीयन डॉलरने कमी झाली. यामध्ये भारताचा फायदा झाला. इतर देश तोट्यात होते. १९८० मध्ये भारताची सार्क देशात ३०७ मिलीयन डॉलर निर्यात होती. १९८१ मध्ये २५.४१ः नी कमी झाली. १९८२ मध्ये ती १९७ मिलीयन डॉलर निर्यात झाली. या दोन वर्षात निर्यात खूप कमी झाली. १९८३-८४ मध्ये वाढ झाली. ती सातत्याने वाढत राहिली. १९९१ मध्ये ती ६४६.०० मिलीयन डॉलर झाली.

सार्कच्या स्थापनेनंतर भारताचा मोठा फायदा झाला. १९८०-८५ पर्यत भारताची एकूण निर्यात १५५१ मिलियन डॉलर होती. १९८६-९१ मध्ये एकूण २७६२ मिलियन डॉलर निर्यात झाली. सार्कच्या स्थापनेनंतर १२११ मिलीयन डॉलरची निर्यात झाली. व्यापार शेष १९८३-८४ पासून वाढतच गेली. १९९१ नंतर भारताने उदारतेचे व मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारले. त्यामुळे भारताचा व्यापार वाढला. गुजराल सिद्धातांनुसार भारताने शेजारी असलेल्या देशांना विश्वासात घेतल्याच्या धोरणावर भर दिल्याने विभागीय व्यापारात वृद्धी झालेली दिसते.

१९९७-९८ या वर्षात आयात-निर्यात कमी झाली. त्याचे कारण भारताने केलेल्या अणुचाचण्या होय. परंतु नंतरही व्यापारात सुधारणा झालेल्या दिसत नाही. २२६ वस्तूंच्या करारासंबंधी उदारता दाखवून ही विभागीय व्यापार ६ : झाला. भारताने १०६ वस्तूंना जास्तीत जास्त सवलती दिल्या, तरीही आयात फक्त २२ वस्तुंची केली. पाकिस्तानने १३ वस्तू व ३५ वस्तूंवरील करात सवलत दिली. १९९८ च्या काठमांडू परिषदेत साप्टाअंतर्गत एकूण ३४५६ कर सवलती जाहीर केल्या. भारताने १९१७, बांगलादेशात ४८१, पाकिस्तानने २९५, श्रीलंकेने ८२, नेपाळने १८६, भूतानने १२४ व मालदिवने ३९८ सवलती जाहीर केल्या.

सार्क देशातील व्यापारात एकूण आयात निर्यातीच्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. १९९० मध्ये ३.१९ः निर्यात होती. १९९९ मध्ये ४.०६ः इतकी झाली. भारत, नेपाळ, मालदिव याच्यातील व्यापार वाढला. १९९०-९९ या कालावधीत मालदिवने २९.४९ः, नेपाळने १०.९८ः, तर ५.२९ः निर्यात केली. भारताचे सार्क संघटनेतील सभासद देशांशी आर्थिक संबंध व भारताच्या सुरक्षेला निर्माण होणारा धोका हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**भारत-पाकिस्तान संबंध -**

पाकिस्तान सार्क संघटनेतील आणि दक्षिण आशिया क्षेत्रातील एक प्रमुख देश आहे. भारत पाकिस्तान यांच्यात राजकीय व भूयुध्दनैतिकदृष्ट्या मतभेद आहेत त्याचा परिणाम आर्थिक संबंधावर होत आहे. त्यामुळे विभागीय विकासात अडथळे येत आहेत. भारत पाकिस्तान यांना पाहता या दोघांचा विकास वर्षानुवषे रखडत आहे. तसेच पाकिस्तानच्या धोरणामुळे भारताच्या आर्थिक सुरक्षेवर परिणाम झालेला नेहमीच पाहत आहेत. भारत पाकिस्तान यांच्यात गेल्या दशकात १४ प्रकारचा व्यापार झाला. १९८७-८८ मध्ये ४७.१५ कोटी रुपयाचा व्यापार होता. १९९८-९९ मध्ये ६४८ कोटी रुपयांचा व्यापार झाला. भारताचे पाकिस्तानमध्ये व्यापाराकरिता स्वतंत्र कार्यालय नाही. राजदुतांच्या कचेरीत व्यापारी कक्ष जोडला आहे.

पाकिस्तानचा भारताशी त्रिस्तरीय व्यापार सुरु आहे. काळा/अवैध व्यापार- हा व्यापार सीमापारकरुन होतो. पारंपारिक पद्धतीने होणारा व्यापार -त्रयस्थांच्या माध्यमातून/पूर्ण निर्यात करुन विमानातून व बंदरातून होणारा व्यापार पाकिस्तानचा भारताशी होणारा दुस-या स्तरातील पारंपारिक व्यापार कमी होतो. राजस्थानच्या ६७५ कि.मी. लांबीच्या कुंपण विरहित सीमेवरुन अवैध व्यापार केला जातो. पाकिस्तान, सिंगापूर, दुबई या त्रयस्थ देशांच्या मध्यस्थीने एक बिलीयन डॉलर एवढा व्यापार होतो. पाकिस्तानचा अवैद्य व्यापार यापेक्षा जास्त आहे. १९८७-८८ पासुन १९९२-९३ पर्यंन्तचा भारताचा पाकिस्तानशी असलेल्या व्यापारात पाकिस्तानकडून केलेली आयात पाकिस्तानला केलेल्या निर्यातीच्या तुलनेने जास्त होतो. १९९३-९४ पासून १९९७-९८ पर्यंत निर्यातीत वाढ झाली. व्यापार शेष ही अधिक्यात आला. १९९८-९९ या वर्षात भारताच्या निर्यातीत एकदम घट झालेली दिसते. त्याचे मुख्य कारण भारताने पोखरणच्या वाळवंटात केलेल्या अणुचाचण्या होय. त्यावर्षी व्यापारशेष कमी झाला.

पाकिस्तान भारताकडून औद्योगिक यंत्रे, पोलाद, सिमेंट, टायर, रसायने, कृत्रिम दागिने, व्हिडीओ टेप इ. ची आयात तर ब्राझील व ऑस्ट्रेलियाकडून सुती धागा, कापड, कच्चा माल, चामडी वस्तु, सुका मेवा, डाळी मोठ्या किंमतीत आयात करतो. या वस्तु व औषधी कमी किंमतीत भारत पाठवू शकतो. भारतीय औषधी पाकिस्तानातील औषधांपेक्षा ३००ः ने स्वस्त आहेत. पाकिस्तान जगातील सर्वात जास्त चहा पिणारा देश आहे.

दरवर्षी १३० ते १५० मिलीयन कि.ग्रॅम चहा केनिया, इंडोनेशिया, श्रीलंकेतून आयात करतो. परंतु भौगोलिकदृष्ट्या जवळ असलेल्या भारताकडून आयात करत नाही. पाकिस्तान भारतातून वैध, अवैध व्यापारातून दरवर्षी २ लाख टायर करतो. १ लाख टायर भारतीय बाजारपेठेतून खरेदी करतो. भारतीय टायरवर पाकिस्तानमध्ये ४६.६ः कर असल्यामुळे बाकी टायर तुर्कस्थानातून आयात करतो.

पाकिस्तान भारतातून ६०० वस्तूंची आयात करतो. युरोपियन देशांकडून व अमेरिकेकडून केल्या जाणा-या आयातीपेक्षा कमी किंमतीत आणि कमी वाहतूक खर्चात भारताकडून आयात करणे शक्य आहे. भारताला निर्यातीची त्यामुळे मोठी संधी आहे. पाकिस्तानने त्याला सकारात्मक प्रतिसाद देण्याची गरज आहे. पाकिस्तानात अतिरिक्त विद्युत निर्मिती होते. भारताला विकणे पाकिस्तानला शक्य आहे. कारण भारतात ३००० मेगावॅट उर्जेची कमरता आहे. हा व्यवहार दोन्ही देशांना फायद्याचा आहे.

दक्षिण आशियाच्या अर्थव्यवस्थेवर शेती उद्योगांचा मोठा प्रभाव आहे. भारत व पाकिस्तानने शेतीक्षेत्रातील उदारतेचे धोरण स्विकारुन भारतातील कृषी क्षेत्रातील २.७ लाख व पाकिस्तानात १.७ लाख रोजगार निर्माण झाला. अरब देशातून संयुक्त गॅस पाईप लाईन आणणे व पर्यटन या क्षेत्रात संधी या देशांना आहे. परंतु पाकिस्तानचे व्यापार सचिव इकबाल फरिद म्हणतात कि, ''पाकिस्तानला आपल्या उ़द्योगांवर भारतीय उद्योगांचा प्रभाव पडण्याची भीती वाटते'' या दोन्ही देशांमध्ये खुला व्यापार होत नाही. भारताने पाकिस्तानला सर्वाधिक पसंतीचे राष्ट्राचा दर्जा दिला आहे. परंतु पाकिस्तानची भारताविरोधी भावना ही मोठी अडचणीची आहे. भारताने ५७० करमुक्त वस्तुंची यादी तणाव शिथीलतेसाठी जाहीर केली. तरीही पाकिस्तानने ६०० भारतीय वस्तुंच्या आयातीवर बंधने घातली. असे भारताचे अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी डिसेंबर १९९५ मध्ये राज्यसभेत दिली.

भारतातील फिक्की (FICCI) सी.आय.आय. (CII) पी.एच.डी.चेंबर (PHDC) & फिएओ (FIEO) & पाकिस्तानामधील लाहोर कराची चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यात विश्वास वाढविणे महत्वाचे आहे. सध्याच्या वातावरणात आणि जागतिक व्यवस्थेत विभागीय सुरक्षेसाठी शेजारील देशांमध्ये परस्पर साधनांचा विकास करणे संरचनात्मक विकास करणे आणि पुरवठ्यासंबंधी आर्थिक करार होणे या दोन्ही देशातील व्यापार वृध्दीसाठी करप्रणालीतील अडथळे कमी करणे गरजेचे आहे.

भारत व पाकिस्तान या देशांमध्ये सरळ व्यापार होणे महत्वाचे आहे. त्रयस्थ देशांमार्फत केल्या जाणा-या व्यापारापेक्षा फलदायी आहे. परवेज मुशर्रफ यांच्या आग्रा भेटीनंतर आर्थिक संबंध सुधारण्याची मोठी अपेक्षा होती. परंतु कारगील युद्ध, आण्विक चाचण्यानंतर निर्माण झालेला तणाव, सीमेपलीकडून होणारा दहशतवाद आणि काश्मीर मुद्यांवरुन दोन्ही देशातील तणांवाचा परिणाम या देशांच्या व्यापारावर झाला आहे. काही गोष्टी बाजूला ठेवून विभागीय शांतता, विकास आणि व्यापाराचे उद्दिष्ट गाठणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

परराष्ट्र व्यापार कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असतो. देशात उपलब्ध साधन सामुग्रीवर एखाद्या वस्तुच्या उत्पादनामध्ये विशेषीकरण साधता येते. व्यापक जागतिक बाजारपेठेचा फायदा घेता येतो. निर्यातीमुळे जागतिक बाजारपेठ उपलब्ध होते त्यामुळे देशांतर्गत उत्पादनाचा विस्तार करणे शक्य होते. विविधता आणता येते. यासाठी योग्य परराष्ट्र व्यापाराचे धोरण स्वीकारावे लागते. भारताने ते धोरण स्विकारले आहे. १९९० नंतर जागतिक अर्थव्यवस्थेत मोठा बदल झाला. बहुसंकुलीय स्थितीमुळे नवी आव्हाने निर्माण झाली.

अशा या बदलत्या व अस्थिर परिस्थितीत दक्षिण आशिया विभागातील देशांना ही मोठे आव्हान आहे. त्यामध्ये परस्पर सहकार्य नसेल तर या विभागातील मोठा देश असून ही भारताची सुरक्षा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**


1. *www.google.com*
2. *भारताची राष्ट्रीय सुरक्षा - लेखक डॉ.व्ही.वाय.जाधव - स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*
3. *भारताचे परराष्ट्र धोरण - लेखक - डॉ. शांताराम भोगले. विद्याप्रकाशन, नागपूर.*
4. *राष्ट्रीय सुरक्षा - लेखक प्रा. ए.पी.चौधरी, सौ. अर्चना चौधरी- निराली प्रकाशन, पुणे.*

# पंतप्रधान मोदींची व्यूहनीती आणि शेजारी राष्ट्रे

**नितिन नन्नावरे**
*सहाय्यक प्राध्यापक ,राज्यशास्त्र विभाग, बी.पी आर्ट्स, एस. एम. ए सायन्स,*
*अँड के. के. सी. कॉमर्स कॉलेज,चाळीसगाव (मो.क्र. ७३८७६७४८१८)*

आजच्या युगातील जागतिक व्यवस्था सर्व राज्यांना परस्परांशी संबंध ठेवण्यास बाध्य करीत असते. पृथक राहून कोणतेही राष्ट्र आपला विकास घडवून आणू शकत नाही.सर्व राष्ट्रांना परस्परांशी सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय संबंध ठेवावेच लागतात.प्रत्येक देशाला त्यांच्या परराष्ट्र धोरणामुळेच एक निश्चित दिशा प्राप्त होऊन तदनुसार उद्दिष्टे साध्य करता येतात किंबहुना जागतिक राजकारणात क्षेत्रीय संघटनांची निर्मिती त्यातूनच होत गेली असावी. (उदा. सार्क, अरबलीग, नाटो, सिटो, ओपेक, एसीयन इ.)

**सार्क विभागीय सहकार्य यातील वास्तव-**

दक्षिण आशियाई उपखंडातील राष्ट्रांच्या तुलनेत सर्वच क्षेत्रांमध्ये भारताचे श्रेष्ठत्व असल्याची कल्पना भारताला आहे. परिणामी दक्षिण आशियाई विकासाचे उद्दिष्ट भारताच्या पुढाकार शिवाय साध्य होणार नाही किंबहुना दक्षिण आशियात भारताला वडील बंधूची भूमिका पार पाडावी लागेल याची जाणीव पंडित नेहरूंपासून नरेंद्र मोदीं पर्यंतच्या सर्व पंतप्रधानांना असल्याचे जरी आपण मान्य केले तरी इतिहासातील धोरणांचा आढावा घेताना कटू अनुभवाचा साक्षात्कार होतो. (अपवाद तत्कालीन पंतप्रधान गुजराल यांच्या धोरणांचा,जून १९९६ ते मार्च १९९८) आपली परराष्ट्र नीती ही सतत पश्चिमी राष्ट्रांकडे डोळे लावूनच आखली जात होती. तर पूर्वेकडील चीन व जपान वगळता इतर शेजारी राष्ट्रांचे अस्तित्व असल्यागत नव्हते, ही परराष्ट्र धोरण आखणाऱ्यांची परंपरा; परंतु हा पायंडा केंद्रातील सत्ता परिवर्तनानंतर मोदी यांच्या परराष्ट्र धोरणातील भूमिकेने मोडली जाईल,अशी आशा निर्माण करण्यात सद्यस्थितीत मोदी यशस्वी ठरलेत.

**हरवलेल्यांना भावनिक साद-**

आपले परराष्ट्र धोरण अमेरिका,रशिया,युरोप व चीन या देशांबरोबरील संबंधाविषयी जेवढे जागरूक असते तेवढे शेजारील राष्ट्रांबाबत नाही, हे वास्तव आहे. यातून परराष्ट्र धोरणातील बेफिकिरी वृत्तीच जाणवते. परिणामी अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध अधिक घट्ट करण्याच्या नादात आपण आपले शेजारी हरवतो कि काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. लांबचे पाहण्याच्या नादात पायाखालच्याकडे दुर्लक्ष व्हावे तसेच हे,असे होणे दूरदृष्टीचे नसते. याबाबत शेजारी असणाऱ्या चीनच्या परराष्ट्र धोरणापासून आपणास बरेच काही शिकण्यासारखे आहे. याचे कारण अटलांटिक पल्याड असलेल्या अमेरिकेस आव्हान देत असतानाच चीनचे हिंदी महासागरातील शेजारील देशांकडे जराही दुर्लक्ष झालेले नाही याची जाण निश्चितच मोदींना असावी.याचाच परिपाक म्हणून दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांशी संबंध

सुधारण्यावर मोदींनी अधिक लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते. तद्वतच दक्षिण-पूर्व राष्ट्रांना सोबत घेऊन शेजार संबंध विस्तारण्याचा प्रयत्न नरेंद्र मोदींकडून होत आहे. त्याचा एक भाग म्हणून पहिल्या शंभर दिवसातील नेपाळ, भूतान,जपान,म्यानमार, फिजी या राष्ट्रांच्या दौऱ्याकडे पहावे लागेल.
मिनी सार्क एक मास्टरस्ट्रोक स्ट्रोक - पंतप्रधान मोदींनी शेजार संबंध दृढ करण्यासंदर्भात त्वरित पावले उचललीत हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. मोदींनी त्यांच्या शपथग्रहण सोहळ्यास सार्क राष्ट्र प्रमुखांना निमंत्रित करून मिनी सार्क आयोजित करण्याचा एक प्रयत्न केला होता.मोदी हे पक्के जाणून आहेत की,सार्क राष्ट्रांच्या प्रादेशिक सहकार्यातूनच भारताला अधिक प्रगती साधता येईल. भारताचे हित लक्षात घेत आंतरराष्ट्रीय राजकारणात नवनवे मित्र जोडत असताना पंतप्रधान मोदींनी दक्षिण आशिया व दक्षिण-पूर्व आशियातील राष्ट्रांशी संबंध सुधारून सार्कच्या नेतृत्वाची धुरा आपल्याच अंगावर असल्याची जाणीव करून दिली.

**गुजराल धोरणाचा प्रभाव -** दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये विभागीय स्तरावर सहकार्य वाढावे व सार्क एक संघटित शक्ती म्हणून जगापुढे यावी अशी तत्कालीन पंतप्रधान गुजराल यांची इच्छा होती. त्यामुळे सार्कच्या या विकासात भारताला पुढाकार घेणे गरजेचे होते. यासाठी गुजराल यांनी जे धोरण सुचविले ते म्हणजे Principal of Non Reciprocity होय. या अंतर्गत दक्षिण आशियायी राष्ट्रांना कोणत्याही परतफेडीची किंवा प्रति मदतीची अपेक्षा न करता आर्थिक सहाय्य करणे होय.यात श्रीलंका,बांगलादेश,भूतान, मालदीव व नेपाळ या राष्ट्रांना मोठे आर्थिक सहाय्य आणि व्यापारी सवलती देण्याचे तत्व होते.भारताचे हे धोरण सार्क राष्ट्रांमध्ये भारताविषयी आदर आणि परस्पर विश्वास निर्माण होऊन सहकार्य प्रस्थापित होण्यासाठी महत्त्वाचे होते. किंबहुना हाच वसा मोदी जोपासत आहेत असे म्हणणे चुकीचे न ठरावे?

**शेजारी राष्ट्रांच्या यात्रांचे फलित –**

**नेपाळ भेट -** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नेपाळ येथील १८ व्या संमेलनात सहभागी होऊन दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या शांतता,सहकार्य,एकात्मता, शौर्य व भरभराटी करीता भारत आशावादी असल्याचे मत व्यक्त केले.व्यापार,ऊर्जा,गुंतवणूक,सुरक्षा, पायाभूत सुविधा, विविध प्रकल्पासाठीची कटिबद्धता व्यक्त करून सार्क राष्ट्रांमध्ये विश्वासाचे वातावरण व उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने नेपाळ भेटीचा हा योग तब्बल 17 वर्षानंतर आला हे विशेष.

**भूतान यात्रा -** भूतान व भारत हे पारंपारिक मित्र राष्ट्र. भूतानची संरक्षण,व्यापार व परराष्ट्र धोरण भारताकडून नेहमीच प्रभावित होते. मोदींनी या भेटीत हायड्रोइलेक्ट्रिक डील करून आयटी व डिजिटल क्षेत्रातील सहकार्यासाठी कटिबद्धता व्यक्त केली.

**मलेशिया** - ईस्ट एशिया समिट प्रसंगी मलेशियाचे पंतप्रधान मोह. नजीब रजाक यांना सांस्कृतिक,आर्थिक व संरक्षणात्मक सहकार्य करण्याबाबत पंतप्रधान मोदींनी आश्वस्त केले.

अफगाणिस्तान - भारताऐवजी पाकिस्तान जवळचा असे मानणाऱ्या अफगाणिस्तानशी केवळ सैनिकी सहकार्य नव्हे तर व्यापार वृद्धीचेही पाऊल मोदी कारकिर्दीत अधिक पुढे जाईल अशी आशा अश्रफ घणी व मोदी भेटीने दिली आहे.

**चीन -** आर्थिक विकासासाठी भारताला चीनशी संबंध मजबूत करणे अत्यावश्यक आहे. दोन्ही राष्ट्र प्रमुखांनी धोरण ठरविताना आर्थिक व सामाजिक अशा दोन्ही पातळीवर विचार करण्याचे मान्य केले. जगाच्या अर्थव्यवस्थेचा लोलक पूर्वेकडे सरकत असल्याने भारत व चीनला आर्थिक सहकार्याची नामी संधी आहे.

**बांगलादेश -** पंतप्रधान नरेंद्र मोदी व बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्यात सीमा कराराची अंमलबजावणी झाली. या करारान्वये भारतातील १११ गावे बांग्लादेशात तर बांग्लादेशातील 51 गावे भारतात समाविष्ट झाली तसेच दोन्ही देशांदरम्यान ( Joint Task Force On Fake Currency ) या कराराअंतर्गत खोट्या नोटांचे व्यवहार थांबविण्यासाठी स्वाक्षऱ्या झाल्या. तसेच मॉरीशस, श्रीलंका, म्यानमार इ. राष्ट्रांच्या भेटीतून भव्यदिव्य, नेत्रदीपक साध्य होण्याची शक्यता नसली तरी आंतरराष्ट्रीय व्यूहरचनात्मक पातळीवर निश्चितच महत्व आहे.

**अपेक्षांचे ओझे -** जागतिक राजकारणामुळे परराष्ट्र संबंधांचे स्वरूप आमुलाग्र बदलले असून यापुढील काळात आर्थिक विकास,उद्योग,बाजारपेठ, तंत्रज्ञानाचा विकास आदी गोष्टींना अधिक महत्त्व आले आहे व परराष्ट्र सबंधांवर त्याचा प्रभाव असणार आहे. मोदी यांनी ही गोष्ट हेरली आणि आपल्या नेतृत्वाने परराष्ट्र धोरणात त्यांनी चैतन्य आणले आहे. मात्र भारताच्या विकासाला गती देत असताना या चैतन्याचा अधिकाधिक उपयोग होईल,याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

मोदींची व्यूहनीती - गेली अनेक वर्षे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये कायम सदस्यत्व मिळावे म्हणून भारत प्रयत्नशील आहे. त्यामुळे कायमस्वरूपी सदस्यत्वासाठी मोदींनी आपल्या पद्धतीने सर्व देशांची बोलणे सुरू ठेवताना त्या देशांच्या भेटीही आरंभिल्या आहेत. हा त्यांच्या 'व्यूहनीतीचाच' एक भाग असेल असे वाटते. मोदींच्या विदेश नीतीमुळे भारताची जगातले स्थान काय आहे हेसुद्धा येणाऱ्या काळात आपल्याला कळेलच.

तात्पर्य, मोदींच्या परराष्ट्र भेटींची फलित केवळ उत्सुकता व उत्साह वाढविणारे नसावेत तर प्रत्यक्ष देश हितार्थ फलदायी टाकणारे असावेत हीच अपेक्षा.

**संदर्भ -**

*डॉ.शैलेश देवळानकर,'भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर',मार्च २००७ पान क्र. ६८,८८,१३६*

*डॉ.वसंत रायपूरकर,आंतरराष्ट्रीय सबंध,२००१,पान क्र.१७५*

*मासिके व साप्ताहिके - डॉ.अविनाश धर्माधिकारी,चाणक्य मंडळ परिवार,ऑक्टो २०१५,पान क्र. ६२*

*विवेक,८ ते १४ फेब्रुवारी २०१५,पान क्र. ०६*

*वर्तमानपत्रे – लोकसत्ता,संपादकीय,१६ मार्च २०१५, २२ एप्रिल २०१५*

# सार्क संघटनेची प्रासंगिकता

**प्रा. सौ. सुहास चंद्रशेखर नागापूरे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला वाणिज्य महिला महाविद्यालय,बल्लारपूर*
*mb. 9588404317 email : suhasnagapure18@gmail.co*

## ❖ प्रस्तावना :—

ज्या प्रमाणे कोणतीही एक व्यक्ती आपल्या सर्वच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नाही.त्याला इतरांच्या मदतीची गरज लागतेच. तीच गोष्ट प्रत्येक राष्ट्राच्या बाबतीत लागू होते. खरे तर आजच्या या जागतीकिकरणाच्या काळात कोणताही एक देश स्वत: स्वत:चा विकास करू शकत नाही,त्याला अन्य देशांच्या मदतीची,सहकार्याची गरज भासते. सहकार्य व मदतीबाबतच्या या गरजेतून व विकासाची गती वाढविण्याच्या विचारातून आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक सहयोगी संघटना स्थापन करण्यात आल्याचे दिसून येते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय दृष्टया सहकार्य करून देशाची प्रगती करणे या विचार प्रवाहातून या संघटनांची स्थापना झाली आहे. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकारी संघटना अर्थात 'सार्क' ही त्यापैकी एक संघटना आहे. वास्तविकता आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी, जागतिक अधिकोष या जगातिक पातळीवरील संघटनांवर जगातील विकसित देशांचे वर्चस्व असल्यामुळे आशियाई देशांचा विचार न करता विकसित देशांनी या संघटनांचा आंतरराष्ट्रीय व्यापार आपल्या बाजुने अधिक फायदेशीर करून घेण्यासाठीच वापर केला. शिवाय पाश्चात्य विकसित देशांनी अनेक आशियाई देशांवर व्यापार विषयक जाचक अटी घातल्या. या कारणांनी प्रादेशिक सहकार्याची गरज लक्षात घेऊनच दक्षिण आशियाई देशांनी आशियाई सामुदाईक बाजारपेठ आणि सार्कची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. सध्याच्या कोव्हिड १९ च्या महामारीच्या काळात आणि भारताच्या सिमावर्ती राष्ट्रांकडून होत असलेली युध्दसदृश्य कटकारस्थाने या पार्श्वभूमीवर सार्क संघटनेची भूमिका अभ्यासनाचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

## ❖ अध्ययनाचे उद्देश

१) सार्क संघटनेचे स्वरूप समजून घेणे

२) सार्कची भुमिका व प्रासंगिकता समजून घेणे.

## ❖ संशोधन पध्दती :—

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साहित्यावर आधारित आहे. ग्रंथ,मासिके,वर्तमान पत्रातील लेख,इंटरनेटवरील लेख व अहवाल आदींचा शोध निबंधाच्या लिखाणाकरिता आधार घेतला आहे.

**❖सार्क संघटनेचा उदय :—**

सार्क संघटनेची कल्पना १९५० च्या दशकात Asian Relation Conference मध्ये मुळ धरू लागली. १९७० च्या दशकात बांग्लादेश, भुतान, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान व भारत या देशांना एकत्रितपणे व्यापार व सहकार्य या संबधाने एका संस्थेची गरज जाणवू लागली आणि यातूनच संघटनेचा उदय झाला. सार्क संघटनेच्या उदयाचा प्रस्ताव बांग्लादेशाचे राष्ट्रपती झिया उर रहेमान यांनी सर्वप्रथम मांडला. दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सार्क संघटना होय. दि. ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना झाली. दक्षिण आशियाई देशाचे समाजकल्याण, तेथील लोकांचा जीवन विकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना स्थापन करण्यात आली. सार्कच्या स्थापणेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य व निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी तयार होते. एप्रिल २००७ मध्ये अफगानिस्तानला आठवा सदस्य देश म्हणून या संघटनेत प्रवेश मिळाला. दि. ७ व ८ डिसेंबर १९८५ रोजी बांग्लादेश, भुतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान व श्रीलंका या देशाच्या प्रमुखांची बैठक ढाका येथे पार पडली. या शिखर परिषदेत दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकारी संघटना अर्थात सार्कची औपचारीक घोषणा केली गेली. १९८५ मध्ये स्थापन झाल्यापासून सार्कने ठरवून दिलेल्या क्षेत्रात आपले कार्य सुरू केले. सातही देशाच्या प्रमुखांच्या शिखर परिषदेत 'सार्क जाहिरनामा' मंजूर होऊन दक्षिण आशियाई देशांचा संघ स्थापन झाला.

**सार्क जाहिरनाम्यात खालील उद्दिष्टे सांगण्यात आली आहेत.**

१) दक्षिण आशियातील जनतेचे जीवनमान उंचवण्यासाठी प्रोत्साहन देणे.

२) दक्षिण आशियात आर्थिक वृध्दी, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाचा वेग वाढवून प्रत्येक व्यक्तिला त्यांच्या पुर्ण क्षमता साध्य करण्यासाठी स्वाभिमानाने जगण्याच्या संधी उपलब्ध करून देणे.

३) दक्षिण आशियाई देशात सामूहिक स्वंयनिर्भरता वाढवणे व मजबूत करणे.

४) परस्परांवरील विश्वास, सामंजस्य आणि एकमेकांच्या समस्याच्या आकलनासाठी योगदान देणे.

५) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक व वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहकार्य व सक्रिय सहभाग वृध्दिंगत करणे.

६) इतर विकसनशील देशांशी सहकार्य मजबूत करणे.

७) सामाजिक प्रश्नांबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्परातील सहकार्य मजबूत करणे.

८) समान उद्दिष्टे व ध्येय असलेल्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांना सहकार्य करणे.

❖ **सार्कची रचना व कार्य:** सार्क संघटनेची अठरावी परिषद नेपाळची राजधानी काठमांडू येथे पार पडली आणि कालबाहय ठरत जाणाऱ्या या संघटनेच्या भवितव्याविषयी काही का

होईना आशेचे चित्र निर्माण झाले. तीस वर्षापूर्वी १९८५ साली या संघटनेची स्थापना झाली. दक्षिण आशिया उपखंडात एक सामुहिक बाजारपेठ निर्माण करणे हा तिच्या स्थापने मागचा प्रमुख उद्देश होता. तसेच १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कची वार्षीक परिषद देशांच्या नावाच्या आद्यक्षरानुसार त्या त्या देशात भरते. देशांच्या परराष्ट्रमंत्र्याची वर्षातुन दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्य देशांचे राष्ट्रप्रमुख उपस्थित राहतात. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्यानंतर भारत, बांग्लादेश, भुतान आणि अफगानिस्तानात या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणाऱ्या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. सदस्य देशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युध्द किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर चर्चा होत नाही. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरूध्द लढण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर भर देण्यात आला आहे. सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. युरोपीयन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनाबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध होते.

सार्कने अल्पकाळातच विविध आघाडयांवर लक्षणीय प्रगती केली. तसेच २००६ मध्ये दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची स्थापना करण्यात आली. व्यापार वृध्दीबाबत या संघटनेला सदस्य देशांमध्ये चांगलेच यश प्राप्त झाले. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्रय, निर्मुलन, पर्यावरण रक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रात सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना पारितोषीक देण्यात आले.

सार्कच्या इतर सदस्यांच्या तुलनेत भारत सर्व दृष्टीने मोठा आहे. एकटया भारताचे आकारमाण दक्षिण आशिया उपखंडाच्या एकुण आकारमानापैकी ७० टक्के एवढे आहे. स्वाभाविकपणे या संघटनेवर भारताचा प्रभाव आहे. दक्षिण आशियातील देशांना युध्दे, परकीय आक्रमणे, वसाहतवाद यांची प्रचंड झळ सोसावी लागली आणि युध्दसंघर्ष सुध्दा अनुभवला आहे. स्वातंत्र्यानंतर या देशांना आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्यांनी सतत भेडसावले आहे. जागतीक स्तरावर हे देश विकसनशील म्हणून गणले गेले. जगातील संपन्न व बलाढय देशांच्या तुलनेत हे देश नगण्य ठरले आणि म्हणून ते दुर्लक्षित राहाले. अशा समदु:खीपणामुळे हे देश आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी एक समान व्यासपीठ शोधत आहे. ते त्यांना १९८५ मध्ये सार्कच्या स्थापनेमुळे मिळाले. सार्कच्या स्थापनेला ३० वर्षे होऊन गेलीत तरीपण या तीस वर्षात या संघटनेची वाटचाल समाधानकारक नाही. या संघटनेचे बरेचसे उद्दिष्टे हे आजही कागदोपत्रीच आहे. सार्कच्या अधिवेशनात महत्वपूर्ण निर्णय घेतले जातात. पण ते कागदोपत्रीच राहतात, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक

ती राजकीय इच्छाशक्ती सदस्य राष्ट्रे दाखवत नाहीत. अंमलबजावणीचे दोन मुख्य अडथळे आहे. एक म्हणजे सदस्य राष्ट्रांमधील विशेषत: भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय स्वरूपाचे संघर्ष आणि दुसरे कारण म्हणजे विश्वासाची कमतरता सार्क संघटनेचे बहुतेक निर्णय पाकिस्तानच्या आडमुठया धोरणामुळे पूर्णत्वाला येऊ शकले नाही. याशिवाय भारताची 'बिग ब्रदरची' प्रतिमा देखील काही प्रमाणात याला जबाबदार आहे.

सार्कला यशस्वी व्हायचे तर प्रथम सार्क देशांनी परस्परांमधला व्यापार वाढवायला हवा, जो सध्या अत्यल्प म्हणजे तीन अब्ज डॉलर्स एवढा आहे. त्यासाठी एअर लॅन्ड, रेल कनेक्टिव्हिटी ही कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे व्यापार शक्य होत नाही. तसेच सार्कच्या काही देशांमध्ये परस्पर विमान वाहतुकही होत नाही. म्हणूनच अठराव्या परिषदेत भारताने पूढाकार घेत कनेक्टिव्हिटीच्या संदर्भात तीन महत्वाचे प्रस्ताव मांडले. रोड, रेल आणि पॉवर कनेक्टिव्हिटी त्यापैकी फक्त वीजेसंदर्भात सहमती व करारावर स्वाक्षरी झाली. उर्वरित दोन करार न होण्यामागे देखील पाकिस्तानचे अडमुठे धोरणच जबाबदार आहे. एकोणीसावी सार्क परिषद पाकिस्तानात होणार असुन आता या करारावर पाकिस्तान काय भुमिका घेतो. याकडे सर्वांचे लक्ष लागुन आहे. जोपर्यंत पाकिस्तान राजकीय संघर्ष आणि आर्थिक सहकार्य यात फारकत करत नाही, भारताबरोबर व्यापार संबंध सुरळीत करत नाही, सार्कच्या निर्णयांकडे संकुचित दृष्टीकोनातुन पाहणे सोडत नाही. तोपर्यंत सार्कला प्रगती करणे अवघड आहे. सार्कच्या यशासाठी भारताला मोठी जबाबदारी उचलावी लागणार आहे. भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण उपग्रह देण्याचे मान्य केले. या उपग्रहासाठी २३५ कोटी रूपये खर्च आला असुन तो संपूर्ण खर्च भारतच देणार आहे.

**❖सार्कची कामगिरी :—**

सार्कने आपल्या क्षेत्रात कार्य करणे सुरू केले तसेच जाणीवपुर्वक वादग्रस्त व्दिपक्षीय व राजकीय स्वरूपाचे मुद्दे बाजूला ठेवले. सार्कने उशिरा का होईना एकमेकांवर अविश्वास असलेले देश प्रथमच एका छत्राखाली आले. एकतेच्या विरोधी कार्य करणारे आणि सहकार्यात अडचण निर्माण करणारे अनेक घटक प्रबळ असूनही सामाजिक कायद्याची प्रबळ इच्छा आणि एकत्र सहकार्य करण्याची तिव्र इच्छा अखेर जास्त प्रभावी ठरल्यामुळे सार्कची स्थापना झाली. तसेच सार्कने आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण सहकार्याच्या योजना आखल्या. त्यात सार्कने यश सुध्दा संपादन केले. व्यापार, वित्तीय व्यवस्थापन, चलनविषयक क्षेत्र या मुलभूत क्षेत्रात भरीव सहकार्य प्राप्त झाले. उदाहरणार्थ, सार्क मुक्त व्यापार करारांतर्गत दुहेरी कर आकारणी बंद करण्यात आली आणि पारंपारीक वस्तुच्या व्यापाराला करमुक्त करण्यात आले. तसेच शिक्षण, क्रिडा, संस्कृती आणि प्रसार माध्यमे या क्षेत्रात सार्कने भरीव कार्य केलेले आहे. सार्कद्वारे सांस्कृतिक देवाण — घेवाण करण्याच्या योजना राबविण्यात आल्या. त्यात चित्रपट महोत्सव कवी — लेखक संमेलन, नृत्य महोत्सव, संगीत मैफिल इत्यादी. शिक्षणक्षेत्रात दक्षिण आशियाई विद्यापीठ दिल्ली येथे सुरू झाले आणि त्याद्वारे शिष्यवृत्ती,

शिक्षा वेतनवृत्ती देऊन दक्षिण आशियासंबंधी विषयांवर संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले जाते. सार्क क्रिडा स्पर्धा व युवक मेळावे आयोजित केले जातात. त्याचबरोबर विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात दक्षिण आशियाई देशांतील सहकार्य फार महत्वाचे आहे.

सार्कच्या जाहिरनाम्यानुसार राजकीय व वादग्रस्त विषय कार्य कक्षेच्या बाहेर असले तरी सार्कने दोन अत्यंत धाडसी करार केले आहेत.

१) मादक द्रव्य व अंमली पदार्थाच्या प्रतिबंधाचा करार.

२) दहशतवाद विरोधी करार.

त्याचबरोबर लोकसंख्यावाढ व आरोग्य हे देखील दक्षिण आशियातील प्रश्न आहेत. त्यामुळे सार्कने त्याबद्दल अनेक योजना हाती घेतल्या. उदा. क्षयरोग, मलेरीया, कुष्ठरोग, पोलिओ, रेबिज, आयोडिन कमकरता अशा जुन्या आजारावर सामाजिक उपाययोजना सुरू करण्यात आल्या. तसेच एड्स, मधुमेह, कर्करोग अशा गंभीर रोगावरही सहकार्याच्या योजना आहेत.

दक्षिण आशिया हा कृषीप्रधान प्रदेश आहे. परंतु शेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. कारण नैसर्गिक आपत्ती, लहरी पर्जन्यवृष्टी, जमिनीचा घसरणारा कक्ष, खते, किटकनाशके याचे वाढते दर यामुळे शेती व्यवसायाचे नुकसान होत असून यामुळे दारिद्रय, उपासमार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा समस्या वाढत आहेत. त्याकरिता सार्कने काही महत्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये मुख्य म्हणजे शेतीबद्दल, जमिनीच्या दर्जाबद्दल, पिकाबद्दल शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीबद्दल आणि तिथे उपयोगी तंत्रज्ञानांबद्दल सार्कने मुलभूत माहिती संकलित केली आहे. जसे, कृषी विद्यापीठे व कृषी संशोधन संस्थाव्दारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, पिकाच्या नविन जाती निर्माण करणे, शेतीकरीता नवीन तंत्रज्ञान विकसीत करणे इत्यादी उपक्रम सुरू केले. त्याचबरोबर सामाजिक वनीकरणास प्रोत्साहन देणे, जनतेचा सहभाग वाढविणे, स्थानिक पातळीवर विकासाच्या योजना आखणे, ग्रामीण भागात वीज व पाठबंधारे योजना राबविणे आणि शेतीवर आधारित समांतर व पूरक व्यवसायास प्रोत्साहन देणे असेही उपक्रम सार्कने राबवले आहेत. अशाप्रकारची दक्षिण आशियाई देशातील सार्क संघटनेची प्रभावी कामगिरी दिसून येते.

### ❖ सार्कची प्रासंगिकता

#### अ) भारत पाकिस्तान प्रश्न

सार्क या दक्षिण आशियातल्या आठ देशांच्या एकमेव संघटनेने भारत आणि पाकिस्तान या दोन देशातील समस्या सोडवण्यात महत्वाची भुमिका बजावली आहे. पुलवामा येथे झालेल्या दहशवादी हल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये टोकाचा तणाव निर्माण झाला होता. या दोन्ही देशांना संयम आणि सबुरीचा सल्ला या संघटनेचे अध्यक्ष्यपद सांभाळणाऱ्या नेपाळने दिला. सार्क देशामध्ये परस्पर सहकार्याचे

वातावरण निर्माण होण्यास संधीच उपलब्ध झाली नाही याचे कारण भारत आणि पाकिस्तान यांच्यामधले शत्रुत्व.

दक्षिण आशिया मधील देशांची पुलवामा हल्लानंतरच्या परिस्थितीवर काय भूमिका घेतली असा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा या दहशतवादी हल्लाचा निषेध करण्यासाठी सार्क देश सर्वात पुढे आले. या सार्क संघटनेतील नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका, भूतान आदी राष्ट्राच्या पंतप्रधनानी या दहशतवादी हल्लाचा निषेध व्यक्त केला. त्यावर मात करण्यासाठी सर्व देशांनी परस्पर सहकार्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले. सध्या सार्क संघटनेचे अध्यक्षपद सांभाळणाऱ्या नेपाळने आपल्या निवेदनातुन भारत व पाकिस्तान यांना संयमचा सल्ला दिला आणि दक्षिण आशियामधल्या शांतता व सुरक्षेला बाधा होईल अशी कोणतेही पावले न उचलण्याचे आवाहन केले. कारण दक्षिण आशियामध्ये शांतता व स्थैर्य नांदण्यासाठी सामोपचाराची नितांत आवश्यकता आहे असे नेपाळला वाटते. नोव्हेंबर २०१४ मध्ये पार पडलेल्या अठराव्या सार्क संमेलनात सर्व सदस्य देशांनी जाहिर केले की दहशतवाद आणि कोणत्याही हिंसक कारवायांचा निषेध करत असून अशा कारवायांचा सामना करण्यासाठी सगळे सदस्य देश सहकार्य करतील या समस्येचे निराकरण करण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांनी महत्वाची भूमिका घेतल्याने सार्क संघटनेला बळकटी मिळत आहे. सध्याच्या दक्षिण आशियामधल्या देशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दहशतवादाशी सामना करण्यासाठी सार्क देशांनी परस्पर सहकार्याची भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. कारण की त्यामुळेच सार्क सारख्या संघटनेची आवश्यकता अबाधित राहू शकेल.

**ब) सार्क संघटना व कोव्हिड—१९**

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदींनी Covid-19 महामारीचा वायरसचा सामना करण्यासाठी सार्क संघटनेतील सदस्य राष्ट्राच्या पंतप्रधानाशी वीडियो—कॉन्फ्रेरंसच्या माध्यमातून सभेचे आयोजन केले. पंतप्रधान मोदींनी सर्व सदस्य राष्ट्रांना आवाहन केले की, ''कोरोनाला न घाबरता, त्याचा सामाना करण्यासाठी तयार रहा, हाच आपला मंत्र आहे''. तसेच पंतप्रधान मोदींनी Covid-19 विषाणूचा सामना करण्यासाठी '' SAARC COVID-19 इमरजेंसी फंड'' ची स्थापना करण्याचा प्रस्ताव ठेवला आणि या फंडात आपल्या भारत देशाकडून १० मिलीयन अमेरिकी डॉलर देण्याची घोषणा केली.

सार्क देशातील कोव्हिड—१९ च्या प्रसारामुळे आरोग्यासोबतच इतर क्षेत्रात (**उदा.** व्यापार, उद्योग, पर्यटन इत्यादी) यावर सुध्दा याचा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत सामुहिक प्रयत्नाने सार्क देशातील कोव्हिड—१९ चा प्रसार थांबविणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर या संसर्गजन्य विषाणूवर मात करण्याकरीता जनजागृती, बाधित लोकांपासून संसर्ग रोखणे, लसीकरण आणि योग्य आचरण इत्यादी उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि म्हणून भारतच असा देश आहे की, या सगळया परिस्थितीवर मात करण्यासाठी तपासणी, उपचार, आरोग्य प्रशिक्षणासाठी कमी वेळात आवश्यक मदत करीत आहे.

## ❖ समारोप

एकूणच दक्षिण आशियाई देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय सहकार्य वाढविण्याबरोबर या देशातील विविध प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, विशेषत: भारत आणि पाकिस्तान या दोन शेजारी राष्ट्रातील वैमनस्य संपविण्याच्या दृष्टीने तसेच सध्याच्या कोराना महामारीच्या काळात आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्याच्यादृष्टीने सार्कचे कार्य प्रासंगिक आहे. सार्कच्या मध्यमातून या देशांमध्ये शांतता नांदू शकेल,व्यापार वृध्दी होऊ शकेल असेच म्हणता येईल.

## ❖ संदर्भ सूची –

*१) भारताची राष्ट्रीय सुरक्षा – प्रा. ए. पी. चौधरी*

*२) आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. वसंत रायपुरकर*

*३) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण – डॉ. सुनिल दात*

*४) 'SAARC as a Regional Alliance, Sharma P.L.(2002)*

*५) http://www.saarc-sec.org/SAARC-charter/5/;accessed on 1st May 2017-05-01.*

*६) Chapter of the SAARC (1985) Article II, Kathmandu:SAARC Secretariat, p.1*

*७) भारत पाकिस्तान प्रश्न व सार्कची भूमिका https://www.orfonline.org/marathi/india-pakistan-tension-is-there-a-role-for-saarc-48978/*

*८). सार्क का पुनुरूत्थान : कोविड–१९ के समय में नेतृत्व https://www.icwa.in/show_content.php?lang=2&level=3&ls_id=4653&lid=3504*

*९). दांव पर सार्क की प्रासंगिकता https://www.pravakta.com/relevance-of-saarc-at-stake/*

*१०). सार्क क्षेत्र में भारत की भूमिका https://www.drishtiias.com/hindi/daily-updates/daily-news-analysis/from-virtual-conferencing-to-real-leadership*

*११) India and SAARC: its implications for the neighborhood https://mea.gov.in/distinguished-lectures-detail-hi.htm?669*

# भारत नेपाळ संबंध

**प्रा. तळणीकर एस. जी.**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव Mob: 8378888333*
*Email –talnikarshripad@gmail.com*

**प्रस्तावना :-**

भारत आणि नेपाळ या दोन देशातील संबंध हे हजारो वर्षापासूनचे आहेत. भारत आणि नेपाळ हे दोन देश असे आहेत ज्यांची बहुसंख्य लोकसंख्या हिंदू आहे. दोन्ही देशामध्ये धार्मिक समानताच नव्हे तर सांस्कृतिक समानता देखील आहे. भारताची राष्ट्रभाषा हिंदी व नेपाळची राष्ट्रभाषा नेपाळी या दोन भाषेतही समानता आढळून हेते. नेपाली भाषेतही देवनागरी लिपी असून शब्दसंग्रह सुद्धा एकसारखा आहे. ज्याला हिंदी येते तो थोड्याफार प्रमाणात नेपाळी भाषा समजू शकतो. दोन्ही देशामध्ये रोटीबेटीचे संबंध आहेत. भारत व नेपाळची सीमा १८५० कि.मी. एव्हढी लांब आहे. भारतातील पाच घटक राज्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, प.बंगाल व सिक्कीम यांची सीमा नेपाळला लागून आहे. नेपाळ भरताचा एक महत्वपूर्ण शेजारी देश आहे. गेल्या अनेक वर्षापासून भौगोलिक ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक संबंधामुळे नेपाळचे भारताच्या परराष्ट्र धोरणात विशेष महत्व आहे. भारत आणि नेपाळ या दोन्ही देशात हिंदू आणि बौद्ध या दोन धर्मांना विशेष महत्व आहे. पशुपतीनाथ मंदिर व जनकपूर मंदिर हिंदुच्या दृष्टीने आस्थेची व श्रद्धेची तीर्थक्षेत्र आहेत. तद्वतच गौतम बुद्धाचे जन्मस्थान लुम्बिनी नेपाळ मध्ये आहे. तर निर्वाण स्थान कुशीनगर हे भारतात आहे. अशा प्रकारच्या धार्मिक आणि ऐतिहासिक संबंधामुळे भारत आणि नेपाळ या दोन देशातील सीमा ही खुली सीमा आहे. दोन्ही देशातील नागरिकांना एकमेकांच्या देशात जाण्यासाठी पासपोर्ट लागत नाही. नेपाळ आणि भारत यांच्यातील संबंध एवढे महत्वपूर्ण आहेत की एकेकाळी नेपाळचे नेते बी.पी. कोईराला, गणेश सिंह, मनमोहन अधिकारी सारख्या नेत्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला होता.

भारत आणि नेपाळ मध्ये केवळ धार्मिक, सांस्कृतिक, संबंध नाहीत तर सैनिकी संबंध सुद्धा ब्रिटीश राजवटीपासून आहेत. ब्रिटीश काळात भारतीय सैन्यात गोरखा रेजिमेंट होती. गोरखांचा भारतीय सैन्यात प्रवेश १८१६ साली अँग्लो नेपाली युद्धानंतर झालेल्या सुगौली कराराद्वारे झाला. गोरखांनी ब्रिटीश राजवटीला जोरदार आव्हान दिले. अँग्लोनेपाळी युद्धात गोरखांचा पराभव झाला तरी त्यांनी अतिशय धाडसाने ब्रिटीशांचा मुकाबला केला. गोरखा अतिशय शूर आहेत. आणि शेवटच्या श्वासापर्यंत लढतात असे ब्रिटीशांच्या लक्षात आले तेव्हा या करारानंतर भारतात गोरखा रेजिमेंटची स्थापना झाली. भारत स्वतंत्र झाल्यावर सात गोरखा रेजिमेंट भारताच्या लष्करात समाविष्ट करण्यात आल्या. सध्या भारतीय लष्करात सात गोरखा रेजिमेंटच्या ४० बटालियन आहेत. ज्यामध्ये सुमारे ३२००० गोरखा सैनिक आहेत. एव्हढेच नव्हे तर नेपाळच्या बाहेर जवळपास ७५ लाख नेपाली नागरिक जगात इतरत्र राहतात. त्यातील ६० लाख नेपाळी नागरिक भारतात राहतात. आज ही गोरखा रेजिमेंट मध्ये नेपाळच्या पहाडी भागातील युवकांची भरती केली जाते. भारत आणि नेपाळ या दोन देशात १९५० मध्ये शांती आणि मैत्री करार

झाला. या करारानुसार भारत व नेपाळ या दोन देशातील संबंधाची सुरवात झाली. या करारातील तरतुदीनुसार नेपाळी नागरिकांना भारतीय नागरीकाप्रमाणे सुविधा आणि संधीचा लाभ घेतला आहे. सध्या भारतात जवळ पास ६० लाख नेपाळी नागरिक भारतात राहून काम करतात. २५ एप्रिल २०१५ मध्ये नेपाळमध्ये ७.४ तीव्रतेचा भूकंप झाला तेव्हा भारत सरकारने आपत्ती निवारण दल आणि मदत सामुग्री सहित विशेष विमाने नेपाली नागरिकांचा बचाव व मदत करण्यासाठी पाठविले होते.

भारत आणि नेपाळ यांच्यामध्ये घट्ट आर्थिक संबंध प्रस्थापित झालेले आहेत. भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. भारत नेपाळला इतर देशांशी व्यापार करण्यासाठी सुद्धा सुविधा उपलब्ध करून देतो. नेपाळ आपला सामुद्रिक व्यापार करण्यासाठी कोलकत्ता बंदराचा उपयोग करतो. भारतातील अनेक कंपन्या नेपाळच्या आर्थिक घडामोडीमध्ये सहभागी आहेत. या कंपन्या नेपाळमध्ये निर्माण कार्यात तसेच वीजनिर्मिती, पर्यटन, सेवाक्षेत्रात कार्यरत असल्याच्या आढळून येतात. नेपाळ एक भू आवरुद्ध देश असल्यामुळे भारताद्वारे नेपाळी नागरिकांच्या आर्थिक विकासासाठी तसेच नागरिकांमध्ये नेपाळचा संपर्क प्रस्थापित व्हावा यासाठी अनेक विकास योजनांना मदत केली जाते. भारतातील रक्सौलला काठमांडूला रेल्वे सेवेने जोडण्यासाठी दोन्ही देशामध्ये करारावर हस्ताक्षर करण्यात आलेले आहेत. नेपाळ एक पहाडी देश असल्यामुळे जीवन आवश्यक गोष्टीसाठी तो भारतावर अवलंबून आहे. याबाबत भारताचे भरीव सहकार्य नेपाळला प्राप्त होते. भारत आणि नेपाळ यांच्यातील धार्मिक, सांस्कृतिक, सैनिकी, रोटीबेटी असे विविध प्रकारचे संबंध असले तरी गत काही काळापासून भारत आणि नेपाळ सुसंबंधात दुरावा निर्माण झाला आहे. नेपाळ पहाडी देश असल्यामुळे तो अनेक बाबतीत भारतावर अवलंबून आहे. भारतातून रस्ते मार्गाने नेपाळला जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा हा सातत्याने चालू असतो. भारत आणि नेपाळ यांच्यात विसंवाद होण्याचे मुख्य कारण म्हणजे उत्तराखंड मधील धारचुला क्षेत्रात लीपुलेखला जोडणारा रस्ता नेपाळचे असे म्हणणे आहे की कालापानी क्षेत्राजवळ असणारा हा भाग नेपाळचा हिस्सा आहे. भारताने नेपाळशी कुठल्याही प्रकारची चर्चा केल्याशिवाय कालापानी भागात रस्त्यांची निर्मिती केली आहे. नेपाळद्वारा जो नकाशा प्रकाशित केला गेला त्यात उत्तराखंड मधील कालापानी लीपियाधुरा व लीपुलेख हा नेपाळचा भाग असल्याचे दाखविला आहे.

२) नेपाळद्वारा या क्षेत्रासंबंधी १८१६ साली झालेल्या सुगौली कराराचा उल्लेख केला जातो. सुगौली करारानुसार कालीनदीच्या (महाकाली) पूर्वेकडील सर्व भूभाग ज्यामध्ये लीपियाधुरा, कालापानी व लिपुलेख हा भूभाग नेपाळचा हिस्सा आहे.

३) नेपाळ सरकारचे असे प्रतिपादन आहे की जम्मु काश्मीर आणि लद्दाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिल्यानंतर भारतातील जो नकाशा प्रकाशित केला त्यात नेपाळच्या भूभागाचा उल्लेख केलेला आहे. २०१९ मध्ये प्रकाशित भारतीय नकाशामुळे नेपाळ आणि भारत यांच्यात मुळात जुन्याच असलेल्या विवादामुळे आणखी नव्याने भर पडली आहे.

४) नेपाळ २०१७ मध्ये चीनच्या वन बेल्ट, वन रोड योजनेमध्ये सहभागी झाला. भारत नेपाळने या योजनेमध्ये सहभागी होऊ नये म्हणून नेपाळवर दबाव टाकत होता. भारतानी मोठ्या भावाची प्रतिमा चीनला मान्य नाही.

५) भारत आणि नेपाळ यांच्यात संबंध खराब होण्याचे मुख्य कारण म्हणजे २०१५ मध्ये नेपाळ मध्ये नवीन राज्यघटना स्वीकारली गेली. भारताद्वारे या राज्य घटनेचे स्वागत केले जावे असे नेपाळला वाटत होते परंतु भारताने या नवीन राज्य घटनेनेच स्वागत जसे नेपाळला वाटते होते. तसे केले नाही.
६) भारताने नेपाळच्या राज्यघटनेचे स्वागत न करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे नेपाळ मध्ये मधेसिया लोकांना नेपाळी संसदेत लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जावे हे आहे. नेपाळ मधील तराई क्षेत्रात मधेशी आणि थारू जनजातीचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. नेपाळमध्ये तराई क्षेत्रापेक्षा पहाडी लोकसंख्येला जास्त प्रतिनिधित्व संसदेत दिल्या गेले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व व नागरिकत्व मिळावे यासाठी लाखो मधेशियांनी २०१५ मध्ये नेपाळची आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी व्यापक आंदोलन केले. नेपाळची आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी भारताने सहकार्य केले असा नेपाळचा आरोप आहे.
७) भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंध दुरावाण्याचे मुख्य कारण म्हणजे चीनचा नेपाळमध्ये वाढत चालेला हस्तक्षेप आणि प्रभाव हे आहे. नेपाळ, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका या देशात चीन ची उपस्थिती वाढली आहे. चीन या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे. नेपाळ मधील बऱ्याच शाळात चीनी भाषा शिकविणे अनिवार्य करण्यात आले आहे. नेपाळ मध्ये चीनी भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाचा खर्च चीन सरकार करण्यास तयार आहे. शिक्षणाच्या माध्यमातून नेपाळी लोकांच्या मनात भारताविषयी द्वेषाची भावना निर्माण करण्याचा चीनचा डाव आहे.
८) चीन नेपाळ मध्ये पायाभूत क्षेत्रामध्ये अनेक योजनावर काम करत आहे. त्यावर प्रचंड पैसा खर्च करीत आहे. भारत आणि नेपाळ यांच्यातील दुराव्याचा चीन पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे. सध्याच्या काळात नेपाळ चीनच्या पूर्णत: प्रभावाखाली गेल्याचे जाणवत आहे. २०१५ मध्ये आर्थिक नाकेबंदी आंदोलना बाबत नाराजी म्हणून नेपाळने भारतातील राजदूत दीप कुमार उपाध्याय यांना परत बोलविले. नेपाळचे राष्ट्रपती विद्यादेवी भंडारी यांच्या शासकीय दौरा देखील अचानक कुठलेही कारण न देता रद्द केला. या योजनेतून मधेधी आंदोलन आणि राज्यघटना याबाबत चर्चा होऊन काहीमार्ग निघाला असता मतभेद कमी झाले असते.
९) नेपाळ मध्ये गौतम बुद्धाच्या २५६० व्या जयंतीचे औचित्य साधून एक जागतिक संमेलन आयोजित केले. या संमेलनाची अध्यक्षता पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी केली. या संमेलनाद्वारे ओली यांनी नेपाळ बौद्ध धर्माची जननी आणि संपूर्ण बौद्ध धर्माचा स्त्रोत असल्याचे भासविले गेले. चीनचे लक्ष स्वत:कडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला बौद्ध धर्माच्या बाबतीत नेपाळ भारतापेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला.

१९१९ मध्ये भारताद्वारे प्रकाशित नकाशा हा वादाचा नवीन मुद्दा बनलेला आहे. या नकाशामुळे नेपाळ मध्ये भारतविरोधी वातावरण निर्माण करण्यात आले आहे. त्याचा परिणाम म्हणून भारत नेपाळ सीमा रेषेवर रोज नवनवीन वाद विवाद निर्माण होत आहेत. भारत नेपाळ सीमा रेषेवरील गावात नेपाळ द्वारे अमानवीय कार्ये करण्यात येत आहेत. भारतीय नागरिकांवर हल्ले करण्यापर्यंत मजल गेली आहे. भारतीय प्रदेशावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न देखील वारंवार केला जात आहे. भारत विरोधी सूर नेपाळ मध्ये प्रबळ बनत चालल्याचे दिसून येते.कैलास मानस सरोवर यात्रा सहज आणि सोपी बनविण्यासाठी भारताद्वारे रस्त्याची निर्मिती करण्यात आली आहे. हा रस्ता तिब्बत व नेपाळच्या धारचुला क्षेत्राला लागून आहे. या रस्त्याच्या निर्मितीमुळे नेपाळ मध्ये भारत विरोधाला चालना मिळाली आहे. नेपाळ मध्ये २०१९

मध्ये झालेल्या जनगणनेनुसार नेपाळची लोकसंख्या २.८६ कोटी आहे. नेपाळ हा एक पहाडी देश असल्यामुळे रोजगराच्या संधी मर्यादित आहेत. त्यामुळे चार पैकी एक नेपाळी नागरिक रोजगाराच्या शोधत नेपाळच्या बाहेर जातो.कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर भारतात काम करणाऱ्या नेपाळी नागरिकांची यादी नेपाळ सरकारकडे उपलब्ध नव्हती.

नेपाळच्या उत्पन्नाचा दुसरा स्त्रोत म्हणजे नेपाळला भेट देणारे पर्यटक व तीर्थयात्री हे आहेत. नेपाळला भेट देणाऱ्या पर्यटकामध्ये भारतीयांचीच संख्या जास्त आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर भारत आणि नेपाळ यांच्या संबंधाची नव्याने सुरवात झाली. ३१ जुलै १९५० रोजी भारताचे पंतप्रधान प. नेहरू व नेपाळचे राजे नरेश त्रिभुवन वीर विक्रम शहा यांच्यात करार झाला. या करारानुसार भारतीय नागरिकांना दिले जाणारे सर्व अधिकार आणि संधी नेपाळी नागरिकांना देखील देण्यात येतील असे स्पष्ट केले. नेपाळी नागरिक भारतात निवडणूक लढवू शकत नाहीत तसेच यु.पी.एस.सी. परीक्षा देऊ शकत नाहीत. अशाच प्रकारचे अधिकार नेपाळ सरकारद्वारे भारतीयांना देखील देण्यात आले. परंतु अशा प्रकारची संधी नेपाळ सरकारने भारतीयांना दिली नाही व भारतीय नागरिकांनी देखील कधी मागितली नाही. ३१ जुलै १९५० च्या करारानुसार (अनुच्छेद आठ) पूर्वी झालेल्या सुगौली करारातील चुकीच्या अपमानजनक तरतुदी रद्द करण्यात आल्या या बरोबरच दोन्ही देशांनी मिळून सीमारेषा निश्चित करावी व पूर्वीच्या सुगौली संधीतील तरतुदी भविष्यात पुन्हा उल्लेख करायचा नाही असा निर्णय घेतला गेला. यानंतर १९७५ मध्ये नेपाळने आपला नकाशा जाहीर केला त्यात लीपिया धुरा क्षेत्रातील ३३५ वर्ग किमी भूमी नेपाळच्या नकाशात दाखविली नाही. दोन्ही देशांनी आपल्या १८५० किमी लांब सीमेतील ९८टक्के सीमारेषा निश्चित केली आहे.

भारत आणि नेपाळ यांच्यात दुरावा निर्माण करण्याचे कार्य चीन द्वारे नेपाळी –कम्युनिस्ट पक्षाला आर्थिक लाच देऊन केले गेले आहे. नेपाळी पहाडी राष्ट्रवादाच्या नावाखाली भारत द्वेषाला भरीस पडण्याचे कार्य केले जात आहे. या चीन द्वारे पुरस्कृत नेपाली राष्ट्रावादात भारत सैतान आहे तर चीन दयावान आहे.

**सारांश :-**

भारत आणि नेपाळ यांच्या संबंधात चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे जरी गैरसमज निर्माण झाले असले तरी भारत आणि नेपाळ यांच्यात अनेक पातळ्यावर साम्य आहे. दोन्ही देशामधील संबंध दृढ करण्यासाठी सांस्कृतिक समानता हा सर्वात महत्वाचा दुवा आहे. दोन्ही देश एका वैभवशाली संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. आणि दोघांनाही समृद्ध ज्ञानपरंपरा आहे. आयुर्वेद योग, जोतिष हे भारत आणि नेपाळ या दोन्ही देशामध्ये समान आहेत. दोन्ही देशांच्या सामायिक संस्कृतीमुळे लोकांचे संबंध दृढ होतील. नेपाळ भारत संबंधात ज्या १८१६ च्या सुगौली कराराचा उल्लेख करतो तो करार भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जो भारत नेपाळ करार ३१ जुलै १९५० मध्ये झाला त्याद्वारे निकालात निघाला आहे. ब्रिटीश सरकारने मान्य केलेल्या चुकीच्या तरतुदी स्वतंत्र भारत मान्यच करू शकत नाही. याचा नेपाळी सरकारने व जनतेने सखोल विचार करावा व पूर्वापार चालत आलेले भारत नेपाळ संबंध दृढ व मित्रत्वाचे बनवावेत.

**संदर्भ :**

*१. दै. लोकसत्ता*
*२. महाराष्ट्र टाईम्स*
*३. इंडिया टुडे*
*४. संसद चर्चा*

# आफ्रिकेसमवेत भारताची लस मैत्री

**शार्दूल अडबाले**

कोविड –१९ या साथीचा रोगाने सर्व देशभर आणि जगातील बहुतेक देशांमध्ये एक छाप सोडली आहे. आफ्रिका प्रदेशावरील देशामध्ये विषाणूंचा परिणाम बाकी देशांपेक्षा वेगळा नाही. साथीच्या रोगाचा सामना करण्यासाठी आफ्रिकन देशांनी जोरदार प्रतिसाद दिला. याचा परिणाम म्हणून, आफ्रिकेने जगाच्या इतर भागांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे

आफ्रिकी देशांशी भारताची जवळची भागीदारी आहे. अलिकडच्या वर्षांत भारताने या क्षेत्रात राजकीय आणि आर्थिक गुंतवणूक वाढविली आहे. सध्याच्या साथीच्या परिस्थितीतही भारताने या भागाशी राजनैतिक संबंध कायम ठेवले आहेत. भारत सरकारने सुरू केलेली लस मैत्री (Vaccine Friendship Initiative), आफ्रिकेबरोबर विशेषकरून आरोग्य क्षेत्रामध्ये सहकार्याने पुढे जाण्यासाठी नवीन संधी उपलब्ध करुन देते, जो आफ्रिकेबरोबरच्या भारताच्या भागीदारीचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

**भारत–आफ्रिका आरोग्य सहयोग**

आरोग्य क्षेत्रातील भारत–आफ्रिका विकास सहकार्याने बर्याच जागतिक व प्रादेशिक आरोग्य धोरणांच्या साधनांचा विचार करून अधिक लाभ मिळविला आहे. त्यापैकी प्रमुख म्हणजे शाश्वत विकास २०३० अजेंडा, ज्यात आफ्रिकन संघाने सुरू केलेले शाश्वत विकास ध्येय (एसडीजी) आणि ‘Agenda 2063: The Africa We Want’, यांचा समावेश आहे. ही साधने निरोगी जीवनाची हमी आणि सर्वांचे कल्याण करण्याचे आव्हान करतात. भारताचे राष्ट्रीय आरोग्य धोरण देखील या उद्दीष्टांचे प्रतिपादन करते.

वर्षानुवर्षे, भारत जगातील फार्मसी म्हणून ओळखली जाते. भारताने एचआयव्ही एड्स, टीबी, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य रोगांचा सामना करण्यासाठी अनेक आफ्रिकन देशांना कमी किमतीची, जेनेरिक औषधे दिली. सिपला या भारतीय कंपनीने एचआयव्ही एड्सच्या उपचारांसाठी कमी किंमतीत एचआयव्ही एड्सच्या उपचारांसाठी अँटी–रेट्रोव्हायरल औषधांचा पुरवठा केला आहे. त्याच्या Dollar-a-Day treatment programme ने अनेक आफ्रिकन देशांना मदत केली आहे. त्याचप्रमाणे, औषधी कंपनी रॅनबॅक्सी ची प्रयोगशाळा अनेक दशकांपासून आफ्रिकेत कार्यरत आहे

Pan-African e-Network हा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम २००९ मध्ये प्रथम सुरू झाला आणि २०१९ मध्ये ई–विद्या भारती ई आरोग्य भारती (ईव्हीबीएबी) प्रोजेक्ट म्हणून पुन्हा सुरू केला गेला, याअंतर्गत ५४ आफ्रिकन देशांमधील रुग्णालये आफ्रिकन डॉक्टर, नर्स आणि पॅरामेडिक्ससाठी सर्वसमावेशक टेलिफोन औषध प्रशिक्षण संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. .

**कोविड —१९ महामारी**

मार्च २०२१ मध्ये आफ्रिकेमध्ये सुमारे ३.९ दशलक्ष कोविड —१९ ची प्रकरणे नोंदली गेली आहेत. दक्षिण आफ्रिकेत (१.५ लाख) त्यानंतर मोरोक्को, ट्युनिशिया, अल्जेरिया, नायजेरिया आणि केनिया येथे सर्वाधिक प्रकरणे नोंदली गेली आहेत. प्रारंभापासूनच भारताने या प्रदेशातील देशांशी संपर्क कायम ठेवला आणि साथीच्या रोगाच्या व्यवस्थापनाविषयी माहितीची देवाणघेवाण केली

सुमारे १.३ अब्ज लोकसंख्या असलेला भारत कोविड —१९ ची मोठी लढाई लढत आहे. तथापि, भारताने आपल्या भागीदार देशांना आधार देण्याची क्षमता दर्शविली आहे. कोरोनाव्हायरस साथीचा रोग सुरू झाल्यापासून, इतरांना औषधे आणि जेनेरिक औषधे पुरवण्यात भारत आघाडीवर आहे.

आफ्रिकेतील २५ देशांसह जवळपास ९० देशांना हायड्रॉक्सीक्लोरोक्विन आणि पॅरासिटामोल टॅब्लेट, टेस्ट किट आणि इतर वैद्यकीय उपकरणे भारताने पुरविली आहेत. भारताने कोविड —१९ व्यवस्थापन आणि आफ्रिकेतील बर्याच देशांना ई—आयटीईसी अभ्यासक्रमाद्वारे आरोग्यसेवा प्रशिक्षण देऊन क्षमता वाढविण्यास मदत केली आहे.

आफ्रिकन खंडासह देशाच्या आरोग्य सहकार्याच्या उपक्रम राबविण्यात भारताच्या संरक्षण दलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मिशन सागर उपक्रमांतर्गत भारतीय नौदल जहाज, आयएनएस केसरी यांनी मॉरिशस, सेशेल्स, मादागास्कर आणि कोमोरोस यांना कोविडशी संबंधित मदत दिली. त्याचप्रमाणे मिशन 'सागर —२' अंतर्गत भारतीय नौदल जहाज, एरावत, नैसर्गिक आपत्ती आणि कोविड —१९ साथीच्या विरूद्ध लढा अधिक बळकट करण्यासाठी औषधे व साहित्य घेऊन सुदान, दक्षिण सुदान, जिबूती व एरिट्रियाला रवाना झाले. अशा प्रकारच्या मोहिमा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या SAGAR — Security and Growth for All in the Region दृष्टिकोनाशी जोडली गेली आहेत. आफ्रिकेतल्या देशासह त्याच्या सागरी शेजार्यांशी संबंधांना भारताने दिलेले महत्त्व ते अधोरेखित करतात.

**Vaccine Maitri Initiative**

कोविड लस प्रवेश आणि वितरणातील असमानतेमुळे आफ्रिकी देश आणि भारत तितकेच विव्हळले आहेत. रवांडाचे अध्यक्ष पॉल कागामे यांनी असा इशारा दिला आहे की लस राष्ट्रवादामुळे "मानवी विकासाची दशकांमध्ये होणारी प्रगती बिघडू शकते तर सर्वांसाठी लसीकरणात गुंतवणूक केल्यास नजीकच्या भविष्यात आंतरराष्ट्रीय व्यापाराला फायदा होईल." दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांनीही विकसित देशांद्वारे लसीची साठवणुक या समस्येकडे लक्ष वेधले आहे.

लस राष्ट्रवादाविरूद्ध भारताने सतत आवाज उठविला आहे आणि या लसीस जागतिक प्रवेश मिळावा यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची मागणी करण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शविला आहे. अशा वेळी, जेव्हा श्रीमंत आणि शक्तिशाली देश लस राष्ट्रवादाचा

अवलंब करीत असताना भारताने लसी मैत्री उपक्रम सुरू केला. हा उपक्रम जगभरातील देशांना मेड—इन—इंडिया कोविड लस विनामूल्य किंवा अल्प किंमतीत पुरवठा करते. भारतातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया द्वारा निर्मित ऑक्सफोर्ड—ॲस्ट्रॅजेनेका कोविशिल्ड आणि भारत बायोटेक निर्मित कोवाक्सिन हे भारतातील आघाडीच्या मेड—इन—इंडिया लस आहेत.

जगातील सर्वात मोठे लस उत्पादक देश म्हणून भारत सरकारने वसुधैव कुटुंबकम या तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने ही Vaccine Maitri Initiative सुरू केला आहे. आफ्रिकेसह जगभरातील देशांना कोव्हिड लसीचे कोट्यवधी डोस गिफ्ट केले.

सेशल्स हा पहिला आफ्रिकन देश आहे ज्याला भारतीय बनावटीच्या लस मिळाल्या. सेलेल्सचे परराष्ट्र व्यवहार व पर्यटन मंत्री सिल्वेस्ट्रे रॅडगोनडे यांनी लस हस्तांतरन कार्यक्रमाच्या वेळी नमूद केले की या ."यामुळे आमच्या दोन देशांमधील एकता, मैत्री आणि सहकार्याचे संबंध अधिक घटट् झाले आहेत"

अल्जेरिया, अंगोला, बोत्सवाना, इजिप्त, इथिओपिया, घाना, केनिया, लेसोथो, लाइबेरिया, मलावी, माली, मॉरिशस, मोरोक्को, मोझांबिक, नायजेरिया, रुवांडा, सेनेगल, सिएरा लिऑन, सोमालिया, दक्षिण आफ्रिका, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो आणि युगांडा या इतर लसी मिळालेल्या अन्य आफ्रिकन देशांनीही अशाच भावना व्यक्त केल्या.

आफ्रिकन देशांसोबत भारत आपल्या असलेला मुत्सद्देगिरीची अंमलबजावणी करीत असताना, एक महत्त्वाचे आव्हान गुन्हेगारी नेटवर्कचे आहे जे एकटे माल अपहृत करतात किंवा बनावट लस पुरवतात. दक्षिण आफ्रिकेच्या पोलिसांनी अलीकडेच बनावट कोविड —१९ लस वितरण नेटवर्कचा शोध लावला. या घटनेत तीन चिनी नागरिकांना अटक करण्यात आली. यापूर्वी चीन आफ्रिकन देशांना मेड—इन—इंडिया टॅग अंतर्गत बनावट औषधांचा पुरवठा करण्यात गुंतला होता .

अलिकडच्या वर्षात, आफ्रिका खंडातही चीनचा पाऊल पडत आहे. अनेक आफ्रिकी देशांमध्ये मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्ये गुंतवणूकीसह द्विपक्षीय व्यापाराच्या वाढीमध्ये हे दिसून येते. साथीच्या रोगाच्या दरम्यान, चीनने सुमारे २० आफ्रिकन देशांना सिनोफर्म लस पुरवण्याचे वचन दिले आहे. दक्षिण दक्षिण सहकार्याच्या सिद्धांताच्या आधारे भारताचे Vaccine Maitri Initiative आफ्रिकेच्या देशाशी संबंधांना वाढविण्यास मदत करणार आहे.

# भारत - पाकिस्तान संबंध

**प्रा. भोये सुरेश मुरलीधर**
*सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, म.गां.वि.मंदिर कला,*
*विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा जि. नाशिक. पिन कोड – ४२२२११*
*मो.न. ९८६०२६१३२२ email- sureshbhoye1975@gmail.com*

**प्रस्तावना :-**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. या दोन राष्ट्रांची निर्मितीच संबंध बिघडविण्यास कारणीभूत आहे. या दोन राष्ट्रांची धार्मिक तत्वाच्या आधारावर निर्मिती झाली आहे. पाकिस्तानने निर्मितीपासूनच सतत भारताला विरोध केला आहे. म्हणजेच अगदी सुरुवातीपासूनच तणावपूर्ण संबंध राहिले आहेत. भारत आणि पाकिस्तानातील संबंध ७३ वर्षापासूनचे आहेत. भारताने उभय देशांतील संबंध सुरळीत करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी पाकिस्तान आडमुठेपणाची भूमिका घेत आला आहे. पाकिस्तानात सत्तेमध्ये लष्करशाही, हुकुमशाही, लोकशाही असो किंवा शासनयंत्रणेचे कोणीही प्रमुख असो त्यांच्या धोरणात काहीही फरक पडत नाही हा आतापर्यंतचा इतिहास आहे. आजसुध्दा संबंधात फारशी सुधारणा झाली आहे असे म्हणता येणार नाही. पाकिस्तानबद्दल कोणताही निर्णय घेताना भारत जेवढा कडक आणि ठाम राहील तितके भारताच्या दृष्टीने चांगले राहील.

* **संशोधन पद्धती :-** सदर शोधनिबंध हा दुय्यम साधंनाच्या स्त्रोतावर आधारीत आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, चर्चासत्र, यांचा आधार घेतला आहे.

* **उद्देश :** १) भारत - पाक संबंधाची पार्श्वभूमी अभ्यासणे .

२) भारत - पाक संबंधाचे परिणाम अभ्यासणे.

*** भारत - पाक संबंध वाटचाल :-**

१९४७ मध्ये पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण करून बराचसा भूभाग व्याप्त केला आहे. नदीच्या पाण्याचे वाटप व काश्मीर प्रश्न यावरून सुरुवातीच्या काळात दोन्ही देशांमधील संबंध बिघडले. १९६५ मध्ये कच्छच्या रणाचा वाद झाला. तसेच काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. वास्तविक २६ ऑक्टोंबर १९४७ ला जम्मू - काश्मीर हे संस्थान भारतात विलीन करण्यात आले होते. संयुक्त राष्ट्राच्या मध्यस्थीने १/३ काश्मीर पाककडे व २/३ काश्मीर भारताकडे राहिला. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानचा पराभव झाला. रशियाच्या मध्यस्थीने 'ताश्कंद करार' करून संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला . १९६८ ते १९७१ या काळात अमेरिकेने पाकिस्तानला शस्त्रसंपन्न बनवले आणि याच काळात पाक - अमेरिका - चीन एकत्र आले. या परिस्थितीचा विचार करून भारताने ७ सप्टेंबर १९७१ रोजी भारत - रशिया यांच्यात २० वर्षाचा 'मैत्री करार' केला. पुढे १९७१ मध्ये 'बांग्लादेश प्रश्न' निर्माण झाला. पूर्व

पाकिस्तानातील निर्वासितांचे लोंढे भारतात आश्रयास आले. त्यांनी भारताकडे संरक्षणाची मदत मागितली. भारताने युद्धात प्रत्यक्ष सहभाग घेऊन पाकिस्तानचा जबरदस्त असा पराभव केला. पाकिस्तानचे दोन तुकडे होऊन डिसेंबर १९७१ ला बांग्लादेश निर्माण झाला. भारत - पाक दरम्यान 'सिमला करार' करून संबंध सुधारण्याचे ठरले. पण पाकिस्तानच्या विश्वासघातकी धोरणामुळे भारत - पाक संबंध सुरळीत होऊ शकले नाहीत.

१९७१ नंतरच्या काळात पाकिस्तानात सत्तांतर होऊन जनरल झिया उल हक सत्तेवर आले. त्यांनी भुत्तोंना फाशी दिली. १९८१ व १९८३ मधील दिल्ली येथील अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेत काश्मीर प्रश्न उकरून काढला. परंतु भारताच्या दृष्टीने हा प्रश्न कायमचा सुटला आहे, उलट पाकव्याप्त काश्मीर भारताला परत मिळाला पाहिजे अशी भूमिका भारताने घेतली. पाकिस्तानने काश्मीर प्रश्नातील अपयश बघून भारताच्या अंतर्गत दहशतवादाला खतपाणी घालण्यास सुरुवात केली. प्रथम पंजाबमधील शीखांना शस्त्रपुरवठा करून दहशतवादी बनवले, त्यानंतर १९८९ पासून पाकिस्तान काश्मीर खो-यातील तरुणांना, फुटीरवादी गटांना दहशतवादी बनवून आजपर्यंत तेथे हिंसाचार घडवून आणला जात आहे. त्यामुळे संबंध अधिकच बिघडत गेले आहेत. मार्च १९८३ मध्ये दोन देशांत व्यापारी व सांस्कृतिक संबंध सुधारण्यासाठी एक संयुक्त आयोग नेमण्यात आला. १९८७ मध्ये पुन्हा एक करार होऊन पश्चिम सीमेवरील सैनिक दोन्ही देशांनी काढून घेतले. १९८९ ला भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, पण पाककडून योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही.

१९९१ ला अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील शीतयुद्ध संपले व रशियाचे विघटन झाले. त्यामुळे अमेरिकेचा पाककडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलला. तसेच याचवेळी भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार करून खुली अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे भारत - अमेरिका संबंध सुधारण्यास मदत झाली. त्याचा परिणाम भारत - पाक संबंधावर झाला. इ.स. १९९३ साली पाकने मुंबईमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणले. त्यामुळे भारत - पाक संबंध बिघडले. १९९८ मध्ये दोन्ही देशांनी अणूस्फोट घडवून आणल्यामुळे परस्पर संशयाचे वातावरण बनले. त्यातच पाकिस्तानी अतिरेक्यांनी 'काठमांडू - दिल्ली' हे विमान अपहरण करून कंदाहार येथे नेले. २० फेब्रुवारी १९९९ मध्ये भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 'दिल्ली - लाहोर' बसयात्रा सुरू करून मैत्रीचा संदेश दिला. पण पाकिस्तानने कारगिलमध्ये घूसखोरी केली. त्याचे युद्धात रूपांतर होऊन पाकचा पराभव झाला. त्यानंतर इ.स. २००० मध्ये भारताने शांततापूर्ण सहकार्याच्या धोरणावर आधारीत आग्रा येथे 'शिखर परिषद' आयोजीत केली. अटलबिहारी वाजपेयी - जनरल परवेझ मुर्शरफ यांच्यात आर्थिक , सांस्कृतिक वैगरे घटकांवर चर्चा सुरू असतांना मुर्शरफ अर्धवट वाटाघाटी सोडून निघून गेले. पुढे १३ डिसेंबर २००१ ला पाक अतिरेक्यांनी भारतीय संसदेवर हल्ला केला त्यावेळी तर संबंध अधिक तणावपूर्ण बनले व युद्धाची परिस्थिती निर्माण झाली होती. पण जागतिक लोकमतामुळे युद्ध टळले. नोव्हेंबर २००३ मध्ये भारत - पाक या दोन्ही देशांमध्ये 'युद्धबंदी करार' झाला होता त्याचे पालन २००६ पर्यंत झाले त्यानंतर पुन्हा पाककडून सीमेवर गोळीबार सुरू झाला व संबंध बिघडले.

संबंध सुधारण्याच्या दृष्टीने १६ फेब्रुवारी २००५ रोजी भारत - पाक दरम्यान 'श्रीनगर - मुझफराबाद' बससेवा सुरू करण्याचे ठरले व ७ एप्रिल २००५ ला सुरू झाली. त्यामुळे भारताची प्रतिमा चांगली तयार झाली होती. भारत - पाक या दोन्ही राष्ट्रांमध्ये संघर्ष होऊ नये यासाठी अमेरिका प्रयत्न करू लागली पण २६ नोव्हेंबर २००९ मध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला करून पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण केली. २०१४ मध्ये सत्तेवर येताच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सार्क देशांच्या प्रमुखांना आमंत्रित करून शेजारील देशांबरोबर संबंध सुधारण्याचे संकेत दिले होते. परंतु गेल्या सहा सात वर्षात पाकिस्तानशी संघर्ष होऊन संबंध ताणले गेले. १४ फेब्रुवारी २०१९ मध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी पुलवामा येथे दहशतवादी हल्ला केला त्यामुळे संबंध बिघडुन दोन्ही देशांतील व्यापार स्थगित करण्यात आला. पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांशी एकाचवेळी संघर्ष करणे भारताच्या हिताचे नाही.

**सारांश :-**

बदलत्या जागतिक परिस्थितीत रशिया आता चीन व पाकिस्तानशी नव्याने मैत्रीचे संबंध प्रस्थापित करू पाहत आहे. अफगाणमधील तालिबानबरोबरची बोलणी यशस्वी करण्यासाठी अमेरिकासुद्धा पाकिस्तानवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानला अफगाणिस्थानात शिरकाव करता येणार नाही याची खबरदारी भारताला घेणे गरजेचे आहे. पाकिस्तानशी गोठलेले संबंध हळूहळू वितळत आहेत असे वाटत असले तरी कोणत्याही क्षणी ते पुन्हा गोठले जाऊ शकतात. सध्या भारताचे माजी नौदलप्रमुख कुलभूषण जाधव प्रकरणावरून दोन्ही देशांमध्ये तणावाचे बनले आहेत. भारत - पाकमधील सर्वात ज्वलंत प्रश्न काश्मीर असून तो सोडवणे अद्याप कोणत्याही शासनकर्त्याला शक्य झाले नाही. भारताने अनेकवेळा प्रामाणिक प्रयत्न केले पण पाककडुन विश्वासघात झाला. भारत - पाक मधील तणाव निवळून उभय देशांमधील संबंध शांतता व सुदृढ व्हावेत यासाठी संयुक्त अरब अमीराती मध्यस्थी करत आहे. भारत - पाक संबंध सुधारण्यासाठी दोन्ही देशांमध्ये प्रशासकीय आणि राजकीय चर्चा सुरू करून दोन्ही राष्ट्रांच्या विकासासाठी परस्पर सहकार्य व मैत्रीचे संबंध ठेवणे गरजेचे आहे. दोन्ही शेजारील देशांमध्ये संबंध चांगले असले तरच जगातील इतर देशांबरोबर संबंध सहकार्याचे निर्माण होतील. पण पाकिस्तान कसे सहकार्य करते यावर अवल्बुन आहे.

**संदर्भ :-**

*१) आंतरराष्ट्रीय सबंध - डॉ. वसंत रायपूरकर, मंगेश प्रकाशन, नागपूर -२००६*
*२) भारत आणि जग - डॉ. बी.डी. तोडकर, डायमंड पब्लिकेशन पुणे - जुलै २०१०*
*३) आंतरराष्ट्रीय सबंध - डॉ. वा.भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन जळगाव-२०११*
*४) आंतरराष्ट्रीय सबंध - डॉ. वसंत रायपूरकर, मंगेश प्रकाशन नागपूर - १० मार्च १९९४*
*५) भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर- डॉ. शैलेन्द्र देवळाणकर प्रतिमा प्रकाशन, पुणे - मार्च २००७*
*६) अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध - शिवम पाल, वंदना पब्लिकेशन, नई दिल्ली २००१*
*७) राज्यस्तरीय चर्चासत्र - डिसेंबर २०१७*
*८) महाराष्ट्र टाइम्स - २१ एप्रिल २०१२*
*९) लोकसत्ता - ६ डिसेंबर २०१८*

# २१ व्या शतकातील भारताचे बदलते पाकिस्तान विषयक धोरण

**प्रा. तानाजी संभाजी माने**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख,,लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जी - चंद्रपूर (म.रा.)*

**प्रस्तावना:-**

भारत हे शांतताप्रेमी,लोकशाहीप्रधान व मानवतावादी मुल्य जपणारे राष्ट्र आहे. भारताने सुरूवातीपासून व्यापक धोरणातून शेजारील राष्ट्राशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्र विकास व जनकल्याणाचे उद्दिष्ट साधण्यासाठी देशांतर्गत राजकीय स्थैर्य व शांततेबरोबरच शेजारील देशांसोबत शांततावादी, परस्पर सहकार्याचे व मैत्रीचे संबंध असणे आवश्यक ठरते. म्हणूनच भारताने परराष्ट्र धोरणाची आखणी करतांना आपल्या शेजारील राष्ट्रांशी अत्यंत जिव्हाळयाचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शेजारील राष्ट्रासोबत 'मित्रत्वाचे संबंध' हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्ये राहिले आहे. या संदर्भात पं. नेहरूंनी म्हणतात की,"आंतरराष्ट्रीय पातळीवर आज तटस्थतेला (विलगता) कोणतेही स्थान नाही. एक दुस-यापासून विलग राहिल्याने आमचे अस्तित्व नष्ट होईल. यासाठी आम्हाला एक तर एकमेकांसोबत सहकार्य केले पाहिजे किंवा युध्द केले पाहिजे, आम्हांला शांतता पाहिजे. त्यामुळे आम्ही एकमेकांसोबतच्या युध्द या पर्यायाचा स्विकार करत नाही."[1]

असे असले तरी स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच भारताचे शेजारील राष्ट्रासोबत विशेषत : पाकिस्तान आणि चीन सोबतचे संबंध हे ताणतणावाचे राहिलेले आहेत. भारताच्या फाळणी पासूनच भारत-पाकिस्तान चे संबंध आहे अतिशय तणावाचे राहिले आहेत. त्यात प्रामुख्याने १९४७ पासून ते अद्याप पर्यंत भारताचा पिच्छा पुरवलेली सर्वात कठीण समस्या म्हणजे काश्मीर समस्या होय. काश्मीर समस्या ही उभय देशांतर्गत असलेली ज्वालामुखी सारखी समस्या आहे. जी थोडया-थोडया वेळाने बाहेर येत असते. या संदर्भात अलाप माईकल असे मत व्यक्त करतात की, "काश्मीर समस्या ही मुलतः जमिन व पाण्याची समस्या नाही, तर ती जनतेची आणि प्रतिष्ठेची समस्या आहे."[2] म्हणजे काश्मीरची समस्या ही उभय देशात आतापर्यंत विविध युध्दाला कारणीभूत ठरली आहे.एकंदरीत शीतयुद्धकालीन व शीतयुध्दोत्तर भारताच्या पाकिस्तान विषयक धोरणाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, शीतयुध्दोत्तर काळात विशेषतः २१व्या शतकात सत्तेवर आलेल्या शासकांनी पाकिस्तानविषयक धोरणात बदल करण्याला प्राधान्य दिले आहे.

**1)मूळ संकल्पना:-**

परराष्ट्र धोरण, विभागीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण.

**2)संशोधनाचा उद्देश:-**

i) २१ व्या शतकातील भारत-पाकिस्तान संबंधाचा अभ्यास करणे.

ii) २१ व्या शतकातील भारताच्या बदलत्या पाकिस्तान विषयक धोरणाचा अभ्यास करणे.

**3)संशोधनाची गृहितके:-**

i)भारत-पाकिस्तान संबंधात पाकिस्तानची आडमुठी भूमिका आणि सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देण्यामुळे उभय देशात सुधारणा होऊ शकली नाही.

ii)२१ व्या शतकात भारताने पाकिस्तान विषयक धोरणात बदल केला आहे.

**4)संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधात ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**5) तथ्याचे विश्लेषणात्मक निर्वचन:-**

**I) मा.अटल बिहारी वाजपेयी आणि भारत पाकिस्तान संबंध:-**

स.न. १९९८ साली केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आले. अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९८ साली पोखरण येथे पाच आणि चाचण्या करून भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्त्वपूर्ण बदलाचा संकेत दिला. या अणुचाचण्यामुळे भारत एक जबाबदार अण्वस्त्रसंपन्न राष्ट्र बनले.भारताने या अणुचाचण्या स्वसुरक्षिततेच्या आवश्यकतेतुन केल्याचे जाहीर केले. २७ मे १९९८ रोजी लोकसभेत बोलताना अटलजी म्हणाले,"आपण अण्वस्त्रसज्ज आहोत,ही आता वस्तुस्थिती आहे. आम्हाला कुणाला भय दाखवावयाचे नाही पण आम्हालाही कोणीही अण्वस्त्रांची भीती दाखवू नये. भारत म्हणजे पृथ्वीच्या पाठीवरची एक षष्ठांश मानवजात आहे,हे कुणी विसरू नये."[3] एकंदरीत या अण्वस्त्र चाचण्या म्हणजे भारतीय परराष्ट्र धोरणातील नैतिक वादाकडून यथार्थवादाकडे झालेल्या परिवर्तनाचा स्पष्ट संकेत मानला जातो. अटल बिहारी वाजपेयी सरकारच्या भारत-पाकिस्तान संबंधाची महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे कारगिल युद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकिस्तानला एकटे पाडणे आणि दहशतवादासारख्या समस्याला भारताच्या परराष्ट्र धोरणात प्राथमिकता देणे ही राहिले आहेत.

अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९८ साली सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर शेजारील राष्ट्रांशी सोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याला प्राधान्य दिले. कारण त्यांची अशी धारणा होती की, भारत एक मोठा देश आहे. त्यामुळे आपल्या शेजारी राष्ट्रांच्या गरजाबाबत आपण अधिक संवेदनशील असले पाहिजे,याचाच एक भाग म्हणून त्यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याला प्राधान्य दिले. याबाबत त्यांनी म्हटले होते की,"भारत आणि पाकिस्तानच्या संबंधाबाबत बोलायचं तर अनावश्यक ताण-तणावांनी उभय राष्ट्रात शत्रुत्वाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे जेव्हा कधी परस्पर संबंध सुधारण्याची छोटीशी सुद्धा संधी उपलब्ध होईल, तेव्हा तेव्हा आपलं सरकार संबंध सुधारण्याच्या दृष्टीने पुढाकार घेईल."[4] भारत-पाकिस्तानातील संबंध सुधारण्यासाठी लाहोर बस यात्रा आणि लाहोर घोषणा पत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. हा करार म्हणजे दोन्ही देशाच्या शांतता आणि सुरक्षितेसाठी एक महत्त्वपूर्ण घटना मानले जाते. मात्र पाकिस्तानने कारगिल क्षेत्रात केलेल्या घुसखोरीमुळे उभय देशातील संबंध बिघडले. अटलबिहारी वाजपेयीनी कारगिल युद्धात ऐतिहासिक विजय मिळवण्याबरोबरच आपल्या राजकीय कूटनीतीच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणात

पाकिस्तानला एकटे पाडले. २००३ साली दोन्ही देशातील सहकार्यासाठी वाजपेयी सरकारने राजकीय इच्छाशक्ती दाखवली. तसेच २००४ साली पाकिस्तानात संपन्न झालेल्या सार्कच्या १२ व्या शिखर संमेलनात अटलबिहारी वाजपेयीनी सहभाग घेतला. पाकिस्तानचे राष्ट्रपती परवेझ मुशर्रफ यांच्याशी संवाद स्थापित केला. सार्कच्या शिखर परिषदेनंतर पाकिस्तानशी पुन्हा संवादाची प्रक्रिया सुरू केली. अशाप्रकारे उभय देशातील राजकीय कटुता संपुष्टात आणण्याचा प्रयत्न वाजपेयी सरकारच्या काळात करण्यात आला.

**II) डॉ. मनमोहन सिंग आणि भारत पाकिस्तान संबंध:-**

२००४ साली केंद्रात सत्तांतर होऊन डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले. डॉ. सिंग यांचे सरकार २००४ ते २०१४ अशी सलग दहा वर्ष केंद्रात होते. यूपीए शासनाच्या पहिल्या सरकारच्या काळात (२००४ ते २००९) अमेरिका,चीन आणि पाकिस्तान सोबत महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. मात्र यूपीए शासनाच्या दुसऱ्या काळात (२००९ ते २०१४) केंद्र शासनात प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व वाढल्याने परराष्ट्र धोरण प्रभावित झाले होते. २००४ साली सत्तेवर आल्यानंतर यूपीए सरकारने 'किमान समान कार्यक्रम' जाहीर केला. त्यात परराष्ट्र धोरणाच्या संचलनाचे काही मुख्य आधार निश्चित करण्यात आले. "भारत सरकार स्वतंत्र परराष्ट्रनीतीच्या अनुसार चालेल. आंतरराष्ट्रीय संबंधांत बहूधुर्वीय दृष्टीकोनाचा स्वीकार केला जाईल,पाकिस्तान सोबत शांततेचे प्रयत्न सुरू ठेवले जातील. दक्षेसला मजबूत बनवले जाईल. चीनसोबत सीमावादावर चर्चा सुरु ठेवली जाईल आणि पश्चिम आशिया सोबतच्या संबंधावर भर दिला जाईल इत्यादी."[5]

डॉ. मनमोहन सिंग सरकारने आर्थिक विकासाला प्राथमिकता देताना परराष्ट्र धोरणातील आक्रमकता टाळण्यावर भर दिला. कारण आर्थिक विकासासाठी शांतता आवश्यक आहे, शेजारील राष्ट्रांशी विशेषत: पाकिस्तान व चीनशी असलेले प्रश्न शांततेची बोलणी आणि चर्चेच्या माध्यमातून सोडवण्याचे अटलबिहारी वाजपेयी यांचे धोरण डॉ. सिंग सरकारने चालविले. परराष्ट्रमंत्री नटवर सिंह यांनी भारत-पाकिस्तान संबंधाबाबत सरकारचे धोरण स्पष्ट करताना म्हटले की, पाकिस्तान सोबत सर्व क्षेत्रातील संबंध सुधारण्यासाठी चर्चा सुरू ठेवली जाईल. पाकिस्तानसोबतच्या मागील धोरणात निरंतरता ठेवली जाईल. स.न. २००५ साली डॉ. मनमोहन सिंग व परवेझ मुशर्रफ यांच्यात चर्चा घडून आली. या चर्चेत जम्मू-काश्मीर, दहशतवाद, वाणिज्य दूतावास, नियंत्रण रेषा आणि सियाचीन इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली. उभय देशात प्रवाशांच्या अनुषंगाने बस सेवा, रेल्वे सेवा २००६ साली सुरू करण्यात आली. २००६ च्या हवाना येथील अलिप्ततावादी शिखर संमेलनात डॉ. मनमोहन सिंग - मुशर्रफ भेटीत उभय देशात संयुक्त रूपात दहशतवाद विरोधी तंत्र विकसित करण्यास मान्यता दिली. एकंदरीत दहशतवादी हल्ल्याच्या घटना आणि इतर अडथळ्यानंतरही बस आणि रेल्वे सेवांच्या माध्यमातून उभय देशात तीर्थाटन, पर्यटन, व्यापार आणि सांस्कृतिक आदानप्रदान वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले.

अशाप्रकारे भारत-पाकिस्तान मध्ये परस्पर चर्चेतून विश्वास निर्मिती व शांततेची प्रक्रिया सुरू होती. मात्र ही प्रक्रिया २००८ नंतर खंडित झाली. कारण नोव्हेंबर २००८ साली मुंबईवर भीषण दहशतवादी हल्ला झाला, या पार्श्वभूमीवर "या हल्ल्यातील पाकिस्तानी गुन्हेगारांना जोपर्यंत पाकिस्तान

शिक्षा करीत नाही, दाऊद इब्राहिम सारख्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगार आणि माफियांना भारताच्या स्वाधीन करीत नाही, सियाचीन आणि सरक्रिकचा प्रश्न सोडविण्यासाठी काही सकारात्मक पावले उचलत नाही, तोपर्यंत पाकिस्तानबरोबर चर्चा करायची नाही हे धोरण संयुक्त पुरोगामी आघाडी शासनाचे होते."[6] अशा प्रकारच्या अटी युपीए सरकारने टाकल्या. या अटीची पूर्तता पाकिस्तानकडून झाल्या नाहीत. याउलट भारत-पाकिस्तान सीमेवरील गोळीबाराचे आणि भारतीय सैनिकांच्या निघृण हत्येचे कृत्य पाकिस्तानकडून होत गेले. परिणामी पुढील सहा वर्षापर्यंत उभय देशात कोणत्याही प्रकारची शांतता चर्चा झाली नाही. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी पाकिस्तानला भेट दिली नाही. २०१२ साली भारत-पाकिस्तान मध्ये व्यापार आणि पासपोर्ट नियम शिथिलीकरण्यासंबंधी दोन ऐतिहासिक करार करण्यात आले. त्यामुळे उभय देशातील शांतता बोलणी सुरू होण्याची पार्श्वभूमी तयार झाली. हा करार म्हणजे दोन्ही देशांमध्ये परस्पर विश्वास वृद्धिंगत करण्याच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते, असे असले तरी या करारानंतर लगेचच सीमेवर शस्त्रसंधी उल्लंघनाच्या आणि दहशतवादी हल्ल्याच्या घटना घडल्यामुळे उभय देशातील संबंध तणावपूर्ण बनले.

### III) मा. नरेंद्र मोदी आणि भारत - पाकिस्तान संबंध:-

2014 साली सोळाव्या लोकसभा निवडणुकीत बहुमत प्राप्त करून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हे सत्तेवर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथविधीच्या वेळी सार्क कंट्रीजच्या प्रमुखाना बोलावून परराष्ट्र धोरण आणि शेजारी राष्ट्र सोबतच्या संबंधाबाबत स्पष्ट संकेत दिले होते. मा. नरेंद्र मोदींनी दक्षिण आशियातील राष्ट्रांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्याला प्राधान्य दिले. कारण भारताचा आर्थिक विकास आणि अंतर्गत सुरक्षेचा संबंध हा शेजारी राष्ट्रांमधील शांतता, तेथील लोकशाहीचे अस्तित्व, राजकीय स्थैर्य आणि त्यांच्या आर्थिक विकासाशी निगडित आहे. भारत हा खंडप्राय देश असल्याने या सार्क कंट्रीज म्हणजेच शेजारील देशांसोबत भारताच्या सीमा लागून आहे त्यामुळे या शेजारील देशांसोबत भारताच्या आर्थिक संबंधाचा विकास करणे, या शेजारील देशांच्या आर्थिक विकासामध्ये योगदान देणे हे आपले मुख्य उद्दिष्ट भारताने ठरविले आहे. केंद्रात सत्तेत आलेले मोदी सरकार हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे पाकिस्तान धोरण पुढे सुरु ठेवतील, असे मत मतांतरे मांडली जात होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सुरुवातही त्याप्रमाणेच केली होती, म्हणजेच आपल्या पहिल्या सरकारच्या शपथविधीला पाकिस्तानच्या पंतप्रधानाला आमंत्रित केले होते.

"पाकिस्तानशी पुन्हा चर्चा व्हावी यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. संवादाचे हे एक सकारात्मक पाऊल टाकून, त्यांनी आपली परराष्ट्र नीती कशी सुसंवादी व समन्वयवादी राहणार आहे याची नांदी दिली."[7] मोदी सरकारच्या पहिल्या शपथविधीला पाकचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना आमंत्रित केल्यानंतर उभय देशात संवादाची प्रक्रिया सुरू करण्यावर संमती सहमती दर्शविण्यात आली. त्यानंतर जुलै २०१५ साली शांघाय बैठकीत उभय देशात संयुक्त घोषणा पत्र जारी करून संवादाची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सहमती दर्शवली. मात्र चर्चेच्या मुद्द्याच्या अग्रक्रमावरून उभय देशातील एनएसएच्या निर्धारित बैठका रद्द करण्यात आल्या. ३० नोव्हेंबर २०१५ साली पॅरिस येथील 'जलवायू परिवर्तन

संमेलनात' उभय देशांच्या प्रमुखाची संक्षिप्त मुलाखत झाली. त्यानंतर उभय देशांच्या शिष्टमंडळाच्या बैठका झाल्या. या बैठकीत शांतता आणि सुरक्षा, दहशतवाद, जम्मू-काश्मीर आदी मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र या बैठका संपन्न होत असताना पाकिस्तान करून दहशतवादी हल्ले सुरू होते. अशा परिस्थितीत दहशतवाद आणि शांततेची चर्चा या दोन्ही बाबी एकाच वेळी सुरू ठेवणे शक्य नाही, अशी भूमिका भारताकडून घेण्यात आली. तथा भारत आता केवळ दहशतवाद या विषयावर चर्चा करेल, अशीही भूमिका घेण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाकिस्तान धोरणा बाबतचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पाकिस्तानला पूर्वीपेक्षा कमी महत्त्व देणे. याचाच भाग म्हणजे पाकिस्तान काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय प्रश्न बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यासाठी पाकिस्तान हा मुद्दा संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत उपस्थित केला. मात्र भारताने ही बाब गांभीर्याने घेतली नाही, किंवा त्यास उत्तर देण्याचे टाळले. पाकिस्तान धोरणाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पाकिस्तानच्या भारत-पाक सीमेवरील हालचालीला जशास तसे उत्तर देण्याचे स्वीकारलेले धोरण. यासोबतच मोदी सरकारला पाकपुरस्कृत दहशतवादाला आळा घालण्यात बऱ्याच प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. विशेषत: उरी आणि पुलवामा येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने केलेला सर्जिकल व एअर स्ट्राईक हा त्याचा एक भाग म्हणून सांगता येईल. एकंदरीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानकडे दुर्लक्ष करून जागतिक पातळीवर इतर देशांसोबत संबंध सुधारण्याला प्राधान्य दिले आहे. "त्यामुळे राजनैतिकदृष्ट्या विभागीय पातळीवर पाकिस्तानला अलिप्त करणे, वेगळे पाडण्यात माननीय नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण यशस्वी ठरले आहे."[8] तर दुसरीकडे जागतिक स्तरावरही पाकिस्तानची दुटप्पी भूमिका उघड केली आहे.

यासंबंधी उदाहरण म्हणून पुलवामा पुलवामा हल्ल्यानंतरच्या भारताला प्राप्त आंतरराष्ट्रीय समर्थानाचे देता येईल. पुलवामा हल्ल्यानंतर संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदाय भारताच्या पाठीशी उभा राहिला. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेने सुद्धा आपल्या इतिहासात पहिल्यांदाच या हल्ल्यावर टीका करणारा प्रस्ताव मंजूर केला. या हल्ल्यानंतर भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राइकच्या विरोधात एकही शब्द कोणी काढला नाही. यावरून असे सिद्ध होते की, भारताचा आंतरराष्ट्रीय प्रभाव वाढत आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तान हा एकटा पडत झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याचाच एक भाग म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी भारताच्या दौऱ्यानंतर पाकिस्तानला भेट देणे टाळले होते.

वरील विवेचनावरून लक्षात येते कि, शितयुध्दोत्तर  काळात त्यातल्या त्यात २१ व्या शतकात भारताच्या पाकिस्तान विषयक धोरणात  बदल झाल्याचे झाल्याचे दिसून येते. शीतयुद्धकालीन भारताचे परराष्ट्र धोरण हे पाकिस्तान केंद्रित राहिले होते. त्यामुळे पाकिस्तान बरोबरचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय राजनयाला आपली अधिक शक्ती खर्च करावी लागत होती. म्हणजेच अमेरिका व युरोपीय देशांना पाकिस्तान कसा चुकीचा आहे हे पटवून देण्याचा सातत्याने प्रयत्न करावा लागत होता. परिणामी भारताचे परराष्ट्र धोरण पाकिस्तान केंद्रित होऊ लागले होते. भारत इतर विभागीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर प्रभाव टाकण्यात कमी पडू लागला. मात्र शितयुध्दोत्तर काळात ही परिस्थिती बदलली. कारण भारताने परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे बदलले. शितयुध्दोत्तर  काळातील नवीन विश्वरचनेत विभागीय

महासत्ता बनण्याचे आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर प्रभाव टाकण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्यामुळे भारताने पाकिस्तान केंद्रीय परराष्ट्र धोरणाचा त्याग केल्याचे दिसून येते. २१ व्या शतकातील भारताच्या पाकिस्तान विषयक धोरणात झालेला पहिला महत्त्वाचा बदल म्हणजे भारतीय शासकांनी विभागीय व आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकिस्तान ना एकटे पाडण्याचे धोरण स्वीकारले. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. यातील महत्वाचे उदाहरण म्हणजे कारगील युद्धाच्या नंतर अमेरिकेला पाकिस्तानची भूमिका कशी चुकीचे आहे, हे पटवून देण्यात तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना यश मिळाले होते. म्हणजे "शीतयुध्दोत्तर काळात विशेषतः वाजपेयी शासनाच्या काळात ...... पाकिस्तानच्या आश्रयदात्यांचे मतपरिवर्तन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यात काहीसे यश मिळाल्याचे कारगिल युद्धातील अमेरिकी भूमिकेवरून दिसते."[9]

दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे उभय देशात शांततेची चर्चा किंवा बैठका घेतल्या जात असत. मात्र यासाठी पूर्वी पाकिस्तान कडून काही अटी टाकल्या जात असत. त्या अटी म्हणजे प्रमुख स्वरूपात काश्मीरची समस्या जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत भारतासोबत कोणतीही सखोल चर्चा होऊ शकत नाही, अशी आडमुठी भूमिका पाकिस्तान येत असत. मात्र आता ही परिस्थिती बदलत आहे. विशेषत: २००८ सालच्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर डॉ.सिंग सरकारने पाकिस्तान सोबत चर्चेसाठी अटी घालण्यात सुरुवात केली. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या गुन्हेगारांना शिक्षा दिली जात नाही. सीमापार दहशतवादाला जोपर्यंत पाकिस्तान प्रोत्साहन देणे थांबवत नाही, तोपर्यंत चर्चा चर्चा नाही, अशी भूमिका भारताकडून घेण्यात आली. तिसरा बदल म्हणजे भारताने पाकिस्तान प्रति स्वीकारलेली 'जशास तशी' भूमिका होय. विशेषत: अशी भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळात स्वीकारण्यात आली. आजपर्यंत सीमेवर पाकिस्तानकडून गोळीबार केला जात असला तरी भारताकडून त्यास प्रत्युत्तर दिले जात नव्हते .कारण भारत-पाकिस्तान सीमेवर तणाव वाढेल आणि त्याचे पर्यावसन अण्वस्त्रयुद्धामध्ये होईल, अशी भारताला भीती वाटत होती. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात या धोरणात बदल करून 'जशास तशी' भूमिका घेतली आहे. म्हणजे सीमेवर पाकिस्तानने गोळीबार केला तर भारताकडून त्यास सडेतोड प्रत्युत्तर दिले जात आहे. एकंदरीत भारताने आपल्या पाकिस्तान विषयक धोरणात बदल घडून आल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

**6) निष्कर्ष:-**

i) भारत-पाकिस्तान संबंधात पाकिस्तानची आडमुठी भूमिका आणि सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचे धोरण अडथळा ठरत आहे.

ii) २१ व्या शतकात भारताने आपल्या पाकिस्तान विषयक धोरणात बदल घडवून आणले आहेत. विभागीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकिस्तान एकटे पाडण्यात भारतीय राज्यकर्त्यांना यश मिळत आहे.

iii) भारत-पाकिस्तान या उभय देशात शांततेचि चर्चा करण्यासाठी पूर्वी पाकिस्तानकडून अटी घातल्या जात होत्या, मात्र आता त्यात बदल होऊन भारतातून अटी घातल्या जात आहेत.

iv) भारताकडून सीमेवरील पाकिस्तानकडून होणाऱ्या गोळीबाराला पूर्वी प्रत्युत्तर दिले जात नव्हते. मात्र आता या धोरणात नरेंद्र मोदी सरकारने बदल करून पाकिस्तानकडून सीमेवर होणाऱ्या गोळीबाराला जशास तसे उत्तर देण्याची भूमिका स्वीकारली आहे.

## संदर्भसूची:-

*१) बी. एल. फडिया, " अन्तर्राष्ट्रीय राजनीती : सिद्धांत एवं समकालीन राजनीतिक मुद्दे", साहित्य भवन पब्लिकेशन आगरा, २०१० पृष्ठ क्रमांक २१९.*
*२) क्रॉनिकल ईयर बुक, २००६, क्रॉनिकल पब्लिकेशन (प्रा.) लि. पृष्ठ क्रमांक ५६७*
*३) सारंग दर्शने, "अटलजी कवी हृद्याच्या : राष्ट्रीय नेत्यांची चरित कहाणी", राजहंस प्रकाशन, पुणे २०१८ पृष्ठ क्रमांक ४३९.*
*४) जयश्री देसाई, "राजयोगी नेता अटलबिहारी वाजपेयी", चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९८ पृष्ठ क्रमांक १३९.*
*५) राजबाला सिंह, "भारत की विदेश नीति", अविष्कार पब्लिशेर्स डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर २००५ पृष्ठ क्रमांक, ८१*
*६) शैलेंद्र देवळाणकर, "भारत आणि जग : भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध", सकाळ प्रकाशन, पुणे, २०१४, पृष्ठ क्रमांक ६५*
*७) लोकराज्य, मे २०१८.*
*८) शैलेंद्र देवळाणकर, "भारताचे परराष्ट्र धोरण : नवीन प्रवाह", सकाळ प्रकाशन, पुणे २०१७ पृष्ठ क्रमांक २१*
*९) समाज प्रबोधन पत्रिका, आक्टोंबर डिसेंबर २००८ कमांक ४२६.*

# पंडित नेहरूंचे अण्वस्त्र धोरण

**प्रा. डॉ. माधव कदम**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री शिवाजी कॉलेज, कंधार*

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.होमी भाभा यांना भारताच्या अण्वस्त्र धोरणाचे 'संस्थापक' समजले जाते. कारण भारताच्या अणवस्त्र धोरणाची पार्श्वभूमी आणि भविष्यकालीन रूपरेखा पंडित नेहरू आणि होमी भाभा यांच्याच काळात आखण्यात आली. आण्विक शक्तीच्या संदर्भात मानव आणि समाज यांच्यावर होणारा परिणाम-दुष्परिणामाच्या बाबततीत नेहरू पूर्णपणे परिचीत होते. म्हणून पंडित नेहरूंची १३ नोव्हेंबर १९४५ ला पत्रकार परिषेत स्पष्ट केले की, "अणु शक्तीचा शोध निश्चितपणे मानवी सभ्यतेसाठी एक महान क्रांती आहे. परंतु अणुशक्तीमुळे मानवी सभ्यता समाप्त सुद्धा होऊ शकते. तसेच अणुशक्तीमुळे विकासाचे शिखर गाठता येते."[१] भारताचे आण्विक धोरण निर्धारित करीत असताना तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी 'जागतिक शांतता व नि:शास्त्रीकरण' या धोरणाचा पाठपुरावा करून अणु शक्तीचा वापर शांततेसाठी व आर्थिक विकासासाठी केला पाहिजे व जागतिक पातळीवर सर्व अण्वस्त्रांचे नि:शस्त्रीकरणे केले पाहिजे. अशी आदर्शवादी भूमिका घेऊन आण्विक धोरणास सुरूवात केली. नेहरूंनी भारतीय अण्वस्त्र धोरणाची दोन मुख्य ध्येय निर्धारीत केली. एक म्हणजे अणुबॉम्बची नर्मिती न करण्याचा निश्चय करणे आणि जागतिक नि:शास्त्रीकरणाला संपूर्ण पाठिंबा देणे. दुसरे म्हणजे, अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व आर्थिक विकासासाठी करण्याच्या हेतूने अणुसंशोधन करीत राहणे.[२]

पंडित नेहरूनी राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात अण्वस्त्राच्या विकासापेक्षा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विकासाला प्राधान्य दिले. राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात नेहरूनी सुरूवातीपासूनच आण्विक उर्जेच्या शांततापूर्ण विकासावर भर दिला. वस्तूत: भारताची अण्वस्त्र नीती प्रारंभापासूनच 'शांततेसाठी अणु' ची राहिलेली आहे. जेव्हा १९४८ ला डॉ. होमी भाभा यांच्या अध्यक्षतेखाली परमाणू उर्जा आयोगाची स्थापना करून अण्वस्त्र कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली तेव्हा पंडित नेहरूंनी होमी भाभांना पुर्ण सहकार्य केले. भारतीय शास्त्रज्ञ आपले ज्ञान आणि कौशल्याचा वापर करून अण्वस्त्र शक्तीच्या संदर्भात सक्षम झाले असते. परंतु पंडित नेहरुच्या नि:शस्त्रीकरणावरील आस्थेमुळे भारताला अण्वस्त्राच्या स्पर्धेपासून दूर ठेवले.[३] भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया सुरु असतानाच भारताच्या अण्वस्त्र धोरणाची रुपरेखा आखली जात होती. २२ जानेवारी १९४७ ला संविधान सभेत बोलत असताना नेहरुंनी असे म्हटले की, "आम्ही अणुबॉम्ब आणि त्यांच्या वेगवेगळ्या उर्जेसंबंधी ऐकलो आहोत. परंतु आज विश्वामध्ये दोन गोष्टीच्या संदर्भात विवाद आहेत. ते म्हणजे एक अणुबॉम्ब आणि दुसरे मानवतेची भावना. मला अशी आशा आहे की, भारत संपूर्ण विश्वात महान आणि चांगली भूमिका घेईल. भारत मानवतेच्या रक्षणासाठी आपली शक्ती लावेल. माझा असा विश्वास आहे की, या जगात अणुबॉम्बवर मानवांच्या भावना मात करतील."[४]

जून १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघासमोर अण्वस्त्र उत्पादन बेकायदेशीर ठरवण्याचा व त्याचे उल्लंघन करणाऱ्यावर कडक निर्बंध लादण्याचा ठेवला गेलेला प्रस्ताव निष्फळ ठरला. यामुळे नेहरु फार

खिन्न झाले. अमेरिकेचे प्रतिनिधी म्हणून करोडपती बनॉर्ड बाराख यांनी हा प्रस्ताव मांडताना म्हटले की, "आज आपल्याला त्वरीत कृती किंवा मृत्यू यातून एकाची निवड करावयाची आहे."[५] पंडित नेहरुंनी शस्त्रास्त्राच्या संदर्भात भारतीय परराष्ट्र धोरणाचे स्पष्टीकरण करित असताना अमेरिकेने हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बचा तीव्र विरोध केला. नेहरुंच्या मते भारताने विश्वातील अन्य राष्ट्रांना सोबत घेऊन अशा प्रकारच्या विनाशकारी शस्त्रास्त्राच्या विकासावर प्रतिबंध घातला पाहिजे. त्यासाठी भारताने आपली सक्रीय भूमिका घेतली पाहिजे. पंडित नेहरू हे गांधीच्या मार्गावर चालणारे गांधीचे अनुयायी असल्यामुळे शांतता आणि अहिंसा या तत्वाचा संस्कार नेहरुवर झाला. त्याचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणाबरोबर अण्वस्त्र धोरणावर ही झालेला दिसून येतो. त्यामुळे नेहरू अणुशक्तीचा शांततापूर्ण कार्यासाठी उपयोग करण्याच्या बाजूने होते. म्हणून २४ जुलै १९५७ ला पंडित नेहरूंनी अशी घोषणा केली की, "भारत कधीही विध्वंसक कार्यासाठी अणुशक्तीचा दुरुपयोग करणार नाही आणि प्रत्येक वेळी शांततेसाठीच अणुशक्तीचा वापर करेल. त्याचबरोबर भारतातील भविष्यात येणारी सरकार सुध्दा शांततेच्याच नीतीचा अवलंब करतील अशा प्रकारची मला आशा आहे."[६]

जागतिक शांततेचा आग्रह धरीत असताना नेहरूंनी कधीही राष्ट्रहित आणि राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड केली नाही. युध्दविरहित विश्वासाठी प्रयत्न करीत असताना अणुशक्तीच्या वापराची क्षमता निर्माण करुन त्याचा वापर करणे भारताला क्रमप्राप्त आहे हे ही नेहरूंनी ओळखले होते. २ फेब्रुवारी १९४८ मध्ये भारताचे संरक्षणमंत्री बलदेवसिंग यांना पत्र लिहिताना असे म्हटले की, "अणुशक्ती वापरणाऱ्यांनाच आता भविष्य आहे. देशाचा तो प्रमुख उर्जास्त्रोत आहे आणि संरक्षणाचा त्यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे आणि त्याचे राजकीय परिणाम विचारात घेण्यासारखे आहेत."[७] १९४८ मध्ये पंडित नेहरूंनी अणुउर्जा विधेयक संसदेमध्ये सादर करीत असताना असे म्हटले की, "या विधेयकाचा उद्देश आण्विक उर्जेचा विकास आणि त्यावर नियंत्रण करणे हा आहे. आण्विक शक्तीचा प्रथमत:च विनाशासाठी उपयोग करून आण्विक शक्तीच्या चांगल्या बाजू झाकून टाकल्या हे दुर्भाग्यपूर्ण आहे. अधीकाधिक लोक असा विचार करतात की, आण्विक शक्ती ही फक्त अणुबॉम्बच्या निर्मीतीसाठीच उपयोगाला येऊ शकते की, जी शक्ती मानवी विनाशासाठी उपयोगात येऊ शकते. परंतु आण्विक उर्जेमध्येच पूर्ण विश्वाला सुध्दा बदलण्याचे सामर्थ्य आहे."[८]

सभागृहामध्ये या विधेयकावर उलट-सुलट चर्चा मोठ्या प्रमाणात झाली. विधेयकाचे समर्थन करित असताना सेठ गोविंद दास यांनी असे म्हटले की, "नवनिर्माण आणि विनाश करण्याची शक्ती विज्ञानामध्ये आहे. आतापर्यंत विनाशाचेच काम झालेले आहे. परंतु आता विज्ञानाला नवनिर्माणाचे कार्य करावयाचे आहे आणि हे निर्माणाचे काम भारतच अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. आमच्या जवळ शास्त्रज्ञ आणि खनिज पदार्थाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. आम्ही स्वातंत्र्य सुध्दा अहिंसेच्या मार्गाने मिळवले आहे. या अहिंसक तत्वज्ञानामुळेच आण्विक उर्जेचा शोध व त्याचा उपयोगही शांतता आणि विकासाच्या कार्यासाठीच केला जाईल."[९] अणुउर्जा विधेयकावर सभागृहात चर्चा होत असताना चर्चेला उत्तर देताना नेहरू म्हणाले की, "आम्हाला जर एक राष्ट्र म्हणून विश्वात सर्वात समोर रहायचे असेल तर आण्विक उर्जेचा विकास युध्दासाठी न करता शांततापूर्ण कार्यासाठी वापर करावा लागेल. अशा प्रकारची आशा ठेवूनच अणुचा विकास करित आहोत. पुढे नेहरू म्हणाले की, मला आशा आहे की, आण्विक

शक्तीचा उपयोग मानवी जीवनाच्या विकासासाठी आणि मानवी जातीच्या आनंदासाठी करण्यात येईल. परंतु विश्वात किंवा मानवा-मानवात घृणा किंवा युध्दासाठी आण्विक शक्तीचा वापर करण्यात येणार नाही."[१०]

जगाच्या इतिहासामध्ये भारताने आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रावर आक्रमण केलेले नाही. 'जगा आणि जगू द्या' या धोरणाचाच भारताने नेहमी अंगिकार केला आहे म्हणून भारताने नेहमीच युध्द आणि शस्त्राचा धिक्कार केला आहे. पंडित नेहरूंच्या शब्दामध्ये, "अहिंसेच्या सिध्दांतावरील आमची निष्ठा आणि विश्वातील घडणाऱ्या घटनामुळे आमचा समज असा झाला आहे की, जर संपूर्ण विश्वाला युध्द आणि विनाशामध्ये ढकलायचे नसेल तर सर्व राष्ट्रांनी नि:शस्त्रीकरणाचे ध्येय ठेवले पाहिजे."[११] पंडित नेहरूंचा दृष्टिकोन मानवतावादी असल्यामुळे त्यांनी युध्द आणि युध्दाला प्रेरक असणाऱ्या सर्व घटकांना विरोध केला. नेहरू शस्त्र आणि अणुबॉम्बच्या विनाशासी संपूर्ण परिचित होते. म्हणून १४ ऑगस्ट १९४७ ला संविधान सभेत भाषण देताना असे म्हणाले की, "आपण अणुबॉम्ब तसेच आण्विक शक्तीच्या संदर्भात बरेच ऐकले आहे. पण आज अणुबॉम्ब आणि मानवी भावाना यांच्यात संघर्ष चालू आहे. परंतु मला अशी आशा आहे की, भारत या क्षेत्रात जबाबदारीची भूमिका घेऊन अणुबॉम्बपेक्षा मानवतेच्या रक्षणाला प्राधान्य देईल."[१२] नेहरूच्या मते भारत उत्पादन आणि विकासासाठी अणुउर्जेच्या प्राप्तीसाठी व विकासासाठी सक्रीय राहिल. परंतु भारताची मानवतावादाप्रति वचनबध्दता असल्यामुळे अणुचा वापर हिंसा किंवा सैन्यासाठी करणार नाही. अण्वस्त्रासंबंधी आपले धोरण स्पष्ट करीत असताना नेहरू आपल्या भाषणात असे म्हणाले की, "हे पूर्णपणे स्पष्ट आहे की, अणुउर्जेचा मानवी कल्याणासाठी व शांततापूर्ण कार्यासाठी उपयोग करता येऊ शकतो. काही वर्षानंतर अणुचा उपयोग योग्यरीतीने करता येऊ शकतो. मी सभागृहाला आठवण करुन देऊ इच्छितो की, भारताजवळ उर्जासाधने कमी असून सुध्दा फ्रान्ससारख्या औद्योगिक व विकसित राष्ट्रापेक्षा आण्विक तंत्रज्ञानाचा उपयोग शांततेसाठी करणे अधिक महत्त्वाचे आहे."[१३]

पंडित नेहरूंची वैज्ञानिक प्रवृत्ती आणि विकसित तंत्रज्ञानाकडे असलेला कल तसेच डॉ. होमी भाभा, शांतिस्वरुप भटनागर आणि पी.कृष्णन यांच्यासारख्या शास्त्रज्ञांच्या तांत्रिक ज्ञानामुळे भारताच्या अणुउर्जा विकासाला चालना मिळाली. भारतीय स्वातंत्र्यानंतर विश्वात सर्वत्र अणुयुगाला सुरुवात झाली होती. त्यामध्ये अमेरिका-रशियात चाललेल्या शितयुध्दाने मोठी भर टाकली. परंतु भारताने प्रारंभापासूनच आण्विक शस्त्राच्या स्पर्धेला विरोध केला. एवढेच नाही तर शस्त्रास्त्रावर प्रतिबंध घालण्यासाठी विश्वाला आवाहन केले. २ एप्रिल १९५४ ला पंडित नेहरू लोकसभेत भाषण करीत असताना म्हणाले की, "आण्विक, रासायनिक आणि जैविक उर्जेचा उपयोग शस्त्रास्त्र बनवण्यासाठी करण्यात येऊ नये."[१४]
आण्विक उर्जा विकासामध्ये पंडित नेहरूबरोबर डॉ. होमी भाभा यांचा सिंहाचा वाटा आहे. पंडित नेहरूंनी होमी भाभांना केवळ सहकार्यच केले नाही तर वेळोवेळी त्यांना कार्यासाठी प्रोत्साहित केले. एप्रिल १९४८ मध्ये घटनात्मक परिषदेंमध्ये भाभांच्या योजनेला विधीमान्यता देण्यासाठी अणुशक्तीविषयक विधेयक मांडण्याचे नेहरूंनी मान्य केले. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, "आता आपल्याला अणुयुगाला सामोरे जायचे आहे आणि बाष्पशक्ती किंवा वीज यापेक्षा ही शक्ती फार प्रचंड आहे. जगात सर्व क्षेत्रात आपल्याला आघाडीवर रहायचे असेल तर अणुशक्तीचा विकास आपण केला पाहिजे. इथे युध्दाचा विचार

नाही. उलट मला वाटते की, शांततामय हेतूसाठीच आपण अणुशक्ती विकसित केली पाहिजे. तथापि, राष्ट्र म्हणून आपल्यावर तिचा अन्य उपयोगासाठी वापर करण्याची वेळ आलीच, तर कोणताही धार्मिक, भावनात्मक विचार त्यापासून देशाला रोखू शकणार नाही."[१५]

विश्वामध्ये आण्विक शक्ती आणि शस्त्रास्त्राच्या संदर्भात क्रांतीकारी आणि नवनवीन प्रयोग चालू होते. त्यावेळी भारतातील प्रतिभाशाली शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांनी पंडित नेहरूंना पत्र लिहून स्वतंत्र भारतामध्ये आण्विक शक्तीच्या विकासाला आरंभ करण्याची शिफारस केली. भारताच्या आण्विक विकासाची एक विशेषता आहे ती म्हणजे भारताच्या अणु विकासाला राष्ट्रातील शास्त्रज्ञ, राष्ट्रप्रेमी भांडवलदार आणि शासन यांच्या सहकार्यातून अणु कार्यक्रम आणि धोरण विकसित झाले आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय अण्वस्त्र धोरणाच्या संदर्भात सर्व सत्ताधारी सरकारांची एकच सैध्दांतीक निती राहिलेली आहे ती म्हणजे भारत आण्विक शस्त्रास्त्र निर्माण करणार नाही. विशेषत: नेहरूंच्या काळात अण्वस्त्र धोरण अधिक दृढ राहिले. पंडीत नेहरुंनी भारताची आजची आण्विक नीती भविष्यातही कायम राहिले असे म्हटले. २० जानेवारी १९५७ टाम्बे मध्ये आशियातील पहिले रिएक्टर 'अप्सरा' चे उद्घाटन करताना नेहरू म्हणाले की, "भविष्य कोणत्याही व्यक्तीच्या हातामध्ये नाही. परंतु मी माझ्या सरकारच्या वतीने सांगू इच्छितो की, मी भविष्यातही कोणत्याही सरकारच्या वतीने असे आश्वासन देतो की, काहीही झाले तरी कोणत्याही परिस्थितीत आम्ही वाई कार्यासाठी आण्विक शक्तीचा उपयोग करणार नाहीत."[१६]
आंतरराष्ट्रीय पातळीवर शितयुध्दाने अणुबॉम्ब आणि शस्त्रास्त्राच्या विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळाली. जेव्हा अमेरिकेकडून प्रथम अणुचाचणी घेऊन अणुबॉम्ब बनवण्यात आला. तेव्हा पंडित नेहरुंनी अणुबॉम्बवर प्रतिबंध घालून सर्वच प्रकारच्या अणुचाचण्या थांबवण्याची विश्वाला विनंती केली. २ एप्रिल १९५४ मध्ये संसदेमध्ये भाषण करीत असताना नेहरू म्हणाले की, "आम्हाला अशा प्रकारच्या शस्त्रास्त्रावर सर्व संमतीने प्रतिबंध घालता आला पाहिजे. आम्हाला विश्वास आणि आशा ठेवून या विनाशकारी व धोकादायक अशा शस्त्रास्त्राच्या निर्मितीला थांबवता आले पाहिजे."[१७]

पंडित नेहरुंच्या काळात भारताचे अण्वस्त्र धारेण हे नैतिकतेला अनुसरुन होते. नेहरूंनी आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा संगम आपल्या अण्वस्त्र धोरणाच्या माध्यमातून साधला होता. नेहरूंनी २६ जून १९४६ ला मुंबईमध्ये एका सभेमध्ये बोलत असताना असे म्हटले की, "जेव्हापासून सृष्टीची रचना झालेली आहे. तेव्हापासून प्रत्येक राष्ट्र जमेल तसे उपलब्ध असलेल्या अत्याधूनिक तंत्रज्ञानाचा वापर मानवी सुरक्षेसाठी करीत आहे. म्हणून मला कसलीही शंका नाही. कारण भारत वैज्ञानिक संशोधनाचा विकास करेल आणि भारतीय शास्त्रज्ञ अणुशक्तीचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी करतील. परंतु जेव्हा कधीही भारताच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल किंवा भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल तेव्हा आपल्या जवळ असणाऱ्या प्रत्येक साधनाचा वापर आपल्या राष्ट्राच्या सुरक्षेसाठी करण्यात येईल."[१८] पंडित नेहरूंच्या अण्वस्त्र धोरणात मुख्यत: दोन गोष्टी दिसून येतात. जेव्हा विश्वामध्ये सैनिकी व शस्त्रीकरणाची स्पर्धा निर्माण झालेली होती. तेव्हा भारताला सैनिक शक्ती बनवण्याचा विचार नेहरूंना शिवला नाही. दुसरी शांततापूर्ण विकासासाठीच अणुशक्तीच्या विकासाला चालना देणे आणि आण्विक धोरणाचे पर्याय खुले ठेवणे. पंडित नेहरूंचे असे मत होते की, "महासत्ता कधीही आपल्या बलाढ्य सैनिक सामर्थ्याद्वारा आपले परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरणाचे चांगले प्रदर्शन करु शकत

नाही. कारण अण्वस्त्रापेक्षा सत्ता संतुलनाच्या माध्यमातूनच चांगल्या प्रकारे करता येऊ शकते. त्यांच्या दृष्टिने अमेरिका, रशिया च चीननंतर भारत ही विश्वातील चौथी सर्वात मोठी सत्ता होती."[१९]

१९५० च्या दशकानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या अण्वस्त्र धोरणाची भूमिका सकारात्मक आणि विधायक स्वरूपाची राहिलेली नाही. १९५६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत भाषण देत असताना वी.के. कृष्णमेनन यांनी शस्त्रनियंणासाठी केवळ नियम बनवून चालणार नाही असे म्हटले. त्यांच्या मते, "अण्वस्त्राच्या संदर्भात केवळ एकच कार्य करणे आवश्यक आहे आणि ते म्हणजे शस्त्रास्त्राची समाप्ती होय."[२०] पंडित नेहरूंचा विध्वंस आणि विनाशापेक्षा रचनात्मक कार्यावर विश्वास होता. म्हणून त्यांनी अणुबॉम्ब आणि शस्त्रास्त्राला कडाडून विरोध केला. गांधीच्या सत्य आणि अहिंसा तत्त्वावर त्यांची निष्ठा होती. म्हणून हिंसेला प्रेरित करणाऱ्या शस्त्रास्त्राचा त्यांनी धिक्कार केला. नेहरूंनी शस्त्रास्त्राच्या प्राप्तीपेक्षा त्यांच्या समाप्तीवर भर दिला. त्यांच्या मते कोणत्याही राष्ट्राने शस्त्रास्त्राची प्राप्ती करणे म्हणजेच मानवतेच्या विरुद्ध अपराध करण्यासारखे आहे. १९५७ ला नेहरू लोकसभेत बोलताना असे म्हणाले की, "आम्ही स्पष्ट स्वरुपात अशी घोषणा केली आहे की, जरी आमच्या जवळ अण्वस्त्र निर्मितीची क्षमता असली तरीही आम्ही अणुबॉम्ब बनवण्यामध्ये कसलीही रूची दाखवणार नाहीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत अणुउर्जेचा उपयोग विनाशकारी कार्यासाठी करणार नाहीत. तसेच मला अशी आशा आहे की, भारतातील भविष्यातील येणाऱ्या सरकारचे धोरण सुद्धा हेच असेल."[२१]

१९५५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत असताना कृष्णमेनन यांनी आण्विक परीक्षणावर प्रतिबंध घालण्याची मागणी केली. कारण नवीन संकल्पानुसार शस्त्रास्त्रामध्ये कपात आणि त्यांच्या वापरावर पूर्णपणे प्रतिबंध घालण्यासाठी करार करता येईल. त्याचबरोबर कृष्णमेनन यांनी नि:शस्त्रीकरणाच्या संदर्भातील चर्चेची प्रक्रिया आणि निष्कर्षाप्रत पोहचण्याच्या असमर्थतेच्या बाबतीत खेद व्यक्त केला. संयुक्त राष्ट्रसंघटनेत बोलताना कृष्णमेनन यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, "आम्ही नि:शस्त्रीकरणाच्या चर्चेच्या नवव्या वर्षात आहोत आणि आम्ही स्वत:लाच प्रश्न विचारला पाहिजे की, आमच्या प्रयत्नामुळे आम्ही युद्धाच्या एकाद्या तरी शस्त्राचा त्याग केला आहे का ? पारंपारिक शस्त्र किंवा शस्त्रास्त्राचे भांडार मर्यादित करू शकलो. नि:शस्त्रीकरणाच्या चर्चेमध्ये आणि करारामध्ये काही प्रगती झाली आहे आणि याचे उत्तर नाही असेच आहे."[२२] भारताच्या परराष्ट्र धोरणाची जडण-घडण होत असताना शस्त्रास्त्राच्या संदर्भात अमेरिकेद्वारा जपानच्या हिरोशिमा आणि नागासकी या दोन शहरांवर टाकलेल्या अणुबॉम्बचा तीव्र विरोध केला. नेहरूंच्या मते, भारताने अन्य राष्ट्रासोबत राहून अशा प्रकारच्या विनाशकारी शस्त्राच्या विकासावर प्रतिबंध घालण्यासाठी सक्रीय भूमिका घ्यावी. नेहरूंनी सर्व प्रकारच्या अण्वस्त्राच्या विकासाला विरोध दर्शविला. नेहरूंच्या शब्दात "आमची अशी सूचना आहे की, अणुचाचणी करणे थांबवावे किंवा शेवटी ती समाप्तच करण्यात यावी."[२३]

पंडित नेहरू यांच्यावर महात्मा गांधीच्या विचाराचा प्रचंड प्रभाव होता. गांधीजी अण्वस्त्राचा उपयोग-दुरूपयोगाबद्दल साशंक होते. गांधीजींची सत्य आणि अहिंसा या तत्वावर अभेद्य निष्ठा होती. जेव्हा अमेरिकेने जपानच्या शहरावर बॉम्ब टाकला. तेव्हा गांधीनी त्यावर कोणतीही प्रतिक्रीया देण्याचे टाळले. २९ सप्टेंबर १९४६ रोजी महात्मा गांधी बोलत असताना म्हणाले की, "माझ्या मनाप्रमाणे सर्व स्त्री-पुरुष व बालकांच्या विनाशासाठी अणुबॉम्बचा उपयोग करणे म्हणजे विज्ञानाचा विनाशकारी उपयोग आहे."२४

त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात सामान्य आणि महत्त्वाच्या उद्देशासाठी आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट करण्यावर भर दिला. अमेरिकेचे राष्ट्रपती हाइजेनहॉवर यांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेत 'शांततेसाठी अणु' हा ठराव मांडत असताना म्हटले की, प्रत्येक राष्ट्राच्या आण्विक क्रियेवर नियंत्रण व देखरेख करण्यासाठी एका आंतरराष्ट्रीय एजेंसीची स्थापना करण्यात यावी. तसेच या एजेंसीची स्थापना संयुक्त राष्ट्रसंघाद्वारा करण्यात यावी. हाइजेनहॉवर यांच्या प्रस्तावावर बोलताना पंडित नेहरू म्हणाले, "आम्ही सर्व या प्रस्तावावर संमत आहोत की, आण्विक सामग्री आणि त्याच्या योग्य वापरासाठी उचित आंतरराष्ट्रीय नियंत्रणाची आवश्यकता आहे. ज्यामुळे सर्व राष्ट्र संशोधनाचे कार्य योग्य प्रकारे योग्य उद्देशासाठी करू शकतील. परंतु अडचण ही आहे की हे कार्य कोणत्या पद्धतीने करता येईल. राष्ट्रपती हाइजेनहॉवर यांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचा एजन्सीचा स्वरूपात केलेला उल्लेख योग्य आहे. परंतु आपणाला हे पहावे लागेल की, वेगवेगळ्या राष्ट्रांनी अणुउर्जा नियंत्रणासंबंधी कोणकोणते प्रस्ताव दिले आहेत. अमेरिकेने या वर्षाच्या सुरुवातीलाच असे म्हटले की, आंतरराष्ट्रीय नियंत्रण एजेन्सीची स्थापना संयुक्त राष्ट्रसंघाद्वारा करण्यात यावी. वास्तवत: ही एजेन्सी संयुक्त राष्ट्रसंघ आणि सुरक्षा परिषद यांच्यापासून स्वतंत्र आणि मुक्त असेल. फक्त संयुक्त राष्ट्र संघटनेला नियंत्रण एंजेन्सीची स्थापना करण्याचा अधिकार असेल. ही एक स्वतंत्र संघटना असेल आणि या संघटनेला निरीक्षण आणि नियंत्रणाचे अमर्यादित अधिकार असतील. कोणत्याही राष्ट्राला ज्यांना अणुउर्जा उत्पादन आणि संशोधनाची अनुमती मिळालेली आहे त्या प्रत्येक राष्ट्राच्या सीमेच्या अंतर्गत निरीक्षण व नियंत्रण करण्याचा अधिकार एजेन्सीला असेल. अशाप्रकारे अणुउर्जा घटकाला सर्वोच्च दर्जा प्राप्त होईल. तसेच एजेन्सीचा स्वत:चा कर्मचारी वर्ग आणि सर्व सहायक साधने असतील या एजेन्सीचे नाव कोणतेही असू शकेल."[२५]

'विश्वशांती' हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मूलतत्त्व आहे म्हणून शांततेची प्रस्थापना हे भारताचे प्रथम उद्दिष्ट आहे. २५ ऑगस्ट १९५४ मध्ये के.एम. पन्निकर यांनी असे म्हटले की, "जर वेळ आली तर भारताला स्वत:ला स्वत:च्या क्षमतेनुसार महासत्ता बनण्याची संधी आहे. परंतु भारताला याची चिंता आहे की, भारताची प्रगती आणि विकास व सामान्यपणे मानवी समुदायाच्या उन्नतीला अवरोध करणाऱ्या युद्धाचा प्रारंभ न होवो."[२६] पंडित नेहरूच्या नेतृत्वाखालील भारताचे आण्विक धोरण हे दोन मूलभूत पायावर आधारले गेले होते. अणुविज्ञानाचा शांततामय कार्यासाठी वापर करण्यासाठी संशोधन आणि अणुकार्यक्रमाबरोबर स्वावलंबनासाठी प्रयत्न या भूमिकेचा दुसरा भाग म्हणजे अणुबॉम्बची निर्मिती न करण्याचा विचार आणि जागतिक नि:शस्त्रीकरणाला सक्रीय पाठिंबा १२ जून १९५२ मध्ये तृतीय विश्व युद्धाच्या शक्यतेच्या संदर्भात आपले शांततावादी धोरण स्पष्ट करीत असताना पंडित नेहरूंनी अशी घोषणा केली की, "आमचे प्रथम धोरण हे असले पाहिजे की, भयंकर आणि विध्वंस स्वरूपाच्या आपत्तीला प्रतिबंध घातला पाहिजे. दुसरे धोरण अशा आपत्ती व संकटापासून स्वत:चा बचाव करणे आणि तिसरे धोरण असे असले पाहिजे की, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, युद्धाची उत्पत्ती झाली तरी ते युद्ध थांबवण्यास आम्ही समक्ष असलो पाहिजे."[२७]

पंडित नेहरू शस्त्रास्त्राच्या बाबतीतील वास्तविकता पूर्णपणे जाणून होते. त्यांच्यामते शस्त्रास्त्राची पूर्णपणे समाप्ती करणे कधीही शक्य नाही. परंतु अण्वस्त्राच्या विकासाला उर्ध्व आणि क्षैतिज स्तरावर प्रतिबंध घालता येऊ शकतो. भारतीय अण्वस्त्र धोरणावर नैतीकतेचा प्रभाव असून सुद्धा नेहरू मोठया

प्रमाणात द्वंद्ववादी बनले होते. नेहरूंचा पश्चिमी संस्कृतीशी जवळचा संबंध आला होता. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव नेहरुवर होता. म्हणून राष्ट्रीय विकासासाठी आण्विक तंत्रज्ञानाचा विकास त्यांना आवश्यक वाटत होता. नेहरूंच्या मते आण्विक उर्जा शांततामय विकासासाठी उपयोगात आणावी. कारण बहुतांश लोक आण्विक तंत्रज्ञानाची प्राप्ती म्हणजे भारताचा आधुनिक युगातील प्रवेश समजत होते. नेहरूच्या मते आण्विक शस्त्रास्त्राचे परीक्षण सुद्धा आण्विक शस्त्रास्त्राच्या प्रयोगापेक्षा कमी नाही. त्यामुळे नेहरूंनी आपले पूर्ण सामर्थ्य वापरून परीक्षणावर प्रतिबंध घालण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला. अण्वस्त्रांचे नि:शस्त्रीकरण आमच्या सुरक्षात्मक हितासाठी आवश्यक आहे. हे आमचे धोरण, आमचे आदर्श, आमची नैतिक मूल्ये आणि आमच्या सिद्धांताप्रती समन्वय साधते.[२८]

नेहरूच्या मते, "विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर मानवी संहाराऐवजी मानवी कल्याणासाठी झाला पाहिजे अशा कार्यातील गुप्तता नष्ट करून पारदर्शकता निर्माण केली पाहिजे. आम्हाला तर असे वाटते की, वैज्ञानिक संशोधनाचे कार्य जाहीरपणे केले तर त्याचा फायदा विश्वातील अन्य राष्ट्रांना होऊ शकतो. मी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील गुप्त कार्याचा विरोध करतो. परिस्थितीनेच आम्हाला मजबूर बनवले आहे. नाही तर या क्षेत्रातील प्रगतीला खिळ बसेल. आम्हाला या क्षेत्रातील विकास व प्रगतीसाठी घाई करावी लागेल."[२९] पंडित नेहरूंच्या अण्वस्त्र धोरणात नैतिकता आणि आदर्शवादाबरोबर व्यवहारवाद सुद्धा दिसून येतो. म्हणून नेहरूंचे असे म्हणणे होते की, "जर आपण शक्तीशाली नसेल तर शांततेसाठी आपले म्हणणे कोणीही ऐकणार नाही. म्हणून चर्चेमध्ये सहभागी होऊन आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी प्रथमत: आपण शक्तीशाली होणे आवश्यक आहे. परंतु पंडित नेहरूंचे असेही म्हणणे होते की, शक्तीशाली होऊन चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी शस्त्रास्त्राच्या माध्यमातूनच शक्तीशाली होण्याची गरज नाही. तर हे सामर्थ्य प्रभावशाली परराष्ट्र धोरण आणि शक्ती संतुलनाच्या माध्यमातूनही प्राप्त करता येते."[३०]

भारतीय अण्वस्त्र धोरणाच्या विकासातील १९४७ ते १९६४ चा कालखंड अतिशय महत्त्वाचा राहिलेला आहे. ज्याप्रमाणे भारताच्या परराष्ट्र धोरणाची वैचारिक आणि तात्त्विक जडण-घडण पंडित नेहरूंनी केली त्याप्रमाणे भारताच्या अण्वस्त्र धोरणाची पायाभरणी सुद्धा नेहरूंनी केली. म्हणून पंडित नेहरू आणि डॉ. होमी भाभा हे खऱ्या अर्थाने भारतीय अण्वस्त्र धोरणाचे शिल्पकार ठरतात. नेहरूंनी आपल्या धोरणात अणुशक्तीचा विरोध केला नाही तर अणुशक्तीचा वापर मानवी कल्याणाऐवजी विनाशासाठी होत असेल तर त्याला विरोध केला. म्हणून नेहरूंनी शस्त्रास्त्राच्या अस्तित्वापेक्षा अण्वस्त्राच्या उद्देशावर जास्त भर दिला आहे. त्यांच्या मते आण्विक शक्तीचा वापर विध्वंसाऐवजी नवनिर्माणसाठी आणि मानवी समुदायाच्या कल्याणासाठी झाला पाहिजे. तसेच नेहरूच्या मते आण्विक क्षेत्रातील बड्या राष्ट्रांचा एकाधिकार नष्ट झाला पाहिजे. अणु शक्तीची प्राप्ती आणि विकास करण्याचा प्रत्येक राष्ट्राला अधिकार असला पाहिजे. सारांश रुपाने नेहरुकालीन भारतीय अण्वस्त्र धोरण हे शांततावादी, मानवतावादी आणि सर्वसमावेशक स्वरूपाचे राहिलेले आहे.

**संदर्भसूची :**

१. *मनु राठी, भारत-अमेरिका संबंध : आण्विक नीति के संदर्भ में, गौड पब्लिशर्स एवं डिस्ट्रीब्यूटर्स, लक्ष्मीनगर दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.२६.*

२. *डॉ. विजय खरे, जागतिक राजकारणात भारत, के सागर पब्लिकेशन्स, शनिवार पेठ, पुणे, आवृत्ती दुसरी २००८, पृ.८०.*

३. अजय उपाध्याय, नाभिकीय भारत परमाणु करार का यथार्थ, राधा पब्लिकेशन्स, अंसारी रोड दरियागंज, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९ पृ.६.
४. डॉ. श्याम बिहारी श्रीवास्तव, भारतीय परमाणू नीति-शताब्दिकी चुनौतिया, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २००६, पृ.१८८.
५. राज चेंगप्पा, मदन पाटील, शांति-अस्त्र, श्री स्वामी पब्लिकेशन्स, शनिवार पेठ, पुणे, पृ.७१.
६. मनु राठी, भारत-अमेरिका संबंध : आण्विक नीति के संदर्भ में, गौड पब्लिशर्स एवं डिस्ट्रीब्यूटर्स, लक्ष्मीनगर दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.२६.
७. राज चेंगप्पा, मदन पाटील, शांति-अस्त्र, श्री स्वामी पब्लिकेशन्स, शनिवार पेठ, पुणे, पृ.७१.
८. आदित्य अवस्थी, भारत की परमाणु यात्रा, आकाशगंगा प्रकाशन, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.२२.
९. कित्ता, पृ.२४.
१०. कित्ता, पृ.२५.
११. एअर कमोडोर जसजीत सिंह, भारतीय परमाणु शस्त्र, प्रभात प्रकाशन, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.८६.
१२. जे.एन.दीक्षित, भारतीय विदेश नीति, प्रभात प्रकाशन, आसफ अली रोड, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २०१२, पृ.२६४.
१३. कित्ता पृ. २६५.
१४. आदित्य अवस्थी, भारत की परमाणु यात्रा, आकाशगंगा प्रकाशन, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.६७.
१५. राज चेंगप्पा, मदन पाटील, शांति-अस्त्र, श्री स्वामी पब्लिकेशन्स, शनिवार पेठ, पुणे, पृ.७६.
१६. शालिनी दुबे, भारत की परमाणु नीति, पोकरण विस्फोट-II, आदि पब्लिकेशन्स, जयपुर, आवृत्ती प्रथम २०१०, पृ.४२.
१७. अजय उपाध्याय, नाभिकीय भारत परमाणु करार का यथार्थ, राधा पब्लिकेशन्स, अंसारी रोड दरियागंज, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९ पृ.७७.
१८. मनु राठी, भारत-अमेरिका संबंध : आण्विक नीति के संदर्भ में, गौड पब्लिशर्स एवं डिस्ट्रीब्यूटर्स, लक्ष्मीनगर दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.२७.
१९. कित्ता, पृ. २८.
२०. एअर कमोडोर जसजीत सिंह, भारतीय परमाणु शस्त्र, प्रभात प्रकाशन, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.८९.
२१. अजय उपाध्याय, नाभिकीय भारत परमाणु करार का यथार्थ, राधा पब्लिकेशन्स, अंसारी रोड दरियागंज, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९ पृ.६.
२२. एअर कमोडोर जसजीत सिंह, भारतीय परमाणु शस्त्र, प्रभात प्रकाशन, दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.९०.
२३. डॉ. श्याम बिहारी श्रीवास्तव, भारतीय परमाणू नीति-शताब्दिकी चुनौतिया, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २००६, पृ.७५.
२४. प्रा.ए.पी.चौधरी, सौ. अर्चना चौधरी, भारताची राष्ट्रीय सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती जुन २००३, पृ.१३५.
२५. जे.एन.दीक्षित, भारतीय विदेश नीति, प्रभात प्रकाशन, आसफ अली रोड, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २०१२, पृ.२६४.
२६. शालिनी दुबे, भारत की परमाणु नीति, पोकरण विस्फोट-II, आदि पब्लिकेशन्स, जयपुर, आवृत्ती प्रथम २०१०, पृ.३२.
२७. कित्ता, पृ.३२.
२८. कित्ता, पृ.४३
२९. आदित्य अवस्थी, भारत की परमाणु यात्रा, आकाशगंगा प्रकाशन, अंसारी रोड, दरीयागंज, नई दिल्ली, आवृत्ती प्रथम २००९, पृ.२३

# दक्षिण आशियासमोरील आव्हाने आणि सार्क

**डॉ. नंदाजी सातपुते**
*राज्यशास्त्र विभागप्रमुख, महिला महाविद्यालय, गडचिरोली.*

**प्रस्तावना:-**

सामूहिक विकास साध्य करण्यासाठी आतापर्यत जागतिक स्तरावर तथा प्रादेशिक स्तरावर विविध स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आली आहेत. यातील काही संघटनांना आपले इप्सित उदिष्ट्ये साध्य करण्यात यश आले तर काही संघटना या आपल्या समोरील आव्हानाचा सामना करू शकली नाहीत. या प्रकारची विविध उदाहरणे देता येतील. या आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करताना सर्वाना भेडसावणाऱ्या समान समस्या सोडविण्याचा विचार केला जातो. असाच एक प्रयत्न दक्षिण आशियाच्या संदर्भात १९८५ साली करण्यात आला. जगातील सर्वात अधिक लोकसंख्येचा उपखंड म्हणून दक्षिण आशिया ओळखला जातो. या उपखंडात भारत,पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, भूतान, नेपाळ,आणि मालदीव या सात संस्थापक सदस्य राष्ट्रांचा समावेश होतो. अफगाणिस्तानला २००७ साली सार्कचा आठवा सदस्य देश म्हणून मान्यता दिली. याशिवाय इतर नऊ देश व संघटना अशा आहेत की ज्यांना सार्कमध्ये निरीक्षकाचा दर्जा प्राप्त आहे. त्यात प्रामुख्याने चीन, अमेरिका, युरोपियन महासंघ यांचा समावेश आहे. या सार्क राष्ट्रांना भौगोलिक,सांस्कृतिक, भाषिक आणि धार्मिक संबंधाची एक विस्तृत अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. असे असले तरी या दक्षिण आशियाई राष्ट्रांना वारंवार विविध स्वरूपाच्या आर्थिक व सामाजिक समस्यांना आणि नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते आहे. या समस्यातील समानता आणि भौगोलिक जवळीकता यामुळे एखाद्या देशांतील घटनेचा परिणाम दुसऱ्या देशावर लागलीच पडताना दिसतो. यामुळे सार्क देशासमोर एकसमान वाटणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागीय सहकार्याची आवश्यकता वाटू लागली या आवश्यकतेतूनच सार्क संघटनेचा जन्म झाला.

सार्क ही दक्षिण आशियातील देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना आहे. या देशातील लोकांचे जीवनमान व आर्थिक स्थितीत सुधारणा आणि समाज कल्याणाचे उद्दिष्ट समोर ठेवून या संघटनेची स्थापना करण्यात आली. दक्षिण आशिया उपखंडात एक सामूहिक बाजारपेठ निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली संघटना म्हणजे सार्क होय. याद्वारे दक्षिण आशियातील देशांत आर्थिक देवाण-घेवाण म्हणजेच सहकार्य वाढीस लावण्याकरिता हे एक व्यासपीठ निर्माण करण्यात आले. आज एकविसाव्या शतकात वावरत असताना सार्क ही संघटना चाळीस वर्षाच्या पूर्ततेकडे वाटचाल करीत आहे. असे असले तरी ज्या हेतूने तथा उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात आली. त्यातील बहुतांश उद्दिष्ट्ये अजूनही कागदावरच असल्याची म्हणजेच प्रत्यक्षात उतरली नाहीत. तसेच सार्कच्या अधिवेशनात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात. मात्र त्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी राजकीय इच्छाशक्ती सदस्य देश दाखविताना दिसत नाही, किंवा सार्कला म्हणावे तितके यश मिळत नाही. यामागचे कारण म्हणजे दक्षिण आशिया समोरील असलेली विविध समस्या किंवा आव्हाने होत.

**दक्षिण आशियासमोरील आव्हाने आणि सार्क**

दक्षिण आशियातील देशांनी १९४७ ते १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे मुहूर्तमेढ रोवली. या संबधी बांग्लादेशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. मात्र दक्षिण आशियातील काही समस्या सार्क समोरील अडथळे ठरत आहेत. सार्कच्या यशस्वीमध्ये सर्वात मोठा अडथळा राहिला आहे, तो म्हणजे सार्क संघटनेतील भारत-पाकिस्तान या दोन मोठ्या देशातील असलेला संघर्ष होय. स्वातंत्र्यापासूनच या दोन्ही राष्ट्रात वैरत्व राहिले आहे. पाकिस्तानने भारताला शह देण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने स्थापन केलेल्या सिएटो व सेन्टो या लष्करी संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले आणि शीतयुद्धाचा दक्षिण आशिया उपखंडात शिरकाव झाला. शीतयुध्दोत्तर काळात अमेरिकेने आपल्या दक्षिण विषयक धोरणात बदल घडून विभागीय सत्ता समतोल टिकवण्याला प्राधान्य दिले. याचाच एक भाग म्हणजे भारताच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करण्यासाठी पाकिस्तानला मदत करणे आणि आशियातील चीनच्या वाढत्या सामर्थ्याला संतुलित करण्यासाठी भारताला 'Counter Weight' म्हणून समोर करत आहे. मात्र महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या आशियातील सत्ता समतोलाचा राजकारणामुळे भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रात मैत्री व सहकार्याच्या संबंधाची निर्मिती होत नाही. परिणामी या दोन्ही राष्ट्राच्या संघर्षाचा परिणाम सार्क संघटनेच्या कामकाजावर पडताना दिसत असल्याचे आजपर्यंतचा इतिहास आहे. म्हणजेच सार्कच्या आतापर्यंतच्या वाटचालीवर नजर टाकल्यास असे लक्षात येते की, भारत-पाकिस्तान यांच्यातील ताणलेले संबंध हा सार्कच्या यशस्वीतेमधील मोठा अडथळा ठरलेला आहे.

शीतयुध्दोत्तर काळात भारत आणि पाकिस्तान या राष्ट्र बरोबरच श्रीलंका, नेपाळ व बांगलादेश या दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कारण या देशांचे एकमेकांशी ताणलेले संबंध होय. सोबतच सोबतच यास दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये वाढलेले वांशिक संघर्ष, दहशतवादी हल्ले, धार्मिक मूलतत्त्ववादाचा वाढता प्रसार, अंमली पदार्थांचा व्यापार,लष्करशाहीचा उदय, फुटीरतावादी चळवळी आणि राजकीय अस्थिरतेमुळे लोकशाहीला आलेले अपयश इत्यादी कारणे कारणीभूत ठरलेले आहेत. एकंदरीत दक्षिण आशियाई राष्ट्रातील वाढती शस्त्रास्त्र स्पर्धा आणि संरक्षणावरील वाढता खर्च याचा निश्चितच सार्क संघटनेच्या वाटचालीवर परिणाम झाल्याचे म्हणता येईल.

दक्षिण आशियाई देशाच्या राजकीय स्थितीचा विचार केला तर असे लक्षात येते की, राजकीय अस्थिरता आणि या देशांचा अतूट संबंध राहिला आहे. विशेषतः शीतयुद्धाच्या काळात या देशात राजकीय स्थिरता अभावानेच राहिल्याचे दिसून येते. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारतात आघाडीचे सरकार सत्तेवर आले. तसेच या कालावधीत नेपाळ, बांगलादेश आणि पाकिस्तान या देशात लोकशाही सरकार सत्तेवर आली. मात्र या लोकशाही शासन प्रणालीला राजकीय अस्थिरतेचे ग्रहण लागले. त्यामुळे लोकशाही म्हणावी तितकी रुजू शकली नाही. या राजकीय अस्थिरतेचा परिणाम असा झाला की, दक्षिण आशियाला त्रासदायक ठरणाऱ्या वांशिक संघर्ष, धार्मिक मूलतत्त्ववाद, दहशतवाद आणि शस्त्रास्त्र स्पर्धा यासारख्या समस्यांचा विस्तार झाला. या समस्यांचा निश्चितच सार्कच्या वाटचाली समोर आव्हाने निर्माण केल्याचे दिसून येते.

परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप हे दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या राजकारणाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य राहिले आहे. मागील पन्नास साठ वर्षाच्या घटना-घडामोडी वरून यास पुष्टी मिळते. स्वातंत्र्यापासूनच काश्मीरच्या प्रश्नावरून पाकिस्तानने भारताच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला आहे. तर 1971 साली बांगलादेश निर्मितीत भारताला तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता पाकिस्तानच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करावा लागला होता. तसेच 1980च्या दशकात भारताने तामिळ बंडखोरांचे केलेले समर्थन तर नव्वदीच्या दशकात काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तानने जम्मू-काश्मीर क्षेत्रात फोफावले दहशतवादाचे जाळे इत्यादी. ही सर्व दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या एकमेकांच्या अंतर्गत कारभारात केलेल्या हस्तक्षेपाची काही उदाहरणे म्हणून सांगता येतील. यामुळेच दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये एकमेकांविषयी अविश्वास आणि संशयाची भावना वाढीस लागली. अशा प्रकारची भावना सार्कच्या यशस्वीतेमध्ये बाधक ठरल्याचे दिसून येते.

भारत दक्षिण आशियातील इतर देशांच्या तुलनेत भौगोलिक, लोकसंख्या, आर्थिक, लष्करी, औद्योगिक, व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान अशा सर्वच बाबतीत सरस आहे. दक्षिण आशिया खंडाच्या एकूण आकारमाना पैकी एकट्या भारताचे आकारमान हे 70 टक्के आहे. केवळ दक्षिण आशियाच्या नव्हे तर आशिया खंडातील आर्थिक आणि राजकीय घडामोडी वरही भारताचा प्रभाव पडतो.यामुळे साहजिकच दक्षिण आशियातील पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान व श्रीलंका यासारख्या शेजारी व छोट्या देशांना भारताच्या श्रेष्टविषयीची एक सुप्त भीती वाटते. या भीतीला खतपाणी घालण्याचे काम पाकिस्तान आणि चीन या देशांनी केले आहे. परिणामी भारताविषयीच्या भीतीमुळे दक्षिण आशियातील काही लहान देशांनी अमेरिका आणि युरोपियन राष्ट्राबरोबर अनेक करार केले आहेत. भारताच्या श्रेष्ठत्वामुळे दक्षिण आशियातील इतर देशांना एक भीती भेडसावत असते की, जर या लहान देशांनी सार्क संघटना अंतर्गत आपली अर्थव्यवस्था आणि बाजारपेठ भारतासाठी मुक्त केली तर तेथील देशी उद्योग धंद्यावर गदा येईल. त्यांच्या बाजारपेठा या भारतीय मालाने भरून जातील आणि त्यांची अर्थव्यवस्था डबघाईस येतील. भारतालाही या भीतीची कल्पना आहे. त्यासाठी भारतानेही आतापर्यंत विविध धोरणाच्या माध्यमातून दक्षिण आशियातील इतर लहान राष्ट्रांना मदत केले आहे. मात्र भारताचे हे प्रयत्न कमी पडताना दिसत आहेत. थोडक्यात भारताविषयीच्या सुप्त भीतीमुळे दक्षिण आशियातील राष्ट्रामध्ये विभागीय सहकार्याला म्हणावे तितके यश प्राप्त होत नाही.

आजमितीस दहशतवादाच्या समस्येने वैश्विक स्वरूप धारण केले आहे. दहशतवादाचा सर्वाधिक फटका बसलेल्या देशांमध्ये निश्चितच दक्षिण आशियाई देशांचा समावेश करावा लागेल. कारण या देशांना देशांतर्गत, सीमापार आणि जागतिक स्तरावरील अश्या तिन्ही प्रकारच्या दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. उदा-1983 पासून श्रीलंकेत सुरू झालेल्या तमिळ बंडखोरांच्या दहशतवादामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली आहे. तर दक्षिण आशियातील सर्वात मोठे राष्ट्र असलेल्या भारताला 1989 पासून पाकपुरस्कृत दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. भारताला याची सर्वात मोठी किंमत जम्मू-काश्मीरमधील हिंसाचारामुळे झालेल्या जीवित व वित्तहानी रूपात चुकवावी लागेल आहे. तसेच सार्कचे सर्वात शेवटी सदस्यत्व प्राप्त झालेले राष्ट्र म्हणजे अफगाणिस्तान होय. हे अफगानिस्तान राष्ट्र 1990 च्या दशकापासून दहशतवादाचे केंद्र बनले आहे. येथूनच भारत, चीन, रशिया मध्य आशियातील

राष्ट्र आणि युरोपातही दहशतवादी हल्ले करण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आलेले दहशतवादी पाठविले जात असत.

अमेरिका सारख्या महासत्तेला हादरवून सोडणाऱ्या सोडणाऱ्या 9 /11 च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड ओसामा बिन लादेन आणि अल् कायदा या दहशतवादी संघटनेचे धागेदोरे अफगाणिस्तान व पाकिस्तान मधील दहशतवादी संघटनेशी जोडले आहेत. एकंदरीत सार्क मधील बहुतांश राष्ट्र दहशतवादाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या शिकार बनले आहेत. यामुळे सार्कच्या वाटचालीवर त्याचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. दहशतवादाला हद्दपार करणे, सार्कच्या ठरावात घेतले जाते. मात्र पाकिस्तानच्या आडमुठ्या धोरणामुळे त्यात म्हणावी तशी प्रगती साधता येत नाही. अलीकडचे सार्कचे पाकिस्तान मध्ये होणारे अधिवेशन दहशतवादाच्या कारणावरून रद्द करण्यात आले आहे.

**समारोप:-**

सार्कने आपल्या जवळपास 40 वर्षाच्या वाटचालीत काही क्षेत्रात यश प्राप्त केले असले तरी ज्या उद्देशासाठी ही संघटना स्थापन करण्यात आली. ती उद्दिष्टे साध्य करण्यात सार्क अद्याप दूर असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे शीतयुध्दोत्तर काळात दक्षिण आशियात सत्ता संतुलनासाठी होत असलेला महासत्तेचा हस्तक्षेप, भारत -पाकिस्तानातील संघर्ष ,दक्षिण आशियातील छोट्या,मोठ्या राष्ट्रांत चाललेली शस्त्रास्त्र स्पर्धा आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या, दक्षिण आशियातील देशात असलेली राजकीय अस्थिरता, परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची प्रवृत्ती, भारता विषयी असलेली सुप्त भीती आणि दहशतवादाची समस्या इत्यादी. सार्कला जर आपले उद्दिष्ट साध्य करायचे असतील तर त्यासाठी भारत-पाकिस्तान संघर्ष संपुष्टात आणले पाहिजे, दक्षिण आशियातील देशांचा आर्थिक विकास घडवून आणणे आवश्यक आहे तसेच भारताविषयी इतर देशांनी सुप्त भीती बाळगण्यापेक्षा व्यापार, उद्योगधंदे आणि आर्थिक विकासाच्या संधी शोधल्या पाहिजेत. तसेच दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी सार्क राष्ट्रांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची:-**

*१) बी. एल. फडिया, " अन्तर्राष्ट्रीय राजनीती : सिद्धांत एवं समकालीन राजनीतिक मुद्दे", साहित्य भवन पब्लिकेशन आगरा, २०१०.*
*२) राजबाला सिंह, "भारत की विदेश नीति", अविष्कार पब्लिशेर्स डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर २००५*
*३) शैलेंद्र देवळाणकर, "भारत आणि जग : भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध", सकाळ प्रकाशन, पुणे ,२०१४.*
*४) शैलेंद्र देवळाणकर, "भारताचे परराष्ट्र धोरण : नवीन प्रवाह", सकाळ प्रकाशन, पुणे २०१७.*